|| श्री ||

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या
विद्यावाचस्पति (Ph.D.) पदवीसाठी
भारतीय विद्याशाखांतर्गत
सादर केलेला शोध प्रबंध

आदिवासी दैवत परंपरांचा अभ्यास

संशोधक
गोखले नलिनी नारायण

मार्गदर्शक
डॉ. शुभांगना अत्रे

बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

सप्टेंबर २०१५

प्रतिज्ञापत्र

मी नलिनी गोखले प्रतिज्ञेद्धारे नमूद करते की, आदिवासी दैवत परंपरांचा अभ्यास या संशोधन प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून, प्रत्यक्ष भेटीतून आणि प्राथमिक तथ्य संकलनाद्धारे संकलित केली असून त्याचा योग्य तसा उल्लेख केला आहे आणि सदर माहितीचा या प्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

ठिकाण: पुणे
दिनांक:

नलिनी नारायण गोखले
(संशोधिका)

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, भारतीय विद्याशाखांतर्गत 'आदिवासी दैवत परंपरांचा अभ्यास' या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी) पदवीसाठी नलिनी नारायण गोखले यांनी आदिवासी दैवत परंपरांचा अभ्यास या विषयावरील प्रबंधासाठी माझ्या मार्गदर्शनाखाली काम पूर्ण केले आहे.

सदर प्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहिती प्रमाणे बरोबर आहेत.

ठिकाण : पुणे
दिनांक :

डॉ. शुभांगना अत्रे
मार्गदर्शिका

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
बाल मुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्र

आभार

हे संशोधन पूर्ण करणण्यासाठी मला दीर्घकालावधी लागला. सतत प्रयत्नशील आणि संयमी राहून मी हा प्रबंध पूर्ण केला आहे.

सर्व प्रथम मी माझ्या मार्गदर्शिका प्राध्यापिका शुभांगना अत्रे यांचे मार्गदर्शन आणि वेळोवेळी त्यांनी दिलेल्या धोरणात्मक सल्ल्याबद्दल त्यांचे आभार मानते. त्यांच्या प्रोत्साहनाशिवाय मला हे कार्य पूर्ण करणे शक्य नव्हते.

श्री बाल मुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीय विद्या अध्ययन केंद्राचे विभाग प्रमुख डॉ. भट यांनी दिलेला पाठिंबा आणि मार्गदर्शन या बद्दल त्यांचेही आभार मानते. तसेच मला टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कर्मचारीवर्गाला त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद द्यायला नक्कीच आवडेल.

अथकपणे परिश्रमपूर्वक केलेल्या संपादनाच्या कामासाठी श्री.किशोर देवधर यांची मी आभारी आहे.

श्री.आप्पासाहेब घाडगे यांनी क्षेत्रकाम आणि गावाचे नकाशे तयार करण्यामध्ये केलेल्या मदतीसाठी मी त्यांची विशेष कृतज्ञ आहे.

क्षेत्रकाम आणि माहिती संग्रहात साहाय्य करणारे श्री. रामलाल काळे यांचेही मी आभार मानते.

क्षेत्रनकाशांचे क्लिष्ट काम केल्याबद्दल शीतल माहुरकर यांची मी आभारी आहे.

माझ्या कुटुंबियांचा पाठिंबा आणि समर्थनासाठी मी कृतज्ञ आहे.

स्वरजा साळस्कर आणि पंकज धनराज जाजे यांनी शुद्धलेखन आणि पृष्ठ रचनेसाठी केलेलया मदती बद्दल मी त्यांची आभारी आहे.

अंतिमत: क्षेत्रभेटी, दरम्यात ज्या लोकांनी मला आपले अनुभव सांगितले, माहिती दिली त्या सर्व व्यक्तींची मी आभारी आहे.

या अभ्यासात मला सर्वबाजूंनी मिळालेल्या मदतीने माझा अत्यंत फायदा झाला. अध्ययन, धर्म आणि त्याचा समाज जीवनाशी असलेला संबंध समजण्यासाठीच्या प्रक्रियेतील माझे हे एक लहान पाऊल आहे.

दिनांक–
नलिनी गोखले

अनुक्रमणिका

अनुक्रम	शीर्षक	पृष्ठ
प्रकरण पहिले	उपोद्घात	१ ते ४६
प्रकरण दुसरे	कोरकूंची भौगोलिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी	४७ ते १०२
प्रकरण तिसरे	कोरकू समाज जीवन	१०३ ते १६९
प्रकरण चौथे	कोरकूंचे धार्मिक जीवन	१७० ते २२९
प्रकरण पाचवे	उपसंहार	२३० ते २५८
परिशिष्ट क्रमांक १	औषधी वनस्पती	२५९ ते २६५
परिशिष्ट क्रमांक २	माखला	२६६ ते २७४
परिशिष्ट क्रमांक ३	कोरकू प्रदेशातील पेंढारींची दहशत	२७५ ते २७७
परिशिष्ट क्रमांक ४	कोरकू जाणकारांनी दिलेली माहीती	२७८ ते ३०४
परिशिष्ट क्रमांक ५	प्रश्नावली	३०५ ते ३१६
ग्रंथसूची	मराठी	३१७ ते ३२०
ग्रंथसूची	इंग्रजी	३२१ ते ३२३

नकाशा सूची

अनुक्रम	शीर्षक	पृष्ठ
नकाशा क्र. १	कोरकू प्रदेश	पान क्र. ४८
नकाशा क्र. २	महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश	पान क्र. ४९
नकाशा क्र. ३	बावरी जातकातील प्रवास मार्ग	पान क्र. ५१
नकाशा क्र. ४	ताम्रपाषाण युगातील संस्कृती	पान क्र. ५३
नकाशा क्र. ५	कोरकूंचे निवास क्षेत्र	पान क्र. ८१
नकाशा क्र. ६	कोरकू घराचा नकाशा	पान क्र. १२६
नकाशा क्र. ७	बोराटाखेडा	पान क्र. १२९
नकाशा क्र. ८	जाम्बुखेडा	पान क्र. १३०
नकाशा क्र. ९	चुनखडी	पान क्र. १३१
नकाशा क्र. १०	कसई	पान क्र. १३२
नकाशा क्र. ११	खडीमल	पान क्र. १३३
नकाशा क्र. १२	कुकरू	पान क्र. १३४
नकाशा क्र. १३	चिचखेडा	पान क्र. १३५
नकाशा क्र. १४	खामला – मेघनाद ढाणा	पान क्र. १३६
नकाशा क्र. १५	बिच्चूखेडा	पान क्र. १३७

छायाचित्र सूची

अनुक्रमणिका	शीर्षक	पृष्ठ
छायाचित्र क्र. १	मुखवटा घालून नृत्य करणारा शिकारी	४३
छायाचित्र क्र. २	भिमबेटका येथील सामूहिक शिकारीचे गुहाचित्र	४३
छायाचित्र क्र. ३	भिमबेटका येथील सामूहिक शिकारीचे गुहाचित्र	४४
छायाचित्र क्र. ४	कुलामामा (वाघ कुलदेवता)	४४
छायाचित्र क्र. ५	'श्रीमंत चिमाजी अप्पा पेशवे' यांची समाधी	४५
छायाचित्र क्र. ६	महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांची विसाव्या शतकातील समाधी	४५
छायाचित्र क्र. ७	महर्षि अण्णासाहेब पटवर्धन समाधी	४६
छायाचित्र क्र. ८	आदमगड येथील गुहाचित्र	९४
छायाचित्र क्र. ९	आदमगड येथील गुहाचित्र	९४
छायाचित्र क्र. १०	आदमगड येथील गुहाचित्र	९४
छायाचित्र क्र. ११	आदमगड येथील गुहाचित्र	९५
छायाचित्र क्र. १२	आदमगड येथील गुहाचित्र	९५
छायाचित्र क्र. १३	आदमगड येथील गुहाचित्र	९५
छायाचित्र क्र. १४	लोटा (माळवा संस्कृती).	९६
छायाचित्र क्र. १५	'चषक' (माळवा संस्कृती)	९६
छायाचित्र क्र. १६	दुधारी तलवार (माळवा संस्कृती)	९६
छायाचित्र क्र. १७	तांब्याची कुऱ्हाड (माळवा संस्कृती)	९६
छायाचित्र क्र. १८	तांब्याच्या बांगड्या(माळवा संस्कृती)	९७
छायाचित्र क्र. १९	नेकलेस (माळवा संस्कृती)	९७
छायाचित्र क्र. २०	तांब्याच्या अंगठ्या (माळवा संस्कृती)	९७

छायाचित्र क्र. २१	लाकडी नांगर	९७
छायाचित्र क्र.२२	चिखलदरा माता	९८
छायाचित्र क्र.२३	बैराटेश्वर १	९८
छायाचित्र क्र.२४	बैराटेश्वर २	९९
छायाचित्र क्र.२५	बैराटगडमाता	९९
छायाचित्र क्र.२६	बैराटगड येथील गणेश	९९
छायाचित्र क्र. २७	बैराटगड येथील प्रस्तर लेख	९९
छायाचित्र क्र.२८	डवराबाबा येथील गवळी पुजारी	१००
छायाचित्र क्र.२९	डवराबाबा	१००
छायाचित्र क्र.३०	सातमाय (डवराबाबा)	१००
छायाचित्र क्र.३१	डवराबाबा	१००
छायाचित्र क्र.३२	डवराबाबा	१०१
छायाचित्र क्र.३३	डवराबाबा	१०१
छायाचित्र क्र. ३४	चुमक्याबाबा	१०१
छायाचित्र क्र.३५	चुमक्याबाबा	१०१
छायाचित्र क्र.३६	चुमक्याबाबा	१०२
छायाचित्र क्र.३७	सातमाय (चुमक्याबाबा)	१०२
छायाचित्र क्र.३८	गुपितवाडा येथील कालाबाबा (महादेव)	१०२
छायाचित्र क्र.३९	गुपितवाडा येथील कालाबाबा (महादेव)	१०२
छायाचित्र क्र.४०	गुपितवाडा येथील कालाबाबा (महादेव)	१०२
छायाचित्र क्र.४१	कोरकूंची ग्राम रचना	१५९
छायाचित्र क्र.४२	कोरकूंची ग्राम रचना	१५९
छायाचित्र क्र.४३	कोरकूंची ग्राम रचना	१६०
छायाचित्र क्र.४४	कोरकूंची ग्राम रचना	१६०
छायाचित्र क्र.४५	कोरकू ढाणा	१६१
छायाचित्र क्र.४६	कोरकूंची ग्राम रचना	१६१
छायाचित्र क्र.४७	मातीच्या कोठ्या	१६२
छायाचित्र क्र.४८	धारणा किंवा उरोगोमाज	१६२
छायाचित्र क्र.४९.१	कोरकूंचे स्वयंपाकगृह.	१६३
छायाचित्र क्र.४९.२	दोरीवर टांगलेले कपड	१६३
छायाचित्र क्र.५०	पुढची पडवी	१६४

छायाचित्र क्र. ५१	(मातीचे जाते)	१६४
छायाचित्र क्र. ५२	मागील परसू	१६४
छायाचित्र क्र. ५३	दफन	१६४
छायाचित्र क्र. ५४	दफन	१६५
छायाचित्र क्र. ५५	भुमक्याची स्मृतिशिला	१६५
छायाचित्र क्र. ५६	देवराई	१६५
छायाचित्र क्र. ५७	द्रिष्ट काढण्याची पद्धत	१६६
छायाचित्र क्र. ५८	भूतबाधेपासून मुक्त होण्याची पद्धत	१६६
छायाचित्र क्र. ५९	नथ घातलेली स्त्री	१६६
छायाचित्र क्र. ६०	अलंकाराने नटलेली स्त्री	१६६
छायाचित्र क्र. ६१	केंडा(गळ्यातील अलंकार)	१६७
छायाचित्र क्र. ६२	बांगड्या	१६७
छायाचित्र क्र. ६३	पैंजण	१६७
छायाचित्र क्र. ६४	नथ	१६७
छायाचित्र क्र. ६५	कर्णफूल	१६७
छायाचित्र क्र. ६६	बाकरिया १	१६७
छायाचित्र क्र. ६७	बाकरिया २	१६८
छायाचित्र क्र. ६८	कपाळावर गोंदण असलेली स्त्री	१६८
छायाचित्र क्र. ६९	हातावरचे गोंदण	१६८
छायाचित्र क्र. ७०	हातावरचे गोंदण	१६८
छायाचित्र क्र. ७१	हातावरचे गोंदण	१६८
छायाचित्र क्र. ७२	पायावरचे गोंदण	१६८
छायाचित्र क्र. ७३	घराच्या रचनेत झालेला बदल	१६९
छायाचित्र क्र. ७४	आधारखांबावर केलेले चित्रांकन	१६९
छायाचित्र क्र. ७५	घरातील बदललेली सजावट	१६९
छायाचित्र क्र. ७६	घरातील बदललेली सजावट	१६९
छायाचित्र क्र. ७७	चादर	२२२
छायाचित्र क्र. ७८	चादर	२२२
छायाचित्र क्र. ७९	चोळणा	२२२
छायाचित्र क्र. ८०	चोळणा	२२२
छायाचित्र क्र. ८१	आसूड	२२२

छायाचित्र क्र.८२	मुठवा गोमाज	२२२
छायाचित्र क्र.८३	धारणा	२२३
छायाचित्र क्र.८४	खेडा	२२३
छायाचित्र क्र.८५	हनुमानाचे देऊळ	२२३
छायाचित्र क्र.८६	हनुमान	२२३
छायाचित्र क्र.८७	दैयत	२२४
छायाचित्र क्र.८८	सातमाता	२२४
छायाचित्र क्र.८९	शितलामाता	२२४
छायाचित्र क्र.९०	बाळ आणि बाळंतीणीचे रक्षण करणाऱ्या देवता	२२४
छायाचित्र क्र.९१	छटीमायची पूजा	२२५
छायाचित्र क्र.९२	छटीमायची पूजा	२२५
छायाचित्र क्र.९३	दफन	२२५
छायाचित्र क्र.९४	सिढुली ((स्मृतीशिला)	२२५
छायाचित्र क्र.९५	सिढुली ((स्मृतीशिला)	२२६
छायाचित्र क्र.९६	सिढुली ((स्मृतीशिला)	२२६
छायाचित्र क्र.९७	मंडो(गावप्रमुख किंवा विशेष दर्जा मिळालेल्या व्यक्तींचे स्मारक	२२६
छायाचित्र क्र.९८	मंडोचे स्थान	२२६
छायाचित्र क्र.९९	विवाहानंतरच्या भोजनाच्या स्वयंपाकासाठी इफ्टीन (मातीची चूल)	२२७
छायाचित्र क्र.१००	खंडीत सूर्यदेवता	२२७
छायाचित्र क्र.१०१	जिरोती सणामध्ये काठीवर चढून खेळणारा मुलगा	२२७
छायाचित्र क्र.१०२	दिवाळी सणामध्ये पूजले जाणारे पांडवांचे प्रतीक	२२७
छायाचित्र क्र.१०३	होळी	२२८
छायाचित्र क्र.१०४	होळी	२२८
छायाचित्र क्र.१०५	वाटसरूंकडे फगवा मागणाऱ्या स्त्रिया	२२८
छायाचित्र क्र. १०६	मेघनाद	२२८
छायाचित्र क्र.१०७	मेघनाद	२२९
छायाचित्र क्र.१०७. अ	रावण	२२९
छायाचित्र क्र.१०८	जेरी	२२९

छायाचित्र क्र. १०९	नाग बाबा (गुणवंत बाबा)	२५७
छायाचित्र क्र. ११०	गुणवंत बाबा	२५७
छायाचित्र क्र. १११	बिहाली वनराई	२५७
छायाचित्र क्र. ११२	बिहाली वनराई स्थित असलेल्या सिद्धुली	२५८
छायाचित्र क्र. ११३	गोठोबा	२५८
छायाचित्र क्र. ११४	टेकडीवर आमराईत राजवाड्याचे भग्न अवशेष	२५८
छायाचित्र क्र. ११५	आमराई	२७१
छायाचित्र क्र. ११६	टेकडीवर आमराईत राजवाड्याचे भग्न अवशेष	२७१
छायाचित्र क्र. ११७	भिंती जवळ मातीचा दिवा	२७२
छायाचित्र क्र. ११८	सूर्याची अस्पष्ट आकृती असलेली शिळा	२७२
छायाचित्र क्र. ११९	स्मृतिशिला	२७३
छायाचित्र क्र. १२०	बांधलेले तळघर	२७३
छायाचित्र क्र. १२१	'शक्तीबीचा बुरू, बाजाराचे स्थान	२७४
छायाचित्र क्र १२२	लाकडी नांगर	२७४

प्रकरण पहिले

उपोद्घात

परिचय

मानवाच्या उत्पत्तीच्या इतिहासाचे अवलोकन करत असताना असे जाणवते की होमोइरेक्टस्च्या (*Homo erectus*) काळापासूनच त्याला भौतिक आणि पारलौकिक जीवनातील भेदाची आणि त्या अनुषंगाने जन्म आणि मृत्यू या दोन्ही घटनांची जाणीव झालेली असावी. हे फ्रान्स येथे ला फेरासी (*La Ferrassie*) व पॅलेस्टाईनमध्ये (*Kiik koba Grotto*) झालेल्या उत्खननातून सिद्ध झाले आहे. या दोन्ही ठिकाणी होमोइरेक्टस्च्या काळातील दफने मिळाली आहेत. *(तोकारेव्ह १९८१: १)*. आल्पस् पर्वतातील गुहेत मानवासोबत अस्वलांचेही दफन केलेले आहे *(तोकारेव्ह १९८१:१०)*. विद्धानांच्या मताप्रमाणे अस्वलाच्या दफनाचे प्रयोजन त्या प्राण्याला मिळालेले धार्मिक आचारांमधील विशेष महत्त्व असावे किंवा शिकारीच्या विपुलतेसाठी दिलेल्या बळीचे (*hunting magic*) ते एक उदाहरण असावे. अथवा अस्वल हे तिथे राहणाऱ्या लोकांचे देवक असावे. दफनांच्या अवशेषातून मृत्यूनंतरच्या जीवनाची मानवाला जाणीव झाली असावी, असे बहुतांश विद्धानांचे मत असल्याचे दिसते *(तोकारेव्ह १९८१:१०)*.

भारताच्या उत्तर प्रदेशातील सराई नहर राय *(Sarai Nahar Rai)* आणि महादाह *(Mahadaha)* या दोन्ही ठिकाणी उत्खननात उत्तर अश्मयुगीन दफने मिळाली आहेत. त्यावरून अशा तऱ्हेची संकल्पना जगभर आणि भारतीय उपखंडातही अस्तित्वात असावी, असे हबीब यांनी म्हटले आहे. 'या दोन्ही ठिकाणच्या दफनभूमी सामूहिक असून तेथे स्त्रिया आणि पुरूषांचे सांगाडे सापडले आहेत. मात्र मृत्यूनंतरच्या जीवनातही स्त्री-पुरूषांना एकमेकांची सोबत मिळावी या कल्पनेने स्त्रीच्या मृत्यूनंतर पुरूषाला किंवा पुरूषाच्या मृत्यूनंतर स्त्रीला हेतुपुरस्सर मारून

दोघांच्या मृतदेहांचे एकत्र दफन केल्याचा पुरावा आढळत नाही' *(हबीब २००४:४१)*. उत्तर अश्मयुगीन काळात मरणोत्तर सहवासाची संकल्पना असावी असा पुरावा आढळला नसला तरीही उत्तर जोर्वे काळात महाराष्ट्रात इनामगावात झालेल्या उत्खननात पुरूष खाली व त्यावर स्त्री असे एकत्र दफन केलेले सापडले आहे *(ढवळीकर १९८८:४२)*. मात्र भारतामध्ये अशा तऱ्हेची दफने इतरत्र क्वचितच सापडलेली आहेत.

सराई नहर राय आणि महादाह येथील उत्खननात सापडलेल्या अवशेषांमधे जंगली धान्याच्या बिया आणि प्राण्यांची हाडे यांचा समावेश आहे. शेतीच्या किंवा लागवडीच्या तंत्राची माहिती त्या वेळच्या मानवाला झाली नसावी असे दिसते. त्याकाळी भांडीकुंडी, वस्त्रे-प्रावरणे वापरात असल्याच्या काहीही खाणाखुणा सापडल्या नाहीत. मात्र संस्कृतीच्या अशा प्राथमिक अवस्थेतही प्रेतांचे काळजीपूर्वक दफन केल्याचे आढळते. मृत्यूनंतरच्या जीवनासंबंधीच्या संकल्पना आणि मरणोत्तर जीवनासाठी केलेली काळजीपूर्वक व्यवस्था जाणवते' *(हबीब २००४:४१)* बहुतांश विद्धानांच्या मतानुसार उत्तर अशमयुगीन समाज निमभटक्या अवस्थेत जंगलात मिळणाऱ्या खाद्यपदार्थावर उपजीविका करणारा होता. तो थंडी, वाऱ्यापासून संरक्षण व्हावे या हेतूने काही काळ डोंगरकपारी आणि नैसर्गिक गुहांत आश्रय घेत असावा असे तेथे कोरलेल्या चित्रांवरून दिसते. फ्रान्समध्ये ल त्रॉय फ्रेरी *(Les Trois Freres)* येथील नैसर्गिक गुहेत काळविटाचा मुखवटा घालून नृत्य करतानाचे चित्र कोरलेले आहे *(फोटो क्र.१) (कोसंबी १९६२:०:१:५)*. मध्यप्रदेशात भोपाळजवळ भिमबेटका येथे अशा अनेक गुहा आहेत त्यातील बहुतांश चित्रे सामूहिक शिकारीची आहेत *(फोटो क्र.२-३)*.

गुहाचित्रांबद्दल देव असे मत प्रदर्शित करतात, "एकट्यादुकट्याने शिकार करण्या-पेक्षा ती समूहाने करणे सुरक्षित असल्याचे त्यावेळच्या मानवाला समजले असावे. टोळीची सदस्य संख्या वाढवणे स्त्रीलाच शक्य असल्याच्या भावनेतून तिचे महत्त्व वाढले आणि त्यातूनच मातृदेवतांची संकल्पना स्फुरली असावी. हा विधिपूर्वक

आचरणाचा आरंभ असावा, तसेच मृतात्म्याच्या भीतीतून दफनविधी सुरू झाले असावेत. शिकारीसाठी भरपूर प्राणी मिळावेत आणि अन्नाची कधी कमतरता पडू नये या उद्देशाने मानवाने प्राण्यांना देवतेचा दर्जा दिला आणि त्यांचे मुखवटे घालून यातुविधींचा आरंभ केला असावा. भक्ष्य आणि शिकारी यांच्यातील संबंधही यावरून स्पष्ट होतो. पर्यावरण किंवा वातावरणात स्वत:ला सामावून घेऊन सावज पारध्याची नजर आपल्यावर पडू नये याचा प्रयत्न करते तर शिकारी त्याचेच रूप धारण करून सावजाच्या जवळ जाण्याच्या खटपटीत असतो. सावज त्यामुळे शिकाऱ्याच्या जवळ जाते आणि त्याच्या तावडीत अलगद सापडते. शिकार करणे सुलभ व्हावे या हेतूनेच प्राण्यांची विधिपूर्वक आराधना करण्याची संकल्पना साकार झाली असावी *(देव १९७६:२३६)*. छत्तीसगढ राज्यातील दुर्गजवळ चित्रांकित गुहा सापडल्या आहेत. तेथील चित्रात प्राण्यांबरोबरच स्त्री पुरूष हातात शस्त्रे घेऊन नृत्य करताना दाखवले आहेत. असे शिकार नृत्य आजही सर्व आदिवासी समाजात प्रचलित आहे *(गौतम २००४:३६)*.

या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब गुहांमधील भित्तीचित्रांमध्ये उमटलेले दिसते. तामिळनाडू राज्यातील अर्कोट *(Arcot)* जिल्ह्यात चेन्नारायनपल्ली (*ChennaRayanPalli*) गावाजवळ सापडलेली गुहाचित्रे महापाषाणयुगीन *(Megalithic)* काळातील असल्याचे आर. व्ही. रामन यांनी १९८४ साली केलेल्या संशोधनावरून दिसते. या चित्रांच्या आधारे खन्ना असे म्हणतात की, "या गुहाचित्रात समभुज चौकोनात एकमेकींना छेदणाऱ्या रेषांचे रेखांकन असून ही देवकांची प्रतीके आहेत. सुफलनाशी संबंधित यातू कल्पनांची ही प्रतीके धार्मिक विचारांशी निगडित असावीत"*(खन्ना १९९२:४०)*. अशा रेषांनी धार्मिकता प्रदर्शित करणारे शहामृगाच्या अंड्यावरील रेखांकन महाराष्ट्रातील जळगाव जिल्हयात पाटण येथे सापडले आहे. हे संशोधन डॉ. सांकलिया यांनी केले आहे *(सांकलिया १९७४:२२८)*. बेलन नदीच्या काठी केलेल्या उत्खननात हाडांवर कोरलेली मध्यअश्मयुगातील मातृदेवतेची चित्रे

सापडली आहेत *(थापर १९८५:१४)*. वरील उदाहरणांवरून मानव निमभटक्या अवस्थेत असतानाच दैवतांवर श्रद्धा आणि मृत्यूनंतरचे जीवन या संकल्पना प्रस्थापित झालेल्या दिसतात.

धर्माचे समाजशास्त्र {Sociology of Religion}

मानवी जीवन 'हा मानववंशशास्त्राचा अभ्यासविषय आहे'. आदिवासी जीवनप्रणालींना मानवी विकासाची प्रथम अवस्था मानून मानववंशशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाचा अभ्यास केला आहे. धर्माचे समाजशास्त्र *(Sociology of Religion)* हा विषय समाज, धार्मिक श्रद्धा आणि आचार यांचा अभ्यास करते. या विषयावर विव्दानांनी सखोल विवेचनही केले आहे. धर्मपद्धतीच्या मानववंशशास्त्रांतर्गत अभ्यासाला एकोणिसाव्या शतकापासून गती मिळाली. धर्माची उत्पत्ती कोणत्या भावनेतून झाली याचा विचार अनेक विचारवंत करू लागले. त्यातून अनेक तांत्रिक विचारधारा निर्माण झाल्या. धर्मविचारांची उत्पत्ती प्रथम वैयक्तिक अनुभवातून झाली की, ती एक सामाजिक संस्था म्हणून आधी विकसित झाली यासंबंधी विशेष विचार समाजशास्त्रज्ञांनी केलेला दिसतो. त्याचाच अंतर्भाव धर्माचे समाजशास्त्र या ज्ञानशाखेत केला जातो. त्याचा येथे थोडक्यात आढावा घेणे सयुक्तिक ठरेल.

आधुनिक संस्कृतीशी येणाऱ्या संपर्कातून आदिवासी समाजाच्या विचारसरणीत आणि राहणीमानात कदाचित बदल होताना आढळत असला तरीही त्यांच्या जीवन प्रणालीतून आदिम मानवी समाजाच्या प्रथा, परंपरा, आणि विविध अवस्था यासंबंधीचे अनुमान बांधता येते. मानवी विकासाबरोबरच दैवककल्पनांमध्येही बदल होत गेल्याचे दिसते. आदिवासी समाजातील दैवतकल्पनांचा अभ्यास मानववंशशास्त्रज्ञांनी जाणीवपूर्वक केलेला आहे. कारण त्यातूनच समूहमनाचा अभ्यास करणे शक्य होते असे असले तरी इतर सामाजिक अंगांपेक्षा धर्मश्रद्धा आणि आचार यामध्ये फारच कमी गतीने बदल होताना आढळतो. आदिवासी समाजात तर

हे बदल इतक्या धिम्या गतीने होतात की ते जाणवतही नाहीत. धर्माचे समाजशास्त्र *(Sociology of Religion)* हा विषय, धार्मिक श्रद्धा आचार आणि त्याचा समाजरचनेवरील परिणाम याचा विचार करते. या विषयावर अनेक विचारवंतांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विचार केलेला दिसतो. त्यातूनच सामाजिक विकासाची दिशा दाखवणारी चौकट निर्माण झाली आहे. फ्रेंच समाजशास्त्रज्ञ कॉम्त (*Comt*) यांना या विषयाचे जनक मानले जाते. त्यांनी मानवी विकासाच्या तीन अवस्था मानल्या आहेत. या अवस्था प्रामुख्याने मानवी बुद्धी किंवा वैचारिक क्षमतेच्या विकासाचे टप्पे दर्शविणाऱ्या आहेत, उत्क्रांतिवादाच्या तत्त्वांवर आधारलेली अशी ही विचारसरणी आहे.

कॅाम्तचा तीन पायऱ्यांचा सिद्धांत

आदिम अवस्थेत मानव आधिभौतिक शक्तींवर श्रद्धा ठेवताना दिसतो. प्रत्येक घटनेच्या मागे ही शक्ती सक्रिय आहे असे त्याला वाटत असावे. त्याच वेळेस निसर्गशक्ती, देव-देवता, जादूटोणा यांच्यावरही त्यांची श्रद्धा होती असे दिसते. परंतु ही श्रद्धा वस्तुस्थितींवर आधारित नसून मानवाने वस्तुस्थितीबद्दल केलेल्या दैवी कल्पनांवर आधारित होती म्हणून त्या अवस्थेला "दैवी कल्पनांवर आधारलेली विचारसरणी" *(Theological Fictitious Stage)* असे मानले जाते. याच पायरीच्या तीन उपपायऱ्या आहेत. त्या अशा-

१) जीवात्मवाद *(Animism)*

२) बहुदेवतावाद *(Polytheism)*

३) एकेश्वरवाद *(Monotheism)*

त्यानंतरची दुसरी पायरी म्हणजे-आधिभौतिकतेवर आधारित 'अमूर्तवादाच्या' *(Meta physical - Abstract)* विकासाची पायरी. या अवस्थेत वैचारिक पातळीवरील संकल्पनायुक्त विचार मूळ धरू लागतो. त्यामुळे धार्मिक विचार अधिक अमूर्त,

तात्त्विक स्वरूपाचा होतो. याच टप्प्यावर राजा किंवा धर्मप्रमुख हाच परमेश्वराचे प्रातिनिधिक रूप आहे असे मानले जाऊ लागले असे दिसते. तिसरी पायरी 'वैज्ञानिक प्रत्यक्षवादावर' आधारित पायरी *(Scientific positivism).* या टप्प्यावर मानवाला निरीक्षण आणि प्रयोगातून अनुभवजन्य ज्ञान प्राप्त झाले असे मानले आहे. कॉम्तचा सिद्धांत थोडक्यात पुढीलप्रमाणे मांडता येईल.

ऑगस्ट कॅाम्त यांचा तीन पायऱ्यांचा सिद्धांत

अनु. क्र.	**पायरी**	**काळ**	**प्रभावी कोण**	**कोणावर प्रभाव**
१	दैवी कल्पंनांवर आधारित विचारसरणी	मानवी समाजाच्या आदिम काळापासून	देवऋषी, भगत, इत्यादी	कुटुंब
	(जीवात्मवाद, बहुदेवतावाद, एकेश्वरवाद या तीन उप-पायऱ्या आहेत)			
२	आधिभौतिकतेवर आधारित अमूर्तवादाच्या विकासाची पायरी	मध्ययुग	सैन्यदल व धर्मसत्ताधारी	शासन-प्रणाली
	(काम्य आचार आणि विधींच्या ऐवजी अमूर्त तात्त्विक चिंतनाला वाढते महत्त्व)			
३	वैज्ञानिक अनुभवगम्यतेवर आधारित पायरी, वादातीत ज्ञानाचा शोध	वैचारिक क्रांती / औद्योगिकीकरण	कायदे पंडित/ औद्योगिक प्रशासक	वैश्विक मानव समाज
	मार्गदर्शक वैज्ञानिक नीतिमूल्ये.			

कॉम्त प्रमाणेच अनेकांनी या विषयावर विवेचन केले आहे. त्यापैकी काहींचे विवेचन खाली देत आहे-

१) **इ्रखाईम** - डर्खाईमच्या मताप्रमाणे धर्म ही श्रद्धा आणि आचार यांच्या मिलापातून आकाराला आलेली संस्था आहे. म्हणजेच धर्म हा आचार आणि श्रद्धा यांचे एकत्रीकरण आहे. समाज स्वास्थ्यासाठी धार्मिक संस्थांनी ज्या आचरण पद्धतीला मान्यता दिली ती शुभ, मंगल, पवित्र (*Sacred*) असे मानले. या नियमांच्या विरूद्ध आचरण म्हणजे अशुभ, अमंगल, अपवित्र (*profane*) असे मानले. आचरण मंगल की अमंगल हे सापेक्ष (*relative*) असते.

२) **मॅक्स वेबर** *(Max Weber)* धर्म हा समाजजीवनाला कसे वळण देतो, धर्माचा समाजजीवनातील अर्थ, काम, ज्ञानप्राप्ती इत्यादी प्रेरणांवर कसा प्रभाव पडतो, अशा दृष्टिकोनातून वेबर यांनी धर्माचे विवेचन केले आहे. ते म्हणतात 'समाजरचनेत' आचरण आणि दैवत कल्पनांना महत्वाचे स्थान आहे. समाजात जसे जसे बदल घडत जातात तसे तसे देवतांचे स्वरूप बदलत जाते. आदिम अवस्थेत आधिभौतिक शक्तीला प्रमुखत्व मिळते, कृषी अवस्थेत सुफलनासाठी लिंग, गोत्र ही प्रतीके ठरतात आणि मातृदेवतेला प्रमुखत्व मिळते. स्थिर वसाहती झाल्यानंतरच ग्रामदेवता, स्थानिकदेवता आणि सत्ता गाजवणाऱ्या देवता अस्तित्वात येतात.

३) **कार्ल मार्क्स** *(Karl Marx)* कार्ल मार्क्सच्या मताप्रमाणे धर्माचे स्वरूप समाजात रूढ असलेल्या आर्थिक आणि भौतिक स्थितीवर अवलंबून असते. धर्म अफूच्या गोळीसारखा, भविष्यात सुख मिळेल अशी खोटी आशा दाखवणारा आहे. खोट्या आशेवर जगण्यापेक्षा खरे सत्य काय आहे ह्याचा विचार केला पाहिजे. आर्थिक स्थितीमुळे गरिबांना सत्यापर्यंत पोहोचण्याची शक्यता / मार्ग उपलब्ध होत नाही म्हणूनच ते जसे चालले आहे तसेच चालत राहावे. असे गरीब मानतात. असे कार्ल मार्क्स मानताना दिसतात.

४)**मार्विन हॅरिस** *(Marvin Harris),* यांनी *Cows, Pigs, Wars and Witches* या ग्रंथात आदिम समाजात असलेल्या विविध प्रथांमागचा उद्देश काय असावा याचे सखोल विवेचन केले आहे. विवेचनासाठी जगभरातील चार प्रथा विचारात घेतल्या आहेत. भारतात गाईला माता का मानतात? हिब्रु आणि मुसलमान डुकराला अमंगल मानून त्याचे मांस का खात नाहीत? प्राचीन काळात युद्धे का व्हायची ? मध्ययुगीन युरोपात चेटकिणींचे महत्व का वाढले होते? ह्या प्रश्नांची उत्तरे शोधताना ते 'समाजरचना आणि अर्थव्यव्यवस्था ज्या घटकांवर अवलंबून असते ते घटक पवित्र समजले जातात, तसेच धर्मसंस्थेत मंगल आणि अमंगल या संकल्पनांना महत्त्वाचे स्थान मिळते ह्या अभिप्रायापर्यंत मार्विन हॅरिस पोहोचलेले दिसतात.

दैवत कल्पनांचा आणि आचारविधिंचा उदय

मानवी जीवनात निसर्गाला अनन्यसाधारण स्थान आहे. मूलभूत गरजांसाठी मानव सर्वस्वी निसर्गावर अवलंबून असतो. जीवनाच्या आरंभापासून मानवाने निसर्गापासून प्रेरणा घेतल्याचे त्याच्या प्रत्येक कृतीतून जाणवते. पाण्यात तरंगणाऱ्या माशाचे निरीक्षण करून मानव पोहायला शिकला असावा किंवा पक्ष्यांच्या किलबिलाटातून त्याला सूर सापडले असावेत. वेगवेगळ्या ध्वनींना शब्दरूप देण्याची प्रक्रिया नेमकी कशी झाली असावी यावर शास्त्रज्ञ संशोधन करीत आहेत. परंतु हे निश्चित आहे की भाषेमुळे मानवाला संवाद साधणे आणि आपले विचार स्पष्टपणे मांडणे शक्य झाले. निसर्गाचे ऋतुचक्र नियमित आहे. सूर्य ठराविक वेळी उगवतो आणि मावळतो. त्यामुळेच आपल्याला प्रकाश आणि उष्णता मिळते. या आणि अशा स्वरूपाच्या प्राथमिक अनुभवातून मिळालेले ज्ञान मानवाने आत्मसात केले. जीवन संघर्षाला सामोरे जाताना त्याला निसर्गाच्या सौम्य व उग्र रूपाची प्रचिती आली आणि कदाचित त्यातूनच प्रारंभीची दैवतकल्पना साकारली गेली. त्याचे स्पष्ट प्रतिबिंब ऋग्वेदातील देवदेवतांच्या वर्णनात दिसते. विजेची आणि अग्नीची, उत्पत्ती समान तत्त्वापासून होत असावी या अनुमानातून अग्नीला देवत्व मिळाले. अग्निपासून मिळणारी उष्णता व प्रकाश यांच्यामुळे अग्नीला महत्त्व प्राप्त झाले. तो पृथ्वी आणि अंतराळ यांना जोडणारा मध्यस्थही ठरला. अशाच तऱ्हेने वादळ, पाऊस, सूर्य, नदी, वनस्पती, इत्यादींना ऋग्वेदात दैवतस्वरूप प्राप्त झाले आहे. इंद्र देवतांचा सेनापती आहे. वाऱ्या-वादळाशी संबंधित मरूत् ही देवता त्याला युद्ध प्रसंगात मदत करणारी मानली आहे. जो आल्याने अंधार होतो, फांद्या डोलू लागतात, जमीन हादरते असे मरूताचे वर्णन केले आहे. थोडक्यात वावटळ किंवा वादळ यांना मरूत् या देवतेचे स्वरूप दिले गेल, नदी किंवा वृक्ष ह्यांचे पूजन अजूनही आपल्या परंपरांचा भाग आहे.

नैसर्गिक घटनांचा मानवी जीवनावर ठळक प्रभाव पडतो. काही नैसर्गिक घटना अनुकूल असतात तर काही प्रतिकूल. अनुकूल घटनांचा मानवाने आनंदाने स्वीकार

केला तर प्रतिकूल घटनांनी तो भेदरून गेला. विनाशकारी अज्ञात शक्तींनी त्याच्या मनात भीती उभी केली. त्याच वेळेस मृत्यूबद्दलचे भय आणि मृत्यूनंतरच्या जीवनावस्थेबद्दलचे कुतूहल मानवाच्या मनात निश्चितच जागृत झाले आणि त्यातून भूतप्रेतादी योनींच्या अस्तित्वासंबंधी कल्पना निर्माण झाल्या. त्यांच्या अस्तित्वाशी अघोरी घटितांच्या कल्पना जोडल्या गेल्या. निसर्ग आणि अघोरी शक्तींवर नियंत्रण मिळवणे आपल्या शक्तीपलीकडले आहे असे मानवाला वेळोवेळी जाणवू लागले. त्यायोगे विश्वातील सर्व घडामोडींवर नियंत्रण ठेवणारी एक आधिभौतिक शक्ती आहे अशी विश्वासप्रणाली त्याद्धारे निर्माण झाली. अनिष्ट घटनांच्या मागे दुष्टशक्ती असतात हा विश्वास त्याच प्रणालीचा भाग होय. इष्ट घटनांची पुनरावृत्ती व्हावी आणि अनिष्ट घटना घडू नयेत अशा भावनेतून मानवाच्या मनात धर्मभावना रूजली. वैश्विक पातळीवर जे जे घडते ते ते भौतिक पातळीवरही घडावे या हेतूने यातुधर्मावर आधारित विधींची योजना केली जाऊ लागली आणि दुष्ट शक्तींचे निवारण करणारे विधिही योजले गेले.

यातुधर्म

इष्ट ते घडावे आणि अनिष्ट ते टळावे ह्या दोन्हीसाठी करण्यात येणारा जादूटोणा आणि तंत्रमंत्र तसेच पूजाविधी यातुधर्माच्या कल्पनेवर आधारित असतात. मानवाने निसर्गातील गतिविधींचे बारकाईने निरीक्षण करून यातुविधींचे संकेत निर्माण केले असे दिसते. हे संकेत आधिभौतिक शक्तींना जागृत करण्यासाठी योजले गेले. यातुशक्ती संवर्धक आणि संहारक अशा दोन्ही प्रकारचे कार्य करते असे मानले गेले. जगभराच्या संस्कृतींमधे प्राचीन काळापासून यातुधर्मावर आधारित आचारविधी प्रचलित होते हे आता सर्वमान्य झाले आहे. भारतातील ऋग्वेदकाळाच्या संदर्भातही असेच मत मांडलेले दिसते. वैदिक साहित्यात 'असू' नावाच्या यात्वात्मक शक्तीचा उल्लेख आहे. ती सर्व प्राणिमात्रात कमी -अधिक प्रमाणात असते असे म्हटलेले आहे. विशिष्ट मंत्र आणि विधी यांच्या साहाय्याने वाढवता अथवा कमी करता येते, या श्रद्धेतून यातुंवर आधारित क्रिया आकाराला आल्या *(गाडगीळ १९७४: ३२)*.

भारतीय आदिवासींची संस्कृती अवैदिक असली तरी त्यांचे आचारविधिही अशाच प्रकारच्या यातुधर्मावर आधारलेले आढळतात. यातुधर्मावरील श्रद्धा सार्वत्रिक असल्याचे हे निदर्शक आहे.

विद्धानांच्या मताप्रमाणे धर्म आणि विज्ञान यांचा आरंभ वैश्विक घटनांचा उलगडा करण्यासाठीच झाला. अर्थात दोहोंमधील तर्कसंगती आणि कार्यप्रणाली यात फरक आहे. निसर्गातील प्रत्येक घटना ठराविक नियमांनुसार घडते असे विज्ञान मानते. निसर्गाच्या गूढ शक्तींमध्ये चमत्कार घडवून आणण्याचे बीज आहे, हा विश्वास यातुविद्येचा आधार आहे. यातुविधी दोन नैसर्गिक तत्त्वांवर आधारित असतात *(फ्रेझर २०००: ११)*. ती नैसर्गिक तत्त्वे अशी आहेत–

(१) साधर्म्य *(Law of Similarity)*

(२) साहचर्य आणि संपर्क *(Law of Contact)*


फ्रेझर यातुविधींना शास्त्र असे न संबोधता आभासी विज्ञान*(Pseudo Science)*अशी संज्ञा देतात. फ्रेझर यांनी समत्वाच्या कल्पनेतून यातू निर्माण झाला, असे प्रतिपादन केले आहे म्हणून यातुला त्यांनी समभावी जादू (*Sympathetic Magic)*असे संबोधले आहे. फ्रेझर यांनी यातुचे वर्गीकरण पुढील प्रमाणे केले आहे –

- अनुकरणात्मक यातू
- संपर्कात्मक यातू

अनुकरणात्मक यातू

भौतिक पातळीवर इष्ट घटनांशी साधर्म्यदर्शक घटना घडवून सृष्टितील घटनाचक्रावर ताबा मिळवता येतो, ही यातुविधी करण्यामागची भावना दिसते. अपेक्षित घटना सांकेतिक रूपाने घडवल्यावर इष्ट परिणाम होतील या भावनेने अनुकरणात्मक यातुविधींची योजना केलेली दिसते. समानदर्शी, समानधर्मी तत्त्वांपासून यातुविधींचे संकेत निर्माण केले गेले असे दिसते. हे संकेत आधिभौतिक

शक्तीला जागृत करण्यासाठी योजले गेले. अपेक्षित घटना सांकेतिक रूपाने घडल्यावर इष्ट परिणाम होतील, या भावनेतून अनुकरणात्मक यातुविधींची योजना केलेली दिसते.



नैसर्गिक घटनांच्या कृतीची अथवा ध्वनींची नक्कल केल्याने इष्ट परिणाम घडविणे शक्य होईल या कल्पनेतून इष्ट दैवतावर अभिषेक केल्याने पाऊस पडतो किंवा ढगांच्या गडगडाटानंतर पाऊस येतो, असा समज छोटा नागपूर भागातील आदिवासींमध्ये असल्याचे दिसते. ते पाऊस यावा म्हणून डोंगराच्या उतारावरून मोठेमोठे ढगड ढकलून देतात. ढगडाच्या गडगडाटाचा पडसाद निसर्गावरही उमटेल आणि ढग गडगडून पाऊस पडेल असा विश्वास त्यांना वाटतो *(नाडगौंडे २००३: ३०७)*. आसाममध्ये दिब्रुगढ जिल्ह्यात बेडूक पावसाचा दूत आहे. अशी श्रद्धा आहे. त्याच श्रद्धेतून तिथे बेडकांचा विवाह करण्याची प्रथा आहे. या प्रथेत बेडकांच्या नर-मादीला आंघोळ घालून, कुंकू लावून त्यांचा विधिपूर्वक विवाह करतात. त्यानंतर सात दिवसाच्या आत पाऊस पडेल असा त्यांना विश्वास वाटतो (*भारतीय संस्कृती*

कोश खंड ६;२२२). अशा प्रकारच्या श्रद्धा अनेक ठिकाणी अस्तित्वात असलेल्या दिसतात. अंतरिक्षातील मेघ म्हणजे काळा वृषभ, सूर्याच्या उष्णतेमुळे त्याची वपा पावसाच्या रूपात झिरपते म्हणजेच पाऊस पडतो असे ऋग्वेदात पर्जन्याचे वर्णन आहे. त्याची पुनरावृत्ती म्हणजे पार्थिव पातळीवर मेदाने परिपूर्ण अशा वृषभाला किंवा एडक्याला मारून सलग अग्नीवर धरून त्याची वपा [१]अग्नीत झिरपवणे. ह्या यज्ञीय विधिचा उल्लेख ऋग्वेदात आहे. हा यज्ञीय विधी समानतेतून समानतेची निर्मिती या नैसर्गिक तत्त्वाच्या आधारावर योजलेला दिसतो *(डांगे १९७३;२४९)*. ऋग्वेदात मंडूकसूक्त आहे, ज्यात ब्राह्मणांनी बेडकासारखे ध्वनी निर्माण केल्याने पाउस पडतो अशी कल्पना आहे, येथे बेडूक हे मेघाचे पार्थिव प्रतीक मानले आहे *(भारतीय संस्कृ ती कोशखंड ६;२२२)*. हा यज्ञीय विधिही समानतेतून समानतेची निर्मिती याच नैसर्गिक तत्त्वाच्या आधारावर योजलेला दिसतो.

संपर्कात्मक यातू

वस्तू आणि व्यक्ती किंवा दोन वेगवेगळ्या पातळीवरील घटना यांच्यात एकदा निर्माण झालेला संबंध कायमस्वरूपी टिकून राहातो असा समजही अनेक विधींमध्ये आढळतो. छायाचित्राला केलेली इजा त्या व्यक्तीलाही होते असे मानणे, हे या यातुचे उदाहरण म्हणून देता येईल. शत्रूचा विनाश करण्यासाठी अनेकदा या भावनेतून यातुचा वापर केलेला दिसतो. अमेरिकेतील आदिवासी राखेची अथवा वाळूची प्रतिमा तयार करून तिला तीक्ष्ण हत्याराने टोचतात. त्यामुळे ज्या व्यक्तीची प्रतिमा असेल त्या व्यक्तीला तशाच वेदना होतात असे मानले जाते *(फ्रेझर २०००:१३)*. तैत्तिरीय संहितेत शत्रूच्या विनाशासाठी विषारी वृक्षाच्या लाकडापासून बनवलेली कृत्या-स्वरूपी 'बल्गा' नावाच्या बाहुलीचा उपयोग करण्याचा उल्लेख आढळतो. ही बाहुली, हाडांनी व केसांनी वेष्टून ती खोल खड्ड्यात पुरावी म्हणजे शत्रू गाडला जातो, *(तै.सं.६.२.११.१)* अशी यामागची भूमिका आहे. अशा तऱ्हेने शत्रूला मूठमाती देण्यासाठी किंवा एखाद्या व्यक्तीला आपल्याकडे आकृष्ट करण्यासाठी अथवा

१ वपा झिरपवणे -यज्ञीय पशूची कातडी अग्निवर धरून चरबी वितळवणे

एखाद्याची बाधा टाळण्यासाठी अथर्ववेदात यातुधर्मावर आधारित विधी म्हणजे तोडगे सांगितले आहेत. या प्रकारच्या तोडग्यांचा समावेश अर्थातच जादूटोण्यामधे होतो. दूध गरम करण्यापूर्वी त्यात थोडे पाणी घालण्याची प्रथा व्यवहारात दिसते. त्यामागे. दूध हे गाईचे अथवा म्हशीचे स्तन्य म्हणजेच अंगभूत असल्याने दूध तापवताना कास जळेल ही भीती असते. रोग निवारणासाठी उपचार म्हणून यातुविधी जगभरातील बहुतेक सर्व समाजात प्रचलित आहेत. उदा. काविळीपासून मुक्तता व्हावी म्हणून पुढील विधी करतात. या विधित रोग्याला पिवळा रंग खाणे, वापरणे वर्ज्य करण्याचा सल्ला दिला जातो. रोग्याला लाल रंगाच्या बैलाच्या कातड्यात गुंडाळून ठेवतात. त्याच्या अंथरूणाभोवती चारही बाजूला चार पिवळे पक्षी टांगतात. ''सूर्यास्तापर्यंत तू रोगमुक्त होशील कारण तुझा रोग पक्ष्यात भरला आहे", असा निर्वाळा भगत देतो. याशिवाय लाल रंगाच्या बैलावर टाकलेले पाणी रोग्याला पिण्यास देतात. लाल रंगाच्या कातडयाचा तुकडाही रोग्याच्या गळ्यात बांधतात. भारतात लहान मुलांना मुडदूस *(Rickets)* होऊ नये म्हणून मांत्रिकाने मंतरलेला दुधी भोपळा अंगणात टांगून ठेवतात. जसाजसा भोपळा वाळेल तसातसा बालकाचा रोग कमी होईल, असा विश्वास मांत्रिक देतो. तुरळक का असेना ही प्रथा खेडेगावात अद्यापही अस्तित्वात असल्याचे आढळते, अशाच प्रकारच्या श्रद्धा आणि त्यावर आधारलेले आचारधर्म भारतात आणि भारताबाहेरील समाजामध्येही रूढ होते, याचे दाखले भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत. ग्रीक इतिहासकार 'प्लिनी' याने म्हटल्यानुसार जर कावीळ झालेल्या रोग्याने पक्ष्याकडे पाहिले तर आजार रोग्याला सोडून पक्ष्याकडे जातो *(फ्रेझर २०००:१६)*.

वर्जनाचे संकेत

सकारात्मक यातू म्हणजे संकेतावर आधारित मंगलकारी विधी आणि नकारात्मक यातू म्हणजे तोडगे आहेत. तसेच वर्जनाचे संकेतही आहेत, 'हे करू नका' असे सांगणाऱ्या संकेतांना 'वर्जनाचे संकेत' असे म्हणतात. आरोग्याचे रक्षण, पाळीव प्राण्यांचे वर्धन आणि संरक्षण, मानवी जीवनातील सुखाची नित्यता सांभाळणे,

अनिष्ट परिस्थिती टाळणे, तसेच संकट निवारण आणि इच्छापूर्ती यासाठी वर्जनांचे संकेत सांगितले आहेत. मध्य भारतातील विलासपूर येथील समाजात पंचायत चालू असताना कोणत्याही व्यक्तीने सूत कातू नये असा संकेत आहे. कारण तसे केल्यास पंचायत कुठल्याही निर्णयापर्यंत पोहोचत नाही असे मानले जाते *(फ्रेझर २०००:२०)*. लवकर आटोपते न घेणारा अशा अर्थी 'दीर्घसूत्री' या शब्दाचा उपयोग केला जातो. ह्याची नोंद इथे करावीशी वाटते.

जगभरातल्या आदिवासींमध्ये आपापल्या जमातींचे देवक मानलेला प्राणी न खाण्याचा संकेत आहे. त्यामागे त्या प्राण्यांची संख्या कमी होऊ नये आणि त्यांचे संरक्षण व्हावे हाच हेतू आहे असे दिसते.

जपानमधील सगालियन *(Saghalien)* बेटात आयनॉस जमातीत गर्भवती स्त्रीने प्रसूतीपूर्वी दोन महिने सूत कातू नये किंवा दोऱ्याला पीळ देऊ नये असा संकेत आहे, कारण तसे केल्यास मुलाच्या गळ्याभोवती नाळेचा वेढा पडतो. असे मानले जाते. गर्भवती स्त्रीसाठी अशा प्रकारच्या वर्जनाचे नियम ग्रहणाशी जोडलेले दिसतात. ग्रहणकालात राहू-केतू नावाचे राक्षस सूर्याला झाकून टाकतात असा समज असल्यामुळे ग्रहणकालात गर्भवतीवर राहू-केतूंची वक्रदृष्टी पडल्यास गर्भपात होईल म्हणून गर्भवती स्त्रीने ग्रहणकालात घराबाहेर पडू नये, असा संकेत आहे. सरपटणाऱ्या सापासारख्या प्रजाती जमीन भुसभुशीत करतात. मऊ जमीन वनस्पतींच्या वाढीसाठी लाभदायक ठरते. त्याची उपयुक्तता लक्षात घेऊन त्यांच्या संरक्षणासाठी काही संकेत मुद्दाम निर्माण केलेले दिसतात. त्यांना देवता किंवा पूर्वज मानल्यामुळे त्यांची हत्या करण्याच्या सहजप्रवृत्तीला आपोआप आळा बसला.

आदिवासींच्या जीवनप्रणालीत यातू आणि वर्जनाचे संकेत यांवर आधारलेल्या त्यांच्या श्रद्धा आणि परंपरा यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. ते जमातीच्या नियमांविरुद्ध वर्तन करीत नाहीत. आपल्या कृतीने आपल्या पूर्वजांना कष्ट पोहोचू नयेत म्हणून ते

परंपरांचे पालन करताना दिसतात. निसर्गशक्तीवरचा दृढ विश्वास आणि सुखी जीवनासाठी केलेले निसर्गशक्तीचे आवाहन या गोष्टी प्राथमिक अवस्थेपासून मानवी मनात खोलवर रूजलेल्या दिसतात. तसेच आत्मा अमर असल्याची श्रद्धा खोलवर गठित झालेली दिसते. निसर्गामध्ये आहे तशीच शक्ती पूर्वजांमधेही आहे असे आदिवासी मानताना दिसतात. म्हणूनच ते देवतांच्या बरोबरीने पूर्वजांचेही आवाहन करतात.

निसर्गचक्राचा नियमितपणा आणि निसर्गातील घटकांचे परस्परांना पूरक संबंध आदिम मानवाला कुतूहलजनक वाटले असावेत. रोज उगवणारा सूर्य आणि कलेकलेने कमी होत किंवा वाढत जाणारा चंद्र पाहून आदिम मानवाने कल्पना केली की,'जो कमीकमी होत जातो तो भक्ष्य आणि जो नियमित आहे तो भक्षण करणारा'. सूर्याने भक्षण केलेला चंद्र पुन्हा उगवतो. इतकेच नव्हे तर वर्धिष्णू होतो. हे दृश्य पाहून आदिम मानवाने चंद्राच्या पुन्हा दृश्यमान होणाऱ्या क्रियेला चंद्राचा पुनर्जन्म मानला असावा *(डांगे १९७३:२२)*. ही संकल्पना उपनयन या विधित स्पष्ट झालेली दिसते. वैदिक उपनयनाच्या दीक्षाविधीत आचार्य हा गिळंकृत करणारा तर बटू हा गिळला जाणारा असतो *(डांगे १९७३:२२)*. दीक्षाविधीनंतर बटूचा दुसरा जन्म होतो. तो द्विज झाला असे मानले जाते.

अशाच प्रकारच्या दीक्षाविधींशी संबंधित विधी जगातील अनेक समाजामध्ये प्रचलित असलेले दिसतात. उदाहरणार्थ न्यू साऊथ वेल्स येथील आदिम जमातीत हा विधी थोडया भिन्न पद्धतीने केलेला दिसतो. प्रत्येक बटूला थर्मोलिन नावाचा प्राणी दूर घेऊन जातो व सांकेतिकरीत्या मारतो. घरी परतण्यापूर्वी विधी पूर्ण झाल्याची खूण म्हणून बटूचा दात पाडतात *(डांगे १९७३:२२)*. अशाच कल्पनांवर आधारित एक धार्मिक विधी क्वीन्सलँडमधे केला जातो. जमातीतील दीक्षाविधीसाठी योग्य वय झालेली मुले एकत्र जमवून त्यांना गावाबाहेरील एका झोपडीत नेतात. 'बुलरोअरर' नावाचे वाद्य मोठ्या आवाजात वाजवून त्या मुलांचा मृत्यू झाल्याचे जाहीर करतात.

मात्र हा मृत्यू सांकेतिक असतो. कारण ठराविक कालावधीनंतर मुले आपापल्या घरी परततात *(डांगे १९७३:२२)*. या प्रथांमागे सांकेतिक मृत्यू आणि पुनर्जन्म झाल्यावरच मुले दीक्षित होतात आणि त्यांना समाजाचे पूर्ण सदस्यत्व मिळते ही कल्पना दिसते. याखेरीज समाजाच्या मूळ पुरूषाबद्दल किंवा त्याच्या उत्पत्तीसंबंधांच्या परंपरागत नियमांच्या कल्पनाही अभ्यासण्याजोग्या आहेत.

मानवी समाज आणि देवके

आदिम समाजाच्या जडणघडणीचा एक भाग म्हणून रक्तसंबंधांवर आधारित नातेगट तयार झाले. या नातेगटांना 'कुळी' असे म्हटले जाते. कुळींची ओळख त्यांच्या देवकावरून *(Totem)* होते. आपले मूळ किंवा पूर्वज यांच्याबद्दलची कल्पना प्रत्येक कुळीच्या परंपरेत रूजलेली असते. हे मूळ अथवा पूर्वज मानवी स्वरूपातच असतात असे नाही. बऱ्याचदा एखादे झाड, पर्वत, पक्षी किंवा एखाद्या वस्तूच्या स्वरूपातही असतात. कुळीतील सर्व सदस्य त्या देवकाला आपला पूर्वज मानतात. देवक म्हणून एखादा हिंस्र प्राणी असेल तर तो कुळींवर हल्ला करीत नाही, किंबहुना रक्षणच करतो, असे समजले जाते. कोसंबींच्या मताप्रमाणे महाराष्ट्रात देवकांवरून आडनावांची योजना झालेली दिसते. या संबंधात मोरे, गोडांबे, पडवळ, इत्यादी उदाहरणे लक्षात घेता येतील. ज्यांचे आडनाव मोरे आहे ते मोराचे मांस खात नाहीत. गोडांबे आंबा खात नाहीत. इतकेच नाही तर जळणासाठी आंब्याचे लाकूड देखील वापरत नाहीत. प्रत्येक बलिप्रतिपदेला आंब्याच्या फांदीची पूजा करतात. पडवळ आडनाव असणारे पडवळ खात नाहीत *(कोसंवी २००४;३३)*. प्राण्याच्या देवकांवरून काही नावे-गोत्रे रूढ असल्याची उदाहरणे वर आली आहेत. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशच्या सीमावर्ती भागातील डोंगरखेडा गावातील कोरकूंचे कुलदैवत वाघ आहे. कोरकू वाघाला 'कुलामामा' म्हणतात. नदीतील गारगोटीचा दगड गावाबाहेर मांडून कुलामामा म्हणून त्याची पूजा करतात *(फोटो क्र.४)*.

देवकाचे वैशिष्ट्यपूर्ण गुण कुळींमधे आपोआपच उतरतात असे मानले जाते.

देवकाच्या जातीतील कोणत्याच प्राण्याला अथवा वृक्षाला इजा पोहोचू नये म्हणून विशेष काळजी घेतली जाते. म्हणूनच देवक असलेल्या प्राण्याचे मांस कुळीतील सदस्यांनी भक्षण करणे वर्ज्य मानले जाते. अर्थात काही जमातींमध्ये मात्र देवकाचे मांस भक्षण केले तर ते खाणाऱ्याला अंशरूपाने त्याचे सामर्थ्य मिळते, अशीही समजूत दिसते. सार्वजनिक उत्सवात देवकाचा बळी देऊन त्याचे मांस भक्षण करण्याची प्रथा 'तोडा' आदिवासी समाजात प्रचारात आहे. तोडा निलगिरी पर्वताच्या पठारावर राहणारा शाकाहारी, पशुपालन करणारा समाज आहे. तरीसुद्धा विधिपूर्वक सामूहिकरीत्या रेड्याचा बळी देऊन त्याचे मांस प्रसाद म्हणून खातात. 'बळी दिलेला प्राणी त्याचे मांस भक्षण करणाऱ्यांमध्ये अंशरूपाने प्रवेश करतो' अशी त्यामागची कल्पना आहे *(फ्रेझर २०००:९३४)*. अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि मलेशियातील आदिवासी जमातींमध्ये देवकांची प्रथा प्रकर्षाने अस्तित्वात आहे. द्रविड समाजातही प्राचीन काळी देवकाची प्रथा असावी.

ऑस्ट्रेलियातील अरुंठा जमातीत असा उत्सव करण्याची प्रथा आहे. एमू हा प्राणी त्यांचे देवक आहे. पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या डोंगराळ भागात या लोकांची वस्ती आहे. ते जवळजवळ नग्न अवस्थेत राहतात. पुरुष मानवी केसांपासून तयार केलेला पट्टा या कानापासून त्या कानापर्यंत बांधतात. एका राखून ठेवलेल्या जागेत पूर्वजांची स्मृती कायम रहावी म्हणून त्याच्या खुणेचा दगड पुरून ठेवतात, *(स्पेन्सर-गिलीन १८९९;१८९)*. एमूंच्या संख्येत वाढ व्हावी म्हणून अरुंठा जमातीचे लोक पावसाळ्यात एक उत्सव साजरा करतात. उत्सवाचे ठिकाण ठरलेले असते. त्या ठिकाणी जमीन स्वच्छ आणि सपाट करतात. जमातीतील एक व्यक्ती एमूला आपल्या हातात घट्ट धरून त्याच्या मानेतील रक्तवाहिनी कापून टाकते. रक्त जमिनीवर ओघळते. रक्ताचा दाट थर झाल्यावर तो सुकू देतात. नंतर त्या रक्ताच्या थरावर एमूचे चित्र रेखाटतात. त्यात त्याचे जननेंद्रिय ठळकपणे दाखवलेले असते. जमातीतील सर्व लोक या चित्राभोवती कोंडाळे करून बसतात. त्यातील काहीजण एमूचे मुखवटे घालतात, आणि गाणी म्हणून एमूच्या हालचालींची नक्कल करतात *(फ्रेझर*

२०००;१७). एखाद्या विशिष्ट दिवशी आपल्या देवकाचे मांस भक्षण केलेच पाहिजे असा दंडक प्राचीन ग्रीसमधील आदिम जमातीत होता, हॅरिसन यांनी पुढील उदाहरणातून हे स्पष्ट केले आहे. ग्रीसमधे एसिस आणि मॅग्नेसिस या गावात सुगीच्या दिवसात जत्रा भरवली जात असे असा उल्लेख आहे. निवडक धष्टपुष्ट बैलांना पुजाऱ्याच्या घरापर्यंत मिरवत नेणे ही या जत्रेतील एक प्रमुख प्रथा असे. तिथे एका बैलाचा बळी दिला जाई. प्रत्येक व्यक्तीला प्रसाद म्हणून मांसखंड देत. बैलाच्या शरीरातील सर्व अवयव आणि मांस काढून पेंढा भरत आणि दुसरे दिवशी पेंढा भरलेल्या बैलाला पायावर उभे करून नांगराला जुंपत असत. बळी देणे म्हणजे जीवनाचा अंत नसून त्या प्राण्याला नवजीवन व सामर्थ्य देणे असे समजले जाई *(हॅरिसन १९२७;१४०)*. अशाच तऱ्हेच्या देवकासंबंधीच्या कल्पना जगभरातील विविध आदिम जमातीत आढळतात. भारतातील काही आदिवासी जमातीतही त्या रूढ आहेत. अगारिया समाजातील बघेल गोत्राचे सदस्य जवळचा नातेवाईक मेल्यावर जसे सुतक पाळतात तसे वाघ मृत झाल्यासही पाळतात. घरातील मडकी फोडतात, उपवास करतात आणि मुंडन करतात *(वेरियर २००७;१२१)*. महाराष्ट्रात राहणाऱ्या परधान आदिवासी समाजातील प्रत्येक पुरूष आपल्या हातावर कुलचिन्ह *(देवक)* गोंदवून घेतात *(गारे २००२:१४३)*.

रामायणात श्रीरामाला मदत करणाऱ्या अनेक प्राण्यांचा उल्लेख आढळतो. रामाला मदत करणारी वानरे, रावणाशी दोन हात करणारा जटायू, जांबुवंत नावाचे अस्वल आणि रामेश्वरला सेतू उभारताना अल्प वाटा उचलणाऱ्या खारी हे सर्व प्रत्यक्षात प्राणी नसून या प्राण्यांना आपली देवके मानणारे समाज असावेत. म्हणजेच देवक पद्धती रामायण काळातही रूढ होती *(सिंधू डांगे १९७५:१९९)*.

भारतीय आदिवासी जमातींमध्ये शुभप्रसंगी आपल्या देवकाची आराधना करण्याची प्रथा आहे. प्रथम घरातल्या देवांची पूजा करतात. नंतर देवक घेऊन मारूतीच्या मंदिरात जातात. तेथे पूजा करून देवक घरी आणतात आणि मांडवाच्या खांबाला

टांगून किंवा घरातील देवांपुढे ठेवतात. मंगलकार्य पार पाडल्यावर देवक उठवतात.

प्रेतात्मे आणि संबंधित आचार

धार्मिक आचारांच्या संदर्भात समाजात असलेली दुसरी प्रभावी कल्पना म्हणजे 'प्रेतात्मा' *(Spirit)*. देवके आणि प्रेतात्मे अन्योन्य संबंधाने जोडले गेलेले दिसतात. मृत्यूनंतर मृत व्यक्तीचा आत्मा देवकामध्ये विलीन होतो तसेच पुढील जन्म मिळेपर्यंत तो प्रेतात्म्याच्या रूपात राहातो असे समजही आढळतात. निसर्गाच्या प्रत्येक सजीव अथवा निर्जीव घटकामध्ये आत्मा असतो अशी सर्वसाधारण समजूत मानवी समाजात सर्वत्र, सर्वकाळ प्रचलित झालेली दिसते. आत्मा सर्वत्र मुक्तपणे संचार करू शकतो आणि त्यामुळेच त्याला एका अस्तित्वातून दुसऱ्या अस्तित्वात प्रवेश करणे किंवा आपल्या अस्तित्वातून दुसरे अस्तित्व निर्माण करणे सहज शक्य असते असे मानले जाते. एखादी व्यक्ती झोपली असतांना तिचे शरीर झोपलेल्या ठिकाणीच स्थिर असते मात्र तरीसुद्धा त्याला दूरवर गेल्याचा किंवा दूरस्थ व्यक्तीशी संभाषण करीत असल्याचा अनुभव येतो. त्या काळात त्याने अनुभवलेल्या प्रसंगाची किंवा व्यक्तीची आठवण राहाते. अशा सर्व कल्पनांवर आदिवासी पूर्णपणे विश्वास ठेवत असल्याचे दिसते. झोपेत आत्मा काही काळासाठी, तर मृत्यूनंतर कायमस्वरूपी शरीर सोडून जातो, अशा प्रकारची श्रद्धा सर्वच प्राचीन समाजामध्ये रूजलेली दिसते *(फ्रेझर २०००;१८१)*. आत्मा मृत्यूनंतर शरीर सोडून जातो. आणि पुन्हा दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो म्हणजेच त्याचा पुनर्जन्म होतो. अशा तऱ्हेचा जीवनमृत्यूचा फेरा चालूच राहातो. मृत्यूनंतर पुन्हा जन्म घेईपर्यंत तो आपल्या देवकाच्या विशिष्ट स्थानकात *(Nanja Spot)* राहातो. अशा प्रकारच्या स्थानकाची प्रत्येक देवकाला अशी अनेक स्थानके असतात आणि प्रत्येक स्थानकात फक्त त्या त्या कुळीतीलच आत्मे वास्तव्य करतात व **जेव्हा संधी मिळेल तेव्हा हे प्रेतात्मे पुन्हा** आपल्याच कुळीत जन्म घेतात *(स्पेसर गिलीन १८९९:१२८)*. या संकल्पनेशीकल्पना मध्य ऑस्ट्रेलियातील आदिवासी जमातीत प्रचारात असलेली दिसते. समांतर असणारी पितृलोक ही संकल्पना भगवद्गीतेत, दुसऱ्या अध्यायात

तेराव्या श्लोकात आलेली आहे –

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥१३॥

ज्या प्रमाणे देहधारी आत्मा या देहात बालपणातून तारूण्यात आणि तारूण्यातून म्हातारपणात एकामागून एक जात असतो, त्याचप्रमाणे तो जीवात्मा शरीराच्या मृत्यूनंतर दुसऱ्या देहात प्रवेश करतो'. अशी संकल्पना श्रीकृष्णाने स्पष्ट केली आहे *(स्वामी प्रभुपाद १९८२:७९)*

या संकल्पनेवर आधारित विधींचे सविस्तर वर्णन गरूड पुराणातील प्रेतखंडात आहे *(गरूडपुराण ७३६–७६०).* आदिवासींच्या अंत्यविधींचा पायाही या संकल्पनेवर आधारित असल्याचे दिसते. जगभरातील आदिवासी समाजात अशा तऱ्हेच्या कल्पना दिसतात. संथाळ समाजात असलेल्या अशा प्रेतात्म्याच्या संबंधीच्या काही कल्पना त्यांच्या आचारविधींमध्ये प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. काही प्रेतात्मे रागीट असतात आणि ते बळीची मागणी करतात. मागणी पूर्ण न झाल्यास ते अनिष्ट घडवून आणतात अशी संकल्पना असून काही आचारविधी या संकल्पनेभोवती गुंफले गेलेले दिसतात. संथाळ प्रेतात्म्यांना 'बोंगा' म्हणतात. बोंगा अनेक प्रकारचे असतात. बोंगांचे वर्गीकरण त्यांच्या वृत्ती, कृती आणि वस्तिस्थानावरून होते. काही बोंगा गावाबाहेरील झाडांवर राहातात. असा समज असल्याचे दिसते. ही झाडे त्यांच्यासाठी राखीव असतात आणि अशा झाडांची ओळख त्यांना बांधलेल्या दोऱ्यांवरून होते. सीमाबोंगा आणि बाहेरेबोंगा गावाबाहेरच राहातात. सीमाबोंगा विषारी प्राण्याच्या रूपात मानवावर हल्ला करतात असे मानले जाते. त्यांना शांत करण्यासाठी विशिष्ट विधी केले जातात. ते करणाऱ्यांना 'नायके' असे संबोधले जाते. प्रत्येक गावाचा स्वतंत्र नायके असतो. बाहेरेबोंगाला शांत करणाऱ्याला 'कदम नायके' असे म्हणतात. बाहेरेबोंगा मृगजळ निर्माण करून मानवांना भुलवतात अशी समजूत आहे. बोंगा मत्सरी असतात आणि त्यांना बळी दिला नाही तर ते रोगराई

पसरवतात असे समजतात. साधारणपणे त्यांना कोंबड्याचा बळी दिला जातो *(ट्रायसी १९७९;१०१)*.

अशा तऱ्हेच्या संकल्पना प्रचारात असल्या तरीही प्रदीर्घ कालावधीमुळे त्या संदर्भातील आचारधर्मात किंवा संकल्पनात काही बदलही झालेले दिसतात. कोकण आणि गोवा येथील तरंगकाठी उत्सव होळीपासून सुरू होतो. तो चार दिवस चालतो. या उत्सवाला 'हुडा उत्सव' म्हणतात. या उत्सवात प्रमुख देवता, स्थानिक देवता आणि 'पूर्वस' यांची प्रतीकाच्या रूपात मिरवणूक व पूजा करण्याची पूर्वापार प्रथा आजही टिकून आहे. गाव वसवणारा हा पूर्वस किंवा मूळपुरूष. काही ठिकाणी पूर्वसाला 'घाडीलोक' असेही म्हणतात. गाव वसवण्याच्या आरंभी तांदळ्याची चव्हाट्यावर स्थापना करून पूर्वस त्याची पूजा करतो. पूजलेल्या तांदळ्याला गांगो म्हणतात. कालांतराने गांगोला शिवाचा अवतार मानून त्यालाच गांगेश्वर असे देवत्व मिळलेलेही दिसते *(वाडेकर २००९ आणि व्यक्तिगत संपर्क)*. मृताची समाधी बांधून त्यावर शिवलिंग स्थापन केल्याने मृत व्यक्ती शिवामध्ये विलीन होते असाही विश्वास टिकून असल्याचे दिसते. 'श्रीमंत चिमाजी अप्पा पेशवे' यांची समाधी पुण्याला ओंकारेश्वराच्या देवळात *(फोटो क्र.५)* अद्यापही अस्तित्वात आहे. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांची विसाव्या शतकातील समाधी पुण्याला ओंकारेश्वराच्या देवळाजवळ आहे. *(फोटो क्र.६)* अण्णासाहेब हे लोकमान्य टिळकांचे समकालीन थोर देशभक्त होते. त्यांनी ३६ वर्षे असंख्य रूग्णांना विनामूल्य औषधोपचार करून रोगमुक्त केले. २ फेब्रवारी १९२७ रोजी अण्णासाहेबांनी देहत्याग केला. दरवर्षी माघ शुद्ध एकादशीला त्यांचे पुण्यस्मरण करण्याची प्रथा आहे. या मागची संकल्पना पूर्वजांना शिवरूपामधे विलीन करणे हीच असावी. हीच पद्धत ऐतिहासिक काळात बृहत्तर भारतातील देशांमध्येही प्रचलित झाली होती. त्यातूनच तिथे 'देवराज' पंथाचा उदय झाला होता. मृत राजाला शिवस्वरूप मानून त्याच्या अवशेषांवर शिवमंदिर उभारण्याची प्रथा तिथे प्रचलित होती. इ.स. ८०२ मधे दुसरा जयवर्मन या राजाने 'हिरण्यदास' नामक भारतीय तांत्रिकाकरवी आपले स्वातंत्र्य अबाधित राहावे या

हेतूने काही प्रयोग केले व याचवेळी हिरण्यदासाने स्थापन केलेल्या 'देवराज' नामक नव-शैव पंथास राजाश्रय दिला. ही प्रथा जवळ-जवळ २५० वर्षे प्रचारात होती *(गुप्ते-कुलकर्णी १९७५:३४२)*. राजा हा शिवस्वरूप आहे. ह्या श्रद्धेच्या आधारे राजाचे मृत्यूत्तर दैवतीकरण आणि त्याचा संप्रदाय स्थापन होणे ही प्रक्रिया देवराजपंथाच्या मुळाशी असलेली दिसते.

जीवनसंघर्षात आलेल्या अनुभवातून मानवाने सुखी व समृद्ध जीवनासाठी संकेत निर्माण केले. हे संकेत देवतांची आराधना, उत्सव, अंत्यसंस्कार इत्यादी स्वरूपात जीवनप्रणालीत समाविष्ट झालेले दिसतात. स्थानपरत्वे अथवा पर्यावरणीय साधनांमुळे, जीवनप्रणालीत विविधता आढळते. तशीच भारतीय आदिवासी समाजांच्या वैशिष्ट्यांमध्ये त्यांच्या जीवनप्रणालीनुसार विविधता आढळते. त्याचा थोडक्यात आढावा घेऊया.

आदिवासी या संज्ञेची व्याख्या आणि व्याप्ती

बहुतांश आदिवासी समाज हे शहरी लोकवस्तीपासून दूर राहाणारे आहेत. विचारवंत, अभ्यासक आणि प्रशासक यांनी आदिवासी या शब्दाला पर्यायी शब्द सुचविले आहेत. आदिवासींची व्याख्या विविध प्रकारांनी केलेली आहे.

इंपिरियल गॅझेट-मध्ये आदिवासींची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे-

''समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भू-भागात राहाणाऱ्या, सुरूवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेला पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या आणि समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात '' (*इंपिरियल गॅझेट-गारे २००२:२*).

डी. एन्. मुजुमदार -यांनी केलेली व्याख्या खालीलप्रमाणे आहे -

'A Tribe is a collection of families or groups of families bearing a common name, members of

which occupy the same territory, speak the same language and observe certain taboos regarding marriage, profession or occupation and have developed a well assessed system of reciprocity and mutuality of obligation" (नाडगोंडे२००३: ४).

समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टीने परस्पर-संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाचा उल्लेख 'आदिवासी समाज' म्हणून नेहमी केला जातो *(नाडगोंडे २००३: ४).*

१९६२ साली शिलाँगमध्ये आदिवासी समाजाच्या परिषदेत आदिवासींची व्याख्या खालील प्रमाणे केली गेली -

''समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती, एका विशिष्ट भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेला व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात ''
(गारे २००२:२).

आदिवासींची व्याख्या करत असताना विविध आदिवासी समाजातील काही समान सूत्रे लक्षात घेण्याजोगी आहेत. अनेक वर्षांच्या जीवन संघर्षातही आदिवासींनी आपली जीवनमूल्ये जपलेली दिसतात. सामाईक मालकीची कल्पना बहुतांश आदिवासी पाळताना दिसतात. खाण्याची प्रत्येक गोष्ट भिल्ल वाटून घेतात. असे करतांना पुरेसे अन्न उपलब्ध झाले नाही तरी त्यांची अर्धपोटी राहण्याची तयारी असते. जुआंग लोक गावातील जमिनींवर जमातीतील सर्व सदस्यांचा समान अधिकार मानतात. सहसा आदिवासी पाड्यात आलेला पाहुणा उपाशी राहात नाही. रोगी, अपंगाला त्याची वाटणी मिळते. गोंडांच्या समाजात अद्याप घोटुल गृहाची पद्धत टिकून आहे. घोटुल गृहात अविवाहित मुलामुलींसाठी मोकळेपणाने वावरण्याची मुभा असते. घोटुल गृहातून मनपसंत जोडीदार निवडण्याची संधी मिळते *(केली १९५०:८४).*

आदिवासी समाजाची सर्वसाधारण वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे मांडता येतील.

(१) विशिष्ट भू-प्रदेश (२) स्वतंत्र जीवनप्रणाली (३) कमी गुंतागुंतीची अर्थव्यवस्था (४) सीमित तंत्रज्ञान आणि साधने (५)विशिष्ट दैवत कल्पना आणि आचारविधी

१) विशिष्ट भू-प्रदेश

सर्वसाधारणपणे प्रत्येकाला निवासाच्या मूळ प्रदेशाबद्दल एक प्रकारची ओढ आणि हक्काची भावना असते तशीच ती आदिवासींमध्येही दिसते. सहसा ते आपली वस्ती सोडून जायला तयार होत नाहीत. काही आदिवासी समाज अजूनही भटक्या अवस्थेत आहेत. त्यांचा भ्रमंतीचा परीघ ठरलेला असतो. सर्वसाधारणपणे डोंगरभा-गात बाह्यसंपर्कापासून अलिप्त असे ते राहातात. एका कुटुंबातील लोक रक्ताच्या नात्याने बांधलेले असतात. प्रत्येक समूहाची स्वत:ची वेगळी बोलीभाषा असते. सहसा या बोलीभाषांची स्वतंत्र लिपी नसते. त्यामुळे त्यांच्या लोककथा, लोकगीतांधून किंवा त्यांना प्रत्यक्ष भेटूनच त्यांच्या दैवत परंपरांची माहिती मिळते.

२) स्वतंत्र जीवनप्रणाली

आदिवासींच्या जीवनात आप्तसंबंधांना महत्वाचे स्थान असते. प्रत्येक वस्तीमधे धर्मप्रमुख असतो. काही समूहांमधे धर्मप्रमुख नियुक्त केला जातो तर काही जमातीत तो वंशपरंपरेतून येतो. धर्मप्रमुख धार्मिक विधींचे आयोजन, नियोजन करतो. साहजिकच सामाजिक व्यवस्थेत, नियंत्रणातही त्याचे स्थान महत्वाचे ठरते.

३) कमी गुंतागुंतीची अर्थव्यवस्था

अर्थव्यवस्था आणि बाजारव्यवस्था ही आदिवासींच्या नित्य आणि नैमित्तिक गरजांची पूर्तता होऊ शकेल अशा स्वरूपाची म्हणजेच बऱ्याचअंशी स्वयंपूर्ण असते. वस्तुविनिमयाच्या तत्त्वावर आधारलेल्या त्यांच्या बाजारव्यवस्थेत व्यापारी

पद्धतीतील नफा-तोट्याच्या तत्त्वाला तुलनेने कमी महत्त्व असते. आदिवासी आणि नागरी समाज यांच्या परस्पर देवाणघेवाणीच्या संदर्भात 'रत्नागर' यांनी मांडलेले मत लक्षणीय आहे. त्यांच्या मताप्रमाणे भारतीय आदिवासी समाज, आणि मैदानात राहणारे समाज यांच्यामध्ये देवाणघेवाणीचे संबंध प्राचीनकाळापासून चालत आले आहेत. आजही हे संबंध शाबूत असल्याचे दिसते. उदाहरणार्थ वस्तुविनिमयावर आधारित व्यवहार होणारी तीन ठिकाणे १९व्या शतकापर्यंत केरळात अस्तित्वात होती. आजही केरळमधील काही आदिवासी, विशेषत: कादर, (*Kadar*) मालापंतराम या जमातीतील लोक कोचीनला येऊन गरजेच्या वस्तूंची देवाणघेवाण करतात *(रत्नागर १९९७:१२१)*.

४) **सीमित तंत्रज्ञान आणि साधने**

बहुतांश आदिवासींचे व्यवसाय वन्य पदार्थ गोळा करणे, शेती करणे, मासेमारी अशा प्राथमिक स्वरूपाचे असतात. व्यवसायाला लागणारी बहुतेक हत्यारे व अवजारे म्हणजे मासे पकडण्याची जाळी, धनुष्य-बाण, झोपडी इत्यादी ते आवश्यकतेनुसार स्वत:च तयार करतात. त्यासाठी ते अवजारे, हत्यारे तयार करण्यासाठी परंपरेतून आलेले तंत्रच वापरतात. नवीन तंत्राचा स्वीकार करताना दिसत नाहीत.

५) **विशिष्ट दैवतकल्पना आणि आचारविधी**

आदिवासींचा निसर्गातील सुष्ट आणि दुष्ट दोन्ही शक्तींवर विश्वास असतो. समृद्धीसाठी आणि संकट निवारणासाठी पुरोहित आचारविधींचे आयोजन-नियोजन करतो. पुरोहिताजवळ इतर कोणाहीपेक्षा जास्त सामर्थ्य आहे, असा दृढ विश्वास आदिवासींना वाटत असतो. आदिवासी समाजात पितरांना अतिशय महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे पितरांची पूजा करण्याची प्रथा बहुतेक सर्व आदिवासी समाजात आढळते. सर्वसाधारणपणे देवतेला बळी देण्याची प्रथाही दिसते. पुरोहित धार्मिक विधी, रोगांवरील उपचार आणि यातुविधींचा जाणकार असतो. धार्मिक विधी सामूहिकरीत्या केले जातात. कौटुंबिक कलह निवारणासाठी योग्य मार्गदर्शनही

करतांना दिसतो. विवाहासाठी योग्य वधू-वरांची निवड करतो. अशा प्रकारे तो समाजाचे नेतृत्व करत असतो. धार्मिक विधी करणाऱ्या आदिवासींमधील पुरोहिताला विविध प्रकारच्या नावाने संबोधले जाते [२].

आदिवासींच्या जीवनात निसर्गातील प्रत्येक लहान-सहान घटनांची दखल घेतली जाते आणि त्यामुळेच त्यांचे सण-उत्सव हे सर्जनाच्या चक्राशी निगडित असतात. त्यांच्या नृत्यांमधून जीव सृष्टीच्या सर्जनाचे नाट्य प्रकट होते.

१९५७ साली कोरापूर येथे आयोजित जनजातीय कल्याण समितीमध्ये टी. सी. दास ह्यांनी प्रस्तुत केलेल्या लेखात आदिवासी समाजाचे आर्थिक, सांस्कृतिक वर्गीकरण केले आहे. ते खालीलप्रमाणे आहे-

१) अन्न गोळा करणारे व पशुपालन करणारे भटके समाज

या विभागातील आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था संपूर्णपणे जंगलातील उत्पन्नावर आधारित असते. ते जंगलात कंदमुळे गोळा करत फिरत राहातात. आधुनिक युगात यांच्यातील काही समाज निमभटक्या अवस्थेत वावरताना दिसतात. कोचीनचे कादर, त्रावणकोरचे मालापंतराम, मदुरेचे पलियान, महाराष्ट्रातील पारधी इत्यादी जमाती या विभागात मोडतात.

२) डोंगर उतारावर स्थलांतरित शेती करणारे

या समाजांची आर्थिक स्थिती भटक्या समाजाच्या आणि कृषी व्यवसाय करणाऱ्या समाजाच्या दरम्यानची आहे. हे स्थलांतरित शेती करतात. म्हणजे शेतीचे क्षेत्र बदलतात. जंगलातील झाडांच्या वाळलेल्या फांद्या गोळा करून जाळतात. राख वनस्पतींच्या वाढीला पूरक ठरते. थोडक्यात कृषीक्षेत्र बदलले की वस्तीचे स्थान बदलते. एका ठिकाणी ते किती काळ शेती करतील याचा काळ निश्चित नसतो. साधारणपणे दोन-तीन वर्षांच्या कालावधीपर्यंत कृषीक्षेत्र बदलत नाही.

२ भुमका, ओझा परिहार, भगत, नायके, गैता

मध्यप्रदेशातील बैगा, बिशनपहाडी आणि आंध्रमधील पहाडी रेड्डी या जमाती अशा प्रकारे स्थलांतरित शेती करतात.

३) डोंगरपठारावर किंवा डोंगर उतारावर कायमस्वरूपी शेती करणारे

बहुतांश आदिवासी डोंगरपठारावर किंवा डोंगर उतारावर शेती करणारे आहेत. ते कृषी क्षेत्रावर अवलंबून असतात. कृषी बरोबरच ते जंगली उत्पादनांचा देखील संग्रह करतात. त्यांच्यात शैक्षणिक सुधारणा होत आहेत. अलीकडे थोडीफार तरूण मंडळी सरकारी कामात मजुरी किंवा वन खात्यात नोकरी करताना दिसतात. यामध्ये भिल्ल, गोंड, कोरकू या आदिवासी समाजांचा समावेश होतो.

४) जे आदिवासी उद्योगक्षेत्राकडे आकर्षित झाले आहेत

ज्या राज्यांमध्ये उद्योगांचा विकास होत आहे त्या आदिवासी राज्यांमधील आदिवासी आपल्या पारंपरिक जीवनशैलीत बदल करून उद्योगक्षेत्रात काम करण्याच्या उद्देशाने स्थलांतर करीत आहेत. बंगाल, बिहार, ओडिसा आणि आसाम ही अशी राज्ये आहेत. अशा स्थलांतरितांमध्ये मुंडा, असूर, भुईया, संथाळ या जमातींमधील लोकांचा समावेश प्रामुख्याने आहे.

अति प्राचीन काळापासून भारतात अनेक मानवीसमूह येत राहिले. कालांतराने ते भारतातच स्थिरावले त्यांनी त्यांच्याबरोबर आणलेल्या संकल्पना, आचारविधी यांचाही स्वीकार भारतीय समाजाने केला. या सर्व समाजाच्या संयोगाने आजची मिश्र संस्कृती उदयाला आली असे मानले जाते. पूर्वजपूजाही आदिवासी समाजापासून आधुनिक हिंदू समाजापर्यंत सर्वच भारतीय करताना आढळतात. लोकधर्मातील देवतांचा उगमही आदिवासी धर्म कल्पनांमध्ये आहे का, हे देखील तपासून पाहायला हवे.

लोकदेवता आणि आदिवासींच्या देवता

भारतीय समाजाच्या आजच्या मिश्र संस्कृतीत काही लोकदेवतांचे उन्नयन करून

त्यांना मुख्य प्रवाहात स्वीकारलेले आहे असे दिसते. 'महाराष्ट्रातील विठोबा, खंडोबा, तुळजाभवानी, रेणुका इत्यादी देवतांवर पौराणिक धर्माचे संस्कार घडून आले *(ढेरे २००२:१७६)*. लोकदेवतांना मिश्र संस्कृतीत स्वीकारताना प्रस्थापित असलेल्या देवतेशी त्यांचे साम्य दाखवून दोहोंमधील ऐक्यात्म्य पटवून दिले जाते. प्रस्थापित देवतेच्या नावाशी ध्वनीरूप साम्यही साधले जाते असे दिसते. अशा पद्धतीने महाराष्ट्रात विठोबा, खंडोबा, रेणुका इत्यादी देवतांचे उन्नयन झाल्याचे दिसते. त्यांच्यापैकी बहुतेक देवतांना कुळाचारातही महत्वाचे स्थान मिळालेले आहे. आधुनिक काळात फक्त महाराष्ट्रातच नाही तर दक्षिण भारतातील आंध्र व कर्नाटकातही लोकप्रिय असलेली देवता 'विठ्ठल' ही उन्नयन झालेल्या देवतांमधले एक प्रमुख उदाहरण आहे. विठ्ठलाचे मूळ स्वरूप शोधण्याचे अभ्यासकांनी अनेक प्रयत्न केले आहेत. डॉ .ढेरे यांनी 'विठ्ठल एक महासमन्वय' या शोधग्रंथात विठ्ठलाचे मूळ स्वरूप कर्नाटकातील गोपालक लोकदेवतेचे आहे असे मत मांडले आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील गवळी आणि धनगर विठ्ठल-विरप्पा या जोड नावाने या देवतेची उपासना करतात. असे जोडदेवतांचे एक उपासनास्थान कोल्हापूर जिल्ह्यात पट्टणकोडोली या गावात आहे (*ढेरे २००५:७८*).

मिश्र संस्कृतीत समाविष्ट झालेली खंडोबा ही आणखी एक लोकदेवता आहे. 'सोनथायमर' यांच्या मताप्रमाणे, विरोबा, खंडोबा आणि म्हसकोबा हे मुळात यक्ष असावेत. महामयुरीमंत्रात 'खंडका ही पैठणची रक्षक देवता आहे' असा उल्लेख आहे (*सोनथायमर १९९३:१८५*). गोपालक अवस्थेत मानवीसमाज पशूंचा चारा जिथे मिळत असेल तिथे म्हणजेच डोंगरपठारातून निमभटके जीवन जगत होता. त्यामुळे अशा पशुपालक समूहांनी येण्याजाण्याच्या मार्गावर त्यांच्या देवतांची स्थापना केली असावी. त्यांच्या देवताही पशूंशी संबंधित होत्या. कृषीअवस्थेत मानवीसमाज एकाजागी स्थिर राहून शेती करू लागले. त्यांच्याबरोबर देवतांची स्थानेही बदललेली दिसतात. त्याचवेळेस उन्नयनाच्या प्रक्रियेला आरंभ झाला असावा. 'तरीसुद्धा काही ठिकाणी खंडोबा तांदळ्याच्या स्वरूपात दिसतात. त्याच्यासमोर पशूंच्या प्रतिमा

असतात. बहुतांश खंडोबाचे तांदळे डोंगरमाथ्यावर स्थित असतात. कारण गोपालकसमाज वर्षातील काही काळ डोंगरमाथ्यावर निवास करतात' (*सोनथायमर १९९३;१८५*). लोककथांमधून खंडोबाच्या आणि त्याच्याशी निगडीत असणाऱ्या पशूंच्या कथा आजही धनगर गाताना दिसतात. डॉ. ढेरे यांच्या मताप्रमाणे खंडोबा मूळचा कर्नाटकातील मैलार आहे. एकनाथांच्या लिखाणात 'मैराळ देव कानडे' आणि 'कानडा खंडेराय' असे उल्लेख आढळतात. संबंधित पुराणांमधल्या किंवा माहात्म्य पोथीतल्या अवतार कथा त्या त्या दैवतांच्या उन्नयनाचे सूत्ररूप सांगणाऱ्या असतात. 'मल्लारिमाहात्म्य' या ग्रंथात अशाच प्रकारची खंडोबाची अवतार कथा आहे. 'कृतयुगात' मणिचूल पर्वतावर तप करीत असलेल्या ऋषींना मल्ल राक्षस त्रास देऊ लागला. मुनींनी शिवाकडे साकडे घातले. शिव मार्तंड भैरवाचे रूप धारण करून मल्लदैत्यावर चालून गेला. पराभवाच्या भीतीने मल्लदैत्य घाबरला आणि शिवाला शरण येउन त्याने वर मागितला. 'प्रभो, माझे शिर तुझ्या चरणाखाली नित्य असू दे. आणि माझे अश्वारूढ रूपही तुझ्या सान्निध्यात राहू दे'. भैरव (शिव) संतुष्ट झाला. ऋषींची विनंती मान्य करून त्याच ठिकाणी लिंगद्धयाच्या रूपात म्हाळसेसह अवतरला. 'तेच आदि क्षेत्र' म्हणजेच प्रेमपूर (पेंबर) होय (*ढेरे, २००२;१८*).

खंडोबाच्या उन्ननयापूर्वीच भैरव ही देवता प्रतिष्ठित झालेली होती. तिचा अवतार म्हणून मण्मैलाराच्या रूपात खंडोबा अवतरला असे मानले जाते. मण्मैलाराचे उन्नयन करताना अवतार कल्पना जोडली गेली असावी. मैलाराचे संस्कृत ध्वनीरूपांतर मणी मल्हार भैरवाच्या मागे लावण्यात आलेले दिसते. मारितोंड्या शब्दाचे मार्तंड हे ध्वनीरूपांतर झाले (*ढेरे २००२:१७६*). उन्नयन होऊनही मूळ लोकधार्मिक स्वरूपाशी संबंधित उपासनेतील बगाडासारखी प्रथा पुढे चालूच राहिली.

पेशव्यांच्या नंतर ईस्ट इंडिया कंपनीचे ब्रिटिश गव्हर्नर 'एल्फिन्सटन' यांनी या भागाच्या पाहणीवृत्तांतामध्ये नमूद केले आहे की ''उत्तर-दक्षिण पसरलेल्या महादेव टेकडयांमुळे पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर,सोलापूरचा पश्चिम विभाग व बेळगाव

जिल्ह्याचा उत्तर विभाग यांचे पूर्व-पश्चिम असे दोन स्वाभाविक विभाग झाले आहेत. पश्चिम भागात पुरेसा पाऊस, धान्योत्पादनासाठी योग्य जमीन, दाट लोकसंख्या, सधनता आहे. त्याविरूद्ध परिस्थिती पूर्वभागाची आहे. या भागात पावसाचे प्रमाण अल्प, जमीन फारशी उपजाऊ नाही. गोपालक समाज निमभटक्या अवस्थेत या भागात वावरत असल्याचे दिसते. चाऱ्याच्या शोधात दक्षिण पठाराच्या पूर्वभागातील भटके समाज पश्चिमेकडे येतात. 'सोनथायमर' यांच्या मते, भटक्या समाजांच्या फिरस्तीत त्यांच्याबरोबर त्यांचे देवही पश्चिमेकडे आले असावेत (*सोनथायमर १९९३:१७७*).

अशा तऱ्हेने आदिवासी दैवत परंपरा हा भारतीय संकृतीच्या प्रवाहातील एक स्वतंत्र आणि समांतर स्रोत आहे. त्याकडे विद्धानांचे म्हणावे तसे लक्ष गेलेले दिसत नाही. जंगलात राहात असतांना आदिवासींच्या एका समूहात किंवा एका वसाहतीत किती सदस्य असावेत यावर साहजिकच मर्यादा आली असावी. जे गट त्याच्या मूळ प्रदेशातून स्थलांतरित झाले, ते कालांतराने मूळ जमातीपासूनही तुटलेले दिसतात, त्यामुळे अनेक आदिवासी समाजाच्या पोटजमातींमध्ये सांस्कृतिक वैविध्य आढळते. मात्र दैवत परंपरा, धार्मिक आचारविचार यांचे अनेक धागे समानच असलेले दिसतात. हे आदिवासी दैवतपरंपरांचे वैशिष्टय आहे.

आदिवासी आणि इतर समाजातील पूर्वापार संबंध

वैदिक काळात उदयाला आलेली छोटी छोटी गणराज्ये विशिष्ट कूलसमूहांचीच (*tribe*) होती. त्या त्या कूलसमूहांतील लोक हे एकमेकांशी निकटच्या नातेसंबंधातून जोडलेले असत. त्यांच्या मालमत्तेच्या मालकी हक्काच्या संदर्भातील नियम आणि परंपरा सामायिकतेवर आधारलेल्या होत्या. म्हणजेच त्यांची समाजरचना, काही बाबतीत तरी आदिवासी जीवनाशी जुळणारी होती. जनपदे आणि त्यात रहाणारे कूलसमूह, आर्य आणि अनार्य अशा दोन्ही प्रकारचे असल्याचे उल्लेख आहेत. अनार्य कूलसमूहामध्ये निषाद, मैखल, मालदा ह्यांचा उल्लेख आहे. तेच आजचे आदिवासी

असावेत (*भट्टाचार्य १९७२:१९६*).

ऋग्वेदात 'दाशराज्ञ' युद्धाचा उल्लेख आहे. हे युद्ध रावी (परूष्णी) नदीच्या काठावर झाले ज्यात सुदासाविरूद्ध पुरू, द्रुह्यु, तुर्वश, यदु हे आर्य आणि पख्त, भलानस, आलिन, विषाणीन, आणि शिव हे अनार्य राजे होते (*ऋग्वेद ७.१८.१९.२३*). सुदास राजाचा विजय झाला. त्याकाळातही आर्य आणि अनार्य किंवा आर्यपूर्व लोक ह्यांच्यामध्ये असलेल्या सामाजिक संबंधांचे हे द्योतक आहे

जंगलाची जमीन लागवडीखाली आणली जात असताना जंगलात रहाणाऱ्या आदिवासी जमाती अधिक दुर्गम भागात लोटल्या गेल्या असे मानले जाते. मात्र त्यामुळे आदिवासींची मूळची स्वतंत्र अस्मिता यत्किंचितही उणावली नाही. या गोष्टीचे प्रत्यंतर त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात दिलेल्या लढ्यांमधून येते. १८५७ पूर्वीच आदिवासींच्या स्वातंत्र्य आंदोलनाची सुरूवात झाल्याचे दिसते. पहिले आंदोलन माल पहाडियांनी १७७२ मध्ये केले. तर दुसरे आंदोलन १८३१ मध्ये सिंघभूम जिल्ह्यातील 'हो' जमातीने केले. आंदोलन दडपून टाकण्यासाठी ब्रिटिशांना फौज बोलवावी लागली . ब्रिटिश इतिहासकार गटे व मेकॅलो यांनी त्यांच्या वीरतेला 'जंगली लोकांनी केलेल्या हत्या' असे संबोधले आहे. प्रा. मोहन लाहाडींनी अभ्यास करून या हत्या नसून खासी जमातींनी नियोजन पूर्वक केलेला विद्रोह आहे, असे सिद्ध केले आहे (*केली १९५०;८५-८६*) संथाळांनी 'भगत' नावाच्या साधूच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले. संथाळांचे मत असे होते की, 'ही भूमी आमच्यासारख्या काळ्या लोकांची आहे म्हणून आम्ही कुणीही कर देणार नाही, गोऱ्यांनी परत जावे'. गोऱ्यांनी हेही बंड दडपून टाकले. राजस्थानमधल्या भिल्लांनी विद्रोह करून आपले स्वातंत्र्यप्रेम सिद्ध केले. विद्रोहाचे नेतृत्व गोविंदगुरूंनी केले होते. शिवलाल कोठाडीयां यांनी या विद्रोहाचे वर्णन लिहिले आहे. आंदोलनाचा हेतू सामाजिक धार्मिक सुधारणा हा होता. अशा तऱ्हेने अनेक ठिकाणी भिल्लांनी विद्रोह केला. गांधीजींनी भिल्ल आणि शासनामध्ये मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. अनेक वेळा

वचन देऊनही ब्रिटिशांनी अटींचे पालन केले नाही (*केली १९५०;९२*). झारखंडमधल्या आदिवासींनी 'बिरसा मुंडा'च्या नेतृत्वाखाली शासनाला विरोध करण्याचा प्रयत्न केला. आज अनेक आदिवासी समाजात बिरसा मुंडा आणि तंट्या भिल्ल ही शौर्याची आणि प्रामाणिकपणाची प्रतीके बनलेली आहेत.

आदिवासी समाज जंगलातच स्थिरावले. त्यांना त्यांच्या जीवनावश्यक वस्तू जंगलात सहजपणे उपलब्ध होत होत्या. त्यांच्या परंपरा पर्यावरणाला अनुकूल अशाच होत्या. त्यांची जीवनप्रणाली जंगलातील जमिनीतून उत्पादित होणाऱ्या वस्तू आणि त्यांचा विनिमय यावर अवलंबून होती. ब्रिटिशांच्या काळात मात्र आदिवासी कोणाला म्हणायचे याची स्वतंत्र व्याख्या जनगणनेच्या चौकटीतून बनवली गेली.

भारतात जनगणनेची सुरूवात १८७१ पासून झाली. सुरूवातीला लोकसंख्येचे वर्गीकरण धर्मानुसार म्हणजे हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख असे होते. १९११साली त्यात अचानक बदल करण्यात आला. हिंदू धर्मियांचे वर्गीकरण तीन विभागात झाले-

१)हिंदू

२)भूत-प्रेतवादी

३)दलित

जनगणनेत झालेल्या बदलाचे कारण मुस्लीम समाजाने लॉर्ड मिंटोला दिलेल्या मानपत्रात केलेली मागणी किंवा सूचना हे आहे. इ.स.१९०९ मधे आगाखानाच्या नेतृत्वाखाली मुस्लीम समाजाने लॉर्ड मिंटोला दिलेल्या मानपत्रात, मुस्लीम प्रतिनिधित्व वाढवण्याची मागणी करताना, 'आदिवासी म्हणजे भूत-प्रेत वादी, आणि इतर छोट्या जातीचे समूह जे वास्तवात हिंदू नाहीत, त्यांना वेगळे करावे, ज्यामुळे मुसलमानांचे लोकसंख्येतील प्रमाण वाढेल व मुस्लीम प्रतिनिधित्वाचे प्रमाणही वाढेल' असा उल्लेख होता. मानपत्रातील मजकूर शासकीय अधिकाऱ्याच्या संमतीने लिहिलेला होता (*केली १९५० ;२६४*).

१९११ सालच्या जनगणनेत हिंदूंचे वर्गीकरण दोन विभागात झाले.

१) जो शंभर टक्के हिंदू आहे

२) जो शंभर टक्के हिंदू नाही

हिंदू नसण्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत–

१) जो ब्राह्मणाचे महत्त्व मानीत नाही

२) वेदांना प्रमाण मानत नाहीत

३) हिंदू देवतांची पूजा करीत नाही

४) हिंदूंकडून गुरूमंत्र घेत नाही

५) ज्यांना ब्राह्मण पुरोहित लागत नाही

६) हिंदू मंदिरात ज्यांना प्रवेश नाही

७) ज्यांचा स्पर्श अपवित्र मानला जातो

८) मृत शरीराचे दफन करतात

९) जे गाईचे मांस खातात

१९४७ मध्ये ब्रिटिश सत्तेचा अंत झाला. परंतु मूळ ब्रिटीश शासनव्यवस्था भारतीयांनी स्वीकारली. १९५० मध्ये स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार झाली. त्यामध्ये आदिवासी आणि मागासवर्गीय यांना विशेष सवलती जाहीर झाल्या. या सवलतींचा लाभ आदिवासींना मिळत असल्याचे दृश्य आता हळू हळू दिसू लागले आहे.

असे असले तरीही बहुतांश आदिवासी आधुनिक काळातही निसर्गाच्या सान्निध्यात परंपरेतून निर्माण झालेली त्यांची स्वत:ची जीवनप्रणाली आणि तिचा अविभाज्य भाग असलेल्या दैवत परंपरा जपत आहेत. आजही त्यांची समाजरचना, सामाईक हक्काची कल्पना काही प्रमाणात तग धरून आहे. यातू तत्त्वावर आधारित सुफलनाचे आचारविधी, भूतप्रतादी कल्पनांवर आधारित देवतागण, देवक कल्पनेवर आधारलेले आचारविधी आणि संकेत त्यांच्या धार्मिक जीवनाचे आणि आचारविधींचे

आधार आहेत.

भारतातील आदिवासी संस्कृती आणि बिगर आदिवासी संस्कृतींमध्ये देवाणघेवाण होणे हे हजारो वर्षांच्या वाटचालीत अपरिहार्यच होते. या देवाणघेवाणीचे प्रतिबिंब अनेक पुराणकथा, लोककथा आणि व्यापार-विनिमयाच्या पद्धती यामध्ये उमटलेले पाहावयास मिळते. प्राचीन वाङ्मयातही ते आढळते.

रामायण आणि महाभारतात प्रस्थापित समाज आणि आदिवासी समूह यांच्यातील संबंधांच्या अनेक कथा आहेत. रामायण रचणारे वाल्मिकी ऋषी आधी वाल्या कोळी म्हणूनच ओळखले जात होते. रामायणातील शबरीची कथा सर्वश्रुत आहे. शबरी भिल्लिण होती. तिने आपल्या सेवाव्रताने मातंग ऋषींकडून शिष्यत्व मिळवले होते. राम जंगलातून जात आहे, ही वार्ता तिच्यापर्यंत पोहोचताच ती रामाचे स्वागत करण्यासाठी उत्कंठतेने वाट पाहत होती. रामाच्या खाण्यासाठी तिने जंगलातील बोरे गोळा केली . बोरे अंबट निघाली तर, या विचाराने तिचे मन शंकित झाले. तिने प्रत्येक बोर चाखून पाहिले. उष्टी झालेली बोरे रामाने खाल्ली. शबरीला धन्यता वाटली. या कथेत शबरीची रामावर असलेली भक्ती आणि दोन्ही समाजातील संबंधांचा आणि त्यात अभिप्रेत असलेल्या सामाजिक उतरंडीचाही प्रत्यय येतो. रामायणात गुहक ह्या निषाद राजाची कथाही अशीच आहे. राम वनवासात गेला तेव्हा त्याला नदी पार करण्यासाठी मदत करणारा आणि मैत्रीचा हात पुढे करणारा राजा गुहकच होता. राम वनवासात निघाला त्यावेळी भरत राजधानीत नव्हता. भरत परत आल्यावर त्याला अयोध्येतील घटनाक्रम समजला. त्याच्या आईच्या इच्छेनुसार राज्यावर न बसता तो रामाला परत आणण्यासाठी निघाला. त्याच्या बरोबर मंत्री, श्रेष्ठी आणि नगरवासीही निघाले. त्यांच्या समवेत वसिष्ठमुनीही होते. अनेक रथ व घोडे घेऊन भरत निघाला. दुरून युद्धावर जाणारी सेना आहे असे दृश्य दिसू लागले. त्यांचा मार्ग शृंगवेरपुरावरून चित्रकूटला जाणारा होता. राम चित्रकूटपर्वतावर असल्यामुळे साहजिकच भरत शृंगवेरपूर जवळून जाऊ लागला. त्यावेळेस

शृंगवेरपूरचा राजा गुहक हा होता. त्याला ढुरून धुरळा आणि अयोध्येचे निशाण दृष्टीस पडले. त्याने कल्पना केली की भरत बहुधा पाठलाग करून रामाला मारण्यास येत आहे. त्याने आपल्या सैन्याची जमवाजमव केली आणि विचार केला की जर भरत रामाचा मित्र म्हणून येत असेल तर त्याचे स्वागत करू आणि शत्रू म्हणून आला तर युद्ध करू. भरताने त्याचे शंका निरसन केले, तेव्हा गुहकाने असे उद्गार काढले –

'धन्यस्त्वं न त्वया तुल्यं पश्यामि जगतीतले।
अयत्नादागतं राज्यं यस्त्वं त्यक्तुमिहेच्छसि ॥ (२–७१–१२)

महाभारताच्या आदिपर्वात भीम आणि हिडिंबेच्या विवाहाचीही कथा आहे. धृतराष्ट्राची आज्ञा घेऊन निघालेले पाच पांडव, द्रौपदी आणि कुंती वारणावत अरण्यात विश्रांतीशाठी शालवृक्षाखाली विसावले होते. जवळच एका वृक्षावर हिडिंब नावाचा राक्षस आपल्या हिडिंबा नावाच्या बहिणी समवेत राहात होता. तो क्रूर आणि नरमांसभक्षक होता. शालवृक्षाखाली विसावलेल्या पांडवांना पाहून त्याची मांस भक्षणाची वासना जागृत झाली. त्याने बहिणीला पांडवांना मारण्याची आज्ञा दिली. हिडिंबा जेव्हा पांडवांच्याजवळ पोचली तेव्हा भीम एकटाच जागा होता. ती भीमाला पाहून मोहित झाली. भीमाला वश करण्यासाठी तिने रूपवती स्त्रीचा वेष धारण केला व आपली विवाहाची इच्छा प्रगट केली. भीमाने नकार दिला. तेवढ्यात कुंती जागी झाली. हिडिंबेने कुंतीची आळवणी केली. कुंतीने विवाहास मान्यता दिली. परंतु हिडिंब राक्षसाचा विवाहास विरोध होता. त्याचे व भीमाचे युध्द झाले. युद्धात हिडिंब राक्षसाचा मृत्यू झाला. भीम आणि हिडिंबेचा विवाह संपन्न झाला. हिडिंबेला मुलगा झाला. त्याचे नाव घटोत्कच होते. हिमाचलमध्ये आजही हिडिंबेला देवता मानून तिची उपासना केली जाते. मनालीला हिडिंबेचे देऊळ आहे.

कौटिलीय अर्थशास्त्रात जंगलातील उत्पादनांची व्यवस्था पाहणाऱ्या शासकीय अधिकाऱ्याला 'कुप्याध्यक्ष' अशी संज्ञा आहे (*कंगले १९९५:१४२*). वन्य उत्पादनांना 'द्रव्य'असे संबोधले आहे. द्रव्यातून उपयोगी वस्तू निर्माण करण्यासाठी कारखाने

स्थापावेत अशी सूचना कुप्याध्यक्षांना केलेली आहे. नागरी समाजाला वन्योत्पादनांचा पुरवठा करण्यामध्ये आदिवासींची महत्त्वाची भूमिका होती (*अधिक माहिती परिशिष्ट क्र. १*). भीम आणि हिडिंबा यांच्या कथेसारख्या अनेक कथा महाभारत आणि इतर संस्कृत साहित्यात आढळतात. त्यावरून प्रस्थापित समाज आणि वन्यसमाजात प्रासंगिक किंवा नैमित्तिक संबंध येत होते असे निश्चितपणे दिसते.

भारतीय समाजरचनेच्या संदर्भात अशा सामाजिक संबंधांचा अभ्यास 'डॉ. कोसंबी' यांनी प्रथमच केला आहे. डॉ. कोसंबींच्या मताप्रमाणे उत्पादनसाधने, उत्पादन व उत्पादनावर आधारित असलेली जीवनप्रणाली यांच्या अनुषंगाने प्राचीन भारतीय इतिहासाची मांडणी केल्यास विविध गटांच्या जीवनप्रणालीत दडलेल्या समान संकल्पना स्पष्ट होतील. कालक्रमानुसार त्या काळातील मानव कसे जीवन जगत होता याचा अंदाजही या पद्धतीच्या अभ्यासातून लक्षात घेता येईल (*कोसंबी २००४:१*) त्या काळातील मानवाच्या संकल्पना किंवा आचारधर्म आजच्या समाजजीवनाशी पडताळून पाहाता येतील (*कोसंबी २००४:६*).

मार्क्स यांच्या सिद्धांताप्रमाणे, ज्या समाजात सामाईक उत्पादन होते त्या समाजात अजाणतेपणी सामाजिक संबंध निर्माण होतात (*कोसंबी २००४:९*).

कोसंबींच्या मतानुसार, मार्क्स यांच्या सिद्धांतांच्या साहाय्याने भारतीय इतिहासाची मांडणी करताना मानववंशशास्त्राची विश्लेषणे, उत्खननातून उपलब्ध झालेले अवशेष आणि आजची आदिवासींची जीवनप्रणाली या सर्वांचा एकत्रित विचार केल्यास सामाजिक संबंधांचा उलगडा होईल. (*कोसंबी २००४:७*) भारतातील आदिवासी समाज आणि शहरी समाज हे परस्पर संपर्कात आहेत. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात परस्परात झालेली आचारधर्मातील देवाण-घेवाण, प्रचारात असलेल्या आचारविधींमध्ये स्पष्ट दिसते (*कोसंबी २००४:२०*).

लोखंडाच्या शोधामुळे भारतीय समाज जीवनात फार मोठा बदल झाला. उत्पादन साधन बदलले. उत्पादनात वाढ झाली. नवीन सामाजिक नाती निर्माण झाली. अधिक उत्पादनातून आर्थिक दशा सुधारली, जमिनीवर मालकी हक्काची नवीन प्रथा आकार घेऊ लागली. अत्यंत आवश्यक असलेले मीठ आणि लोखंड प्रत्येक गावात तयार होत नव्हते तरीसुद्धा प्रत्येक गावात वापरले जात होते. यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक, वस्तू विनिमय किंवा देवाण-घेवाण होत होती आणि दुसरी गोष्ट गरजेपुरतेच उत्पादन होत होते (*कोसंबी २००४:११*).

कोसंबींच्या मतानुसार, नांगराच्या आधारे केलेली शेती ही भारतीय समाजासाठी फार मोठी देणगी होती. कोसंबीनी *'An introduction to the study of Indian History'* या ग्रंथात आधुनिक समाजांतील उदाहरणे देउन आपले मत स्पष्ट केले आहे. हे स्पष्ट करण्यासाठी कोसंबीनी पारधी, वैदू, आणि रामोशी या तीन जमातींची उदाहरणे दिली आहेत (*कोसंबी २००४:२७ ते३१*). कोसंबींच्या मतानुसार, आदिवासी ते मुख्य प्रवाहातील एक जात ही समन्वयाची प्रक्रिया भारतात निरंतर चालू आहे. म्हणूनच कोसंबी ठामपणे सांगतात, 'भारतातील आदिवासी समाज आणि शहरी समाज हे परस्पर संपर्कात आहेत. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात परस्परात झालेली आचारधर्मातील देवाण-घेवाण, प्रचारात असलेल्या आचारविधींमध्ये स्पष्ट दिसते' (*कोसंबी २००४ :२०*).

प्राचीन काळापासून अनेक मानवी समूह व्यापाराच्या वा आक्रमणाच्या उद्देशाने ऐतिहासिक काळातही भारतात येत राहिले. कालांतराने येथेच स्थिरावले. त्यांनी बरोबर आणलेल्या परंपरा, श्रद्धा, संकल्पना, भारतीय भूमीत रूजल्या आणि म्हणूनच या पार्श्वभूमीवर भारतीय समाजाला मिश्र स्वरूप प्राप्त झाले आहे. याच स्वरूपाच्या प्रक्रियांच्या आधारे लोकधर्मातील देवतांचा जन्म आदिवासी धर्म कल्पनांमध्ये आहे का, हे ही तपासून पाहिले पाहिजे.

भारतीय इतिहासातील सर्वाधिक प्राचीन ज्ञात संस्कृती म्हणजे हडप्पा संस्कृती. त्याकाळी भारतीय मालाला देशात आणि परदेशातही भरपूर मागणी होती. मेसोपोटेमियामधील अक्कडचा राजा पहिला सार्गन *(इ.स.पूर्व२३३४)* याच्या राजवाड्यात सापडलेल्या इष्टिका लेखात, 'बंदरात मालाने भरलेली मेलुहाची जहाजे उभी आहेत' असा उल्लेख आहे. मेलुहा भारतातील सिंधुप्रदेशाचे प्राचीन नाव असल्याचे विद्धानांनी मान्य केले आहे (*रत्नागर २००६ ;५३*). या लेखात व्यापारी मालाची यादी आहे. या यादीत तयार मालाबरोबर वन्योत्पादनांचाही समावेश आहे. वन्योत्पादनांचा पुरवठा जंगलातील रहिवासी करीत असत. ऐतिहासिक काळातही वनसंरक्षण व प्रवाशांना मार्गदर्शन इत्यादी कामे आदिवासी करीत असल्याचा उल्लेख मोतीचंद्र यांच्या 'सार्थवाह' या ग्रंथात आहे. प्राचीन व्यापार या विषयावर मोतीचंद्र ह्यांनी सखोल अभ्यास केला आहे. त्यांनी बौद्ध-जैन-संस्कृत इत्यादी साहित्याचा आधार घेतला आहे. तसेच काही प्राचीन इतिहासकार, व्याकरणकार इत्यादी लेखकांच्या ग्रंथांचाही विचार केला आहे. ते म्हणतात जंगलातील हे रहिवासी स्वत: बरोबर उत्तम जातीची व माग काढण्यात तरबेज असलेली कुत्री बाळगत. पिवळ्या रंगाचे कपडे, गळ्यात लाल मण्यांच्या माळा, डोक्यावरचे केस लाल पट्टीने बांधलेले, असा त्यांचा वेष असे (*पारधी २०१०:१०१*). ही प्रथा मौर्य काळातही यात फारसे बदल न करता चालू असल्याचे दिसते. या काळात जंगलात रक्षणासाठी आदिवासी शिकाऱ्यांना त्यांच्या कुत्र्यांसह नेमले जाई. शत्रू किंवा डाकू येत असल्याची चाहूल लागतांच ते शिकारी झाडावर लपून बसत. लपलेल्या जागेवरून नगारे वाजवून अथवा शंख फुंकून इतरांना सावध करीत. तसेच पाळलेल्या संदेशवाहक कबुतरांच्या गळ्यात मुद्रा बांधून राजाला संदेशही पाठवत किंवा थोड्या थोड्या अंतरावर धूर करून संकटाची सूचना देत असत (*पारधी १९७४:१०१*).

सनातन धर्म आणि आदिवासी दैवत परंपरांचे नाते

भारतीय समाजाच्या धार्मिक आचार-विचारांमध्ये पौराणिक कर्मकांडांचे उपचार आणि लोकाचार यांची सरमिसळ झालेली दिसते. त्याचमुळे भारतीय धर्मशास्त्रात

काळानुरूप बदलत जाणाऱ्या प्रवाहांचे प्रतिबिंब पाहायला मिळते. आज जरी या सर्व धार्मिक आचार, विचार व भारतीय संप्रदायांना ' हिंदुधर्म ' असे सर्वसमावेशक नाव दिलेले असले तरी मुळात तो सनातन धर्म म्हणून ओळखला जात असे. सनातन याचा अर्थ आदि व अंत नसलेला. ऋग्वेदात धर्म संकल्पनेची व्याख्या, 'या विश्वाचे धारण करणारी शक्ती म्हणजेच धर्म' अशी आहे (*डांगे १९७३:५*). ऋत म्हणजेच वैश्विकचक्र ही आणखी एक संकल्पना ऋग्वेदात आहे. जे अव्याहत चालत आहे, जे विश्वातील प्रत्येक घटनेचे कर्ते करविते आहे, ते विघ्न न येता चालत राहावे असे आचरण नित्य करणे हे देवांचे आणि मानवाचे कर्तव्य आहे. ते चालत राहावे म्हणून यज्ञ करावा असा उल्लेख आहे. यज्ञ हे त्या सृष्टिचक्राचे प्रतीक मानले आहे. म्हणून यज्ञ हाच धर्म ही संकल्पना ऋग्वेदात प्रस्थापित झालेली दिसते. धर्म कल्पनेचे मूलतत्त्व हेच मानलेले आहे. आदिवासी दैवत परंपरांमध्ये यज्ञ आणि होमहवनावर आधारित आचारविधी नाहीत हे खरे. परंतु यज्ञविधी हा एक यातुविधी आहे. हे लक्षात घेतले तर मात्र आदिवासींचे यातुविधी आणि यज्ञातील यातुविधी यांच्यामागील भावना आणि कार्यकारणविधी यांचे कुठेतरी नाते जुळते आणि त्या मागील प्रेरणा काय असाव्यात ह्या प्रश्नाचा वेध घ्यावा असे वाटते. कदाचित दोन्ही प्रकारातील आचारविधींमध्ये दृश्य स्वरूपात साम्य नसले तरी वैदिक समाज आणि आदिवासींमधील देवाणघेवाणीचे प्रतिबिंब ह्या आचारविधींमध्ये उमटले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोरकूंच्या आचारविधींचा सविस्तर अभ्यास करत असताना अशा प्रकारचे परिणाम जाणवतात का ह्याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे.

जगभरातील नवाश्मयुगीन काळातील 'मातृदेवतेच्या संकल्पना आणि उपासना पद्धतीत समानता आढळते' (*अत्रे १९८७;१९१*). आधुनिक काळातही त्यात फारसे बदल घडलेले दिसत नाहीत. 'मातृदेवतेच्या पूजनात सर्जन ही मध्यवर्ती कल्पना आहे. या देवतांचे उत्सव निसर्गातील नवनिर्मितीच्या चक्राशी जोडलेले असतात. मातृदेवतांच्या मूर्ती कधी अर्धमानव तर कधी अर्धपशू अशा संयुक्त स्वरूपातही

असतात. मूर्तिसमवेत झाड, स्तंभ, पाणी आणि वन्य वा पाळलेले पशू आढळतात. भूमातेच्या स्वरूपात ती सर्जनाचे स्वयंसामर्थ्य असणारी किंवा सूर्य शक्तीच्या संयोगाने सर्जन करू शकणारी अशी मानली जात असावी. मातृदेवतेला पुरूष जोडीदार आवश्यक असणे ही संकल्पना नंतरच्या काळातील असावी असे दिसते' (*अत्रे १९८७;१९३*).

सुफलनासाठी व भय निवारणासाठी असलेल्या काही परंपरा नंतरच्या काळातही अखंड राहिलेल्या दिसतात. कृषी अवस्थेत मानवी समाज एका जागी स्थिर राहून शेती करू लागले गावाच्या स्थापनेबरोबर गावाच्या रक्षणासाठी ग्रामदेवतांची कल्पना रूजलेली दिसते. खंडोबा, तुळजाभवानी, रेणुका, एकवीरा इत्यादी ग्रामदेवतांचे रूपांतर कुलदेवतेत झाल्याचेही आढळते. दरवर्षी ग्रामदेवतांचा उत्सव करण्याची प्रथा भारतभर प्रचलित आहे. अशा उत्सवाला महाराष्ट्रात उरूस किंवा जत्रा, तर मध्य प्रदेशात मेला म्हणतात. कार्ल्याच्या एकवीरादेवतेची जत्रा माघ महिन्यात भरते. एकवीरा ही कोळी व प्रभू समाजाची कुलदेवता आहे तशीच एकनाथांचीही कुलदेवता आहे (*एकनाथी भागवत;१.७०*). एकनाथ ब्राह्मण होते, म्हणजेच अनेक जमातींची एकच कुलदेवता असल्याचे दिसते. ह्या देवतांच्याही जत्रा भरतात. महालक्ष्मी, खंडोबा ही ब्राह्मणांची व धनगरांची कुलदैवते आहेत. ग्रामदेवतांच्या उपासनापद्धती काहीशा कठोर आहेत. जिच्यात बगाडासारखी शरीराला कष्ट देणारी व पशुबळी सारखी आदिम प्रथा रूढ़ आहे.

अशा तऱ्हेने अनेक भिन्न भिन्न श्रद्धापरंपरा भारतीय समाजात रूजल्या. मिश्र संस्कृतीत प्रत्येक समुदायाच्या परंपरा, श्रद्धा यांना स्वतंत्र स्थान मिळाले आणि अशा तऱ्हेने समावेशक आचारधर्माची प्रणाली निर्माण झाली व ती अद्यापही टिकून असल्याचे दिसते. भारतीय समाजात असलेली मूर्तिपूजकता हे एक सिद्ध वास्तव आहे (*ढवळीकर १९८८;५५*). इनामगाव येथील उत्खननात मिळालेल्या मातीच्या मूर्ती काही भाजलेल्या तर काही कच्च्या मातीच्या आहेत. काहींचे अवयव उठावदार,


तर काही सपाट शरीराच्या आहेत. ज्यांचे अवयव उठावदार आहेत त्या सुफलनाच्या संकल्पना आणि विधींशी निगडित असाव्यात. ह्या मातीच्या मूर्ती भाजल्या जात. ज्या मातीच्या मूर्ती भाजलेल्या नाहीत त्यांची उपासना विशिष्ट योजना विशेष प्रसंगी केली जाई, असे डॉ.ढवळीकरांचे मत आहे. त्यांच्या मताप्रमाणे विशिष्ट प्रसंगी पूजल्या जाणाऱ्या काही देवता शिरोहीनही आहेत. त्यातील दोन मूर्ती जमिनीत खड्डा खणून झाकणाच्या डबीत ठेवून पुरलेल्या होत्या. त्यामध्ये एक बैलाची मूर्तीही होती. पाठीवरील छिद्रांत काडी खोचून त्यावर देवतेला बसवता यावे अशी योजना ही केलेली होती. 'देवतेचे वाहन' या कल्पनेचा हा आरंभ असावा. याशिवाय शिशूजन्म वेळीही अशा मूर्तीचे पूजन होत असावे. महाभारतातही शिरोहीन देवतेचा उल्लेख आहे. महाभारतात तिला विशिरा म्हटलेले असून ती बालकांच्या भविष्याशी निगडित असल्याचे दिसते (*वन २३०,१५*). अशा तऱ्हेच्या देवतेचे पूजन शाकंभरी म्हणून सहाव्या शतकापर्यंत महाकूट येथे होत होते. स्कंद पुराण, व देवीमाहात्म्य या ग्रंथात तिचा उल्लेख छिन्नमस्ता असा आहे. मातृदेवता आद्यस्वरूपात तांदळ्याच्या रूपात तर कधी शिरोहीन दिसते. तिचे विकसित रूप अनेक भुजा असलेल्या मूर्तिस्वरूपात दिसते. तांदळ्यापासून मूर्तिस्वरूप प्राप्त होईपर्यंत तिला प्राप्त झालेल्या अनेक अवस्था, पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी सिद्ध केल्या आहेत. संस्कृत ग्रंथातूनही हा विकासक्रम पडताळून पाहाता येईल.

भारतीय संस्कृतीत प्रत्येक समुदायाच्या भिन्न परंपरा, श्रद्धा, यांना स्वतंत्र स्थान मिळाले आणि त्यातूनच समन्वित श्रद्धाप्रवाह व आचारधर्माची प्रणाली निर्माण झाली. लोकदैवतांचे उन्नयन केले गेले. काही विद्धानांनी या प्रक्रियेला संस्कृतीकरण *(Sankritizition)* असे संबोधले आहे.


अनेकत्वाच्या स्वीकारामुळेच भारतीय समाजात विविधता निर्माण झाली आहे. या विषयावर इरावती कर्वे असे मत देतात की 'एका बाजूला जुने एतद्देशीय तर दुसऱ्या

बाजूला परकीय यात नेहमी सांकृतिक तडजोडच होत आली आहे. त्यामुळे जी परंपरा परिणत झाली आहे. तिच्यात सर्व संस्कृतींची मूलतत्त्वे जिवंत राहिली आहेत. तडजोड हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे'. डॉ. कर्वे या वाक्यातून भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य सांगत आहेत. त्यांनी हिन्दू या संज्ञेऐवजी हिन्दी या संज्ञेची जाणीवपूर्वक योजना केली आहे. भारतातील सर्वच समाजात नवीन आलेले परदेशी असोत अथवा भारतात स्थिरावलेले एतद्देशीय असोत त्यांच्यात तडजोड क़रणारी गुणवैशिष्ट्ये आहेत असे त्यांना म्हणायचे आहे. पुढे त्या म्हणतात, हिंदुस्थानातील बहुदेवतावाद विचार करण्यासारखा आहे. शिव या अवैदिक देवतेला विष्णूच्या बरोबरीचे स्थान मिळालेले दिसते. हे त्याचे एक ठळक उदाहरण आहे (*कर्वे २००६:२३*). लोकधर्मातील देवतांची लोकप्रियताही टिकून असल्याचे दिसते. आजही नवीन देवता निर्माण होतात, त्यांचा स्वीकारही आदरपूर्वक होताना दिसतो.

अनेकत्वाच्या स्वीकारामुळे साकार झालेल्या दैवत परंपरेत लोकधार्मिक आणि आदिवासी परंपरांचे स्थान आणि त्यातून धार्मिक परंपरेत झालेले बदल याचा फारसा सखोल अभ्यास झालेला दिसत नाही. भारतातील आदिवासी समाजाच्या दैवत परंपरांचे विश्व खूप व्यापक आहे. परंतु त्यातील मूलभूत संकल्पनांमध्ये आणि आचारविधींमध्ये साधर्म्यही आहे कारण,आदिवासी जीवनपद्धतींशी ते अन्योन्यत्वाने जोडलेले आहे. या प्रबंधामध्ये कोरकूंच्या दैवतपरंपरांचा अभ्यास करण्यामागे त्या व्यापक विश्वाची एक झलक मांडावी, तसेच बदलत्या काळानुरूप जीवनपद्धतीतील बदलानुसार या दैवतपरंपरा आणि आचारधर्मामध्ये काही बदल झाले असल्यास त्याचीही नोंद घ्यावी हा हेतू आहे.



मुखवटा घालून नृत्य करणारा शिकारी




भिमबेटका येथील सामूहिक शिकारीचे गुहाचित्र



भिमबेटका येथील सामूहिक शिकारीचे गुहाचित्र



कुलामामा (वाघ कुलदेवता)



'श्रीमंत चिमाजी अप्पा पेशवे' यांची समाधी



महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांची विसाव्या शतकातील समाधी



महर्षि अण्णासाहेब पटवर्धन समाधी

प्रकरण दुसरे

कोरकूंची भौगोलिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी


महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश

कोरकू महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशचे निवासी आहेत. हा प्रदेश (*नकाशा क्र. १*) पूर्व-पश्चिम पसरलेल्या विंध्य आणि सातपुडा पर्वतांच्या रांगांनी वेढलेला आहे. प्राचीन काळी महाराष्ट्राच्या ईशान्य विभागाला विदर्भ अशी संज्ञा होती. नंतर मध्ययुगात विदर्भालाच बरार असे संबोधले गेल्याचे दिसते. बहुसंख्य कोरकूंचे वास्तव्य सातपुड्याच्या उत्तर आणि दक्षिण रांगांमधे असल्याचे दिसते. महाराष्ट्राचा ईशान्यभाग म्हणजे अमरावती जिल्हा आणि आजच्या मध्यप्रदेशातील बैतूल, छिंदवाडा, होशंगाबाद, निमाड इत्यादी जिल्हे, नर्मदा परिसर हे कोरकूंचे निवासक्षेत्र आहे. सर्वसाधारणपणे नर्मदा आणि तापी या नद्यांच्या परिघात कोरकू एकवटलेले दिसतात. १९८१ सालच्या जनगणनेनुसार कोरकूंची एकूण लोकसंख्या ३,६३,१४८ होती. त्यापैकी मेळघाटातील लोकसंख्या १,१५,९७४ आणि मध्यप्रदेशातील ६,६७५१ इतकी होती. म्हणजेच कोरकूंच्या एकूण लोकसंख्येतील जवळजवळ ३०% हून अधिक कोरकू मेळघाटात राहातात. हे लक्षात घेऊन कोरकूंच्या जीवनशैलीच्या अभ्यासासाठी चिखलदरा परिसरातील आणि मध्यप्रदेशातील भैसदेही तालुक्यातील कोरकू गावे निवडली आहेत. अमरावती ते बऱ्हाणपुर राजमार्ग मेळघाटातून जातो. अमरावतीपासून ९५ किलोमीटर अंतरावर चिखलदरा आहे. शासनाच्या 'भाषावार प्रांतरचना' या योजने अंतर्गत मेळघाट महाराष्ट्रात आणि उरलेले विभाग मध्यप्रदेशात वर्ग झाले आहेत. अशा तऱ्हेने कोरकूंची भूमी दोन प्रांतात विभागली असली तरीही त्यांचे नातेसंबंध, आप्तसंबंध यांवर त्याचा काही परिणाम झालेला नाही. या प्रदेशात कोरकूं खेरीज आंध, परधान, बैगा, माडिया, गोंड, कोलाम राजगोंड, निहाल या आदिवासी जमाती आणि गवळी, बलिया या मागासवर्गीय जमातींची वस्ती आहे. आदिवासींच्या दैवत परंपरा समजून घेण्यासाठी त्यांच्या निवासक्षेत्राची ऐतिहासिक, भौगोलिक पार्श्वभूमी लक्षात घेणे योग्य ठरेल.

कोरकू प्रदेश


भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश
जम्मू आणि काश्मीर
हिमाचल प्रदेश
पंजाब
हरियाणा
उत्तराखंड
राजस्थान
उत्तर प्रदेश
बिहार
सिक्किम
अरुणाचल प्रदेश
आसाम
नागालँड
मेघालय
मणिपूर
मिझोरम
त्रिपुरा
मध्य प्रदेश
गुजरात
झारखंड
पश्चिम बंगाल
छत्तीसगढ
ओरिसा
दमण आणि दीव
दादरा आणि नगर-हवेली
महाराष्ट्र
आंध्र प्रदेश
गोवा
कर्नाटक
लक्षद्वीप
केरळ
तामीळनाडू
पुडुचेरी
अंदमान आणि निकोबार


पश्चिम निमाड
पूर्व निमाड
बेतुल
छिंदवाडा
बऱ्हाणपुर
जळगाव
अमरावती
अकोला
बुलढाणा
औरंगाबाद


N
REFERENCE
State
District
State Capital
District HQ
Town
मोरेना
भिंड
उत्तर प्रदेश
ग्वाल्हेर
दतिया
शिवपुर
शिवपुरी
राजस्थान
टिकमगढ
छत्तरपुर
रेवा
पन्ना
सतना
सिधी
सिंगरोली
निमच
मंडसौर
गुणा
अशोकनगर
राजगढ
विदिशा
सागर
दामोह
कटनी
उमरिया
शाहदोल
रतलाम
उज्जैन
शाजापुर
भोपाळ
रायसेन
जबलपुर
डिंडोरी
अनुपपुर
झबुआ
इंदुर
सिहोर
नरसिंगपुर
मंडला
धार
देवास
होशंगाबाद
छत्तीसगड
अलीजापुर
हरदा
सियोनी
पश्चिम निमाड
पूर्व निमाड
छिंदवाडा
बालाघाट
नंदूरबार
बरवानी
बेतुल
बऱ्हाणपुर
गोंदिया
GUJRAT
धुळे
जळगाव
अमरावती
नागपुर
भंडारा
बुलढाणा
अकोला
वर्धा
नाशिक
वाशिम
यवतमाळ
चंद्रपुर
औरंगाबाद
जालना
हिंगोली
गडचिरोली
ठाणे
अहमदनगर
परभणी
मुंबई
बीड
नांदेड
पुणे
रायगड
लातुर
सातारा
सोलापुर
उस्मानाबाद
आंध्र प्रदेश
रत्नागिरी
सांगली
Arabian Sea
कोल्हापुर
सिंधुदुर्ग
REFERENCE
SCALE

भौगोलिक पार्श्वभूमी

मध्यप्रदेश आणि मेळघाट हा प्रदेश उंचसखल दऱ्या-खोऱ्यांनी व्यापलेला आहे. या विभागाचे अक्षांश-रेखांश असे आहेत-

उत्तर अक्षांश-२२ते२३ अंश

पूर्व रेखांश- ७२ते ८२ अंश

पूर्वेला बंगाल आणि बिहार; पश्चिमेला गुजरात; दक्षिणेला महाराष्ट्रातील अकोला, यवतमाळ आणि बुलढाणा हे जिल्हे; उत्तरेला मध्यप्रदेशातील भोपाळ, जबलपूर जिल्हे आणि छत्तीसगड राज्य अशा या प्रदेशाच्या सीमा आहेत (*नकाशा क्र. २*). सातपुडा आणि विंध्य पर्वतांच्या आडव्या रांगा या प्रदेशात पूर्वपश्चिम पसरलेल्या आहेत. तापी, नर्मदा, पूर्णा, सिपना, टिगनी, गडगा, सुखी या नद्या व त्यांच्या उपनद्या या प्रदेशातून वाहतात.




येथील हवामान विषम व कोरडे आहे. हा प्रदेश अधिक पर्जन्यमानाचा आहे. सरासरी पाउस १९०५ मि.मी. इतका पडतो. ज्वारी, कोद्दो, कुटकी, कान्हळे, राळा, धान, भुईमुग ही येथील प्रमुख पिके आणि वनौषधी, डिंक, हरडा, गवत, मोहाच्या बीया, मोहाची फुले, चारोळी, तेंदुपाने ही येथील प्रमुख वन्योत्पादने आहेत. येथील रहिवाशांचा निर्वाह प्रामुख्याने शेती, शासकीय योजनांमध्ये मजुरी आणि लाकूडतोडी यावर अवलंबून असतो. चिखलदरा हे महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे.

प्राचीन प्रवास मार्ग

डॉ. सांकलियांच्या 'नावडाटोली अहवालातील' उल्लेखानुसार, प्राचीन काळापासून उत्तर आणि दक्षिण भारत जोडणारे मार्ग या विभागातूनच जात होते. नावडाटोली येथे झालेल्या उत्खननाच्या आधारे ताम्रपाषाणयुगीन काळापासूनच हे दळणवळण चालू होते असे दिसते (*सांकलिया १९७४:४३४*). आज ही मथुरा-आग्र्याहून दक्षिणेकडे जाणारा मार्ग चंबळ नदीच्या खोऱ्यातून उज्जैनपर्यंत (*उज्जयिनी*) येऊन नंतर नर्मदेच्या खोऱ्यातून दक्षिणेकडे वळतो. प्राचीनकाळी दक्षिणेकडे जाणाऱ्या राजमार्गाचे हेच वळण होते (पारधी१९७४;३०). 'सूत्तनिपात' या बौद्धग्रंथातील 'बावरी' जातकाच्या आधारे दक्षिण-उत्तर जोडणारे मार्ग सातपुड्यातून जात होते हे स्पष्ट होते. बावरीचे शिष्य गौतम बुध्दाचे मार्गदर्शन प्राप्त करून घेण्यासाठी या मार्गाने कौशांबीला गेले होते असे मानले जाते (*कौसंबी १९९६:११२-१३*).

'कोसलचा बावरी नावाचा ब्राह्मण' आपल्या शिष्यांसह 'दक्षिणापथला' येऊन मुळा गोदावरीच्या संगमाजवळ राहू लागला. त्या सर्वांची उपजीविका जंगलातील कंदमुळे, जंगली धान्य यावर अवलंबून होती. बावरीने एक यज्ञ केला. या यज्ञात दान कमी मिळाले असे वाटून ब्राह्मणाने शाप दिला. शापातून मुक्त होण्याच्या उद्देशाने, बावरीने आपले सोळा शिष्य गौतम बुध्दाचे मार्गदर्शन प्राप्त करून घेण्यासाठी कौशांबीला पाठवले होते'. या जातकात वर्णन केलेला दक्षिण-उत्तर जोडणाऱ्या मार्गाचा आरंभ पैठणपासून होत असे. पटित्थान(पैठण), महिष्मती,

उज्जैयिनी (*उज्जैन*), गोनद्धपूर (*गोंधपूर-गोंडवनात असावे*). अजूनही गोनद्धपूरच्या स्थानाची निश्चिती झालेली नाही. भिलसा, साकेत, फैजाबाद, कौशांबी, सावथ्थी येथपर्यंत आलेला हा मार्ग पुढे 'उत्तरापथाच्या' पूर्व भागातून सेतव्य, कपिलवस्तु, वेसाली, कुशिनार, पावा, भोजनगर, राजगीरला जात असे. त्याच मार्गाने बावरीचे शिष्य कौशांबीला पोहोचले होते असे मानले जाते (*नकाशा क्रमांक ३*).



मेळघाटी सातपुडा या ग्रंथात आणखी एका मार्गाचा उल्लेख आहे. हा मार्ग पायनघाट आणि लगतच असलेल्या नरनाळा किल्ल्याजवळून जातो (*देशपांडे २००९:५६*). पायनघाट हे कमी उंचीचे पठार आहे. हे पठार मेळघाट आणि बैतुलच्या दक्षिणेकडे

आहे या भागाला गंग्राला असेही संबोधले जाते. हा प्रदेश सातपुड्याच्या उतरणीवर आहे (*देवगावकर १९९०:१५*). या घाटातूनच अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेकडे प्रवेश केला असावा (*देशपांडे, २००९:५६*).

दाट जंगले हे या भागाचे वैशिष्ट्य आहे. या जंगलात रानडुकरे व अस्वले भटकताना आढळतात. शासनाने अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा व मध्यप्रदेशातील सीमावर्ती क्षेत्राची वाघ संरक्षण क्षेत्र म्हणून निवड केली आहे. या अभयारण्यात वाघांची एकूण संख्या ७३ असल्याची नोंद १९९७ च्या शासकीय वृतांतात आहे (*गाईड प्रोजेक्ट टायगर रिझर्वस् इन इंडिया*).


ऐतिहासिक पार्श्वभूमी

मध्यभारताच्या इतिहासाची व्याप्ती लक्षात घेऊन तो चार टप्प्यात मांडणे उचित ठरेल. ते टप्पे असे मानले आहेत:- १)प्रागैतिहासिक २)प्राचीन ३)मध्ययुगीन ४) ब्रिटिशकालीन

१) प्रागैतिहासिक कालातील मानवी अस्तित्वाची साक्ष

मानवाचे आगमन या प्रदेशात केव्हा झाले हे निश्चित सांगता येत नसले तरीही आदमगड येथे आर. व्ही. जोशी यांनी १९६८ साली केलेल्या संशोधनातून मध्याश्मयुगात या प्रदेशात मानवाचे अस्तित्व होते हे सिद्ध झाले आहे. आदमगड नर्मदेच्या दक्षिण तीरावर असलेल्या होशंगाबाद शहरापासून अंदाजे सहा मैल अंतरावर आहे. 'या ठिकाणी मध्याश्मयुगीन सूक्ष्मास्त्रे, कुत्री, मांजरे, डुकरे, इत्यादी पाळलेल्या जनावरांची हाडे, भांड्यांचे आणि लोखंडाचे अवशेष सापडले आहेत'. आदमगड येथे गुहाचित्रे आहेत (*फोटो क्र ८-१३*). ही संस्कृती (*इ.स. पूर्व ५५००*) मध्याश्मयुगीन आहे (*घोष १९८१:२-३*). मध्यभारतातील मध्याश्मयुगीन मानवाचे अस्तित्व सिद्ध झाले तरी मध्यभारतातील मानवीजीवनाचा सलग इतिहास मिळत नव्हता. १९५० मध्ये डॉ. सांकलिया आणि त्यांचे सहकारी यांनी केलेल्या संशोधनातून 'माळवासंस्कृती' उजेडात आली

(*नकाशा क्रमांक ४*)



त्याच्या आधारे मध्य भारतातील संस्कृतींचा संबंध इतिहासपूर्व कालाशी जोडता येणे शक्य झाले (*ढवळीकर १९७९:२२९*). नर्मदेच्या उत्तर आणि दक्षिण तीरावर वसलेले महेश्वर, नावडाटोली (*जिल्हा निमाड*), नागदा, कायथा, मंदसोर आणि एरण या इतिहासपूर्व कालातील वसाहतींचा शोध लागला (*ढवळीकर १९८९:२२९*). नावडाटोली येथील अवशेषांच्या आधारे माळवा समाजाच्या धार्मिक संकल्पना, जीवनप्रणाली आणि कला-कौशल्य इत्यादींचे चित्र उभे करणे शक्य झाले. १९६७-६६ साली डॉ. व्ही. एस्. वाकणकरांनी विक्रम विश्वविद्यालयातर्फे केलेल्या संशोधनातून इतिहासपूर्व कालातील वसाहतींचा काळ इ. स. पूर्व २००० असल्याचे

मान्य झाले आहे (*अन्सारी, ढवळीकर १९७५:२२९*).

उत्तरेला विंध्यपर्वत, दक्षिणेला सातपुडा आणि मध्यभागी नर्मदेचे विशाल पात्र, शेतीसाठी सुपीक जमीन, अनुकूल हवामान अशा वातावरणात नर्मदेच्या दोन्ही तीरावर मानवी समूह स्थिरावले. 'भारताचे उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम जोडणारे मार्ग माळव्यातून जात असल्याचा उल्लेख मोतीचंद्र यांच्या 'सार्थवाह' ग्रंथात आहे (*पारधी १९७४:३०*). डॉ. सांकलियांनी माळवा संस्कृतीच्या लोकांचा संपर्क पश्चिम आशियातील संस्कृतींशी आला होता असे म्हटले आहे (*सांकलिया १९७४:४५९*). या परिसरात उदयाला आलेली माळवा संस्कृती ३०० ते ४०० वर्षे टिकून राहिली.

नावडाटोलीच्या उत्खननातून जे अवशेष प्राप्त झाले त्यावरून ही ताम्रपाषाणयुगीन संस्कृती होती आणि तिचा काळ ख्रि. पू. १६०० ते ख्रि. पू. १३०० हा असल्याचे मान्य झाले आहे. येथे सापडलेल्या अवशेषात विविध आकार व प्रकारची भांडी, गोल किंवा चौकोनी घरे, उजेडात आली. 'एरणच्या घरांभोवती तटबंदी व खंदकही आहे' (*थापर १९८५:९४*). तसेच दगडाची आणि अल्प प्रमाणात तांब्याची हत्यारे मिळाली आहेत. येथील लोक तांब्याचा वापर अंलकारासाठीही करत होते असे दिसते.

नावडाटोली हे स्थान नर्मदेच्या दक्षिण तीरावर आहे. नावाड्यांची वस्ती असल्यामुळे या वस्तीला नावडाटोली हे नाव लाभले आहे. नावडाटोलीचे उत्खनन १९५३-५४ आणि १९५७ ते ५९ साली डॉ. सांकलिया आणि त्यांचे सहकारी यांनी केले. उत्कृष्ट बनावटीच्या लाल भांड्यावर काळ्या रंगाने काढलेली विविध आकाराची नक्षी हे या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. ही नक्षी भौमितिक आकार, वन्यपशू, निसर्गदृश्ये अशा विविध स्वरूपात आहेत. त्यात मानवाची चित्रे ही आहेत. या भांड्यांच्या आकारातील दोन भांडी लक्षणीय आहेत एक म्हणजे लोटा, जो आजही भारतभर प्रचारात आहे (*फोटो क्र १४*). दुसरे महत्वाचे भांडे म्हणजे 'चषक' (*फोटो क्र १५*). सांकलियांच्या मताप्रमाणे, 'या चषकांचा आकार पश्चिम आशियातील चशकांशी साम्य दर्शवणारा आहे' (*सांकलिया १९६३; ३१५-३१७*).

माळवा संस्कृतीच्या विविध स्थळांच्या उत्खननातून प्राप्त झालेल्या भांड्यांपैकी तीन चतुर्थांश भांडी नावडाटोली येथे सापडली आहेत (*ढवळीकर १९७९:२३८*). नावडाटोलीच्या भांडंयाचे चार प्रकार करता येतील (*ढवळीकर १९७९:२३७*). ते असे –

१) पांढऱ्या भांड्यांवर काळ्या व लाल रंगाने केलेले रंगकाम

२) रंगलेप असलेली भांडी

३) लाल रंगावर काळी नक्षी असलेली

४) चकाकी नसलेली जाडी–भरडी लाल रंगाची

नावडाटोली येथील घरे गोल अथवा चौकोनी आकाराची होती. घराचे छप्पर शंकूच्या आकाराचे असावे. सर्वसाधारणपणे गोल घरांचा व्यास तीन मीटर आणि चौकोनी घराची रूंदी साडेतीन मीटर इतकी आहे (*ढवळीकर १९७९:२३७*). नागदा येथील घरांसाठी कच्च्या विटांचा वापर केल्याचे दिसते (*सांकलिया १९७४:४३४*). इतर ठिकाणी मात्र मातिच्या भिंती होत्या. घरात चुली होत्या. घरात भिंतीजवळ अथवा घराच्या मध्यावर साठवणीसाठी ठेवलेले रांजण होते. रांजणावर असलेल्या आकृतीं–मधून आचारधर्म आणि दैवत संकल्पनांसंबंधी अनुमान बांधता येणे शक्य होते. रांजणांच्या वरच्या भागावर उजव्या बाजूला उपासना करणाऱ्या स्त्रिया तर डाव्या बाजूला सरडा, सुसर, मगर, पाल असे चित्रण आहे. रांजणावर चार ठिकाणी देवता आणि तिच्या सोबत मगर वा सरड्यासारखे सरपटणारे प्राणी आहेत. डॉ. ढवळीकरांच्या मतानुसार, मध्यप्रदेशातील उदयगिरी येथील चंद्रगुप्त गुंफेत महिषासुरमर्दिनीचे कोरीव चित्र आहे. तिच्या बारा हातांपैकी दोन हात सुसरीच्या रूपात आहेत. ऐतिहासिक काळात सुसर (*गोधा*) पार्वतीचे प्रतीक मानले जात होते (*ढवळीकर १९८९:२४१*).

माळवा संस्कृतीत हत्यारांसाठी तांब्याचा उपयोग ढगडांपेक्षा कमी प्रमाणात झालेला दिसतो (*ढवळीकर १९८९:२४१*). या हत्यारात दुधारी तलवार *(Dagger Fragement)* वैशिष्ट्यपूर्ण आहे. या तलवारीला दोन्ही बाजूंना धार असून मध्यभागी कंगोरेदार

कड आहे (*फोटो क्र १६*). ह्या तलवारीचा आकार इराणी तलवारीसारखा असल्याचे मत डॉ. सांकलिया यांनी दिले आहे (*१९७१:३९३*). तांब्याची एक कु-हाडही(*फोटो क्र १७*) कायथा येथे सापडली आहे (*ढवळीकर १९८९:२३२*). तांब्याचा उपयोग बांगड्या (*फोटो क्र १८*), अंगठ्या (*फोटो क्र १९*), नेकलेस (*फोटो क्र २०*) इत्यादी अलंकारांसाठीही केलेला दिसतो.

नावडाटोलीच्या वसाहतीभोवती तटबंदी आढळली नाही. पण एरण येथे तटबंदी आणि खंदक सुद्धा आढळला आहे (*थापर १९८५:९४*). कर्ब १४ या पद्धतीने तटबंदीची कालनिश्चिती इ. स. पूर्व २०३५–७५ झाली आहे. इ. स. पूर्व २०३५ पासून इ. स. पूर्व ७०० पर्यंत या तटबंदीचा वापर होत असावा असे मत घोष यांनी दिले आहे (*घोष १९७३:७३*). कृष्ण मोहन माळींच्या मतानुसार, 'इ. स. पूर्व ६०० ते ४०० साली एरणमधील लोकसंख्या १६०० असून तत्कालीन भारतातील दहा मोठ्या नगरात एरणचा समावेश होतो' (*माळी २००७;४०*).

येथे राहाणाऱ्या लोकांचे व्यवसाय कृषी, मासेमारी व शिकार हे होते. ते लाकडाचा नांगर वापरत असावेत, आजही माखला येथील शेतकरी लाकडाचा नांगर वापरतात (*फोटो क्र २१*). कृषी उत्पादनात गहू, तांदूळ, उडीद, मूग, जव या धान्यांबरोबर तेलबियांचेही उत्पादन होत असल्याचे पुरावे आहेत. आवळा व बोरे ही त्यांच्या आहारात होती. हे लोक मांसाहारी होते. ते गाय व डुकराचे मांसही खात असावेत असे अवशेषातून स्पष्ट दिसते (*ढवळीकर १९७९:२४०*).

प्राचीन युगात घडलेल्या घटनांचे भारतीय साहित्यातील दाखले

बहुसंख्येने कोरकूंची वस्ती असलेल्या या प्रदेशाच्या इतिहासाची मांडणी पुराणे, बौद्ध साहित्य, शिलालेख आणि प्राचीन नाणी यांच्या मदतीने करावी लागते.

प्राचीन परंपरेनुसार उत्तरेकडून विंध्य ओलांडून अगस्तीऋषी आले व गोदावरीच्या परिसरात स्थायिक झाले. त्यांचा विवाह लोपामुद्रा नावाच्या राजकन्येशी झाला

होता. ऋग्वेदातील काही ऋचा अगस्त्यऋषींनी लिहिलेल्या आहेत (*ऋग्वेद, १, १७९, ४*).

बृहदारण्यकात या प्रदेशाचा उल्लेख विदर्भ असा आहे. ऋषभदेवाचा पुत्र विदर्भ याने विदर्भ राज्याची स्थापना केली. म्हणून या भागाला विदर्भ ही संज्ञा मिळाली' असा उल्लेख पुराणांमध्ये केलेला आढळतो. या राज्याची राजधानी अमरावती जिल्ह्यात वर्धा नदीच्या तीरावर कुंडिनपूर येथे होती (*ऐतरेय ब्राह्मण खंड ७:३४*).

विदर्भकन्या इंदुमती, दमयंती व रूक्मिणी यांचे विवाह अनुक्रमे अज, नल, श्रीकृष्णाशी झाल्याचे उल्लेख पुराणात सापडतात. हरिवंशातील कथेनुसार, रूक्मि इंद्राणीची पूजा करण्यासाठी आली असतांना कृष्णाने तिचे हरण केले. अमरावती शहरात असलेले अंबेचे मंदिर हे तेच ठिकाण असल्याचे मानले जाते. रूक्मिणीहरणामुळे रूष्ट झालेल्या रूक्मिने कृष्णाला मारल्याशिवाय राजधानीत प्रवेश करणार नाही अशी प्रतिज्ञा करून 'भोजकट' नावाची नवीन राजधानी उभी केली. अमरावती पासून आठ मैल दूर असलेले 'भटकूली' हे खेडेगाव हेच 'भोजकट' असावे असे मानले जाते. भटकूली गावात रूक्मिचे देऊळ आहे. दुसऱ्या प्रवरसेनच्या ताम्रपटात, 'वाकाटकांचा' एक शासकीय विभाग भटकूली येथे असल्याचा उल्लेख आहे' हा ताम्रपट अचलपुरच्या उत्तरेस चार मैलावर 'चमक' (*प्राचीन चर्माङ्क गाव*) येथे सापडला आहे (*मिराशी १९५७:२१४*). अलिकडच्या काळात विदर्भात क्षत्रपांच्या नाण्यांचा निधी सापडला आहे. गॅझेटियरमध्ये येथे असलेल्या मातीच्या ढिगाऱ्यांची नोंद आहे. पुराणकथांमधील परंपरा आणि या मातीच्या टेकड्यांचे उत्खनन यांची सांगड घालणे शक्य झाल्यास येथील प्राचीन इतिहासावर अधिक प्रकाश टाकता येईल.

रामायण, आणि इतर साहित्यातून विंध्य आणि सातपुडा परिसर उंच पर्वत रांगांनी व घनदाट जंगलांनी व्यापलेला आहे असे उल्लेख येतात. विंध्य ओलांडून तपश्चर्येसाठी आलेल्या तपस्वींच्या तपश्चर्येत राक्षस विघ्न आणत असत. रामायणाच्या

उत्तरकांडात इक्ष्वाकूचा पुत्र आणि मनुचा नातू दण्ड राजाची गोष्ट आहे. दण्ड विंध्य आणि सैवला(*सातपुडा*) मधील प्रदेशचा राजा होता. मधुमंता ही त्याची राजधानी होती. एकदा त्याने भार्गवमुनींच्या मुलीचा विनयभंग केला. क्रोधित झालेल्या मुनींनी राजाला शाप दिला. 'तुझे संपूर्ण राज्य ओसाड होईल' (*अमरावती गॅझेटियर १९६८:४०*). विंध्य आणि सातपुडामधील सर्व प्रदेश घनदाट जंगलांनी व्यापलेला आहे आणि तिथे लोकवस्ती तुरळक आहे त्या संबंधी स्पष्टीकरण देणारी ही कथा आहे हे उघड आहे.

नावडाटोली येथे प्राप्त झालेल्या पुराव्यावरून तेथील 'माळवा' संस्कृती दीर्घकाल नांदली असावी हे स्पष्ट होते. सर्वसाधारणपणे इ. स. पूर्व ७०० पासून उत्तर भारतात स्थिर वसाहती झाल्या होत्या. पाली ग्रंथांतून गौतमबुद्ध किंवा बौद्ध भिक्षूंनी केलेल्या प्रवासाचे वर्णन करतांना वाटेत आलेल्या गावांची नावे आहेत (*श्रीमाळी २००७:३३*). या वसाहतींचा विकास ग्राम-निगम-नगर अशा दिशेने झाला असावा. ग्राम-फक्त नातेसंबधियांची वसाहत, निगम-नातेसंबंधियांबरोबर कारागिरांची वसाहत, नगर-शहर किंवा राजधानी अशी विभागणी असावी. नगरात राजकीय सामाजिक संस्था कार्यरत असाव्यात (*श्रीमाळी २००७:३४*).

मध्यभारतात स्थायिक झालेल्या समाजाची माहिती पुराणांतून, संस्कृत, बौद्ध व जैन साहित्यातून मिळते. शिलालेखातून त्याला आधार मिळतो. भट्टाचार्य यांनी दर्शविल्यानुसार 'अनेक पुराणांतून विंध्यपरिसर, अमरकंटक, आणि बरार या प्रदेशाला विंध्य-प्रस्थ असे संबोधले आहे. विंध्यामध्ये राहाणारे लोक मालदा,अमरकंटकला राहाणारे मेखला[३] [४]आणि बरारमधील भोज म्हणून ओळखले जात होते' (*भट्टाचार्य १९७२:१९५*). 'प्राचीनयुगात विदर्भावर भोज राजवंश राज्य

३ पुराणात मेखला समाजाचा उल्लेख आढळतो. चिखलदरा तालुक्यात माखला गाव आहे. हे मोगल आणि ब्रिटिश अमलात संस्थान होते. प्रदीर्घ काल अमरकंटकला राहाणारा मेखला हा समाज स्थलांतरीत झाला असावा. अमरकंटक ते माखला हे अंतर अंदाजे३५० कि. मी. आहे. माखला सेमाडोह पासून १० कि. मी. अंतरावर आहे. १५९८ मध्ये बादशहा अकबरने माखला येथे स्थलांतरीत झालेल्या मेखला लोकांना कायदा आणि सुव्यवस्था कायम राखण्याच्या अटीवर पदवी आणि सनद दिली होती (फ्युचेस १९८८:४३१). त्यांच्या वंशजांपैकी कुमारसिंग आणि त्याचा परिवार धारणी जवळ जांबुतोटा या गावात राहात आहे. या राजघराण्याच्या वंशजांना कोरकू लोक अजूनही आपला राजा मानतात (पाहा परिशिष्ट २).

४ मेखला हा अमरकंटकच्या सभोवारचा प्रदेश. अमरकंटक येथे उगम पावणाऱ्या नर्मदा नदीला मेखलसुता म्हणतात, हे प्रसिद्ध आहे. गुप्तांच्या उदयापूर्वी हा प्रदेश मघ राजांच्या अमलाखाली होता. या राजाचे साम्राज्य उत्तरेस फत्तेपूर पासून दक्षिणेत बांधवगड पर्यंत पसरले होते (मिराशी,१९७७:४९)

करीत होता. म्हणून येथील समाज भोज म्हणून ओळखला जाऊ लागला' (*मिराशी खंड १:१०९*).

जनपद आणि साम्राज्य विस्ताराचा काळ

इ.स.पूर्व ६०० मधे भारताच्या, मध्य आणि पश्चिम भागात व दक्षिणेकडे एक अशा तऱ्हेची १६ राज्ये निर्माण झाली होती. ज्यांना जनपदे अशी संज्ञा आहे. या जनपदांची यादी पुराणात, बौद्ध साहित्यात व जैन साहित्यात आहे. त्यांची संख्या आणि नावे यात मात्र थोडाफार भेद आढळतो. 'जबलपूरच्याजवळ त्रिपुरी आणि एरण (*जिल्हा सागर म.प्र*) हे निश्चितपणे चेदी जनपदात समाविष्ट होते' (*श्रीमाळी २००७:४५*).

'मौर्य साम्राज्यात महत्वाचा असलेला कलिंग प्रांत इ. स. पूर्व पहिल्या शतकात खारवेलच्या अधिकारात स्वतंत्र एकछत्री राज्य म्हणून उदयाला आला. खारवेलराजाची स्तुती करणारा शिलालेख हाथी गुंफेत आहे. या शिलालेखात, खारवेलराजा 'मेघवाहन' वंशाचा असून चेदींशी संबंधित आहे' अशी अक्षरे आहेत (*थापर २००२:२११*). 'पउमचरियम्' या रामायणावर लिहिलेल्या जैन ग्रंथात रावणही 'मेघवाहन' वंशाचा असावा असा उल्लेख आहे (*थापर २००२:२११*). या संदर्भात विशेष नमूद करण्याची गोष्ट म्हणजे कोरकूही स्वत:ला रावणाचे वंशज समजतात.

बहुतांश जनपदे मौर्य साम्राज्याच्या उदयापर्यंत लोप पावली होती. त्यात चेदीराज्याचाही समावेश होता. चेदी राज्याचा समावेश मौर्य साम्राज्यात होता हे अशोकाच्या १३ व्या शिलालेखात 'भोजांच्या राज्यातील लोक धर्माचरण करतात' असा जो उल्लेख आहे त्यावरून स्पष्ट होते. चांदा येथील अशोकाच्या महामात्राने कोरविलेल्या देवटाक्यावरच्या शिलालेखातूनही हे सिद्ध होते, असे मत मिराशींनी मांडले आहे (*मिराशी १९५७:१७९*).

सम्राट अशोकानंतरही शुंग साम्राज्यात 'विदर्भाचा' समावेश होता. हे कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकातील कथानकावरून म्हणता येईल. अग्निमित्राने विदर्भाची विभागणी वर्धा नदीला सीमा मानून दोन भागात केली. पश्चिम विभागात अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, परभणी आणि नांदेड हे जिल्हे होते. विदर्भाची विभागणी केल्यानंतर अग्निमित्राने त्या दोन प्रांतांवर नेमलेल्या यज्ञसेन आणि माधवसेन यांच्यांपैकी माधवसेन हा सातवाहनांचा मांडलिक होता असे मिरांशींचे मत आहे (*अमरावती गॅझेटियर १९६८:४२*).

सातवाहनांच्या राज्यात आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, माळवा इत्यादी प्रदेश होते. नाशिकला सातवाहन राजा पुळुमावी याच्या शिलालेखात, गौतमीपुत्र याने व्यापलेल्या प्रदेशांची यादी आहे. या यादीत १) अनुप-(*मध्य प्रदेशातील नेमाड जिल्हा*) व २) विदर्भ-(*सध्याचा विदर्भ*) यांचा समावेश आहे (*गोखले १९७५:१४०*). विदर्भात जरी शिलालेख सापडले नसले तरी सातवाहनांच्या नाण्यांचे तीन निधी तेथे सापडले आहेत. पहिला चांदा जिल्ह्यात, दुसरा तऱ्हाळे येथे आणि तिसरा साठा १९३९ साली सापडला परंतु तो कुठे सापडला ह्या संबंधीची माहिती उपलब्ध नाही. इ. स. २५० मध्ये सातवाहनांच्या सत्तेचा अंत झाला. त्याच सुमारास वाकाटकांची विदर्भावर सत्ता स्थापन झाली.

इ. स. २५० पासून इ. स. ४८० पर्यंत वाकाटक विदर्भाचे सत्ताधीश होते. वाकाटकांची सत्ता प्रस्थापित करणाऱ्या पहिल्या राजाचे नाव विंध्यशक्ती होते. असा उल्लेख अजिंठ्याच्या सोळा क्रमांकाच्या शैलगृहातील लेखात आहे. विंध्यशक्तीनंतर त्याचा मुलगा पहिला प्रवरसेन गादीवर बसला. याच्या राज्यात नर्मदेपासून तुंगभद्रा नदीपर्यंतचा प्रदेश होता. हरिवंशात प्रवरसेनच्या राजधानीचे नाव पुरिका असून ती सातपुड्याच्या पायथ्याला होती असा उल्लेख आहे (*मिराशी १९५७:२१६*). प्रवरसेनला चार पुत्र असल्याचे मानले जाते. परंतु त्याच्या दोनच पुत्रांची माहिती मिळते. प्रवरसेननंतर वाकाटक घराण्याचे दोन भाग झाले असे मानले जाते. पहिले 'नंदिवर्धन' आणि दुसरे 'वत्सगुल्म' म्हणजे आजचे वाशीम. प्रवरसेनच्या मृत्यूनंतर

त्याचा नातू रूद्रसेन नंदिवर्धनला (आधुनिक नाव नंदरधन असून हे रामटेकजवळ आहे) राहून राज्यकारभार करू लागला. त्याच्या राज्यात अमरावती जिल्ह्याचा समावेश होता. याचा एकमेव शिलालेख देवटाक्यावर आहे. त्यावर धर्मस्थान बांधत असल्याची नोंद केलेली आहे (*मिराशी १९५७:१८४*). रूद्रसेनानंतर त्याचा पुत्र पहिला पृथ्वीसेन गादीवर बसला. पृथ्वीसेन कर्तबगार राजा होता. त्याच्या राज्यात शांतता आणि समृध्दी असल्याचे मानले जाते. पृथ्वीसेनपुत्र रूद्रसेन याचा विवाह दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या प्रभावती नावाच्या कन्येशी झाला होता. रूद्रसेनला दोन पुत्र होते. पहिला दिवाकरसेन आणि दुसरा दामोदरसेन. मुले लहान असल्यामुळे राणी प्रभावतीने १३ वर्षे राज्य कारभार सांभाळला (*मिराशी १९५७:४२*). दिवाकरसेन नंतर त्याचा धाकटा भाऊ दामोदरसेन 'प्रवरसेन' या नावाने राज्यकारभार पाहू लागला. प्रवरसेन दीर्घायुषी होता. त्याने ३० वर्षे राज्यपद सांभाळले. हा राजा विद्वान आणि उदार विचारांचा होता. त्याने दिलेल्या बारापेक्षा जास्त दानपत्रांची नों द आहे. अमरावती, वर्धा, बैतुल इत्यादी परगण्यातील गावे दान दिल्याचे उल्लेख आहेत (*मिराशी १९५७:४३*).

प्रवरसेननंतर त्याचा मुलगा नरेंद्रसेन गादीवर बसला. त्याची कारकीर्द चालू असतानाच नलराजा भवदत्त वर्मनाने विदर्भावर आक्रमण केले. बराचसा भाग जिंकून घेतला. याच्या कारकीर्दित वाकाटक राजधानी प्रवरपुरला हलली असावी. प्रवरपुर वर्ध्या जवळचे पवनार असावे (*मिराशी १९५७::४४*).

नलांच्या तीन राजांची माहिती मिळते. १)वराह २)भवदत्त ३)अर्थपती. अमरावती जिल्हयातील रध्धापूर *(Rddhapur)* येथे सापडलेल्या दानपत्रात भवदत्ताने तीर्थयात्रेला जाण्यापूर्वी कदंबगिरीग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे. आजचे कळंब हेच ते गाव असल्याचे मानले जाते. हे गाव यवतमाळ जिल्ह्यात आहे. यावरून नलांचे राज्य यवतमाळपर्यंत पसरले होते असे मानता येईल (*मिराशी खंड५:८८*).

वाकाटकांचे दुसरे घराणे अकोला जिल्ह्यात 'वत्सगुल्म' म्हणजे आजचे वाशिम येथे

राज्य करीत होते. त्यांच्या राज्यात अमरावती विभागाचा समावेश झाला (*मिराशी खंड ५:९३*). या शाखेचा हरिशेण हा अंतिम राजा असावा हरिशेणच्या काळातील अजिंठ्याच्या लेण्यामधील रंगीत चित्रे, दोन विहार आणि एक चैत्यगृह, वाकाटकांच्या कलात्मकतेचे साक्षीदार आहेत. **आधुनिक काळात हाच विभाग कोरकूंचे निवास क्षेत्र म्हणून ओळखला जातो.**

३ मध्ययुग –सत्ता संघर्ष यादवी आणि हिंदू राज्यांचा अंत

वाकाटक सत्तेचा शेवट इ.स. ५५० मध्ये झाला. वाकाटकांनंतर कलचुरी, राष्टकूट, कल्याणीचे चालुक्य या राजघराण्यांच्या सत्ता या प्रदेशात होत्या. राष्टकूटांनी घटनांच्या नोंदी इ.स.नात करणाऱ्या नवीन प्रथेचा आरंभ केला. हे त्यांच्या दानपत्रातील नोंदीं मधून स्पष्ट होते. त्यात इ. स. ८०० मध्ये तिसरा **गोविंद** याने अंजनवती गाव दान दिल्याची नोंद आहे. आजही हे गाव अंजनवती याच नावाने ओळखले जाते. हे गाव **अचलपूर तालुक्यात आहे** (*अमरावती गॅझेटियर १९६८:४९*). राष्टकुटांच्या पराभवानंतर कल्याणीच्या चालुक्यानी विदर्भावर ताबा मिळवला असे दिसते. त्यांचे दोन शिलालेख सापडले आहेत (*अमरावती गॅझेटियर १९६८:५०*) बाराव्या शतकात कल्याणीच्या चालुक्यांचे जहागिरदार असलेल्या भिल्लमदेव यादव याने स्वातंत्र्य घोषित केले. त्याने राजधानीसाठी नवीन देवगिरी नावाचे शहर वसवले.(*अमरावती गॅझेटियर १९६८:५१*) भिल्लमदेवचा नातू **सिंधनचा** ११३२ सालचा अंबडपूरचा शिलालेख सापडला आहे (*अमरावती गॅझेटियर १९६८:५१–५२)*. सिंधनाचा सेनापती खोलेशर हा सिंघना इतकाच शूर होता. त्याने विदर्भातील अनेक देवळे बांधली तसेच देवळांच्या व्यवस्थापनासाठी दाने दिली. इ.स. १२५४ **सिं**धनानंतर त्याचा नातू कृष्ण गादीवर बसला. त्याचा एक शिलालेख अमरावती जिल्ह्यात नांदगावला खांडेश्वर मंदिरात सापडला आहे (*अमरावती गॅझेटियर १९६८:५२*). कृष्णाच्या मृत्यूनंतर यादव घराण्याचे दोन राजे झाले. पहिला महादेव व दुसरा अमन. या दोघांचीही कारकीर्द फार काळ टिकली नाही. काही दिवसातच कृष्णचा मुलगा रामचंद्राने त्याचा पराजय करून राज्य जिंकले (*अमरावती गॅझेटियर १९६८:५५*). रामचंद्र शूर होता. त्याने अनेक प्रांत जिंकून आपल्या

राज्याला जोडले. यादव राजांनी कला आणि साहित्याला आश्रय दिला. त्यांच्या काळात बांधकामाची विशिष्ट शैली निर्माण झाली. या शैलीला हेमाडपंती अशी संज्ञा मिळाली. यादवांच्या छत्रछायेत अनेक लेखक, कलाकार नावारूपाला आले. अशा वैभवशाली राज्यावर अचानक अल्लाउद्दिन खिलजीची धाड पडली. लवकरच यादव सत्तेचा अंत झाला.

अमरावती जिल्हा आणि त्याच्या लगतच्या प्रांतावर म्हणजे आजच्या कोरकूंच्या निवास क्षेत्रावर देवगिरीच्या रामचंद्रराय यादव यांची सत्ता होती. अल्लाउद्दिन खिलजीने कपट करून देवगिरीवर हल्ला केला. त्याचा विजय झाला. वार्षिक खंडणीचे आश्वासन आणि देवगिरीची भरपूर लूट घेउन तो एलिजपूरवरून दिल्लीला परत गेला (*काळे १९२४:८१*) बरारची प्रशासन व्यवस्था यादवांकडेच राहिली. १३१६ साली रामचंद्ररावांचा जावई हरपालसिंग याने देवगिरी जिंकून घेतली. त्याच वर्षी कुतुबउद्दिन ऐबकने देवगिरीवर स्वारी केली. या लढाईत हरपालसिंगचा मृत्यू झाला. त्या वेळेपासून बरार मुसलमानी साम्राज्यात समाविष्ट झाले. १३२५ मध्ये महंमद-बिन तुघलक दिल्लीच्या तक्तावर बसला.

१३३९ मध्ये त्याने राजधानी देवगिरीला हलवली. देवगिरीचे नाव दौलताबाद झाले. व्यवस्थापनाच्या सोयीसाठी महाराष्ट्राचे चार विभाग केले. त्यात बरार एक स्वतंत्र प्रांत झाला. त्या प्रांताची राजधानी एलिजपूर झाली. प्रत्येक प्रांतावर स्वतंत्र प्रांताधिकारी नेमला. बरारच्या प्रांताधिकाऱ्याच्या नावाची माहिती मिळत नाही. या पूर्ण प्रदेशाचा कर अंदाजे ३५,००,००० रूपये आकारला. कर वसुलीची जबाबदारी प्रांताधिकाऱ्यावर सोपवण्यात आली. त्याचा अधिकार सैन्यावरही असल्याचे दिसते (*अमरावती गॅझेटियर १९६८:५५*).

व्यवस्थापनाच्या सोयीसाठी त्याने आपल्या राज्याचे बरार, दौलताबाद, बिदर, व गुलबर्गा असे चार विभाग केले. बरार हा स्वतंत्र विभाग झाला. त्याची राजधानी एलिजपूर झाली. प्रत्येक भागावर स्वतंत्र सुभेदार नेमले. बरारच्या उत्तरेला तापी,

पूर्वेला वर्धा आणि प्राणहिता नदी, दक्षिणेला गोदावरी आणि पूर्णा नदी, या सीमा ठरल्या. व्यवस्थापनासाठी बरारचे दोन परगणे झाले. उत्तर आणि दक्षिण. उत्तरेची राजधानी एलिजपूर आणि दक्षिणेची राजधानी झाली महू. या व्यवस्थेचा ऐने-अकबरीत उल्लेख आहे (*अमरावती गॅझेटियर १९६८:५७*).

पुढे १६४७ मध्ये विदर्भ मोगलांच्या राज्यात समाविष्ट झाला. तोडरमलने जमीनीची नोंदणी करून तेरा विभागात विदर्भाची वर्गवारी केली. त्याच वेळेस अबुलफजलने विदर्भातील उद्योगधंद्यांची नोंद 'वैराटगड येथे रत्नांची खाणआहे, पाथरी गावाजवळ जवाहिऱ्यांची बाजार पेठ आहे, गाविलगड येथे शस्त्रे तयार होतात, लोणार येथे काच व साबण तयार होतो' अशी केली आहे (*काळे १९२४:१३५*).

श्याम देशपांडे यांच्या मेळघाटी सातपुडा या ग्रंथात गाविलगड येथे तयार झालेल्या १९ व १६ फूट लांब, कड्यांसह घडविलेल्या अखंड 'कालभैरव' आणि 'बिजली' या तोफा सुरक्षित असल्याचा उल्लेख केला आहे (*देशपांडे २००९:४५*).

विदर्भावर मोगल रियासत स्थिर असताना सातपुडा रांगांमधील देवगड, खेरला, मंडला इत्यादी स्थानावर गोंडराज्य टिकून होते. देवगडच्या गोंडराजाने १८व्या शतकात आपल्या राज्यात पंचमढी, बैराम-पगारा, बैरी आणि चांदू इत्यादी ठिकाणी कोरकू जहागिरदार शांतता राखण्याच्या अटींवर नेमले होते (*फ्युचेस १९८८:४२५-३०*).

१५९८ मधे अकबर बादशहाने मेळघाटात शांतता आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याच्या अटींवर सहा परगण्यांवर राजपूत सुभेदार नेमले. त्यांना राजा ही पदवीही दिली होती. ही राज्ये अशी होती. १)माखला २)धूपघाट ३)जामघर ४)माखोट ५)खटकली ६)रूपगड (*फ्युचेस १९ ८८:४३१*).

औरंगजेबच्या मृत्यूनंतर इ.स. १७०७ मध्ये शाहूराजांची मोगलांच्या कैदेतून सुटका

झाली. शाहूराजे नर्मदा ओलांडून खानदेशात आले तेव्हा त्यांना सैन्यासह परसोजी भोसले येऊन मिळाले. 'त्यावेळच्या ऐतिहासिक दस्तऐवजांप्रमाणे छत्रपती शाहू महाराजांनी परसोजी भोसले यांच्या वऱ्हाडातील दौलतीशिवाय गाविलगड, नरनाळा, माहूर, पोनार व कळंब या किल्ले-कोटांची सनद परसोजी भोसले यांना दिली होती' (*देशपांडे २००१:४७*). भोसल्यांनी इंग्रजांशी तह करताना वऱ्हाडावरील हक्क सोडले. परंतु नरनाळा व गाविलगड वरील हक्क सोडले नाहीत. शेवटी १८०३ साली भोसले आणि ब्रिटिशांच्यात झालेल्या युद्धात ब्रिटिशांनी हे किल्ले-कोट जिंकून घेतले.(*देशपांडे २००१:४२*).

मराठ्यांनी विदर्भावर अंदाजे दीडशे वर्षे राज्य केले. निजाम उल-मुल्कराजाने १७२४ मध्ये मेहेकर आणि उमरखेड सोडून विदर्भाच्या इतर भागावर हक्क दाखवल्यामुळे पेशवे आणि निजामामध्ये करार होऊन अमरावती विभाग निजामाच्या अधिकारात आला.

४ मराठेशाहीचा अंत आणि ब्रिटिश सत्ता आरंभ

१८६० मधे निजाम आणि ब्रिटिशांमधे करार झाला. करारानुसार हा सर्व प्रदेश (*म्हणजेच बरार)* ब्रिटिशांच्या ताब्यात आला. ब्रिटिशांनी १८६१ मध्ये हा सर्व प्रदेश आणि निजामाच्या हद्दीतील मराठी भाषिक प्रांत जोडून सेंट्रल प्रॉव्हिन्स *(central province)* निर्माण केला. आजही कोरकूंचे हेच निवास क्षेत्र आहे. 'भाषावार प्रांतरचना' या योजनेअंतर्गत महाराष्ट्रात वर्ग झालेल्या मेळघाटात चिखलदरा आणि धारणी हे दोन तालुके आहेत. कोरकू समाजाची वस्ती प्रामुख्याने महाराष्ट्रात चिखलदरा आणि धारणी या दोन तालुक्यात व मध्यप्रदेशात बैतुल, छिंदवाडा, होशंगाबाद आणि पूर्व निमाड जिल्ह्यात आहे.

सेंट्रल प्रॉव्हिन्सचे वर्णन निमाडचे कमिशनर 'फोरसिथ' यांनी केले आहे. 'पूर्व-पश्चिम' पसरलेल्या विंध्य आणि सातपुड्याच्या पर्वतरांगांनी व्यापलेला भारताचा मध्यवर्ती प्रदेश म्हणजेच 'सेंट्रल इंडिया'. या भागात चिखलदरा, धारणी, बैतुल,

छिंदवाडा, होशंगाबाद आणि पूर्व निमाड या प्रांतांचा समावेश आहे (*फोरसिथ १८७२:३*).

प्राचीनयुगापासून या अशा दुर्गम पठारी प्रदेशातून व्यापारी ये-जा करीत असल्याचा उल्लेख भारतीय प्राचीन साहित्यात आढळतो. 'फोरसिथ यांनी काबुलचे व्यापारी सुकामेवा विकण्यासाठी या प्रदेशातून जा-ये करतात, वाहन म्हणून ते उंटाचा वापर करतात, असा उल्लेख केला आहे. मैदानांजवळ असलेल्या मोठ्या खेड्यात व्यापारी आणि आदिवासींमधे देवाण-घेवाणीचे व्यवहार चालू असतात' (*फोरसिथ १८७२;३७-३८*). या प्रदेशातून असणाऱ्या प्रवासी मार्गांचा तपशील मोतीचंद्र ह्यांनी 'सार्थवाह' या ग्रंथात दिला आहे.

मोतीचंद्रांनी 'प्राचीन भारतीय व्यापारी, त्यांचे प्रवास, खरेदी-विक्रीच्या वस्तू, व्यापाराचे नियम व पथपद्धती' या विषयावर सखोल अभ्यास करून 'सार्थवाह' या ग्रंथात भारतीय उपखंडाला उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम जोडणारे मार्ग या प्रदेशातून जात होते. या मार्गांमध्ये थोडाफार फरक झाला असला तरीसुद्धा ते मार्ग अद्यापही वापरात असल्याचे दाखवून दिले आहे. त्यातील दोन मार्ग उदाहरणादाखल देत आहे :-

१. पूर्व -पश्चिम मार्ग :- पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या महामार्गाचा उल्लेख बौध्द साहित्यात 'पुब्बन्ताअपरांत' असा केला आहे. या मार्गावर वाराणशी हे प्रमुख व्यापारी शहर होते. उत्तरापथाचे व्यापारी वाराणशीला येत असत. या शहराचे तक्षशिला आणि गंधारशी व कौशांबीमार्गाने चेदी (*बुंदेलखंड*) व उज्जयिनीशी व्यापारी दळण-वळण होते (*पारधी १९७४:२२*).

२. उत्तर- दक्षिण मार्ग :- बौध्द साहित्यातील 'बावरी जातकात' बावरीच्या शिष्यांनी केलेल्या प्रवासवर्णनामधून उत्तर-दक्षिण जोडणारे मार्ग सातपुड्यातून जात होते हे स्पष्ट होते. बावरीचे शिष्य गौतम बुध्दाचे मार्गदर्शन प्राप्त करून घेण्यासाठी या मार्गाने कोशांबीला गेले होते. असे मानले जाते. दक्षिण-उत्तर

जोडणाऱ्या मार्गाचा आरंभ पटित्थान (*पैठण*) पासून होत असे. पटित्थान(*पैठण*), महिष्मती(*महेश्वर*), उज्जैयिनी (*उज्जैन*), गोनद्धपूर, भिलसा, हा मार्ग कौशांबीपर्यंत जात होता. त्याच मार्गाने बाबरीचे शिष्य कौशांबीला पोहोचले होते असे मानले जाते (*कोसंबी १९९६:१११*).

ऋग्वेदात अगस्त्यऋषी सातपुडा ओलांडून आले असा उल्लेख आहे. (ऋग्वेद १७९:४) सातपुड्यातील पायनघाट या कमी उंचीच्या पठारातून जाणाऱ्या मार्गाने अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेकडे प्रवेश केला (*देशपांडे २००९:५६*). यावरून असा अंदाज करता येईल की प्राचीन काळापासूनच येथील आदिवासी समाज बाहेरून येणाऱ्या लोकांच्या संपर्कात होता.

आधुनिक काळातही पठारावर आणि मैदानात राहाणाऱ्या लोकांमध्ये गरजेच्या वस्तूंची देवाण-घेवाण होत असल्याचे दिसते. नेमाडे लिहितात, 'ह्या भागातले रस्ते सातपुड्यातून वर उत्तरेकडे जायचे. राजस्थानाकडून बैल विकणारे हेडाऊ आजही ह्या रस्त्यांनीच सातपुड्यातून हरिपुरा-मोरगाव-बुलढाणा-वऱ्हाडातून विदर्भात जातात' (*नेमाडे २०१०:१००*).

प्राचीन काळात एकट्याने प्रवास करणे धोकादायक असल्यामुळे लोक गटाने प्रवास करीत असत. या गटांचे संचालन करणाऱ्या व्यक्तीला भारतीय साहित्यात 'सार्थ' असे संबोधले असल्याचे दिसते. 'सार्थ' प्रवाशांना सुरक्षित स्थानी त्यांच्या वस्तूंसकट पोहोचवण्याची काळजी घेत असत. कारण रस्त्यात जंगलातील वन्यपशू किंवा चोर, लुटारूंशी गाठ पडण्याची दाट शक्यता असे. जंगलातून जातांना प्रवासी तांड्याला तेथील वनवासी मार्गदर्शन करीत असत. 'प्रवास करणाऱ्यांमध्ये व्यापारी, साधू-संन्यासी, यात्रेकरू, फेरीवाले, घोड्यांचे व्यापारी, खेळ-तमाशावाले, विद्यार्थी, विद्याभ्यास संपवून देशदर्शनासाठी निघालेले, असे अनेक प्रकारचे लोक असत' (*पारधी १९७४:१४*). हे प्रवासी तांडे विशिष्ट उद्देशांसाठी प्रवास करत असत पण या शिवाय भटके जीवन जगणारे समाजही या प्रदेशातून जा-ये करीत असत. वंजारी,

कैकाडी, मांग-गारोडी, पारधी इत्यादींचा या जमातीत समावेश होता (*आत्रे, १९९०*).

'गावाबाहेरील रेताड मैदानावर पारधी, डोंबारी, कोल्हाटी, गारोडी, कुडमुडे जोशी, कोरकू अशा फिरत्या जमातींना पाटलाच्या परवानगीने पाले टाकून राहाता येई. एकंदरीत ही सगळी गावाबाहेरची वस्ती गावाचाच एक भाग होती. किरकोळ पिकांच्या, गवतांच्या, लाकूडफाट्याच्या चोऱ्या सोडल्या तर यांच्यापासून गावावर संकट, आरिष्ट असं काही ओढवण्याची भीती नसे (*परिशिष्ट क्र. २*). उलट मोठ्या दरोड्यांची माहिती त्या फिरत्या लोकांकडूनच दुसऱ्या दिवशी पाटलांना समजे' (*नेमाडे २०१०:१०६*).

अशा या दुर्गम परिसरात **कोरकू**, निहाल, आंध, माडिया, परधान, बैगा, कोलाम इत्यादी समाज स्थायिक आहेत.

कोरकू आणि इतर आदिवासी

आंध-सन १९८१ च्या जनगणनेनुसार आंधांची एकूण लोकसंख्या २,३१,८७१ इतकी होती. त्यापैकी २,२६,६९३ आंध खेडेगावात तर ५,१७६ शहरात राहातात. आंधांची वस्ती प्रामुख्याने परभणी, नांदेड व अकोला जिल्ह्यात आहे. आंध तेलंगणातून आले आहेत असे मत रसेल यांनी दिले आहे. रंग काळा, ओठ जाड, गालाची हाडे वर आलेली असे त्यांचे वर्णन करता येईल.

आंध आपले घर व परिसर स्वच्छ ठेवतात. घरांच्या भिंती आणि गुरांचे गोठे नेहमी शेणाने सारवतात. घरांची रचना मजबूत असते. घरात दोन खोल्या व स्वतंत्र स्वयंपाकघर असते पण घराला एकही खिडकी नसते.

आंधांचे व्यवसाय शेती, मासेमारी किंवा शेत मजुरी हे आहेत. ते शेतीसाठी नांगराचा वापर करतात. जोमदार पीक यावे म्हणून खते वापरतात. शेतात ज्वारी, तूर , उडीद,

मूग, वाल, इत्यादी पिके घेतात.

कोंबड्या, बढके, डुकराचे मांस खातात. गाईचे मांस खात नाहीत. पालेभाज्या खातात. सर्व फळे खातात. लिंबूही खातात. मद्यपानाची त्यांना आवड आहे.

आंध कुणब्यांशी रोटी व्यवहार करतात पण गोंडांशी करत नाहीत. आंधांना मराठा आणि कुणबी समाजापेक्षा खालचे तर न्हावी, धोबी समाजापेक्षा वरच्या दर्जाचे मानले जाते (*गारे २००२:४३*).

आंध स्वत:ला हिंदू म्हणवतात (*गारे २००२:४३*). आंधांच्या देवतासमूहात मारूती, मरीआई, माता, कान्होबा, खंडोबा, भवानी, दत्तात्रय इत्यादी देवतांबरोबर भीमसेन व वाघमाई या देवतांचाही समावेश आहे. पूजेत लिंबाचा वापर करतात. आंध समाजात आळंदी, त्र्यंबकेश्वर या ठिकाणी तीर्थयात्रेसाठी जाण्याची प्रथा आहे (*सिंग-भानु २००४;७१*). देव अंगात येतो असे आंध मानतात. देव अंगात आलेल्या व्यक्तीला देवकर म्हणतात. बाळाच्या जन्मानंतर पाचव्या दिवशी सटवीची पूजा करतात.

आंधांची आडनावे सजीव अथवा निर्जीव वस्तूंवरून ठेवलेली दिसतात. जसे- मुंग्यांच्या वारूळावरून डुभोर, डुकरापसून डुकरे, टिटवीपासून टिटवे, इत्यादी. सगोत्र विवाह करत नाहीत. सगोत्र विवाहाला विरोध असला तरीही लग्नानंतर बहिणीचे गोत्र बदलते म्हणून मामाशी विवाहाला मान्यता आहे. विवाहानंतर स्त्रिया मंगळसूत्र घालतात व कपाळावर कुंकू लावतात (*सिंग-भानु २००४;७२*). आंध विधवेला मंगळसूत्र घालण्याचा किंवा कुंकू लावण्याचा अधिकार नाही असे मानतांना दिसतात. तसेच विधवा स्त्रीला मालमत्तेत वाटणीही मिळत नाही (*सिंग-भानु २००४;७२*).

आंध मराठी भाषा बोलतात. देवनागरी लिपीत लिहितात. आंधांची समाजव्यवस्था

पुरूषप्रधान आहे. पुरूषांना कुटुंब प्रमुखाचा मान असतो. आंध्रांमध्ये न्यायनिवाडा पंचायती मार्फत होतो. पंचायतीच्या प्रमुखाला 'मुखिया' किंवा 'म्हेतऱ्या' म्हणतात. हे पद वंशपरंपरागत नसते. मुखियाच्या साह्यासाठी दोन मदतनीस नेमले जातात, त्यांना डुक्रिया आणि पोपटिया म्हणतात. तंटे, संघर्ष मिटविण्याचे काम मुखिया करतो तसेच अपराध्याला दंडही करतो. स्त्रियांना ग्राम पंचायतीत सभासद होता येत नाही मात्र साक्षीदार म्हणून हजर राहाता येते.

आंध मृताचे डोके दक्षिणेकडे करून त्यास पुरतात. मरणासन्न व्यक्तीच्या तोंडात साखर घालतात. विवाहित असल्यास दहा आणि अविवाहित व्यक्तीच्या मृत्यूनंतर तीन दिवस सुतक पाळतात. कावळ्याला पूर्वज मानून त्यास वर्षश्राध्दाला अन्न खाऊ घालतात.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आंध्रांना शासकीय योजनांचा लाभ मिळाल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण १८.२५ इतके वाढले आहे. शेती विकास योजनांचा त्यांना फायदा झाला आहे. भूमिहीन मजुरांपेक्षा स्वत:ची शेती असणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे (*गारे २००२:४३*).

माडिया:- माडियांची वस्ती गडचिरोली आणि बस्तर ओरिसापर्यंत पसरलेली आहे. माडिया गडचिरोली जिल्ह्यात भामरागड आणि सुरजागड या ठिकाणी राहतात. १९९१च्या जनगणनेत यांची संख्या ४,४९,२५१ इतकी होती. 'माडिया या शब्दाचा अर्थ जंगलात राहाणारा असा आहे. माडिया ही गोंड जमातीची उपजात आहे' (*गारे २००२:७५*). माडियांचे घर म्हणजे लहान झोपडीच असते. या लहान झोपड्या जंगलात आणि पाणी उपलब्ध असेल अशा ठिकाणी पण दोन झोपड्यात अंतर ठेवून बांधलेल्या असतात. गडचिरोली जिल्ह्यात आणि जिल्ह्याच्या सीमेवरून अनेक लहान-मोठ्या नद्या वाहतात. हा भाग उत्तर-दक्षिण वाहणारी ओझी नदी, प्राणहिता, वैनगंगा, गोदावरी आणि इंद्रावती या पाच नद्यांनी वेढलेला आहे (*गारे, २०००:७४*). या नद्यांना बाराही महिने भरपूर पाणी असते.

मूळचे निसर्गपूजक असलेले माडिया बडादेव व पितरांचेही पूजन करतात. तसेच हिंदू देवतांनाही मानतांना दिसतात.

माडिया कपड्यांचा वापर फार कमी प्रमाणात करतात. माडिया जंगली फळे-कंदमुळे गोळा करतात. प्राथमिक स्वरूपाची शेती करतात. या शिवाय मासेमारी आणि गुरे व डुकरे पाळतात (*गारे २००२:८९*). जंगली पदार्थ, शेतीतून आलेले धान्य, वन्यप्राणी, पक्षी, डुक्कर, उंदीर, घोरपड, इत्यादींचे मांस खातात.

माडिया समाजात आतेमामे भावंडांच्या विवाहाची प्रथा आहे. तसेच वधूमूल्याची रूढी आहे. विवाह ठरल्यानंतर वराला एक नक्षीदार खांब तयार करावा लागतो. हा खांब विवाहविधी संपन्न होईपर्यंत घरासमोर अथवा घोटुलसमोर रोवून ठेवतात. विवाहानंतर या खांबाचा वापर इतरत्र करता येतो. या खांबाला मुंडा म्हणतात.

माडिया समाजात अद्यापही घोटुलची पद्धत प्रचलित आहे. जीवनासाठी लागणारे आवश्यक शिक्षण आणि जीवनसाथी निवडण्याची संधी युवकांना घोटुलमुळे प्राप्त होते. फसवणुकीच्या फारशा घटना घडत नाहीत. घडल्यास पंचायत स्त्रियांच्या बाजूने उभी राहाते. माडिया समाजात स्त्री आणि पुरूष दोघांचा दर्जा समान आहे. बालविवाह प्रथा नाही. विधवेला पुनर्विवाह करता येतो. माडिया मृताचे दफन करतात. दफनाभोवती गोलाकार शिला रचतात. मृताजवळ त्याच्या आवडीच्या वस्तू ठेवतात. दफनावर मातीचा चौथरा बांधतात. 'हा सर्व दफन प्रकार पाहिल्याबरोबर प्रागैतिहासिक कालातील महापाषाण संस्कृतीशी साम्य वाटते. कदाचित हिंदू संस्कृतीचा पगडा येण्यापूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या अशा तत्कालिन परंपरा हा समाज आजही जतन करीत असावा' (*कुलकर्णी २००७;७१*).

मृत्यूनंतर वर्षाच्या आत गावजेवण देतात. मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ स्मरणशिला उभारतात. पुरूषांच्या स्मरणशिला सर्वसाधारणपणे उभ्या तर स्त्रियांच्या आडव्या असतात. गावाच्या सीमेवर अशा स्मरणशिला उभ्या असतात. स्मरणशिलांवर

कोरीव काम करण्याची प्रथा असल्याचे दिसते. या स्मरणशिलांना 'उरकल' म्हणतात (*गारे २००२;१४*).

पुणे येथील आदिवासी कल्याण केंद्रातील संग्रहालयामध्ये माडियांचे स्मृतिचिन्ह लाकडी खांबाच्या रूपात उभे केलेले आहे. 'जमिनीत मृताची राख पसरून त्यावर एक लाकडी खांब उभा करतात. या खांबावर बैलाचे तोंड व खांबाच्या मध्ये घंटा असते. ते पारंपरिक देवतेचे चिन्ह असावे', अशी माहिती दिलेली आहे.

कोलाम :-कोलाम समाज महाराष्ट्रातील नांदेड, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात आढळतो. १९८१च्या जनगणनेत त्यांची एकूण लोकसंख्या १,१८,०७३ असल्याची नोंद आहे. कोलाम समाजाच्या मूळ वसतिस्थानाबद्दल मतभेद आहेत. 'हिरालाल' यांच्या मते कोलाम समाज तोडांशी संबंधित असावा. 'ग्रियसन' यांना कोलामांची भाषा आणि चंद्रपूरच्या नाईकांच्या भाषेत साम्य आहे असे वाटते. गोंड त्यांना पुजारी मानतात. गारे यांच्या मताप्रमाणे कोलाम द्रविडवंशी आहेत (*गारे २००२:१४*). कोलाम मात्र स्वत:ला पांडववंशी मानतात. कोलाम आणि राजगोंडांमध्ये रोटी व्यवहार होतो. पण ते एकमेकांच्या जन्म आणि अंत्यविधी यांच्यांशी संबंधीत प्रसंगामध्ये सामील होत नाहीत. कोलाम मुख्य वस्तिपासून दूर राहतात. त्यांच्या वस्तीला 'पोड' म्हणतात. कोलामांचे घर म्हणजे झोपडीच असते. झोपडीचे दार पूर्वेकडेच असते. भिंती लाकडाच्या आणि मातीने सारवलेल्या असतात. घर, घराभोवतीचा परिसर, गुरांचे गोठे सर्व स्वच्छ व नीटनेटके असते.

गोंडांप्रमाणे कोलामांच्या जमातीत बहिर्विवाह करणारी वेगवेगळी कुळे आहेत व त्यांच्यापैकी बरीच कुळनामे जोडकुळींसारखी आहेत. काही ठराविक कुळे मिळून झालेले चार कुळवर्ग (*Phatrie*) आहेत. ती म्हणजे चारदेवांची उपासना करणारे ते चारदेवे, याप्रमाणे पाचदेवे, सहादेवे इत्यादी नावांनी ते कुळवर्ग ओळखले जातात. (*गारे २००२:११६*).

कोलामांचा रंग काळा व बांधा ठेंगणा असतो. त्यांच्या भाषेला कोलामी म्हणतात. कोलाम परस्परात कोलामी भाषेत बोलतात. पण इतर लोकांशी मराठीत बोलतात.

कोलाम स्त्रिया नऊवारी साडी नेसतात व खणाची चोळी घालतात. पदर डोक्यावरून घेऊन उजव्या खांद्यावर सोडतात (*गारे २००२:११६*). कोलाम समाजात गोंदण्याची प्रथा आहे. पुरूषांच्या हातावर वनस्पती आणि छातीवर श्रीराम, लक्ष्मण, मारूती किंवा वाघ-सिंहासारख्या प्राण्यांचे गोंदण असते. स्त्रिया आपल्या हनुवटीवर, कपाळावर आणि गालावर ठिपके गोंदवून घेतात.

कोलामांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. पंच्याण्णव टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. चाळीस टक्के लोकांजवळ स्वत:च्या जमिनी आहेत. बाकीचे शेतमजुरी करून किंवा बांबूच्या टोपल्या, चटया विणून उदरनिर्वाह करतात. यांच्या जमिनी फारशा सुपीक नाहीत. ते खतांचा वापरही करत नाहीत. शेतीसाठी पाणीपुरवठ्या संबंधित फारशा सोयी सुविधा नाहीत त्यामुळे पीक कमी येते.

कोलामांना वनौषधींची माहिती असते. शतावरी, कालीमुसळी, सफेदमुसळी, मुरूड-शेंग इत्यादी वनौषधी गोळा करून त्याची विक्री करतात. वनौषधींची माहिती असूनही त्यांच्यामध्ये कुपोषणाचे आजार अधिक असल्याचे दिसते.

प्रत्येक पाड्यामध्ये पंचायत असते. पंचायतीचे कामकाज करण्यासाठी गावातील तीन सदस्य निवडले जातात. प्रमुखाला नाईक म्हणतात. मदतनीसांना कारभारी व महाजन म्हणतात. प्रत्येक पाड्याच्या मध्यभागी चावडी असते. चावडीत पंचायतीच्या आणि न्यायमंडळाच्या सभा भरतात. परस्परातील तंटे अथवा संघर्षांचे निराकरण पंचायतीत होते. पंचायतीने दिलेल्या निर्णयाचे काटेकोर पालन केले जाते. नियमांचे पालन न करणारा शिक्षेस पात्र ठरतो. नाईक सण, उत्सवांचे नियोजन करतो. तारका आणि घट्या हे नाईकाचे दोन मदतनीस असतात. घट्या निरोप्याची कामे करतो. एखाद्या कुटुंबात कर्त्या पुरूषाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या

मालमत्तेची वाटणी करणे हे कामही नाईकच करतो. कोलाम जमातीच्या पंचायती खेरीज गावच्या पंचायतीतही सहभागी होतांना दिसतात.

प्रत्येक पाड्याच्या मध्यभागी चावडी असते. चावडीसमोर देवाची घुटी असते. 'आयक' ही कोलामांची मुख्य देवता आहे. सीतादेवीची पूजा कृषिउत्पादन वाढावे म्हणून केली जाते. भीमसेन, जैतूर, मारोती, भैराम या देवता मानतात. देवतांची प्रतिकात्मक पूजाही करतात. चांदीचा नाल हे 'दौल मालिकाचे' प्रतीक म्हणून घराच्या देव्हाऱ्यात बसवतात' (*गारे २००२:११९*). गावातील चौकात दोन शिलांच्या रूपात देवीची स्थापना करतात. हिंदू देवता आणि मुसलमान पीर दोन्हींना मानतात. ताबूत तयार करून त्याची पूजा करतात. हसन, हुसेनना देवता मानतात. (*त्रिभुवन १९९६:१४६*). आषाढ महिन्यात पाच लोक जंगलात जाऊन वाघोबाची पूजा करतात. तांदळ्याला तेल आणि शेंदूर लावून वाघोबा तयार होतो. पूजा केल्याने वाघाकडून जनावरांना धोका होत नाही, असा त्यांचा समज आहे. जैतुरदेवालाही जंगलात स्थापन करतात. भिमसेनचे प्रतीक म्हणून दगडाला शेंदूर व तेल फासून त्याची जंगलात स्थापना करतात (*गारे २००२:११९*). पोळ्यानंतर भगत जैतुरदेवतेची पूजा करतात. देवी आणि बहिराम या देवताही मानतांना दिसतात. कोलामी पुजाऱ्याला 'दियाला' म्हणतात. कोलाम समाजात पूर्वजांची पूजा पौष महिन्यातील मंगळवारी करतात. कुटुंबातील मृत व्यक्तीचे प्रतीक म्हणून लाकडाचा, सोन्याचा अथवा चांदीचा तुकडा सुरक्षित ठेवलेला असतो. त्याला ते बमा म्हणतात. (*त्रिभुवन १९९६:१४६*).

कोलामांच्या समाजव्यवस्थेमध्ये सोंगाड्याला (*वेताळक*) महत्त्वाचे स्थान आहे. कोलाम गोंड जमातींचे भाट असल्याचे मानले जाते. ते सण, उत्सव प्रसंगी गोंडांचा इतिहास पद्यात गाऊन नृत्य करतात. लग्नाची तिथी निश्चित करणे, लग्न लावणे, मंगलाष्टका आणि लग्नाचे मंत्र म्हणणे ही सोंगाड्याची कामे आहेत (*गारे २००२:१२२*).

कोलामांचे कोरा, सटी, दिवाळी आणि गावबांधणी हे मुख्य सण आहेत. उत्सव प्रसंगी ढंडारी नृत्य करण्याची त्यांची प्रथा अद्याप टिकून आहे. ढंडारी नृत्य विदर्भात लोक प्रिय आहे. इतर समाजातील लोकही हे नृत्य पाहाण्यासाठी जमा होतात.

गावाचे रक्षण व्हावे म्हणून 'गावबांधणी' हा विधी करतात. गावाची रचना साधारणत: चौकोनी आकारात असते (*त्रिभुवन १९९६:१४६*). गावात दुष्ट शक्तीने प्रवेश करू नये म्हणून गावाच्या चारही कोपऱ्यात कोंबड्याचा बळी देतात (*त्रिभुवन १९९६:१४४*).

स्वयंपूर्ण प्रशासनव्यवस्था हे कोलामांचे वैशिष्ट्य आहे. दरवर्षी वर्षप्रतिपदेला निवडणूक घेतात. या दिवसाला 'मांडवस' किंवा 'मांडोशी' म्हणतात. मांडोशीच्या दिवशी प्रत्येक कोलाम पाड्यावर निवडणूक होते. गेलेल्या वर्षाच्या कामाचा आढावा घेउन सार्वमताने प्रतिनिधी निवडले जातात (*गारे २००२:१२१*).

परधान : परधान ही महाराष्ट्रात राहणारी आणखी एक आदिवासी जमात आहे. त्यांची वस्ती मुख्यत: वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली आणि नांदेड या जिल्ह्यात आहे. १९७१ च्या जनगणनेत यांची लोकसंख्या ९५,११५ असल्याची नोंद आहे.

गोंड राजे यांना मंत्री म्हणून नेमत असत. 'रामनगरच्या गोंड राजाने 'भागर मारवी' या परधानाची मुख्यमंत्री म्हणून निवड केली होती' (*सिंग १९९४:९८*). गोंड राजांनी परधानांच्याकडे वंशावळी ठेवण्याचे काम सोपवले होते असे मानले जाते. परधान भाट म्हणूनही प्रसिद्ध आहेत. परधानांनी गोंडांचा गौरवशाली इतिहास गीतांमधून जपला आहे (*मुरकुटे १९९१:४०*).

ते स्वत:चा उल्लेख 'पानल' असा करतात. छत्तिसगड मध्ये त्यांना पठारी म्हणून ओळखले जाते. 'पठारी याचा अर्थ भाट किंवा कुशीलव (राजेलोकांचा कुलवृतांत गाणारे स्तुती पाठक) अथवा दुसऱ्या व्युत्पत्तीनुसार डोंगराळ भागात राहणारा

माणूस' असा आहे (*गारे २००२:१४१*).

परधान ही गोंडाची उपशाखा आहे. त्यांच्यामधील भेद सांगणारी कथा रसेल आणि हिरालाल यांनी सांगितली आहे. 'गोंड आणि गोंडीण भाताच्या शेतात काम करीत असताना त्यांना सातवा मुलगा झाला. इतर भावांनी म्हटले, हा जरी आमचा भाऊ असला तरी त्याचा जन्म भाताच्या शेतात अर्धे भात काढल्यावर झाला असल्यामुळे त्याला आम्ही आमच्यापेक्षा अर्धा हिस्साच देणार. आणि कुटुंबातील व्यक्ती मृत झाल्यास त्याने आमच्या सोबत बसावे एरवी त्याने घरात प्रवेश करू नये, लाकडी वाद्य वाजवावे असे ठरवले'(*रसेल हिरालाल १८१६:२६*).अद्यापही परधान लाकडी वाद्य वाजवतात. हिस्लॉप यांनी, 'गोंड समाजाची उत्पत्ती महादेवापासून झाली असल्याची कथा गोंडांच्या पुराणकथांमध्ये असल्याचा उल्लेख केला आहे.

परधान ठेंगण्या बांध्याचे व बुद्धीने चलाख असतात. परधान स्त्रिया आपले घर नीटनेटके आणि स्वच्छ ठेवतात. गाय, डुक्कर, उंदीर, मांजर, इत्यादींचे मांस व धान्य दोन्ही खातात. उष्टे खात नाहीत. परधान स्त्रिया व पुरूषांना गोंदवून घेणे आवडते. पुरूष आपले वंशचिन्ह कोपराच्या आतील बाजूस गोंदवून घेतात.

परधानांचा विवाहविधी अतिशय साधा असतो. वधूशुल्क देण्याची प्रथा आहे. विवाह प्रसंगी कोंबडीच्या दोन पिल्लांचा बळी देतात. विधवा विवाहास मान्यता आहे. बालविवाहाची प्रथा नाही. जादूटोण्यावर परधानांचा विश्वास असतो. परंतु शासकीय रूग्णालयातून औषधही घेतात.

परधानांची पंचायत अद्यापही कार्यरत आहे. होळी, दिवाळीत मद्य पिऊन नृत्य करतात, पण त्यात स्त्रिया सहभागी होत नाहीत.

'मागतेरी' नावाची प्रथा पाळतात. ह्या प्रथेतून गोंड आणि परधान यांच्या संबंधाची माहिती मिळते. या प्रथेप्रमाणे परधान गावोगाव फिरून आपल्या गोत्राचे सोडून इतर

गोंडांच्याकडून वर्गणी गोळा करतात. वर्गणी गोळा करणाऱ्या परधानाला दासोडी म्हणतात (*गारे २००२:१४४*).

बैगा: हा समाज दुर्गम भागात राहणे पसंत करताना दिसतो. बैगा स्वभावाने संकोची असतात. इतर समाजापासून दूर राहणे पसंत करतात. आज त्यांची वस्ती मंडला, बालाघाट येथे असली तरीही ते छत्तीसगडमधून आले असावेत असे मानले जाते.

'बैगा' या शब्दाचा अर्थ जादू-टोणा जाणणारा असा आहे. ते औषधेही देतात. बैगा समाजात जातिबाह्य विवाहाला मान्यता असल्यामुळे बिंजवर, भारोटिया, नारोटिया, रायभैना, काथमैना, इत्यादी उपशाखा निर्माण झाल्या आहेत. (*कुलकर्णी ००७:७३*)

बैगांच्या भाषेला बैगानी म्हणतात. ते बैगानी बरोबरच ज्या प्रांतात राहतात तेथील भाषाही बोलतात, आणि म्हणून त्यांच्या भाषेत गोंड, मराठी, हिंदी शब्द समाविष्ट झाले आहेत (*कुलकर्णी २००७:७३*).

बैगा समाजात 'दर काही वर्षांनी पहिले घर पाडून नवीन घर बांधण्याची रूढी आहे'. ही रूढी अद्याप प्रचलित आहे (*कुलकर्णी २००७;७३*). बैगाचे घर म्हणजे ओबड धोबड जमिनीवर कुडाच्या भिंतीची झोपडी असते. भिंतीला आतून मातीने सारवण करतात पण बाहेरील भिंत तशीच ठेवतात. घरे मात्र एका ओळीत बांधतात. दोन घरांमध्ये दोन ते तीन फूट अंतर असते. घर फक्त एका खोलीचेच असते त्यातच उठणे, बसणे, झोपणे करतात, शिवाय धान्यही साठवतात.

स्त्रिया कंच म्हणजे लुगडे वापरतात. (*कुलकर्णी २००७;७४*). पुरूष क्वचित धोतर नेसतात एरवी रूंद लंगोटी व डोक्याला पटका बांधतात. बैगांच्या भुमिया शाखेतील स्त्रिया चोळी वापरत नाहीत. बैगा स्त्रिया नाकात अलंकार घालत नाहीत. हातात बांगड्या व गळ्यात तऱ्हेतऱ्हचे अलंकार घालतात. पायात चुटकी नावाचा अलंकार

घालतात. पुरूष केस न कापता मानेवर बांधतात. स्त्रिया मानेवर अंबाडा घालतात. बैगा डुकरे पाळतात. कोंबडा बकरा किंवा डुक्कर बळी देतात.

प्रत्येक देवतेचे स्वतंत्र ठाणे नसते. काही वेळेस घरासमोर मोठा खांब उभा केलेला असतो. गावाच्या वेशीवर देव तांदळ्याच्या स्वरूपात मांडलेले दिसतात (*कुलकर्णी २००७:७३*) बैगा अतिमानवी शक्तीवर श्रध्दा ठेवतात. लोकगीतांमधून देवतेशी बरोबरीचा संबंध असल्याचे दिसते. 'भगवान' ही प्रमुख देवता असून तिनेच जंगलही निर्माण केले, मानवाला स्थिर जीवन दिले, शेती करणे सुध्दा शिकवले असे समजतात. या देवतेनेच विवाहाचे नियमही ठरवलेले आहेत. जन्म व मृत्यू भगवंताच्या हातात आहे असे मानतात. मृत्यूनंतर सर्वजण या देवतेकडेच जातात असे मानत असल्याचे दिसते. या शिवाय बरादेव आणि ठाकूर ह्या ग्रामदेवताही मानतात. धरणीला माता समजतात. प्रत्येक शुभप्रसंगी धरणीला दारू अर्पण करतात. भीमसेन ही त्यांची पर्जन्य देवता असल्याचे दिसते. दुष्काळ पडल्यास ते पावसासाठी भीमसेन देवतेला कोंबडा बळी देऊन साकडे घालतात. नारायणदेव, रातमाई, दुल्हादेव, ह्या त्यांच्या पारंपरिक देवतांनाही मानतात. त्याच वेळेस हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन संतांची उपासना करतांना दिसतात (*कुलकर्णी २००७:७३*).

सणवार हिंदूंसारखे असले तरीही साजरे करण्याची पद्धत भिन्न असते. किचराई हा सण मुलांसाठी असतो, त्या दिवशी मुले साधूचा वेष घेऊन घरोघर भिक्षा मागतात. घरातील प्रौढ मंडळी उपवास करतात. मार्च मध्ये फाग सण आणि जूनमधे 'बिडरी' हे सणही साजरे करतात. ऑगस्ट महिन्यात जनावरांची पूजा करून पोळा सण साजरा करतात. पावसाळा संपतांना पाऊस दिल्याबद्दल ठाकूरदेवतेचे आभार मानून पूजनही करतात.

शुभाशुभांच्या संकल्पनांवर त्यांचा दृढ विश्वास असल्याचे दिसते. विशिष्ट काम विशिष्ट दिवशीच केले पाहिजे असा अट्टाहास असल्याचे दिसते. स्त्रियांना स्वत:चा नवरा निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळते. स्त्रियांचे पुरूषांच्या बरोबरीने नृत्य करणे

किंवा दारू पिणे समाजमान्य आहे.

त्यांचे व्यवसाय अद्यापही प्राथमिक स्वरूपाचे असल्यामुळे त्यांची आर्थिक अवस्था अतिशय हलाखीची असल्याचे दिसते. बैगांचा प्रमुख व्यवसाय मंत्र, जादूटोणा करणे हा आहे. थोडीफार खरीप शेतीही करतात. जोडधंदा म्हणून जंगली औषधे गोळा करतात व शिकार करतात. ते डुकरे पाळतात.

निहाल :- कोरकू आणि निहाल यांच्यातील संबंध पूर्वीपासूनच जवळचे आहेत. महाराष्ट्रात त्यांना निहाल तर मध्यप्रदेशात नहाल या नावाने ओळखतात. पद्मपुराणात त्यांचा उल्लेख निषाद असा आहे. रसेल यांच्या मतानुसार भिल्ल पुरूष आणि कोरकू स्त्रीची संतती म्हणजे 'निहाल' होत (*रसेल १९०९:११८*). मात्र ते स्वत:ला 'कोलटा' म्हणतात. कोलटा या शब्दाचा अर्थ मानवीसमूह असा आहे. निहाली भाषेत निहाल या शब्दाचा अर्थ वाघ असा आहे (*सिंग १९९४:११८*).

निहाली भाषेचा अभ्यास अनेक विद्धानांनी केला आहे. १९८० मध्ये 'रक्षिता' यांनी निहाली भाषेचा अभ्यास केला. त्यांच्या मताप्रमाणे आज जी भाषा निहाली म्हणून ओळखली जाते. ती भाषा अनेक भाषांचे मिश्रण आहे. विशेष म्हणजे आजचे निहाली युवक-युवती मात्र कोरकू भाषा बोलणे जास्त पसंत करतांना दिसतात.

निहाल तोंडी इतिहास असा सांगतात की 'आम्ही रावणाचे वनरक्षक आहोत. आमच्या राजाचे राज्य विंध्यपर्वतापर्यंत पसरलेले होते. उत्तरेकडून एक राजा आला. त्याने रावणाला व मेघनादाला मारले (*मुंडले १९९५:५*). राम या शब्दाचा उच्चार करत नाहीत म्हणूनच कदाचित मुलाचे नाव राम ठेवत नाहीत पण मारूती मात्र ठेवतात. निहालांचा रंग काळा व केस दाट कुरळे असतात. चपळ व तीक्ष्ण नजर हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. ते सरकारी दवाखान्यात जात नाहीत (*मुंडले १९९५:५*).

१९५६ साली शासनाने चाळीस निहालांना शेतजमीन, नांगर, बैलजोडी व घरे बांधून

दिली. वस्तीला शांतीनगर असे नाव दिले पण एका महिन्याच्या आतच ते वस्ती सोडून जंगलात निघून गेले. त्यांनी बैल आधीच मारून खाऊन टाकले होते (*मुंढले १९९५;१७-१८*).

निहालांच्या दैवत संकल्पना आणि सण उत्सव कोरकूंसारखेच आहेत. मुठवा गावाच्या मध्य भागात तर खेडा गावाच्या सीमेवर असतो. प्रत्येक कुटुंबाची स्वतंत्र जलदेवता असल्याचे मानतात. खानदेशातील निहाल कुटुंबाची देवता म्हणून धातूच्या ताटलीला विशेष स्थान देतात[७](*सिंग भानू १९७५:२६०*).

निहालांची गोत्रे कोरकूं सारखीच सजीव अथवा निर्जीव वस्तूंवरून असतात. त्यांच्यामध्ये सगोत्र विवाहाला मान्यता नाही. वधू -वरांच्या वस्त्रांची गाठ बांधणे हा विवाहातील मुख्य विधी असल्याचे ते मानतात.जिरोती किंवा भावे उत्सवात ढंडारनृत्य करण्याची प्रथा आहे. सारवलेल्या भिंतीवर गाढव, बैलगाडी किंवा झाडाचे चित्र काढतात. खानदेशातील निहाल बिब्याचे तेल काढतात. ते बिब्याचे तेल आणि भुकटी करून विकतात (*सिंग भानू १९७५:२६१*).

कोरकू


महाराष्ट्रातील मेळघाट व मध्यप्रदेशातील बैतुल, छिंदवाडा, निमाड या प्रदेशात राहातात. चिखलदरा येथील आदिवासी लोकसंख्येत कोरकू लोकसंख्येचे प्रमाण शहात्तर टक्के इतके आहे. सर्वसाधारणपणे डोंगर उतारावर कोरकूंची वस्ती आणि लगतच डोंगर पायथ्याला इतर शेतकऱ्यांची शेती आणि वस्ती असते. इतर समाजाच्या संपर्काचा आणि नवीन योजनांचा थोडाफार परिणाम कोरकूंच्या जीवनप्रणालीवर झालेला दिसतो. कोरकू जनसमुदायातील ८० टक्के लोक स्व:तला हिंदू मानतात.

यांची प्रमुख देवता 'मुठवागोमाज' आहे. कोरकू भाषेत देवतेला गोमाज म्हणतात.

७ जंगलात राहाणाऱ्या निहालांनी धातुच्या ताटलीला कुटुंबाची देवता मानावे हे विशेष आहे. धातुची ताटली ही अन्नाच्या शाश्वत पुरवठ्याचे प्रतीकस्वरूप असावी आणि त्यामुळेच त्यांनी तिला देवतास्वरूप, कदाचित मातृस्वरूपातही मानलेले असावे.

झोपडी बांधताना मध्यभागी तिला आधार देणारा खांब रोवतात. त्याला 'धारणा' किंवा 'उरागोमाज' म्हणतात. त्याचा मान घरातील वडीलधाऱ्यांपेक्षा जास्त असतो. गावसीमेवरच्या भूमीवरील निसर्गसृष्टी सुरक्षित ठेवतात. या भूमीला देवराई म्हणतात. रक्षक देवता गावसीमेवर स्थापित करण्याची प्रथा अद्याप अस्तित्वात आहे. गावात हनुमानाचे मंदिरही असते. कोरकू रावण आणि मेघनाद यांना पूज्य मानतात.

कोरकूंचे निवास क्षेत्रकोरकूंचे निवास क्षेत्र



सर्वसाधारणपणे प्रत्येक कोरकू गावात एक भुमका असतो. त्याची नियुक्ती वंशपरंपरागत असते. सर्व पूजाविधी भुमकाच करतो. आपत्तीच्या प्रसंगी परिहाराला आमंत्रण देतात. प्रत्येक गावात परिहार असतोच असे नाही. दोनचार गावासाठी मिळून एकच परिहार असल्याचे दिसते. कोरकू यातुविधींवर श्रद्धा ठेवतात. प्रसंगी फोटोला किंवा प्रतिमेला इजा करणे, यासारखे मंत्रतंत्रवादी विधीही करतांना दिसतात.

प्रत्येक व्यक्तीला अनेक आत्मे असतात. अशी कोरकूंची श्रद्धा असल्याचे दिसते. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीची दोनदा अंत्यक्रिया करतात. कोरकू प्रेताचे दफन करतात. दफनावर दगड रचून ठेवतात. मृताच्या स्मरणार्थ सिडोली नावाचा विधी करतात. कोरकूगावाची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. पूर्व-पश्चिम रांगांचे वैशिष्ट्यपूर्ण गाव कोरकूंचे गाव म्हणून दुरूनही ओळखू येते.

कोरकू समाजाच्या रीतिरिवाजांचा मिश्रपट

मध्यभारतात स्थिरावलेल्या समाजात विशेषतः कोरकूंमध्ये प्रचारात असलेल्या काही मिश्रपरंपरांचा विचार केल्यास असे लक्षात येते की कालौघात आणि शेजाऱ्यांशी आलेल्या संपर्कातून, कोरकूंच्या परंपरा, विधी-आचारांमध्ये सरमिसळ झालेली आहे. ती पुढील काही उदाहरणावरून पाहता येईल.

कोरकू दरवर्षी होळी नंतरच्या मंगळवारी मेघनादाचा उत्सव करतात. तीन पायाची उंच शिडी हे मेघनादाचे प्रतीक मानून तिची पूजा करतात. शिडीच्या पायथ्याला रावणाचे प्रतीक म्हणून एक शिळा प्रस्थापित केलेली असते. 'काही कोरकू तर स्वत:ला रावणवंशी मानत असल्याचे दिसते (*देवगावकर १९९०:३०*). रावण हा आदर्श राजा आहे. तो आणि मेघनाद संकटांपासून आपले रक्षण करतील असे कोरकू मानतात. रावण आणि मेघनाद ही कोरकूंची पूज्य दैवते असली तरी इतर समाजाच्या संपर्कामुळे ते रामाचाही तितकाच आदर करतांना दिसतात. हे एकच उदाहरण त्यांच्या संमिश्र परंपरांचे द्योतक म्हणून सांगता येईल.

कोरकू महाराष्ट्रातील गणेशोत्सवाप्रमाणे दहा दिवसांचा गणेशोत्सव साजरा करतात. या उत्सवाचे आयोजन सार्वजनिक पद्धतीने होते. मेळघाटातील रायपूर गावाचे लोक सांगतात की, 'शाळेतील शिक्षकाने सांगितल्यामुळे गणपती बसवतो. गणपती बसवल्यामुळे गावातील विंधन विहिरींना पाणी लागले. म्हणून आता नियमित गणपती बसवतो'. सार्वजनिक दुर्गापूजेची प्रथाही कोरकू इतरांइतक्याच श्रद्धेने साजरी करतात. मराठी समाजाच्या संपर्कातून वधू-वरांनी सात पावले चालणे ही परंपरा कोरकूंनी त्यांच्या स्वतःच्या विवाह पद्धतीत समाविष्ट केल्याचे दिसते.

कोरकू दैवतसंकल्पनेत पितरपूजेला महत्वाचे स्थान आहे. सिडोलीच्या स्वरूपात ते साकार होते. सिडोलीवर घोडेस्वाराचे चित्रण अवश्य केले जाते. घोडा हा कोरकूंच्या परिचयाचा असला तरी त्यांच्या नित्य वापरातला प्राणी नाही. कोरकूंच्या 'उत्पत्ती' सांगणाऱ्या कथेत इंद्राच्या घोड्याने कोरकूंच्या 'उत्पत्तीमध्ये' विघ्न आणले होते. या कथेतील इंद्राचा उल्लेख कोरकूंचा पौराणिक श्रद्धांशी, कथांशी आलेला संपर्क दर्शवतो. इंद्र देवांचा राजा आणि त्याचा घोडा या दोन गोष्टींच्या श्रेष्ठत्वाची कल्पना त्यांनी पौराणिक कथांमधून उचलली असावी. मृत्यूनंतर पितर स्वर्गात जातात यावर आणि मृत पूर्वज परततो यावर कोरकूंची श्रद्धा असते. ह्या सर्वांची सांगड घातली जाऊन, प्रत्यक्ष जीवनात घोड्याचा वापर न करणाऱ्या कोरकूंनी पूर्वजांच्या स्मारकात मात्र घोडा हे त्यांचे वाहन म्हणून स्वीकारले असे दिसते.

मृतांना स्वर्गात पोहोचण्यासाठी कोळी सहाय्यक ठरेल या भावनेतून सिडोलीवर कोळ्याचे चित्रण करण्याची प्रथा सुरू झाली असावी. कोळी स्वर्गात जाण्यास साह्य करतो ही कल्पना अहिरांच्या संपर्कातून कोरकूंनी घेतली असावी. मंडला जिल्ह्यातल्या अहिर समाजामध्ये कोळ्याशी संबधित कथा प्रचारात आहे. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथात ही कथा दिली आहे. त्यांच्या मताप्रमाणे या कथेतून मंडला येथील अहिरांनी' सुताने वर्गाला जाणे' या म्हणीशी कोळ्याचा संबंध जोडलेला दिसतो. ही कथा स्वर्गाची निर्मिती कशी झाली व

कोळ्याच्या साह्याने स्वर्गात जाता येते हे सांगते' (*भागवत १९५६:३०५*). मृत्यूनंतर आत्मा दिवसा सूर्याजवळ आणि रात्री चंद्रा जवळ राहातो असे कोरकू मानतात. म्हणून सिडोलीवर त्यांचे चित्रण आवश्यक ठरले असावे.

कोरकूंच्या उत्पत्तीची कथा सांगणारी एक लोककथा आहे. त्या कथेनुसार एकदा रावण विंध्य आणि सातपुडा पर्वतावरून जात असताना या निसर्गसुंदर प्रदेशात मानवी वस्ती नाही असे त्याच्या लक्षात आले. त्याने महादेवाकडे या निसर्गसुंदर प्रदेशात मानवी वस्ती असावी अशी विनंती केली. त्यानुसार महादेवाने कावळ्याला लाल मातीचा शोध घेण्यासाठी पाठविले. कावळ्याला बैतुल येथे वारूळातील लाल माती सापडली. रावणाच्या विनंतीवरून महादेवाने लाल मातीतून नर आणि मादी अशा दोन आकृती निर्माण केल्या. पण इंद्राच्या घोड्याने त्या नष्ट केल्या. महादेवाने पुन्हा दोन आकृती निर्माण केल्या. इंद्राच्या घोड्याने त्या पुन्हा नष्ट केल्या. म्हणून महादेवाने संरक्षक कुत्रा निर्माण केला. कुत्र्याने या आकृती सुरक्षित ठेवल्या. महादेवाने त्याच्यात प्राण फुंकला. स्त्री व पुरूषाला अनुक्रमे मुलाई आणि मुला ही नावे आणि पोथरे हे आडनाव ठरवले. कोरकू त्यांनाच आपले पूर्वज मानतात. कालांतराने या जोडप्याला मुले झाली. ती मोठीही झाली तेव्हा मुलाईने महादेवाला घरी येण्याचे आमंत्रण दिले आणि त्याच्याकडे धान्याची मागणी केली. महादेवाने पुन्हा कावळ्याची मदत घेतली. कावळ्याने जवळच राहणाऱ्या जाफरेकडे धान्य आहे ही गोष्ट महादेवाला सांगितली. महादेवाने स्वत: जाफरेकडे धान्याची मागणी केली. जाफरेने आनंदाने १२ खंडी धान्य, १२ बादल्या पाणी, १२ मेंढरे दिली आणि महादेवाला जेवणाचे आमंत्रण दिले. जाफरे 'मांग' होता. जाफरेच्या घरी अन्न भक्षण केल्यास समाजमान्यतेविरूद्ध वर्तन होईल म्हणून पार्वतीने भीमसेन निर्माण केला. भीमसेनाने जाफरेने दिलेली सर्व सामग्री खाऊन फस्त केली आणि जाफरेचे घर घाणीने आणि चिखलाने भरून टाकले. जाफरेने महादेवाकडे तक्रार केली. महादेव मुलाई आणि रावणावर रागावला, त्याने कावळ्याच्या मदतीने बुड्डू नावाचे डुक्कर शोधले. बुड्डुने घाण स्वच्छ करण्यासाठी अट घातली 'माझी आणि माझ्या वंशजांची मुलाईने आणि तिच्या वंशजांनी दर तीन वर्षांनी पूजा करावी'. बुड्डूने जाफरेचे घर

स्वच्छ केले. घर स्वच्छ करतांना खाल्लेल्या घाणीमुळे त्याचा मृत्यू झाला. मृत्यूनंतर त्याला 'महाभुषूम' असे नाव मिळाले. आजही कोरकू दर तीन वर्षांनी डुक्कर आणि 'लोकदेव भीमसेनाची' पूजा करतात. भीमसेन हे दैवत कोलाम, आंध, गोंड, बैगा या आदिवासींमध्येही महत्वाचे असल्याचे दिसते.

उत्पत्ती सांगणाऱ्या ह्या कथेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे जाफरे मांगाचे अस्तित्व, कोरकू आणि मांगांच्या भौगोलिक सान्निध्याचा परिणाम सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर झाल्याचे स्पष्टपणे दिसते. त्याचाच परिणाम म्हणून कदाचित महादेव, पार्वती ह्या देवतांचा समावेश कोरकू परंपरेत झाला असावा. किंवा असेही म्हणता येईल की आदिवासींच्या दैवतपरंपरेत बऱ्याच प्राचीन काळापासूनच त्यांचा समावेश झालेला होता.

महादेव कोळी ही जमात स्वत:ची उत्पत्ती कशी झाली हे सांगताना 'शिव की झोली, उसमे का कोली' असे म्हणतात. त्यांच्या उत्पत्तीबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. वरील उक्तीवरून महादेवाशी त्यांचा थेट संबंध जोडलेला दिसतो. थोडक्यात इतर आदिवासी जमातींच्या संपर्कातून वेदपूर्व असणारा महादेव हा आदिवासींनीं स्वीकारला असावा किंवा सुरूवातीपासूनच तो त्यांच्या दैवतपरंपरेचा अविभाज्य हिस्सा असावा. त्या अनुषंगाने मांगसमाजाची जीवनप्रणाली आणि दैवत संकल्पनांचा थोडक्यात परिचय करून घेता येईल.

हा समाज मांग-गारूडी या संयुक्त नावाने ओळखला जातो. हे खेडेगावात वाजंत्री वाजवण्याचे व बैलाचे कातडे कमावण्याचे काम करतात. १९११ सालच्या शिरगणतीत यांची लोकसंख्या ९०,००० होती. नागपूर आणि नर्मदा विभागात ३०,००० तर बरारमध्ये ६०,०००. २००१ सालच्या जनगणनेत मांगांची महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या ३,९९,९००० एवढी झाली आहे.

मांगांना अस्पृश्य मानले जात असे. रसेल यांच्या मते 'आदिवासी समूहातून वेगळा

झालेला हा गट असावा. त्यांना जातीत प्रवेश देतांना त्यांच्याकडे स्वच्छतेचे आणि फाशी दिलेल्या किंवा बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावण्याचे व बैलाची कातडी सोलण्याचे काम सोपवले असावे. तोच त्यांनी व्यवसाय म्हणून स्वीकारला असावा. (*रसेल १९१६:१८४*). गावाबाहेर राहून गावासाठी सोपवलेली कामे करावीत पण राजाने बोलावल्याशिवाय गावात येऊ नये अशीही अट घातली असावी (*रसेल १९१६:१८४*).

गुरांची चोरी करण्यात हे तरबेज असल्याचे मानून ब्रिटिश शासनाने त्यांचा समावेश गुन्हेगार जमातीत केला होता. मांगांची वस्ती प्रामुख्याने बरारमध्ये आहे असा उल्लेख शासकीय अहवालात आहे (*बरार जनगणना अहवाल १९८१:१४७*). यांना भाकड म्हशीला गाभण करण्याची विद्या माहित आहे असे मानले जाते. आंध्रामधे त्यांना मातंग म्हणतात. त्यांची मुख्य देवता मरीआई आहे. ती जन्म आणि मृत्यू दोन्हीला जबाबदार असल्याचे मानले जाते. डॉ. ढेरे यांच्या मताप्रमाणे 'मारी' हा दक्षिणी (तामिळ) शब्द वर्षावाचक असून जी पर्जन्यदेवाला वर्षणशील बनवते ती मारी, असे तिच्या नावाचे स्पष्टीकरण देता येते (*ढेरे १९८८: ७१*).

मांग सरस्वतीदेवीची उपासना करतात. कारण सरस्वती देवीच्या मागे ब्रह्मदेव लागला असताना मांगांनी काठीने मारून ब्रह्मदेवापासून तिची सुटका केली. म्हणून मांगांना 'उपाशी राहावे लागणार नाही' असा वर सरस्वती देवीने दिला आहे. अशी कथा सांगतात. मांगांच्यामध्ये आपल्या मुलींना खंडोबा किंवा यल्लम्माला वाहण्याची प्रथा आहे.

मांगाची उचले, डफले घोडके , पेंढारी, गारूडी इत्यादी आडनावे व्यवसायावरून आलेली दिसतात. उचले यांचा व्यवसाय उचलेगिरी हा आहे. घोडके घोड्यांना तरबेज करतात. गारूडी साप पकडतात. रसेल यांच्या मताप्रमाणे बहुधा हाच मांगांचा पारंपरिक व्यवसाय असावा. नागपूर विभागात हे गोवारी म्हणून ओळखले जातात. गोवारी हा गारूडी शब्दाचा अपभ्रंश असावा.

मांग मांजर आणि कुत्री पाळतात. नजरचुकीने मांजर किंवा कुत्र्याचा मृत्यू झाल्यास प्रायश्चित घेतात. जातीला जेवण देतात. शिवाय घरातील सर्व मातीची भांडी फोडून टाकतात.'बाळाला पाळण्याच्या खाली वर झेलून 'कुणी गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या' असा विधी बारशाच्या दिवशी करतात.

मांगांच्या पूर्वजांची निश्चित माहिती मिळत नाही. पण विदेह पुरूष आणि कायस्थ स्त्रीच्या विवाहातून यांची उत्पत्ती झाली असावी असे मानले जाते. मांग आपली उत्पत्ती महादेवाच्या घामातून झाली असे मानताना दिसतात. तशी एक लोककथा ते सांगतात. 'कथा फार पूर्वीची म्हणजे ज्या वेळेस पशुंशिवाय नांगरणी होत होती त्या काळातली आहे'. एकदा फार मोठा दुष्काळ पडला. कुणब्यांनी पेरणीसाठी ठेवलेल्या बियासुद्धा खाऊन टाकल्या होत्या. बियांअभावी पेरणी करणे शक्य नसल्यामुळे कुणब्यांनी महादेवाकडे धाव घेतली. महादेवाने बिया दिल्या. परंतु अशक्त झालेल्या कुणब्यांना नांगर ओढणे शक्य नव्हते. त्यांनी महादेवाची मदत मागितली. महादेव स्वतः नंदीला घेउन आला. महादेव असेपर्यंतच नंदीने काम केले. त्यानंतर काम करण्याचे नाकारले. कुणब्याने महादेवाकडे नंदीची तक्रार केली. महादेवाला रागाने घाम आला. घामाच्या एका थेंबातून एक काळा, बुटका माणूस बाहेर आला. तोच आपला पूर्वज आहे असे मांग मानतात. महादेवाने या माणसाला नंदीचे खच्चीकरण करण्याची आज्ञा केली. तसे केल्यावर नंदी व्यवस्थित काम करू लागला तेव्हापासून कुणबी नांगराला बैल जोडून शेती करू लागले. मांग बैलाचे कातडे सोलणे हा व्यवसाय करू लागले.

मांगांचे महादेवाशी असलेले नाते लक्षात घेऊन कुणबी मांगांना कधीही रिकाम्या हाताने जाऊ देत नाहीत. डॉ. कोसंबी यांनी वरील कथेशी साम्य दर्शवणारी कथा दिली आहे.'कोसलचा 'प्रसेनजित' राजा आणि बुद्ध समकालीन होते. हा राजा इक्ष्वाकू राजवंशाचा असल्याचे मानले जात असले तरीही तो मातंग कुळातील होता' (*कोसंबी १९६६:१५८*). हत्ती ही त्यांची कुलदेवता होती. प्रसेनजितने शाक्य स्त्रीशी विवाह करण्याची मागणी शाक्यांकडे केली होती. शाक्यांची या विवाहाला मान्यता

नव्हती त्यांनी प्रसेनजितला फसवून 'नागा मुंडा' या दासीशी त्याचे लग्न लावून दिले. मुंडा ही जमात आजही छोटा नागपूर भागात राहाते. कोरकू ही मुंडांची उपशाखा असल्याचे मानले जाते. प्रत्यक्ष भेटीत सोमेश्वर या कोरकू व्यक्तीने धारणी या विभागात 'दादरा' गाव मांगांचे आहे, अशी माहिती दिली.

कोरकूंचा एकेकाळी मांगांशी जवळचा संबंध असावा. आज मात्र कोरकू मांगांशी रोटीबेटी व्यवहार करीत नाहीत. या कथेतून महादेव आणि मांगांचा संबंध तीन प्रकारचा असल्याचे दिसते. मांगांच्या व्यवसायाचे स्पष्टीकरणही मिळते. महादेव मांगांचा पूर्वज आहे. तो त्यांच्या मदतीला धावून येतो. नंदी हा महादेवाचा सेवक होता. तरीही महादेवाने नंदीला शिक्षा केली. यावरून महादेवाचे मांगांप्रती असलेले प्रेम दिसते. या दोघांच्या संबंधातला एक दुवा मृत्यूशी जोडलेला दिसतो. शिव स्मशानात राहातात. त्या दृष्टीने त्यांचा मृत्यूशी निकटचा संबंध आहे. तर मांगांकडे फाशी दिलेल्यांची विल्हेवाट लावण्याचे काम होते. गारूडींचा पारंपरिक व्यवसाय सापांची जोपासना करणे हा असावा असे रसेल यांचे मत आहे. शिव तर सापाला सदैव स्वतःबरोबर सांभाळतो. म्हणजेच सर्प हा देखील दोघांमधला एक दुवा आहे. डुक्कर आणि कावळ्याचाही कोणत्या ना कोणत्या रूपात मृत्यूशी संबंध आहे.

वरील कथेतून मांगाची उत्पत्ती शिवापासून झाली असे सांगितले आहे. विशेष म्हणजे कोरकूंची उत्पत्तीकथाही त्यांच्या उत्पत्तीचे श्रेय महादेवालाच देते. त्यामुळेच कदाचित त्यांच्या उत्पत्तीकथेत जाफरे मांगाला खास स्थान आहे. आणखी लक्षात घेण्याजोगी गोष्ट म्हणजे मांगांच्या उत्पत्तीकथेप्रमाणे शेतीची सुरूवात करण्याचा प्रयत्न महादेवाकडून बियाणे मागून घेऊन केल्याचे दिसते. कोरकूंकडे मात्र स्वतःचे धान्य नव्हते. म्हणजेच कोरकूंना शेतीचे तंत्र अवगत होण्याआधीपासून मांग शेती करत होते. म्हणूनच जाफरे मांगाकडे त्यांनी धान्याची मागणी केली. कथेच्या आधारे शेतीचे तंत्र मांगांच्याकडून कोरकूंना मिळाले असे अनुमान करता येते.

कोरकूंच्या परंपरांवर केवळ आदिवासी आणि इतर जातीजमातींच्या परंपरांचा प्रभाव

दिसतो असे नाही तर इतर धर्मांचा प्रभावही कोरकू परंपरांवर असल्याचे खालील प्रत्यक्ष केलेल्या निरीक्षणातून दिसते. कोरकू त्यांच्या परंपरागत दैवतांखेरीज खालील दैवतांनाही मानताना दिसतात.

कोरकू आपल्या कुलदेवतेने कृपा करावी म्हणून नोस (*कुळधर्म*) करतात. कुळधर्म केल्याने संकटांपासून संरक्षण मिळेल, आजार होणार नाहीत अशी कोरकूंना खात्री वाटते. पूर्वी दरवर्षी नोस(*कुळधर्म*) करण्याची प्रथा होती. कुळातील प्रत्येक व्यक्तीची सिडोली मूळ गावातच होत असे. परिस्थितीत बदल झाल्यामुळे स्थायिक जागी सिडोली करतात व कुळधर्मही तीन वर्षांनी करतात. चैत्र महीना नोससाठी निश्चित केलेला आहे. गावाचा भुमका आणि सर्व कुटुंबीय नोस करण्यासाठी कुलदेवतेला जातात. पूजेत बळी देण्याची प्रथा अस्तित्वात आहे. एकंदर सहा कुलदेवतांची माहिती मिळते. त्या खालील प्रमाणे आहेत.

कुलदेवता–

१) **चिखलदरामाता** २) **बैराटगडमाता** ३) **डवराबाबा** ४) **चुमक्याबाबा** ५) **गुपितवाडा** ६) **पीरबाबा**

१) **चिखलदरामाता – (***फोटो क्र. २२***)**

गाविलगडपासून सुमारे सहा ते सात कि. मी. अंतरावर गुंफा आहे. गुंफेत चिखलदरामातेचा तांदळा आहे. या मातेला नवस करतात आणि नवस फेडण्यासाठी येथे परत येतात. लाकडाच्या फळीत दोन्ही पाय किंवा हात अडकवून डोंगर चढण्याची प्रथा प्रचारात आहे. गुंफेशेजारी आधुनिक पद्धतीने बांधलेले देवीचे देऊळ आहे. कोरकू आणि इतर जातीजमातीतील लोक या दोन्ही मंदिरात दर्शनाला येतात. या देवळाच्या बाहेर देणगी देणाऱ्यांची नावे आहेत .

२) **बैराटगडमाता –** (*फोटो क्र. २४*)

अचलपूर पासून अंदाजे पंधरा कि. मी. अंतरावर बैराटगड आहे. येथील डोंगरावर

बैराटेश्वर (*फोटो क्र. २३, २५*) आणि बैराटमातेचे स्थान आहे. जवळच आधुनिक पद्धतीने बांधलेले गणेशाचे देऊळ आहे (*फोटो क्र. २६*). गणेशाचे देऊळ झाल्यामुळे कोरकू मातेसमोर बळी न देता पायथ्यापाशी बळी देऊन नैवेद्य बैराटमातेजवळ घेऊन येतात. डोंगर चढल्यावर उजव्या बाजूला एक प्रस्तरलेख आहे (*फोटो क्र. २७*). अतिशय झिजल्यामुळे त्याचे वाचन झालेले नाही (*फोटो क्र. २८*) विराटराजाची राजधानी येथेच होती असा समज आहे.

३) **डवराबाबा –** (*फोटो क्र. २९*)

सेमाडोह येथून २८ कि. मी. अंतरावर हातरू गाव आहे. हातरूपासून सात कि. मी. अंतरावर असलेल्या डोंगरावर डवराबाबाचे स्थान आहे. येथे नवस करण्याची प्रथा आहे. डोंगरावर सपाट जागेवर पूर्वेकडे तोंड करून डवराबाबांची स्थापना केलेली आहे. समोर सातमाय स्थापित केलेल्या आहेत (*फोटो क्र. २९*). पुजारी गवळी जमातीचा आहे. डाव्या हाताला शेतीची लाकडी अवजारे वाहतात. त्यात डौरा (कुळव), बैल, लोखंडी त्रिशूळ, लोखंडी चिमटा यांचा समावेश आहे (*फोटो क्र. ३०, ३१, ३२, ३३, ३४*). डवराबाबाच्या पूजेच्या सामग्रीमध्ये लोण्याचा समावेश असतो. लोणी बाबांच्या आणि देवीमाच्या पायाला लावतात. धान्य काढल्यावर उरलेले बुडखे बाबांचे पाय असल्याचे मानतात. येथे हिरवे व केशरी झेंडे आणि चादरी वाहतात. चादरी दर्ग्यात देतात. येथील कुठलेही झाड तोडत नाहीत.

४) **चुमक्याबाबा–** (*फोटो क्र. ३४ ३५, ३६, ३७*)

काटकुंभजवळ कोमलारी येथे डोंगरावर चुमक्याबाबाचे स्थान आहे. जवळच मातामायचे स्थान देखील आहे. चुमक्याच्या पायाशी नागबाबाचा फोटो वाहिलेला आहे. पायाजवळच विड्याच्या पानावर नारळ आणि शंखही ठेवलेला दिसला. हिरवे–केशरी झेंडे, ॐ आणि उर्दु आयाते लिहिलेले तक्के सुद्धा वाहिलेले दिसतात. चिमटा, त्रिशूळही चुमक्याबाबाला वाहतात असे दिसले. जरिदामधे भेटलेल्या संतोष राणा बैठेकर यांनी ४० ते ५० वर्षांपूर्वी नेहमी घडणारी एक कथा सांगितली. त्यांच्या मताप्रमाणे, चुमक्याबाबा, डवराबाबा, दैय्यतबाबा आणि पीरबाबा हे चौघे भाऊ

आहेत. पौर्णिमेला आणि अमावस्येला दैय्यतबाबा आणि पीरबाबा हे दोघे भाऊ पांढरे कपडे घालून पांढऱ्या घोड्यावर बसून कंदील घेऊन चुमक्याबाबाला भेटायला जात असत. जरिदापासून थोडे दूर गेल्यानंतर ते अदृश्य होत आणि एकदम चुमक्याबाबाजवळ गेल्यावर दिसू लागत. परतताना ते गाववाल्यांना हाक देत असत. त्यांची हाक म्हणजे गावावर आलेल्या संकटाची सूचना होय असे मानले जाते. या दोघांनाही लाल रंग आवडत नाही आणि तो पाहिल्यावर ते चिडतात, ७ ते ८ वर्षांपूर्वी एका मुलीने लाल रंगाचे कपडे घातल्यामुळे तिला त्यांनी गायब केले. तिच्याबरोबर एक बकरीही होती. अद्यापही त्या दोघींचा पत्ता लागलेला नाही. भुमक्यानेही लाल रंग वापरलेला या चारही भावांना चालत नाही. ते म्हणाले देवाचीही दोन कुळे आहेत १) देवकुळ २) राक्षसकुळ. देव फक्त चांगल्या गोष्टीत साथ देतो, पण राक्षस वाईट गोष्टीतही मदत करतो. हे चौघे भाऊ राक्षस कुळातील आहेत. येथे भेटलेल्या 'भुषम धुर्वे' यांनी सांगितल्यानुसार चुमक्याबाबाच्या दर्शनाला कोरकू, गोंड, कुणबी, मुसलमान, इत्यादी समाज येतात.

६) **गुपितवाडा** (*फोटो क्र ३८, ३९, ४०*)

येथील कालाबाबा म्हणजेच महादेव. या कुलदेवतेचे हे स्थान मध्यप्रदेशातील बैतुल जिल्ह्यात आहे. परतवाड्यापासून अंदाजे ९२ कि. मी. अंतरावर हे स्थान आहे. पूजेसाठी इतर सामग्री बरोबरच दारू आवश्यक मानतात. देवाला त्रिशूळ लाल, काळा किंवा सफेद झेंडा वाहतात. बकरा अथवा कोंबडा बळी देतात. कोरकू याच्या पूजनात दारू आवश्यक आहे असे मानतात. त्याचे कारण सांगतात की, शिव पार्वतीच्या लग्नात हजर असलेल्या लोकांनी, 'विवाह समारंभ झाला परंतु मजा वाटली नाही' असे मत व्यक्त केले. शंकराने महुवा पासून दारू तयार करून ती सर्वांना पाजली. त्याची स्मृती म्हणून पूजनात दारू अवश्य ठेवतात.

पीर बाबा–बुलढाणा जिल्ह्यात अकोटजवळ एका गुंफेत हे स्थान आहे. पायविहिरच्या दहिकर (डिकार) यांचे हे कुलदैवत आहे. कालाबाबा हे देखील दहिकरांचे कुलदैवत असल्याचे बाबनू दहिकर यांनी सांगितले. ते दरवर्षी दोन्ही कुलदेवतांच्या दर्शनाला

जातात. त्यांच्या घरात कालाबाबाच्या फोटो जवळ पीराच्या दग्र्याचा फोटो आहे. जाम्बुखेडा गावातील तांडेल यांचे कुलदैवत पीरबाबा आहे. तांडेल आखाडीला पीरबाबाला पांढरा बकरा बळी देतात. वाडवडिलांपासून ही प्रथा चालू आहे, असे जुकलानीने सांगितले.

चुमक्याबाबा आणि ड्वराबाबा या देवतांचे दर्शन घेताना पुढील वैशिष्ट्ये लक्षात आली, चुमक्याबाबा आणि ड्वराबाबा या देवतांना केशरी आणि हिरव्या चादरी, चिमटा, त्रिशूळ, कुराणातील कलमा, ॐ अशी अक्षरे लिहिलेले तक्ते अर्पण केलेले आहेत, या शिवाय नागबाबाचा फोटो ही ठेवलेला होता. त्या ठिकाणी चौकशी केल्यावर लोकांनी सांगितले देव सर्वांचाच असतो. बैराटगडमाता आणि चिखलदरामाता येथे मात्र फक्त देवीमाताच आहेत.

अशा तऱ्हेच्या वैविध्यपूर्ण परंपरा असलेले समाज मध्यभारतात स्थायिक झालेले दिसतात. त्यांच्या दैवत परंपरांचा थोडक्यात आढावा वर घेतला आहे. मध्यभारतात स्थायिक झालेल्या समाजात दक्षिणेकडील, उत्तरेकडील व पूर्वेकडून आलेली मुंडांची उपशाखा म्हणजेच कोरकू आहेत.

फ्युचेस यांच्या मतानुसार, 'कोरकूंची शारीरिक ठेवण, भाषा, आणि त्यांच्या आचार-विचारातून ते मुंडांची उपशाखा आहेत' (*फ्युचेस, १९८८:३५*). कोरकूंच्या परंपरांत दिसणारे मिश्र प्रवाह हे त्याच प्रक्रियेचा परिणाम आहे, असे म्हणता येईल.

कोरकू स्वभावाने शांततापिय आहेत. कोरकू राहतात त्या प्रदेशाचा इतिहास सदासर्वकाळ युद्ध आणि सत्तासंघर्षाने व्यापलेला असतानाही त्यात कोरकूंचा सहभाग नगण्य आहे. निहाल आणि गोंडांशी कोरकूंचे संबंध सलोख्याचे आहेत. परस्परांच्या परंपरांची देवाण-घेवाण झाल्याची उदाहरणे आहेत. भटके जीवन जगणाऱ्या समाजांशी प्रदीर्घ संपर्क असूनही वाटमारी, चोरी, दरोडे यात कोरकू सहभागी झाल्याची उदाहरणे फारशी नाहीत.

महाराष्ट्र आणि मध्यभारतातील दुर्गम आणि डोंगराळ प्रदेशात येण्याआधी कोरकूंच्या अनेक पिढ्या स्थलांतर करत होत्या हे स्पष्ट आहे. स्थलांतराच्या काळात त्यांच्या जीवनप्रणालीत अनेक परंपरांचे प्रवाह मिसळले गेले असावेत, त्यामुळेच आजच्या कोरकूंच्या परंपरांमध्ये, विधी-आचारांमध्ये वेदपूर्व, वैदिक इतकेच नव्हे तर आधुनिक परंपराही सहजतेने सामावल्या गेलेल्या दिसतात.




आदमगड येथील गुहाचित्र



आदमगड येथील गुहाचित्र




आदमगड येथील गुहाचित्र




आदमगड येथील गुहाचित्र



आदमगड येथील गुहाचित्र




आदमगड येथील गुहाचित्र




लोटा (माळवा संस्कृती)




'चषक' (माळवा संस्कृती)



दुधारी तलवार (माळवा संस्कृती)




तांब्याची कु-हाड (माळवा संस्कृती)




फोटो क्रमांक २०

तांब्याच्या बांगड्या(माळवा संस्कृती)



फोटो क्रमांक १९

नेकलेस (माळवा संस्कृती)



फोटो क्रमांक १८

तांब्याच्या अंगठ्या (माळवा संस्कृती)



फोटो क्रमांक २१


लाकडी नांगर




चिखलदरा माता




बैराटेश्वर १



बैराटेश्वर २



बैराटगडमाता



बैराटगड येथील गणेश



बैराटगड येथील प्रस्तरलेख



डवराबाबा येथील गवळी पुजारी



डवराबाबा



सातमाय (डवराबाबा)



डवराबाबा



डवराबाबा



डवराबाबा



चुमक्याबाबा



चुमक्याबाबा



'चुमक्याबाबा



सातमाय (चुमक्याबाबा)



गुपितवाडा येथील कालाबाबा (महादेव)



गुपितवाडा येथील कालाबाबा (महादेव)



गुपितवाडा **येथील** कालाबाबा (महादेव)

प्रकरण तिसरे

कोरकू समाज जीवन

या प्रबंधाचा अभ्यास विषय आहे 'आदिवासी दैवत परंपरांचा अभ्यास'. विषयाच्या व्याप्तीचा विचार लक्षात घेता सर्वच आदिवासी समाजांच्या दैवतपरंपरांचा अभ्यास प्रस्तावित प्रबंधाच्या चौकटीत करणे कठीण आहे. 'कोरकू' आदिवासी असूनही इतिहासकाळापासून विविध आदिवासी जमाती आणि ग्रामस्थित समाजांच्या संपर्कात येत गेले हे आपण आधीच्या प्रकरणात पाहिले. त्यामुळे स्वत:च्या परंपरागत दैवतांच्या सोबतच कोरकूंनी इतर परंपरामधील दैवतांचाही स्वीकार केलेला दिसतो. म्हणून या प्रबंधात कोरकूंच्या दैवतपरंपरांचा सविस्तर अभ्यास केला आहे. ज्या आदिवासी समाजावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे या प्रबंधाचे उद्दिष्ट आहे. त्या कोरकू समाजाचे सविस्तर वर्णन आत्तापर्यंत मांडलेल्या पार्श्वभूमीवर देणे योग्य ठरेल. कोरकू आज जरी सातपुड्याच्या रांगात स्थायिक असले तरीही ते छोटा नागपूर भागातून इतरत्र पसरले असल्याचे मानले जाते. कोरकू हा मुंडांचा पश्चिमेकडे स्थलांतरित झालेला पहिलाच गट असावा (*फ्युचेस १९८८:१७*). मुंडा हे कोलवंशाचे असून त्यांची एक शाखा म्हणजेच कोरकू हे बहुतांश विद्वान मान्य करतात. गेली अनेक शतके त्यांचे वास्तव्य मध्यभारतात आहे.

'कोल समाजाच्या संदर्भात ऐतरेय ब्राह्मणात एक कथा आहे, त्यानुसार बेन या राजाने अंगिरस ऋषींचा अपमान केला. ऋषींनी दिलेल्या शापामुळे त्याचा हात गळून पडला व त्यातून जी माणसे निर्माण झाली त्यामध्ये प्रथम निषाद नंतर मुशाहर, कोल आणि विल हे उत्पन्न झाले' (*रॉय १९७०;१६*).

'कोरकू' या शब्दाच्या अर्थावरून विद्वांनांमध्ये एकमत असल्याचे दिसत नाही. कोर या शब्दाचे अभ्यासकांनी भिन्न-भिन्न अर्थ मानलेले दिसतात. एका अर्थानुसार कोर म्हणजे मानव. त्याला कू हे अनेक वचन लावल्यामुळे कोरकू हा शब्द तयार झाला.

त्याचा अर्थ 'मानवी समूह' असा होतो (*रसेल-हिरालाल १९१६:५५०*). कोरो या शब्दाचा दुसरा अर्थ 'वाट चालत असताना एका बाजूला राहून गेलेली तुकडी'. कौरवांची मागे राहिलेली एक तुकडी म्हणजे आपण असे कोरकू मानताना दिसतात. (*पौहार २००५:४*) भोगनकर-देवरकर-यांच्या लेखात, 'कोरकू' या शब्दाचा अर्थ 'प्रामाणिक माणूस' असा दिला आहे (*भोगनकर-देवरकर १९९७:१५६*).

मानववंशशास्त्रज्ञांच्या नोंदीनुसार, 'कोरकूंची' शरीरयष्टी पीळदार, चेहरा गोल, नाक रूंद, पण चपटे नसते. शारीरिक ठेवण आणि नाकाच्या लांबी, रूंदी वरून हे समाज कोल-मुंडा वंशगटाचे असावेत असे मानले जाते. फ्युचेस यांच्या मताप्रमाणे वांशिक दृष्टीने कोल, मुंडा आणि कोरकू यांच्या नाकाच्या लांबी, रूंदीच्या प्रमाणावरून वरून त्यांचा वंशगट एकच असावा असे अनुमान करता येते (*फ्युचेस १९८८:२८*).

मध्यभारतात स्थायिक असलेल्या समाजात उत्तरेकडून आलेले आर्य भाषागटातील भाषा बोलणारे, दक्षिणेकडून आलेले द्रविडभाषा समूहातील भाषा बोलणारे, आणि पूर्वेकडून आलेले मुंडारी भाषा बोलणारे, अशा तिन्ही समाजांच्या परंपरांची सरमिसळ असल्याचे मानले जाते.

मुंडारी भाषेला लिपी नाही. संस्कृत आणि पाली भाषेतील साहित्यातून अथवा विद्धानांनी केलेल्या विवेचनातून कोरकूंच्या गत इतिहाचा मागोवा घेणे सयुक्तिक ठरेल. संस्कृत साहित्यात अनार्यांना दस्यू अथवा दास असे संबोधन आढळते.

रामायणात विंध्य परिसराचा 'जनस्थान' म्हणून उल्लेख आहे. विंध्य पर्वतरांगांमध्ये राहाणारे ते जन म्हणून हा प्रदेश जनस्थान म्हणून ओळखला जात होता. आज ज्या समाजांना आदिवासी या नावाने संबोधले जाते, त्याच समाजांचा उल्लेख प्राचीन साहित्यात 'जन' म्हणून केलेला असल्याचे दिसते. आर्य आणि द्रविड समाजांचे आगमन मैदानी प्रदेशात होण्यापूर्वी हे समाज मैदानी प्रदेशात स्थिरावले होते.

कृषीच्या वाढीत ते डोंगराळ प्रदेशात, जंगलात सरकले. बहुतांश जन हे प्रोटो–आस्ट्रोलॉइड वंशाचे होते. हे जन निषाद, कोल आणि शबर असल्याचे दाखले इतिहासात आहेत (रे १९७२:१६).

रामायण आणि महाभारत या दोन्ही महाकाव्यात 'शबर' या जनजातीचा उल्लेख आहे. रामाला मध्यभारतातील जंगलात 'शबर' स्त्री भेटली होती असे मानले जाते. आजही मुंडारी भाषा बोलणारे ज्यांना सवर किंवा सओरा संबोधल जाते असे आदिवासी दक्षिण बिहार ते दक्षिण ओडिसामध्ये आढळतात (कर्वे १९९०:३२१).

महाभारतात आणि प्राचीन संस्कृत सहित्यात 'नाग' समाजाचा उल्लेख आहे. नाग हा शब्द सरपटणारे प्राणी आणि मानव या दोघांसाठी योजलेला दिसतो. नग म्हणजे पर्वत त्यामुळे पर्वतरांगांच्या दऱ्याखोऱ्या मधून राहाणाऱ्या लोकांना नाग म्हटले गेले असावे, असेही मानले जाते. नागांची चौदा राजघराणी असल्याचे मानले जाते. तक्षक राजघराणे यमुनेच्या परिसरात म्हणजेच आजच्या पंजाब प्रदेशावर राज्य करीत होते. त्या प्रदेशातील जंगल अर्जुनाने इंद्रप्रस्थ राजधानी वसवण्यासाठी जाळून टाकले. त्यावेळी तक्षक नागाने संघर्ष केला परंतु त्याचा प्रयत्न असफल ठरला. संघर्षाच्या शेवटी तक्षकाने संधी साधून परीक्षित आणि जन्मेजयाचा वध केला. नंतरच्या सर्प यज्ञात अनेक नागांना प्राण गमवावे लागले. शेवटी आस्तिक (Astika) नावाच्या तपस्वीने शांतता प्रस्थापित केली असाही उल्लेख आहे. आस्तिक, नाग राजकन्या आणि एका ब्राह्मणाचा पुत्र होता (कर्वे १९९०:३२२).

मुंडारी भाषा बोलणाऱ्या आजच्या समाजाचा नागा समाजाशी संबंध असावा अशी शक्यता दर्शवणारी एक कथा पाली साहित्यात आढळते. कथा अशी आहे, 'कोसलचा' राजा प्रसेनजित याने शाक्य कुळीतील राजकन्येशी विवाहाची मागणी केली. शाक्यांना हा संबंध मान्य होत नव्हता. म्हणून त्यांनी महानामाची दासी असलेल्या नागा मुंडाची मुलगी राजकन्या आहे असे भासवून प्रसेनजितशी तिचा विवाह करून दिला. त्यांचा मुलगा विढुडभ प्रसेनजित नंतर कोसलचा राजा झाला.

त्याला शाक्यांनी केलेली फसवणूक समजली तेव्हा त्याने शाक्य कुळीचा संपूर्ण नाश केला (*कोसंबी २००४:१६०*).

हरिवंश पुराणात, 'जे आदिवासी योद्धे हरले *(degraded)* आहेत त्यांना कोल सर्प किंवा कोली सर्प असे संबोधले आहे' (*कर्वे १९९०:३२३*). मुंडांना आजही कोल म्हणून संबोधले जाते. तसेच त्यांच्या वसतीस्थानाला कोळीवाडा *(Kolhan)* असे म्हटले जाते. हरिवंशातील उल्लेखांवरून अशी दाट शक्यता वाटते, की नागा मुंडारी भाषा बोलणारे असावेत (*कर्वे १९९०:३२३*).

महाभारतात करकोटक नागा विंध्य पर्वताच्या पूर्व परिसरात राहात होते अशी माहिती मिळते. त्या परिसरात आजही मुंडांचे वास्तव्य आहे. अथर्ववेदात तक्षक आणि ऐरावत अशी दोन नाग राजघराणी असल्याचे म्हटले आहे. ते जंगलात राहाणारे बहुधा भातशेती करणारे असावेत (*कर्वे १९९०:३२३*).

मध्यप्रदेशातील कोरकू एक कथा सांगतात, त्यानुसार एक नाग जोडपे एक मुलाला मोहाच्या झाडाखाली टाकून निघून गेले. कनोजच्या राजाने बालकाचे पालन-पोषण केले. त्याचे नाव 'महावासी' ठेवले. मोठा झाल्यावर त्याचे लग्न लावून दिले. व त्याला गांजार प्रदेशाची जहागिर दिली. आजही मेळघाटात गांगडा नावाचा प्रांत आहे आणि मोवासी कोरकू गांगडा प्रदेशात रहातात. कोरकूंच्या एका शाखेला मोवासी म्हणतात (*सानप २००८:१२९*) पण मेळघाटातील कोरकूंकडून त्यांना ही कथा माहित नसल्याचे समजले. निमाडचे कोरकू स्वत:ला कर्कोटक नागवंशी असल्याचे मानतात. ते नागपूजाही करतात (*ढेगावकर, १९९०:३०*). भारतीय संस्कृ ती कोशात 'कर्कोटक' ही एक जमात होती असे म्हटले आहे. महाभारतात त्यांना विधर्मी म्हटले आहे (*संस्कृतीकोश खंड २:११३*). कर्कोटक या जमातीला कार्तवीर्य अर्जुनाने जिंकले होते, असे वायुपुराणात म्हटले आहे (*संस्कृतीकोश खंड २:११३*).

वरील कथेला पूरक ठरेल अशी कथा मध्यप्रदेशातील कोरकू समाजात प्रचारात आहे.

एकदा काही कोरकू जंगलात शिकारीसाठी भटकत होते. त्यांना एक सांबर दिसले. त्याचा पाठलाग करीत ते पंचमढीला एका गुहेपर्यंत पोचले. पण सांबर गुहेत लपले. गुहेतून एक तपस्वी बाहेर आला. त्याने सांगितले मीच महादेव आहे आणि हेच ठिकाण तुमच्या वस्तीसाठी योग्य आहे. आजही कोरकू येथील मंदिरात सेवा करत असल्याचे दिसते. या कथेमधून कोरकूंच्या मध्यभारतातील निवासक्षेत्राचे स्पष्टीकरण होते (*फ्युचेस १९८८:३९०*).

कोरकू स्वत:चा वंश प्राचीन असल्याचे मानतात. ते स्वत:ला रावणाशी संबंधित मानतात. रावणाचा आदर करणारा रामलाल हा आमचा कोरकू सहायक आपल्याला रावण म्हणावे असा आग्रह धरतो.

आर्यांनी गुरा-ढोरांच्या चाऱ्यासाठी आणि शेती करण्यासाठी जंगले साफ करण्याला आरंभ केला. साहजिकच त्यांचे आणि मुंडारी बोलणाऱ्या नागांमध्ये वितुष्ट निर्माण झाले. या संघर्षात नागांना माघार घ्यावी लागली असावी आणि त्यांच्यातील काहींचा समावेश आर्य समाजात झाला असावा (*कर्वे १९९०:२२३*).

कोरकूंचे वास्तव्य मध्यभारतात केव्हापासून आहे हे निश्चित सांगता येत नाही. 'तरीसुद्धा अभ्यासकांच्या विवेचनातून असा अंदाज करता येतो, की आर्य आणि द्रविडांचे आगमन मध्यभारतात होण्यापूर्वी या प्रदेशात काही आदिम समाजांचे अस्तित्व होते. हे आदिम समाज दक्षिण आशिया, ऑस्ट्रेलियापर्यंत पसरलेले होते असे मानले जाते[६] आता मात्र हा समाज छोट्या छोट्या समूहात विभागलेला दिसतो (*कर्वे १९९०:३१६*). विभागलेल्या समूहातील सर्वात पश्चिमेकडचा ऑस्ट्रो-एशियाटिक भाषा समूहातील मुंडारी भाषा बोलणारासमूह कोरकू म्हणून ओळखला जातो' (*कर्वे १९९०:३१३*).

कोरकूंनाही इतर आदिवासी समाजासारखेच निसर्ग सान्निध्यात राहाणे अधिक

६ त्यातील एक समाज ऑस्ट्रो- एशियाटिक बोलणारा जंगलात राहून भात शेती करणारा व शिकारी समाज असावा. (कर्वे,१९९०:३१६)

आवडते कारण त्यांचे स्वतंत्र अस्तित्व त्यांना तेथे जपता येते. कोरकूंच्या सर्व वसाहती सातपुडा आणि विंध्य पर्वताच्या उतारावर किंवा पठारावर आहेत. त्यांनी निवासस्थानासाठी डोंगर उतारावर पण जंगलापासून फार दूर नाही, अशी ठिकाणे निवडलेली दिसतात. लगतच इतर समाजातील शेतकऱ्यांची शेती व वस्ती असते. महाराष्ट्रातील अमरावती व मध्यप्रदेशातील पूर्व निमाड, बैतुल, छिंदवाडा, हौशंगाबाद या जिल्ह्यांमध्ये यांची वस्ती आहे. हे दोन्ही प्रदेश डोंगराळ आणि दुर्गम आहेत.

जंगलात राहाणाऱ्या आदिवासी जमाती कृषिक्षेत्रातील विस्तारामुळे अधिक दुर्गम प्रदेशात सरकल्या असे मानले जाते. मेळघाट आणि कालीभीत जंगल या परिसरात विखुरलेल्या लहान-लहान वस्त्यांमध्ये कोरकू स्थायिक झाले असे दिसते. जंगलातील वन्य उत्पादन, कंदमुळे, फळे, भाजीपाला, मासे, पशू-पक्षी त्यांना या क्षेत्रात सहजपणे उपलब्ध होत होते. शिवाय कोरकूंना स्थलांतरित शेतीच्या पद्धतीने कोदो, कुटकीसारखी धान्ये पिकवणे शक्य होत होते. त्यांच्या परंपरा पर्यावरणाला अनुकूल अशाच होत्या. त्यांची जीवनप्रणाली जंगलातील वन्य उत्पादन आणि त्याचा विनिमय यावर अधिष्ठित होती.

इतर आदिवासी समाजासारखेच कोरकू जीवात्मवादी आहेत. कोरकू त्यांच्या घरात नित्य पूजापाठ करीत नाहीत. सामुदायिक पद्धतीचे धार्मिक विधी साजरे करण्यावर त्यांचा अधिक भर असतो. प्रत्येक वस्तूमात्रात आत्मा असतो पण मानवाजवळ मात्र अनेक आत्मे असतात असे ते मानतात. सुफलन आणि समृद्धीसाठी देवतांना आवाहन करणे आणि संकटाचे मंत्रतंत्र करून निवारण करणे, अशीच सर्वसाधारण पठडी कोरकू समाजातही दिसते.

कोरकूंचे निवास क्षेत्र

सातपुडा म्हणजे सात डोंगर रांगा असलेला पर्वत. या डोंगररांगांमध्ये कोरकूंच्या वसाहती विखुरलेल्या आहेत. महाराष्ट्रातील चिखलदरा, धारणी हे दोन तालुके आणि

मध्यप्रदेशातील पूर्व निमाड, हौशंगाबाद, बैतुल आणि छिंदवाडा हे चार जिल्हे सातपुडा पर्वतरांगामध्ये स्थित आहेत. सातपुड्याचा विस्तार पूर्व-पश्चिम ५६० मैल आहे. सातपुड्याचे सर्वात उंच शिखर धुपगड हे १३५० मी. इतके उंच आहे. येथील हवामान विषम कोरडे असून, पावसाचे सरासरी प्रमाण १९०५ मि. मी. इतके असते. बहुतांश प्रदेश डोंगराळ असल्यामुळे काही सखल भागात भुईमूग, कपास, ज्वारी इत्यादी कृषी उत्पादने होतात. इतर प्रदेश जंगलांनी व्यापलेला आहे. या जंगलात वाघ, चित्ता, सांबर, अस्वल यासारखे वन्यपशू आढळतात. येथील जंगलातून कच्चे डांबर, डिंक, बांबू, सागवान लाकूड, बिब्बा, इत्यादी वन्य उत्पादने मिळतात. कोरकूंचे वास्तव्य या परिसरात अनेक शतके आहे.

प्राचीनकालापासून मध्ययुगापर्यंतच्या प्रदीर्घ कालावधीत मौर्य, शुंग, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, यादव इत्यादी अनेक राजवंशानी या प्रांतावर अधिपत्य गाजवले. पण गोंडांखेरीज इतर स्थानिक लोकांची सत्ता स्थापन झाल्याचे उदाहरण मात्र आढळत नाही.

मध्ययुगात इ.स.१३१६ साली कुतुबुद्दिन ऐबक याने यादवसत्तेचा अंत केला व विदर्भाचा समावेश मोगल साम्राज्यात केला. १३४७ मध्ये महंमद बिन तुघलकच्या सैन्याने बंड केले. या बंडात वऱ्हाडातील सर्व मुसलमान, गोंड आणि कोरकू सामील झाले होते. बंडखोरांनी जफरखानाची 'दक्षिणचा राजा' म्हणून निवड केली. त्याने बहामनी हे नाव स्वीकारले (*काळे १९२४:२८*).

आजचा कोरकू प्रदेश बहामनी राज्यात समाविष्ट झाला. इ. स.१३९८ मध्ये सातपुडा रांगांमध्ये देवगड, खेरला आणि मंडला येथे गोंडराज्य स्थापन झाले. या राज्यात कोरकूंना अनेक ठिकाणी जहागिरी मिळाल्याचे पुरावे आहेत.

अठराव्या शतकात हा प्रांत मराठ्यांनी जिंकला. १८१८ मध्ये मराठी सत्तेचा अंत झाला त्यावेळेस नागपूरकर भोसले मेळघाटात आश्रयासाठी आले होते. कोरकूंनी

त्यांना आश्रय दिला होता असे मानले जाते. १८५७ च्या उठावाचे सेनापती तात्या टोपे यांनी मेळघाटातून उत्तरेकडे जाताना कोरकूंना उठावात सामील होण्याची विनंती केली होती. कोरकूंनी ती अमान्य केल्याने ब्रिटिश कमिशनर टायलर यांनी कोरकूंच्या इमानदारीचे कौतुक केले (*फ्युचेस १९८८:२०*).

ब्रिटिशांनी १८६१ मध्ये हा सर्व प्रदेश आणि निजामाच्या हद्दीतील मराठी भाषिक प्रांत जोडून 'सेंट्रल प्रॉव्हिन्स' निर्माण केला आणि 'वनसंरक्षण' योजना आखल्या. संरक्षित क्षेत्रात स्थानांतरित शेतीवर आणि पशूंच्या शिकारीवर बंदी आली. संरक्षित क्षेत्रात स्थायिक असलेल्या आदिवासींच्या जमिनी गेल्या. पर्यायी जमिनी देण्याचा विचारही शासनाने केला नाही. अन्न सामग्रीच्या कमतरतेमुळे स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत कोरकू हलाखीचे जीवन जगत राहिले. १९४७ मध्ये ब्रिटिश सत्तेचा अंत झाला. १९५० मध्ये शासनाच्या मार्गदर्शनासाठी घटना तयार झाली. घटनेमध्ये आदिवासी आणि मागासवर्गीय यांना सवलती आणि आरक्षण जाहीर झाले. तरीही आदिवासींच्या परिस्थितीत फार फरक पडला नव्हता. आता मात्र कोरकूंची युवापिढी जास्त जागरूक झाली आहे हे त्यांचा राजकारण आणि शिक्षण या क्षेत्रातील वाढत्या सहभागातून स्पष्ट दिसते.

आदिवासी जीवनप्रणालींना मानवी समाजव्यवस्थेची प्राथमिक अवस्था मानून मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाचा अभ्यास केला आहे. आता मात्र समाजशास्त्रज्ञ या विषयाकडे फक्त उत्क्रांतिवादाच्या दृष्टिकोनातून न पाहता आदिवासी संस्कृती-परंपरांचे स्वतंत्र स्थान मान्य करतात. त्यापैकी महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात राहाणाऱ्या कोरकू या आदिवासी समाजाची या प्रबंधासाठी अभ्यासविषय म्हणून निवड केली आहे. कोरकूंनी आधुनिक शहरवासियांच्या संपर्कात येऊनही त्यांच्या परंपरांचे मूळ स्वरूप जपलेले आहे. तरूण मुलांमध्ये आधुनिक शिक्षणामुळे त्यांच्या अस्मितेची जाणीव अधिक प्रखर झालेली आहे. ते त्यांच्या परंपरांचा विचार अधिक सजगपणे करू लागले आहेत. त्यामुळे त्यांच्याशी संवाद साधणे सहज शक्य होते. या प्रबंधासाठी महाराष्ट्रातील आणि मध्यप्रदेशातील

विविध कोरकू गावांमध्ये राहणाऱ्या समाजातील जाणकारांशी संपर्क साधणे, या पद्धतीचा अवलंब केला आहे (*परिशिष्ट ४ पाहा*). कोरकूंच्या दैवत आणि विधी परंपरांचा अभ्यास करण्याच्या हेतूने मानवशास्त्र आणि समाजशास्त्र या दोहोंच्या अभ्यासपद्धतीचा आधार घेतला आहे.

कोरकू समाजजीवन

'समाज म्हणजे ज्यांचे हेतू समान आहेत, जे एकाच प्रदेशात एकत्र वास्तव्य करतात, ज्यांची जीवनपद्धती समान आहे, ज्यांच्या मनात एकात्मतेची जाणीव आहे व या सर्वांमुळे आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत असे मानणाऱ्या व्यक्तींचा मोठ्यात मोठा व तुलनात्मक दृष्ट्या कायम स्वरूपाचा गट म्हणजे समाज होय' (*कुलकर्णी-खैरनार २०३:५७*). रेडक्लिफ ब्राऊन म्हणतात, 'सामाजिक मानवशास्त्र समाजशास्त्राची अशी शाखा आहे की ज्यामध्ये आदिवासी किंवा निरक्षर समाजाचे अध्ययन करण्यात येते' (*खडसे १९९९:७*).

आदिवासी समाजातील कायदा, धर्म, आर्थिक संघटना, राजकीय संघटना, कुटुंब व इतर संघटनांचा अभ्यास सामाजिक मानवशास्त्राच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट आहे (*खडसे १९९९:१५*).

कोरकू ही मुंडांची उपशाखा सातपुडा आणि विंध्य परिसरात अनेक शतकांपासून स्थायिक असल्याचे साहित्यात उल्लेख आहेत. स्थायिक होताना कोरकूंनी पर्यावरणाला अनुकूल आणि सामुदायिकतेला प्राधान्य देणारी जीवनप्रणाली स्वीकारलेली दिसते. समाजजीवन सुरळीत असावे, त्याचे सातत्य टिकून राहावे म्हणून नियम तयार केलेले आहेत. .कोरकू त्यांचे काटेकोर पालन करतात. नियमांचे नियोजन कुटुंब आणि जातपंचायत या संस्था करतात. नियमाविरूद्ध वर्तन करणारा शिक्षेस पात्र ठरतो.

समाजाचे आस्तित्व, जन्म आणि मृत्यू या 'मानवी' जीवनचक्रातून साध्य होते,

अव्याहतपणे चालू राहाते, व्यक्ती आणि कुटुंब हे सामाजिक जीवनाचे मूलाधार आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक व्यक्ती समाजाशी जोडलेली असते. आत्मा अमर आहे. तो पुन्हा-पुन्हा आपल्या कुळीतच जन्म घेतो, अशा तऱ्हेच्या संकल्पना भारतातील सर्व समाजात खोलवर रूजलेल्या आहेत. कोरकू तर गर्भधारणा झाली ही मृत पूर्वजांची कृपाच आहे असे मानताना दिसतात.

कोरकू समाजात गर्भवती आणि गर्भाचे संरक्षण व्हावे या उद्देशाने गर्भवतीने बैलगाडीत बसू नये, जड वस्तू उचलू नये, ग्रहणात, वादळात, विजा चमकत असताना घराबाहेर पडू नये अशा तऱ्हेची बंधने आहेत. गर्भधारणा झाल्यापासून बाळंतपण होईपर्यंत गरज पडल्यास दाईमाची मदत घेतात. आर्थिक हलाखीमुळे गर्भवतीला घरातील आणि घराबाहेरील कामे करावी लागतात. शारीरिक स्वास्थ्याकडे फारसे लक्ष देता येत नाही.

कोरकू स्त्रीचे बाळंतपण सुईण घरातच करते. सुईणीला दाईमा म्हणतात. बाळंतपणाला विलंब झाल्यास देवतांची अथवा पूर्वजांची अवकृपा झाली असे मानून परिहाराला आमंत्रण दिले जाते. तो बळी देऊन, मांत्रिक उपचार करून देवतांची कृपा संपादन करण्याचा प्रयत्न करतो. चौरे यांच्या मतानुसार, 'कोरकूंना मुलगी झाल्यास आनंद होतो. कारण मुलीमुळे वधुमूल्य मिळते आणि जावयाच्या रूपात एक नोकर मिळतो' (*चौरे १९८७:४९*). कोरकूंना मुलगी झाल्याचा आनंद होतो याचा अर्थ मुलगा झाल्यास दु:ख होते असा नाही. मुलगा वंश चालवणारा म्हणून त्याच्या जन्माचा आनंदही तितकाच असतो. प्रत्येक माता-पिता मुलगा व्हावा अशीही अपेक्षा करतात. जुळी मुले झाल्यास 'आईला भाग्यशाली आणि पित्याला साहसी मानले जाते' (*चौरे, १९८७: ४५*). व्यंग असलेले मुल बघितल्यावर मांडीवर घेऊन त्याला पैसे देतात.

बाळजन्माच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी बाळाचे नाव ठेवतात. नाव ठेवताना पूर्वज, जन्माचा वार, किंवा त्यादिवशी घडलेली नैसर्गिक घटना लक्षात घेतात.

गृहदेवतेजवळ बसून भुमका खालीलप्रमाणे निवड करून बाळाचे नाव ठेवतो. ज्या पूर्वजाचे बाळाशी साम्य वाटत असेल त्याचेच नाव बाळाला ढिले जाते किंवा जन्माचा वार सोमवार असेल तर मुलाचे नाव सोमा आणि मुलीचे नाव समोती असे ठेवले जाते. जन्मवेळी 'आंधी' आल्यास मुलीचे नाव अंधुडी आणि मुलाचे अंधुडा होते. हिंदू समाजातही पूर्वजांचे नाव नवजात वंशजाला ठेवण्याची प्रथा प्रचलित होती.

'बाळंतपणात बाळाचा मृत्यू झाल्यास देवता रूष्ट झाल्या आहेत असे मानले जाते. बाळंतिणीचा मृत्यू झाल्यास ती 'चुडैल' होईल या भीतीने अंतिम संस्कार करताना तिच्या साडीच्या पदराचा तुकडा फाडून परिहार, भुमका किंवा रजालिया आपल्या जवळ ठेवतो. या तुकड्याचा उपयोग तांत्रिक क्रियेसाठी करतात (*चौरे १९८७:४५*).

बालकाच्या पाचव्या किंवा सहाव्या दिवशी संध्याकाळी 'छटी' पूजा करतात. गावातील सर्व स्त्रिया या पूजेत सहभागी होतात. बाळावर संकट येऊ नये म्हणून बाळाला ढुपट्यावर झोपवून त्याच्याभोवती अक्षता टाकत पाच प्रदक्षिणा घालतात. घराच्या चारही कोपऱ्यात अक्षता फेकतात. हा विधी केल्याने बाळ संकटमुक्त होईल कारण याप्रसंगी छटी देवी उपस्थित राहून बाळाचे भाग्य लिहित असते, असा कोरकूंना विश्वास वाटतो (*फोटो क्र. ११/१२*).

सर्वसाधारणपणे कोरकू स्त्रिया महिन्याभराने घरात आणि शेतात कामाला लागतात. कोरकूंच्या आर्थिक हलाखीमुळे स्त्रियांना शेतात काम करणे आवश्यक असते. आईला जेव्हा वेळ मिळेल तेव्हा ती बाळाला दूध पाजते. त्या घरातील वयोवृद्ध माणसांजवळ अथवा घरात असणाऱ्या मोठ्या मुलाजवळ बाळाला सोडून कामाला जाते. बाळ आजारी पडल्यास आजारपण हे पूर्वजांची किंवा देवतेची अवकृपा झाली आहे असे मानून नजर उतरवणे अथवा परिहाराला बोलवून 'झाडफूंक' करणे अशा तऱ्हेचे पारंपरिक उपचार करतात. शासनाने छोट्या छोट्या खेड्यात 'प्राथमिक आरोग्य केंद्र' सुरू केली आहेत. या केंद्रात औषधांचा पुरवठा सुरळीतपणे होत नाही.

आजाऱ्याला बाहेरून औषधे आणा असे सांगतात. त्यामुळे खर्च करावा लागेल या भीतीने कोरकू आरोग्य केंद्रात न जाता पारंपरिक उपचारांना अधिक महत्व देताना दिसतात.

मुले पाच वर्षाची होईपर्यंत कोरकू मुलगा-मुलगी असा फरक करत नाहीत. मुलाची विशेष निगा घेतली जाते असे दिसत नाही. अंगावर एखादा कपडा घालून देणे, चार-पाच दिवसांनी आंघोळ घालणे, दोन वेळा इतरांबरोबर जेवण देणे. एवढ्या गोष्टी मुलांचे पालन करण्यासाठी पुरेशा होतात. मुलगा पाच वर्षाचा झाल्यावर तो मोठ्या भावाबरोबर गुरांना चरण्यासाठी जंगलात घेऊन जातो. गुरांना जंगलात घेऊन गेलेली मुले खाण्यासाठी जंगली कंदमुळे, आवळे, करवंदे, बोरे यासारख्या गोष्टी गोळा करतात. परतताना जंगलात उपलब्ध झालेली फळे, जळणासाठी सुकलेल्या झाडाच्या फाद्या, गोवऱ्या घेऊन येतात. मोठ्या भावाबरोबर लहान भाऊही ओझे उचलतो. तसेच आईवडीलांबरोबर बाजारातून खरेदी केलेल्या वस्तूही उचलून आणतो. 'कोरकू मुलांना लहानपणापासून कष्ट करण्याची सवय असते कोरकू मुले लहानपणापासून मासे पकडणे, गुलेलीने पक्षी मारणे, जंगलातून जळणासाठी लाकडे, फळे, कंदमुळे गोळा करून आणण्यात तरबेज असतात' (*पाटिल १९९३:५६*). मुली आईला घरकामात, नदीचे किंवा विहिरीचे पाणी आणण्यात मदत करता करता घरकाम शिकतात (*पाटिल १९९३:५६*).

चोरी करू नये, खोटे बोलू नये, वडीलधाऱ्यांना मान द्यावा असे वर्तणुकीचे वेगळे शिक्षण न देता, अशी आगळीक घडल्यास कडक शिक्षा करतात. वेळप्रसंगी मारतात सुद्धा. प्रत्यक्ष मिळालेले हे ज्ञान कोरकू मुलांच्या मनात रूजते, त्यामुळे पारंपरिक व्यवसाय करण्याची इच्छा होते. समाजाची नियमितता टिकून राहाते असे कोरकू मानत असल्याचे दिसते (*पाटिल १९९३:५६*).

उत्सवप्रसंगी कोरकू समाजात घरातील सर्व सदस्यांनी मद्यपान करणे आवश्यक आहे, असे मानले जाते. घरातील वडीलधारे लहान मुलांना प्रसाद म्हणून दारू

पाजतात. लहान वयातच कोरकू मुले जंगलात एकमेकांच्या मदतीने दारू तयार करायला शिकतात. कोरकू स्त्रिया बऱ्याचदा मुलांनी तयार केलेली दारू पितात. दारू पिण्याची मुलांनाही सवय जडते. याच वयात मुले धूम्रपानही करू लागतात. हळूहळू त्याचे रूपांतर व्यसनात होते. कोरकू समाजात मुलींना धूम्रपान करण्याची बंदी आहे. विवाहित स्त्रियांसाठी मात्र ही बंदी नाही (*पाटिल १९९३:५६*).

जंगलात गुरांची राखण करण्यास गेलेली मुले संध्याकाळपर्यंत जंगलात बरोबरच्या मुलांच्या आणि मोठ्या भावाच्या सहवासात वाढतात. त्यामुळे गावातील संघर्ष, पारिवारिक कलह, गावात घडलेल्या घटना इत्यादींवर केलेली चर्चा मोकळेपणाने ऐकतात. या चर्चेतून सामाजिक संबंध, आपुलकी, इत्यादी भावना जागृत होतात. एक प्रकारे किशोरवयातच कोरकू मुले प्रौढांप्रमाणेच समाजाचे सदस्य झालेली असतात.

मासिक पाळीचे पाच दिवस मुलीला घराबाहेर पडवीत झोपावे लागते. वडील किंवा मोठ्या भावाशी स्पर्शच नाही तर बोलणेही निषिध्द मानले जाते. फक्त आई मुलीच्या संपर्कात असते. स्वयंपाक करणे, स्वयंपाकघरात जाणे वर्ज्य मानतात. पोथडिया कोरकूंमध्ये मात्र ही बंधने विवाहितेसाठी शिथिल आहेत. पाळी सुरू झाल्यानंतर स्नान करून ती घरात वावरण्यास मोकळी होते.

मुलांच्या आवाजात झालेल्या बदलावरून तो तरूण झाल्याचे मानतात. तो वडिलांबरोबर कुटुंबाची जबाबदारी पेलण्यास सक्षम होतो. कुटुंबासाठी अर्थार्जन करणे हे त्याचे कर्तव्य मानले जाते. तो वडिलांबरोबर सकाळीच कामाला बाहेर पडतो. दिवसभर काम करून संध्याकाळी घरी परततो. त्याचे हे वय विवाहायोग्य झाल्याचे मानले जाते. तारूण्याची चाहूल लागताच आई-वडील मुलांसाठी जोडीदार शोधू लागतात. योग्य निवड झाल्यावर वराचा सिथोरा[७] आणि भुमका वधुच्या गावात जाऊन वधुपक्षला भेटतात. त्यांच्या होकारानंतर विवाह ठरतो.

७ विवाह निश्चित करताना दोन्ही गावातील भुमके व प्रौढ मंडळी किंवा पंच मध्यस्थाची भूमिका करतात. त्यांना सिथोरा म्हणतात.

कोरकूंची विवाह संस्था

'विवाह ही प्रत्येक मानवी समाजातील अशी एक जटिल घटना असते की ज्याद्वारा फ क्त समागमाचे जैविक कार्यच संपन्न होत नाही तर समाजशास्त्रीय कार्ये जशी मुलांचे संगोपन, गृहकार्ये आणि सांस्कृतिक परंपरेने परिभाषित केलेली कौटुंबिक कार्ये पार पाडली जातात' (*खडसे १९९९:७४*).

पारंपरिक समाजात विवाह संस्था ही कुटुंबसंस्थेला आधारभूत मानली जाते. अनेक कुटुंब मिळून समाज होतो म्हणजेच विवाह हा समाजाचाही आधार आहे. समाजाचे स्वास्थ्य आणि सातत्य टिकून राहावे या दृष्टीने विवाहसंस्थेचे नियम घालून दिलेले आहेत. कोरकू त्याचे काटेकोर पालन करतात.

कोरकू समाज रक्ताच्या नात्यामध्ये विवाह करत नाहीत. गावात शक्यतो सोयरिक करत नाहीत. बालवयात केलेला विवाह अनुचित समजतात. विवाहासाठी पंधरा ते पंचवीस हे वय योग्य मानतात कारण त्या वयातील मुलांमध्ये होणारे बदल तारूण्य आल्याचे सूचक आहेत असे मानले जाते. मुलाचा आवाज बदलणे किंवा मुलींना रजोदर्शन होते हे तारूण्याचे संकेत दिसल्यानंतरच कोरकू आपल्या मुलांसाठी जोडीदाराचे संशोधन सुरू करतात.

कोरकू समाजात वधुमूल्य घेण्याची प्रथा प्रचलित आहे. वरपक्षाचा एक नातेवाईक विवाह जमवण्याची जबाबदारी घेतो. त्याला सिथोरा अशी संज्ञा आहे. वधु-वरांची सामाजिक, आर्थिक स्थिती सारखी असावी यावर शक्यतो कटाक्ष असतो. ते लक्षात घेऊन सिथोरा वराची माहिती जमवतो. योग्य वाटल्यास वधुपक्षाचा प्रतिनिधी सिथोऱ्यापुढे आपली बाजू मांडतो. नंतर घरातील प्रौढ मंडळी भुमक्यासह वधूपित्याकडे जाऊन वधुला रीतसर मागणी घालतात. वधुपिता मागेल ते ढेज (*गोनम*) मान्य झाल्यावर विवाह निश्चित होतो. वधुमूल्य नगदी अथवा पशुंच्या रूपात देतात. साहजिकच विवाहप्रसंगात वधुपक्षाची बाजू वरचढ ठरते. अशा प्रचलित विवाह पद्धतीला 'गोनम विवाह' असे संबोधले आहे. या पद्धतीचा वधुमूल्य

हा आवश्यक घटक आहे.

घोटुलसारखी तरूणांना मार्गदर्शन करणारी कुठलीही संस्था कोरकू समाजात अस्तित्वात नाही. परंतु फगनाई किंवा सजनाई सिरिंजमध्ये यौन संबंधाचे संकेत आढळतात. गढोली नृत्य करताना ही सिरिंज गाण्याची प्रथा आहे. विवाह प्रसंगी रात्री विवाहित किंवा अविवाहित युवक-युवती एकत्र गढोली नृत्य करताना ही सिरिंज गातात. सुनिल ढहिकर या आमच्या कोरकू सहाय्यकाने ही माहीती दिली.

कोरकूंच्या हलाखीच्या स्थितीत गोनम देऊ न शकणाऱ्या वरपक्षासाठी काही पर्याय उपलब्ध आहेत. त्यातील एक पर्याय आहे - **लमझाना विवाह**. ही प्रथा काहीशी घरजावई प्रथेशी मिळती-जुळती आहे. या विवाहासाठी फक्त गरिबी हेच एकमेव कारण नाही. वधूपिता श्रीमंत असेल किंवा निपुत्रिक असेल तर वधूमूल्य न घेता योग्य वर शोधून त्याच्याशी आपल्या कन्येचा लमझाना विवाह करून देतो. या प्रथेनुसार वराला निश्चित काळपर्यंत वधूच्या घरी राहून नि:शुल्क सेवा करावी लागते. वर्षभरात संतती न झाल्यास वर आपल्या घरी परत जातो. दुसरा वर शोधून मुलीचा दुसरा लमझाना विवाह केला जातो. अंदाजे वीस वर्षांपूर्वी चांदपुरच्या खानजी तोटे यांचा लमझाना विवाह झाला होता. मुदतीनंतर नियमांनुसार त्यांना पटेल पद मिळाले. विवाह आणि सिडोलीच्या वेळी ते मूळगावी जातात.

घरघुशी विवाह ही प्रथा एकतर्फी प्रेम करणाऱ्या स्त्री-पुरूष दोघांसाठी अस्तित्वात आहे. एकतर्फी प्रेम करणारी व्यक्ती ज्याच्यावर प्रेम आहे त्याच्या घरात घुसते. घरातील सर्व सदस्य या व्यक्तीशी दुर्व्यवहार करतात. घरघुशी व्यक्ती वर्षभर त्याच घरात अत्याचार सोसत राहिली तर तिचे प्रेम खरे मानून घरात घुसलेल्याशी वधूमूल्याशिवाय विवाह केला जातो. घरघुशी स्त्री असेल तर वरपक्ष पंचायत बोलावतो. पंचायत देज माफ करून वधूपित्याला गूळ वाटण्याचा दंड आकारते. घरघुशी पुरूष असेल तर देज द्यावा लागतो. न दिल्यास वधूपित्याकडे लमझाना म्हणून राहावे लागते. नुकताच आंबापाटी या गावात घरघुशी विवाह गोनम पद्धतीने

झाला आहे. वधू अविवाहित असल्यामुळे वधूमूल्य देऊन गोनम विवाह झाला. विवाहित शेतात गेले असल्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही.

आटो-साटो विवाह. दोन परिवारात विवाह योग्य वधू-वर असतील तर मुलगी देऊन सून आणली जाते. या विवाह पद्धतीत कुणालाच देज द्यावा लागत नाही. साटेलोटे प्रकाराप्रमाणेच ही पध्दती आहे.

कोरकू समाजात विधवा आणि विधुराच्या विवाहाला मान्यता आहे. विधवेला पुनर्विवाह करताना प्रथम धाकट्या दिराला प्राधान्य द्यावे लागते. दीर विवाहयोग्य नसेल तर दुसऱ्या विधुराशी विवाह करता येतो. अन्य अविवाहित युवकाशीही विवाह करण्याला मान्यता आहे, त्याच प्रकारे विधुराला प्रथम विधवा झालेली मोठी वहिनी, दुसरी कुठलीही विधवा, अथवा कुमारिकेशी विवाहाला मान्यता आहे. एखादी मुलगी विवाहापूर्वी गर्भवती झाल्यास त्या मुलीचे वडील पंचायत बोलावतात. पंच तिला ज्याच्यापासून गर्भ राहिला त्याचे नाव विचारतात. जर त्या व्यक्तीने गर्भाचे पितृत्व मान्य केले तर वरपक्ष वधूपक्षाला देज देतो आणि गोनम विवाह होतो.

कोरकू समाजात घटस्फोटाला मान्यता आहे. घटस्फोटासाठी दोन कारणे महत्वाची मानली जातात स्त्री वंध्या (*बन्हया*) किंवा चारित्र्यहीन असेल तर पंचायत घटस्फोटाला मान्यता देते. घेतलेले वधूमूल्य परत करावे लागते म्हणून बरेचदा कोरकू पुरूष मूल न झालेल्या पत्नीचा त्याग न करता दुसरा विवाह करतो. दोन्ही स्त्रिया नवऱ्याच्या घरात राहतात. परित्यक्ता स्त्रीशी विवाह केल्यास देजची अर्धी रक्कम तिच्या पहिल्या नवऱ्याला परत करावी लागते (*पाटिल १९९३:१०३*).

कोरकूंची कुटुंब संस्था

दुबे यांनी कुटुंबाची व्याख्या,'सामाजिक मान्यता असलेले लैंगिक संबंध आणि प्रजोत्पादन, एकच निवासस्थान, कौटुंबिक सेवा आणि आर्थिक सहकार यांनी युक्त असलेली एक सार्वत्रिक, कायमची आणि व्यापक संस्था म्हणजे कुटुंब' (*देशपांडे*-

केजकर २००४:६०) अशी केली आहे.

भारतीय कुटुंबाचे स्वरूप, वंशपरंपरा, राहाण्याचे ठिकाण, सभासदत्व आणि आप्तांची संख्या या घटकांवर आधारित आहे. बहुतांश भारतीय समाजात 'वंशपरंपरा ही पितृवंशाची परंपरा आणि एकत्र कुटुंब पद्धती प्रचलित आहे'. एकत्र कुटुंबात माता-पिता तसेच इतर नातेवाईकही राहतात.

कोरकू कुटुंबपद्धतीत मुलीचा विवाह लमझाना पध्दतीचा असेल तर तिचा पती मुदत संपेपर्यंत एकत्र कुटुंबात राहातो. जर विवाह गोनम असेल तर ती सासरी जाते. विवाहित मुलगा, विवाहानंतर धाकट्या भावाच्या विवाहापर्यंतच एकत्र राहातो. आणि नंतर तो स्वतंत्र बिऱ्हाड करतो. स्वतंत्र बिऱ्हाड झाले तरीही चल-अचल संपत्तीची वाटणी होत नाही. बिऱ्हाडे वेगळी झाल्यानंतर सामायिक कृषी उत्पादनाची वाटणी कुटुंबातील सदस्य संख्येनुसार होते. परंतु कर्ज-फेडीत मात्र स्वतंत्र बिऱ्हाड करून राहणाऱ्या कुटुंबियाला बरोबरीने सहभागी व्हावे लागते. ही परंपरा कोरकू मनापासून पाळतात. वडिलांच्या मृत्यूनंतरच संपत्तीची वाटणी होते. आकाराच्या अनुषंगाने विचार केल्यास कोरकू कुटुंबाला सीमित संयुक्त परिवार अशी संज्ञा देणे उचित ठरेल. या कुटुंबाचा विस्तार, अविवाहित मुलगे व मुली आणि विवाहित मुलगा, सून आणि त्यांची मुले, मुलीचा विवाह लमझाना असेल तर ती व तिचा पती अशा स्वरूपाचा असतो. सावत्र मातेला मूलबाळ नसल्यास वडिलांच्या मृत्यूनंतर घरात राहाणारा लहान मुलगा तिचा सांभाळ करतो. वडिलांच्या मृत्यूनंतर प्रत्येक मुलाचे कुटुंब स्वतंत्र कुटुंब म्हणून ओळखले जाते. पिता पंचायतीचा सदस्य असल्यास त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा त्याची जागा स्वीकारतो.

कोरकूंची वस्ती डोंगर पठारावर लहान-लहान खेड्यांमधून विखुरलेली आहे. प्रत्येक कोरकू गावात पारंपरिक ग्रामपंचायत (*जातो पंचायत*) आहे. स्वत:ची परंपरागत पंचायत असतानाही कोरकूंनी ग्रामपंचायतीचा स्वीकार कर्तव्य मानून केला आहे. लोकसंख्येनुसार तीन-चार गावांसाठी एकच औपचारिक पंचायत असते.

१) **ग्रामपंचायत** – शासकीय आदेशानुसार निवडणूक होउन निवडलेले सभासद पंचायतीचे काम करतात. या पंचायतीचे कार्य शासकीय नियमानुसार केले जाते.

२) पारंपरिक पंचायत – कोरकूंच्या प्रत्येक गावात कितीही लहान गाव असले तरीही 'जातो पंचायत' आहेच. 'जातो पंचायत' ही सामाजिक संस्था कोरकू समाजाचे नियमन व नियोजन करते. 'शहरी समाज जनजातीय समाजाला मागासलेला मानत असले तरीही जनजातीय समाजांची राजकीय व्यवस्था जास्त नियोजित व सुव्यवस्थित असल्याचे स्पष्ट दिसते' (*पाटील १९९३:१७१*). डॉ. चौरे या मताशी सहमत आहेत. त्यांच्या मतानुसार, 'जनजातीय समाजाची पंचायत संस्थांच्या संघटन आणि कार्यपद्धतीत लोकतंत्राची आणि राज्यतंत्राची सामान्य वैशिष्टये आढळतात (*चौरे १९८७:९७*).

कोरकू जातो पंचायतीत गावातील सर्व जेष्ठ पुरूषांना पंचायतीचे सभासद म्हणून मान्यता आहे पण महिलांना मात्र सभासद होता येत नाही. ज्या महिलेचा सभेपुढे आलेल्या प्रकरणाशी संबंध असेल तिला ग्रामपंचायतीच्या कार्यवाहीत साक्षीदार म्हणून प्रवेश मिळतो. एन्हवी महिलांना प्रेक्षक म्हणूनही पंचायतीत प्रवेश करता येत नाही. पुरूष प्रेक्षक म्हणून हजर राहतात. चालू कार्यवाहीसंबंधी महत्वाची माहिती असल्यासच साक्ष देतात. कार्यवाही चालू असताना वादी, प्रतिवादी, साक्षीदार आणि पंच सोडून इतरांना हस्तक्षेप करता येत नाही. पंचायतीच्या नियमांनुसार कारवाई होते, निकाल दिला जातो आणि त्याचे काटेकोर पालन होते.

पंचायतीचा कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी सहा व्यक्तींवर असते.
१. प्रधान २. भुमका ३. परिहार ४. पटेल ५. दोन अन्य पंच ६. रजालिया किंवा चौधरी

प्रधान–हे पंचायतीचे प्रमुख पद आहे. हे पद वंशपरंपरेतून मिळते. पित्याच्या मृत्यूनंतर पुत्राला या पदाचा अधिकार मिळतो. पुत्र नसल्यास कुटुंबातील कोणत्याही

इतर व्यक्तीला हे पद मिळते. त्याच्यानंतर त्याच्याच वंशात ते चालू राहाते.

भुमका–हे पदसुद्धा वंश परंपरेतून मिळते.

परिहार–भुमका हजर नसेल तर त्याचे काम पहातो.

पटेल–याची निवड सर्वांच्या संमतीने होते. स्त्री–पुरूष संबंधांच्या बाबतीतले खटले चालवणे आणि त्याचा निकाल देणे ही संपूर्ण जबाबदारी पटेलाची आहे, असे मानले जाते. या विषयातील त्याचा निर्णय अंतिम मानला जातो.

दोन पंच–धार्मिक विधी प्रसंगी यांची निवड भुमका आणि पटेल यांच्या सहमतीने होते. प्रत्येक खटल्यात यांचे मत विचारात घेतले जाते.

रजालिया अथवा चौधरी–भुमका आणि परिहार यांच्या सहमतीने निवड होते. पंचायतीची बैठकीची वेळ, तारीख निश्चित झाल्यावर त्याची सूचना इतर पंच आणि वादी–प्रतिवादींपर्यंत पोहोचवणे, या सारख्या कामांची जबाबदारी रजालिया सांभाळतो.

प्रधान खटल्यातील वादी–प्रतिवादींचे मत ऐकून पंचांच्या सहाय्याने निकाल देतो. प्रधान, भुमका, इत्यादी पदे वंशपरंपरेतून येत असली तरीही शारीरिक असमर्थता निर्माण झाल्यास या पदांचा त्याग करता येतो.

पंचायतीकडे कुटुंब, भूमी, संपत्ति, लैंगिक स्वरूपाचा गुन्हा, जवळच्या नात्यातील लैंगिक संबंधांमुळे होत असलेल्या संघर्षांचे निवारण करण्याची जबाबदारी आहे. या संबंधात वाद निर्माण झाल्यास पंचायतीमध्ये तक्रार करता येते.

कोरकू समाज परंपरा मानणारा, नियमांचे काटेकोर पालन करणारा असल्याने

पंचायतीच्या कामात सर्व सभासद उपस्थित राहातात. पंचांचा निकाल स्वीकारतात. त्याचे पालन करतात.

कोरकूंच्या कुळी

आदिम समाजातील जडणघडणीचा एक भाग म्हणून रक्तसंबंधांवर आधारित, पितृवंशीय देवकांच्या आधारावर नातेगट तयार झाले. या नातेगटांना कुळी असे म्हटले जाते. कुळींची ओळख त्यांच्या देवकावरून *(Totem)* होते. आधुनिक कोरकू समाजात देवकांना मान्यता असल्याचे दिसत नाही. त्याऐवजी गोत्र व्यवस्था प्रस्थापित झालेली आहे. मुंडा समाजानेही हे परिवर्तन स्वीकारलेले आहे (*फ्युचेस १९८८:१७१*). एका कुळीत अनेक गोत्रे असू शकतात. भारतीय समाजात गोत्रांच्या जागी आडनाव लावण्याची प्रथा प्रचारात आली. कोरकू समाजातही आता गोत्रांच्या जागी आडनाव लावण्यास अधिक प्राधान्य दिले जाते (*फ्युचेस १९८८:१७१*).

कोरकू समाजात कुळींची संकल्पना अस्तित्वात आहे. 'कुळींची उत्पत्ती कल्पित पूर्वजापासून झाल्याचे मानले जाते. एका कुळीत अनेक कुटुंबांचा समावेश असतो. फ्युचेस यांच्या मतानुसार चिखलदरा येथील कोरकूंमध्ये १३ कुळी आहेत. चटोपाध्याय यांनी आणखी १० कुळी असल्याचे दाखवून दिले आहे. कालभित परिसरात १४ कुळी आहेत (*फ्युचेस १९८८:१७२, १७३*).

कोरकूंच्या कुळींची नावे सर्वसाधारणपणे वनस्पती किंवा पशूंवरून निवडलेली दिसतात. 'कोरकू सांगतात, युध्दात हरल्यानंतर ज्या नैसर्गिक घटकाचा आधार त्यांच्या पूर्वजांनी घेतला तेच त्यांच्या कुळीचे नाव ठरले' (*फ्युचेस १९८८:१७१*). हे युध्द कोणामध्ये झाले व का झाले याबद्दल मात्र काहीच माहिती उपलब्ध नाही (*फ्युचेस १९८८:१७१*).

चिखलदऱ्यातील कोरकू कुळी निर्माण झाल्याची कथा अशी सागंतात. 'एकदा भगवानने सर्व लोकांना भोजनासाठी आमंत्रित केले. भोजनासाठी गाय, डुक्कर,

बकरी, इत्यादींचे मांस, तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या तयार केल्या होत्या. ज्वारी, गहू आणि कुटकीच्या भाकरीही होत्या. भगवानने लोकांना सांगितले ज्याला जे आवडेल त्याने ते पोटभर खावे. कुणी गाईचे, कुणी डुकराचे, कुणी बकरीचे मांस खाल्ले. त्यापैकी कुटकी खाणारे कोरकू म्हणून ओळखले गेले (*फ्युचेस १९८८:१७८*) .

कोरकूंच्या गोत्रांची नावे

१)	बेथे किंवा चासा	बिब्याचे झाड
२)	मावसी किंवा डा	छाणी
३)	जांबू	जांभळाची पाने
४)	अखंडी किंवा खंडी	भाताच्या साळी
५)	कसडा किंवा कसा	माती, जमीन
६)	धिकार	धावडा वृक्ष
७)	चुथर	हिरवे झाड
८)	झारा	हिरवे गवत
९)	दरसिमा	भादली, कुटकीचे रोप
१०)	साकोम	पान
११)	टोटा	ज्वारी किंवा मक्याची ढांडी
१२)	कोल्या	कोळसा
१३)	सिलू	बोराची झाडी
१४)	बूसुम	झाडी
१५)	ताती	दूर्वा
१६)	चिलाटी	नदीतीरावरचे हिरवे झाड
१७)	मुरियाना	पठारावर असलेले हिरवे झाड
१८)	ढीकार	वाळलेले झाड
१९)	टाण्डिल	उंदीर
२०)	ढिकार	मासा
२१)	टाखेर	काकडीचा वेल
२२)	अटकूल	गुहा
२३)	ढेवडा	भाताचे शेत
२४)	बाळू	जंगल, प्राणी
२५)	मर्सकोला	पाण्याने भरलेले शेत

कोरकू समाजात एकाच कुळीतील दोन व्यक्तींमध्ये शरीरसंबंध होत नाही. एकाच कुळीतील दोन व्यक्तींमध्ये शरीरसंबंध झाल्यास त्या व्यक्तींना अपराधी मानून त्यांना पंचाच्या पुढे हजर व्हावे लागते. त्यावर दंड किंवा बहिष्कार घातला जातो. प्रायश्चित घेऊन मगच जातीत घेतले जाते. असा अपराध करणाऱ्यांना भगवानही शिक्षा करतो. ते जखमी होऊन त्यांच्या जखमेत किडे पडतात असे कोरकू मानताना दिसतात (*फ्युचेस १९८८:१७६*).

स्थानिकता आणि सामाजिक किंवा धार्मिकतेच्या अनुषंगाने कोरकू समाजाचे पाच उपविभाग झाले असे मानले जाते. १–देशी कोरकू २–पोथरिया कोरकू ३–राज कोरकू ४–भवरिया कोरकू आणि ५–मोवासी कोरकू.

'जे कोरकू बिगर आदिवासी आणि शहरी समाजाच्या जास्त संपर्कात आले त्यांना स्वत:ला कोरकू म्हणवून घेणे आवडत नाही. त्यांनी आपली आडनावे बदलली आहेत. त्यांमध्ये भोपची, मोवासी, बोंडिया हे प्रमुख आहेत'. चांदपुरमध्ये रामजी सावरकर भेटले त्यांनी सांगितले, 'माझे मूळ आडनाव सावलकर आहे परंतु मला सावरकर आडनाव आवडले म्हणून मी सावरकर लावतो'. हे मात्र स्पष्ट दिसते की जे कोरकू अशा तऱ्हने बदलले आहेत त्यांना वरच्या दर्जाचे मानले जाते म्हणूनच आजच्या कोरकू समाजात दोनच वर्ग असल्याचे दिसते. पहिला देशी कोरकू आणि दुसरा पोथरिया कोरकू' (*फ्युचेस १९८८:२४–२५*).

१ – देशी कोरकू : जे कोरकू हिंदूंच्या संपर्कात आले किंवा हिंदूंप्रमाणे आचार धर्माचे पालन करतात त्यांना देशी कोरकू असे संबोधले जाते.

२ – पोथरिया कोरकू: कोरकूंच्या मूळ परंपरांचे पालन करणारे. हे कोरकू जास्त दुर्गम प्रदेशात राहातात. त्यांना पोथरिया म्हणतात.

३ – राज कोरकू: जे कोरकू रजपुतांच्या जास्त संपर्कात आले, त्यांचे रजपुतांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित झाले आहेत. ते स्वत:ला इतरांपेक्षा उच्च दर्जाचे

मानतात. त्यांना राजकोरकू म्हणतात.

४- भवरिया कोरकू: भगवानगड येथे राहणाऱ्या कोरकूंना भवरिया किंवा भोपा म्हणतात. काही भोपा कोरकू वर्धा जिल्ह्यातही राहातात.

५- मोवासी कोरकू: कालभित आणि मेळघाटात रहाणाऱ्या कोरकूंना मोवासी कोरकू म्हणतात.

कोरकूंची ग्राम रचना

कोरकू गावात प्रवेश करतानाच मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूस सरळ एका ओळीत असलेली घरे लक्ष वेधून घेतात. पूर्व-पश्चिम दिशेने असलेल्या एकाच उंचीच्या घरांच्या ओळी हे कोरकू ग्राम रचनेचे वैशिष्ट्य सांगता येईल. एकमेकांना खेटून समोरा-समोर दरवाजे असलेली वीस ते पंचवीस घरांची एक ओळ समोर तशीच दुसरी ओळ या दोन ओळीत पंचवीस ते तिस फुटांचा रूंद रस्ता ठेवतात. या रस्त्यावरून बैलगाडीला सहज ये-जा करता येते. याच पद्धतीच्या घरांच्या रांगा प्रत्येक कोरकू गावात दिसतात (*फोटो क्र. ४१,४२, ४३,४४,४५)*.


ग्रामरचनेचा आरंभ मुठवागोमाजच्या स्थापनेने होतो. मुठवा ग्रामरक्षक देवता असल्याचे मानले जाते. मुठवागोमाज जवळ भुमक्याचे घर असते. देवता आणि देवतांची स्थाने निश्चित केलेली आहेत (*परिशिष्ट चार पहा*). अशा पद्धतीची रचना हे कोरकू गावाचे वैशिष्ट्य आहे.

ज्या गावात फक्त कोरकूंचीच वस्ती असते त्या गावाला ढाणा म्हणतात. एखाद्या गावात कोरकू अल्पसंख्य असले तरीही ते वेगळी वस्ती करून परंपरिक ग्रामरचना कायम ठेवतात. चिचखेडा गावात कोरकू अल्पसंख्य आहेत. त्यांची वसाहत गावापासून अलग थोड्या अंतरावर कोरकूंच्या पारंपारिक रचनेसारखीच एका ओळीत एकाच उंचीची घरे बांधलेली आहेत. दूरूनही ही वस्ती कोरकूंची असल्याचे ध्यानाात येते (*फोटो क्र. ४६*). एकाच उंचीची सरळ ओळीत चौकोनी आकाराची घरे बांधतात. जंगलातील लाकडांचा उपयोग करून ही झोपडीवजा घरे बांधलेली

असतात. घराला एकच खोली मागे-पुढे पडवी अशी घरांची रचना असते.

घर बांधताना घराच्या मध्यावर आधार खांब रोवतात. याला धारणा किंवा उरोगोमाज म्हणतात (*फोटो क्र. ४७*). घराचा नकाशा पुढे देत आहे.

<u>घराचा नकाशा (नकाशा क्र. ६)</u>



मण-दिडमण धान्य मावेल इतक्या मोठ्या साठवणीसाठी मातीच्या, घट्ट झाकण असलेल्या कोठ्या धारणा खांबा जवळ ठेवलेल्या असतात. या कोठ्या चौकोनी किंवा गोल आकाराच्या करतात. त्या स्त्रियांनी तयार केलल्या असतात. चौकोनी कोठी भातासाठी तर गोल डाळीसाठी वापरतात. तिला डुबोले म्हणतात. धारणा आणि तिथे ठेवलेल्या कोठ्यांमुळे घराचे दोन भाग होतात (*फोटो क्र. ४८*).

सर्वसाधारणपणे पुरूषांचा वावर बाहेरच्या खोलीत जास्त होतो. तर स्त्रियांचा वावर आतल्या खोलीत होतो. या आतील खोलीचा वापर स्वयंपाकासाठी आणि भांडी-कुंडी ठेवण्यासाठी करतात. भांड्यांच्या प्रकारातून घराची आर्थिक स्थिती लक्षात येते. थोडी फार पितळेची व क्वचितच स्टीलची भांडी दिसतात. ॲल्युमिनियमच्या भांड्यांचा भरणा अधिक दिसतो. मातीची भांडी पाणी साठवण्याकरता वापरतात. याच खोलीत दोरीवर कपडे टांगलेले असतात (*फोटो क्र. ४९.१, क्र. ४९.२*).

पुढच्या पडवीचा वापर बाहेरून आलेल्या व्यक्तींची उठबस करण्याकरता होतो (*फोटो क्र. ५०*). त्याच पडवीत शेतीची अवजारे, जाते, उखळ, घड्या केलेली अंथरूणे-पांघरूणे ठेवलेली असतात (*फोटो क्र. ५१*). मागील पडवीत पाण्याच्या साठवणीचे माठ झाकून ठेवतात.

मागील पडवी नंतर परसू असते. त्याचा वापर परसबागेसाठी करतात (*फोटो क्र. ५२*). ज्यात वांगी, कांदे, मिरची, व पालेभाज्या लावतात. सर्वसाधारणपणे परसबागेत लिंबाचे व पेरूचे झाड असतेच. लिंबू पूजेत आवश्यक मानत असल्यामुळे उपयोगी पडते. पेरू गावा-गावात जाऊन विकतात त्यातून नगदी पैसे मिळतात. तंबाखू खाणारे कोरकू तंबाखू लावतात. उन्हाळ्यात परसबागेतील उत्पादनांचा उपयोग होतो. यात खतासाठी घरातील केर-कचरा, गुरांचे शेण टाकतात. परसबागेनंतर गुरांसाठी गोठा असतो.

ईशान्य दिशेने गावात प्रवेश केल्यास वाटेत उजव्या बाजूला स्मशान लागते. दफन

करण्याची रूढी प्रचलित आहे. दफन दगडांनी पूर्णपणे झाकतात (*फोटो क्र. ५३, ५४*). विष पिऊन आत्महत्या केली असेल तर दहन करतात कारण पोलिस येऊन दफन उकरतात. वृद्ध, तरूण किंवा अपघाताने मृत्यू झाल्यास अंत्यविधीमध्ये काही फरक नाही. अंत्यविधी करताना मृताला उदबत्तीने ओवाळतात. बाळंतीण मेल्यास वेशी बाहेर पुरतात.

स्मशानाच्या उत्तरेला खेडा गोमाज, हरदुलीमाता आणि मंडो[८] प्रस्थापित केलेला असतो. सहसा भुमक्याची सिडोली मूळ गावात करतात, क्वचितच सध्या राहात असलेल्या गावात होते. तीन ते चार फूट उंच, छप्पर असलेल्या चौथऱ्यावर भुमक्याची स्मृतिशिला स्थापित करतात. दर मंगळवारी तिथे दिवा लावतात (*फोटो क्र. ५५*).


गावाच्या पश्चिम सीमेवर बजरंगबली आणि सातमातांचे स्थान असते. देवळात बजरंगबलीची दगडावर कोरलेली मूर्ती व मूर्तीचे तोंड स्मशानाकडे असणे ही रूढी प्रचलित आहे[९]. बहुतांश कोरकू गावातील बजरंगबलीचे देऊळ आधुनिक पद्धतीने बांधलेले दिसते. तेथून जवळच बिजासरी व सातमाता प्रस्थापित केलेल्या असतात. सातमाता लहान-लहान पाषाण स्वरूपात असतात. जवळच एका खांबावर मातीच्या भांड्यात पाणी टांगून ठेवण्याची प्रथा आहे. या पाण्यात रोग निवारण करणारी शक्ती असल्याचे मानले जाते. चौकात लिंबाच्या झाडाखाली मुठवागोमाजचे स्थान निश्चित केलेले आहे. मुठवागोमाज कोरकूंची प्रमुख देवता आहे. कोरकू भाषेत देवतेला गोमाज म्हणतात. झोपडीच्या मध्यभागी झोपडीला आधार देणाऱ्या खांबाला धारणा किंवा उरागोमाज म्हणतात. त्याचा मान घरातील वडीलधाऱ्यांपेक्षा जास्त असतो. गावसीमेवरची नैसर्गिक भूमी सुरक्षित ठेवतात. या भूमीला देवराई म्हणतात (*फोटो क्र. ५६*). रक्षक देवता गावसीमेवर स्थापित करण्याची प्रथा अद्याप अस्तित्वात आहे. अशी परंपरेतून आलेली विशेष ग्रामरचना कोरकू जपत असलेले पुढील नऊ गावांच्या नकाशांवरून स्पष्ट होईल.

---


८ मंडो भुमक्याची सिडोली

९ गावातील लोकांचे भूत-प्रेतांपासून संरक्षण बजरंगबलीने करावे या हेतूने बजरंगबलीचे तोंड स्मशानाकडे करण्याची प्रथा आहे. असे कोरकू जाणकारांनी सांगितले


नकाशा क्र. ७ – बोराटाखेडा




नकाशा क्र. ८ – जाम्बुखेडा




नकाशा क्र. ९ – चुनखडी




नकाशा क्र. १० – कसई


कसई
उत्तर
प्रा.शाळा
मंदिर
स्मशान (मरहाट)
आमचा रस्ता
पक्का रस्ता
कच्चा रस्ता
पाऊल वाट
पाणी प्रवाह
झोपडी
कुंपण
विद्युत खांब
शाळा
कडेआंबा विहीर
पाझर तलाव
घर
झाडाचे घर
मुतारी
पाणी टाकी
झाड
पक्के घर/बांधकाम


नकाशा क्र. ११ – खडीमल




नकाशा क्र. १२ – कुकरू


कुकरू
उत्तर
स्मशान
खामगाव कडे
जांभूळढोक कडे
प्रा. शाळा
विश्रामगृह
बोकिंगा कडे
मोबाईल टॉवर
पवनचक्की
परतवाडा कडे
(महामार्ग)
सूची
पक्का रस्ता
कच्चा रस्ता
पाऊल वाट
पाणी प्रवाह
हातपंप
ट्युबवेल
शौचालय विरहित
शौचालय
कडुनिंबाची विहीर
पाझर तलाव
घर
झोपडीवजा घर
मुतवा
पाणी टाकी
झाड
पक्के घर


नकाशा क्र. १३ – चिचखेडा



नकाशा क्र. १४ – खामला–मेघनादढाणा



नकाशा क्र. १५ बिच्चूखेडा



गावांची नावे

१	बोराटाखेडा
२	जाम्बुखेडा
३	चुनखडी
४	कसई
५	खडीमल
६	कुकरू
७	चिचखेडा
८	खामला–मेघनाढढाणा
९	बिच्चूखेडा

प्रत्येक कोरकू गावात एक भुमका असतो. त्याची नियुक्ती वंशपरंपरागत असते. सर्व पूजाविधी भुमकाच करतो. आपत्तीच्या प्रसंगी परिहाराला आमंत्रण देतात. प्रत्येक गावात परिहार असतोच असे नाही. दोनचार गावांसाठी मिळून एकच परिहार असल्याचे दिसते. कोरकू जादूटोण्यावर, तोडग्यांवर विश्वास ठेवतात. कोरकू भाषेत त्यांना 'उटानाटा' म्हणतात. कोरकू यातुविधींवर श्रद्धा ठेवतात. फोटोला किंवा प्रतिमेला इजा करणे, यासारखे मंत्रतंत्रवादी विधी करतांना दिसतात.

नैसर्गिक घटना आधिभौतिक शक्तीच्या कृपेने घडतात. अशी कोरकूंची श्रद्धा असल्याचे दिसते. उत्सव व धार्मिक विधी योग्य प्रकारे आणि योग्य वेळी न केल्यास ऋतुचक्राचा नियमितपणा ढासळेल असेही त्यांना वाटते. आत्मा अमर आहे, तो सर्वत्र फिरू शकतो असे कोरकू मानतात. व्यक्तीमध्ये एकापेक्षा अधिक आत्मे आहेत अशी त्यांची श्रद्धा असल्यामुळे कोरकू प्रत्येक मृत व्यक्तीची अंत्यक्रिया दोनदा करतात. त्यातील एक आत्मा शारीरिक हालचालींवरच नाही तर श्वासांवरही नियंत्रण ठेवतो. त्यालाच जीव असे म्हणतात. त्याच्याशी परिहाराच्या माध्यमातून संपर्क साधता येतो. आत्मा सुरक्षित राहावा म्हणून त्याचे स्मारक बनवतात. विधिपूर्वक मृतात्म्याचे स्मारक केल्यास मृतात्मा पूर्वजांच्यात विलीन होतो अशी कोरकूंना खात्री वाटते (*फ्युचेस १९८८:२८६*).

कोरकू सुफलन आणि समृद्धीसाठी विविध दैवतांना आवाहन करतात. रोग निवारण व्हावे म्हणून मातामायला साकडे घालतात. प्रत्येक व्याधीची स्वतंत्र देवता असल्याची संकल्पनाही कोरकू समाजात प्रचारात आहे. दैवतांइतकाच मान पूर्वजांनाही देतात. संकट निवारण व्हावे म्हणून यातुविधीही करतात.

देवता किंवा पूर्वज रूष्ट झाल्यामुळे आजार येतो असे कोरकू मानत असल्याचे दिसत असले तरीही ते दुखण्याचे शारीरिक स्वरूपही मान्य करतात. बहुतेक सर्व कोरकूंना त्यांच्या परिसरातील वनस्पतींचा औषधी उपयोग माहित असल्याचे दिसते. त्याचा उपयोग करून ते घरगुती उपचार करतात. त्यांच्या वसाहती जंगलापासून दूर नसतात. त्यामुळे त्यांना औषधी वनस्पती सहज उपलब्ध होतात. परिहारांना वनौषधींचे सखोल ज्ञान असते. ते त्याचा उपयोगही करतात. या संदर्भात २०१० साली नाथ विजयेंद्र आणि खट्टी पवनकुमार यांनी आफ्रिकन जनरल फार्मसी खंड ९ मध्ये बैतुल आणि छिंदवाडा जिल्ह्यातील ७७ वनौषधींचा उल्लेख केला आहे (*नाथ विजयेंद्र आणि खट्टी पवनकुमार २०१०:आफ्रिकन जनरल फार्मसी व्हाल्युम ९*). कोरकूंच्या नित्य वापरात असलेल्या काही वनस्पतींची यादी देत आहे.

कोरकूंच्या वापरात असलेल्या काही वनौषधींची यादी (*फ्युचेस १८८: २८३*)

१	सर्पगंधा	*Rauwolfia serpentina*	रक्त दाब कमी करणे
२	धवल	*Lobal ia Nicotinac folia*	अस्थमा, श्वास नलिकेचा दाह किंवा अकुंचन पावणे
३	कुडा, दुधीबार्क आणि त्याची पाने	*Holarr hena antidy senterica*	दमा, खोकला, आमांश, आव
४	पांगळी		इसब, चिंता, नैराश्य
५	जमरासा	*Elaeodendron*	साप चावणे
६	सागरगोटा	*Caesalpinia bonducella*	जंतु नाशक
७	गुळवेल	*Tinospora cordifolia*	जुलाब

८	महानिब	*Ailantus excelsa*	ताप, वेदना
९	रक्तवेल	*ventilago maderspatana*	पोटाचे विकार
१०	वावडिंग	*Embelia ribes*	जंत
११	बाभूळ	*Lyhale*	आवाळू
१२	डिकेमाली	*Gardeniagummifer*	दात दुखणे
१३	निरगुडी	*Vitex negundo*	संधिवात
१४	प्राजक्त	*Nyctanthes*	
१५	अश्वगंधा	*Withania somnifera*	अशक्तपणा

कोरकू मंत्रशक्तीवरही विश्वास ठेवतात. रोग निदानाचे काही मंत्र प्रचलित आहेत. (*चौरे १९८७:११४*) ते असे आहेत –

१) डोळे दुखत असल्यास म्हणायचा मंत्र

पिलकु पिलकु डि अंटे, डि टेगा झारा सागे बा।

पिलकु डि टेंगन बांटे गोमाज टेंरज डि डालूम खोज।

अर्थ:

पिलकु पिलकु तुझे डोळे कुठे गेलेत।

ते तुझ्या वडिलांबरोबर गेलेत।

गवत आणायला गेलेत।

त्यांनी काय केले होते.

२) शारीरिक वेदनेवर म्हणायचा मंत्र

बन गीडा बनवारी बीडा डि रे।

बारिया अकून उरा पान्ड बनवाडी।

जोशी उरा रोगी, रोशी उरा जोशी।

कन पाटेंटे हरदुल गोमाज की।

उमडा बीड डी दुवा।

अर्थ:

हे वेदना देणाऱ्या देवा तू कुठून आलास।

तू शरीरात कसा प्रवेश केलास।

तुझे घर कुठे आहे, तू कोणत्या जातीचा आहेस।
जोशीच्या (भुमका)क्षेत्रात तू कसा घुसलास।
तुला हरढुल गोमाजची शपथ आहे
उमडा वीरजो तुझा रक्षक आहे, त्याची तुला शपथ आहे।
तू ताबडतोब निघून जा।

कोरकूंचे टोने-टोटके

कोरकू जादूटोण्याचे प्रयोगही (*टोने-टोटके*) करताना दिसतात. त्याला ते 'उटानाटा' म्हणतात. हे काम करण्याचा अधिकार परिहार किंवा गुनियालाच आहे. शरीरावर फोड किंवा पुरळ आल्यास परिहार लाल धागा रोग्याच्या अंगावरून उतरवून चौकात टाकतो. असे मानले जाते की जो कोणी हा धागा ओलांडेल त्याला हा रोग होईल आणि रोगी निरोगी होईल. पहिल्याच बाळंतपणात जिला मुलगा झाला असेल अशा स्त्रीचे केस किंवा साडीचा पदर कापून जाळून त्याची राख पाण्यात घालून प्याल्यास वांझ स्त्रीलाही संतान प्राप्ती होते. एखाद्या स्त्रीचे मूल जगत नसेल तर तिने सर्वांच्या नकळत सात घरांना आग लावल्यास तिचे मूल जगते असे मानले जाते. वरील प्रकारचे टोटके करणारी स्त्री पकडली गेल्यास त्या स्त्रीला अपराधी मानून शिक्षा केली जाते. तिला हीन समजले जाते (*चौर १९८७:९६*).

सर्व जीवित प्राण्यांना मग तो माणूस असो अथवा जनावर त्याला नजर (*द्रिष्ट*) लागते असे कोरकू मानतात. नजर लागल्यामुळे भुक न लागणे वजन कमी होणे अशा तऱ्हेचे आजार संभवतात. नजर उतरवण्याची पद्धत प्रौढ स्त्रियांना माहित असते. त्या पुढील पद्धतीने नजर उतरवतात (*फोटो क्र. ५७*). मीठ, मिरची आणि बिब्बा मुठीत ठेऊन सात वेळा ओवाळतात. 'जीवो, गोरूवासरू, शेळी, मिरचा बोलूमाग डिट पासरण डिटू सिन्या चाकना' (*जीवो गोरू वासरू, शेळी या सर्वांची लागलेली द्रिष्ट मिरची तू घेउन जा.*) असा मंत्र म्हणून मुठीतील मीठ, मिरची आणि बिब्बा चुलीत टाकतात. द्रिष्ट मिरची बरोबर जळून जाते. अशी कोरकूंना खात्री वाटते. नजर लागू नये म्हणून मासयानी व कुलागोमाज यांच्या नावाने भुमका दोरा

बांधतो. नजर लागू नये म्हणून लिंबू, आंब्याची पाने, मिरची दारावर बांधून ठेवण्याची रूढी कोरकू पाळताना दिसतात. महाराष्ट्रातील ग्रामीण समाजातही 'द्रिष्ट' ही संकल्पना प्रचलित आहे. द्रिष्ट काढणे आणि द्रिष्ट लागू नये म्हणून लिंबू, आंब्याची पाने, मिरची दारावर बांधून ठेवण्याची रूढी प्रचलित आहे. चांदपूरचा भुमका श्रीराम चतुरकर याने सांगितले, नुसत्या स्पर्शाने झोडपा (*भूतबाधा*) झाल्याचे ओळखता येते (*फोटो क्र ५८*). फुटाणे, दूध, पाणी, चिवडा, लिंब आणि भूत मागेल ते गाव सीमेबाहेर पुरणे व लोटीत पाणी घेऊन खालील मंत्र सात वेळा बाधितावरून ओवाळल्याने भूत निघून जाते.

''भाले खोले को पकडना।
मही मशान को पकडना।
चलते फिरते माता को देख बराबर।
सातमाता तुम्हारे नामसे पानी देता।

या उपायांनी भूतबाधेपासून मुक्तता मिळते अशी कोरकूंची श्रद्धा असल्याचे दिसते. भूत कसे काढता येते हे दाखवत असतानाचा चतुरकरचा फोटो आहे (*फोटो क्र. ५८*).

कोरकूंचे आहार

कोरकूंचा आहार संमिश्र स्वरूपाचा असतो. सकाळी उठल्यावर ते ज्वारीच्या पिठाची पेज पिऊन दिवसाला सुरूवात करतात. दोन वेळच्या जेवणात ज्वारीची भाकरी, भात, वरण, परसात लावलेली पालेभाजी असते. अधून-मधून मूग, उडीद यांचाही आहारात समावेश करतात. अन्नधान्याची कमतरता झाल्यास पेजेवर भागवतात. पूर्वी जंगलातील पशूंचे मांस आणि जंगलातील कंदमूळे असे गरजेपुरते अन्न मिळत होते. ब्रिटिशांनी वनसंरक्षण कायदे केले. कोरकूंच्या संरक्षित क्षेत्रात येणाऱ्या जमिनी वनखात्याकडे जमा झाल्या. पर्यायी जमिनी देण्याचा विचारही शासनाने केला नाही. जंगलांवर आधारित असलेले कोरकू हलाखीचे कष्टमय जीवन जगू लागले.

कोरकूंचा पोशाख

आजच्या कोरकू महिलांचा पोशाख मध्यप्रदेशातील स्त्रियांसारखा साडी, उजव्या खांद्यावर पदर आणि पोलके असा असतो. मुली सलवार-कमीज घालतात. पुरूष धोतर, बंडी आणि डोक्याला गमछा अशा वेषात वावरताना दिसतात. आधुनिक युवक इतर भारतीय युवकांसारखाच पायजमा व शर्ट घालतात.

कोरकूंचे अलंकार (*फोटो क्र ५१ ते ६७*)

कोरकू स्त्री-पुरूषांना अलंकार घालण्याची आवड आहे. पुरूष कानात बाळी, कानाच्या पाळीत मुरकी, आणि बोटात मुंडी घालतात. कोरकू स्त्रिया मात्र हातात, पायात व गळ्यात सर्वत्र दागिने घालतात. केसात थक्कन (*बिंदी*), नाकात U आकाराची नथ घालतात. गळ्यात केंडा, मुरकू (*काळी पोत*), टोगली (चांदीचे नेकलेस), सकरी (*हासळी*) घालतात. ढंडात बाकरिया, पायात पैंजण घालतात. स्त्रिया केसांचा अंबाडा घालतात तर मुली वेणी घालतात आणि तिच्या टोकाला रिबिन बांधतात.

कोरकू भाषा

कोरकू मुंडा गटातील एक बोलीभाषा आहे. ती कोलारियन भाषेची उपशाखा असल्याचे मानले जाते. कोरकू भाषेला लिपी नाही, आजच्या कोरकूंच्या बोलीभाषेत हिंदी आणि मराठी शब्दांची सरमिसळ झालेली दिसते. 'ध्वनिशास्त्राच्या अनुषंगाने कोरकू भाषा विकसित झाली असावी' (*ढेगावकर १९४२:.५८*). कोरकू भाषेच्या व्याकरणाचा विचार केल्यास कोरकू भाषेत हिंदी पेक्षा जास्त स्वर आहेत. वाक्याच्या शेवटी आलेल्या व्यंजनांचा उच्चार बदलतो, जसा 'क' चा 'ग' , 'च' चा 'ज', 'ट' चा 'ड', 'प' चा 'ब' होतो. कोरकू भाषेतील शब्द पुल्लिंग आणि स्त्रीलिंग यामध्ये विभागले जातात. या भाषेत नपुंसकलिंग नाही. नामाला लावलेल्या प्रत्ययातून लिंगाचा बोध होतो. उदा. 'कोन' म्हणजे मुलगा. 'कोनजे' म्हणजे मुलगी.

गोंदणे (*फोटो क्र. ६८ ते ७२*)

गोंदवण्याने देव प्रसन्न होतात, तसेच भूत-प्रेत बाधेपासून संरक्षण होते असे कोरकू मानताना दिसतात. म्हणून प्रत्येक कोरकू गोंदवणे आवश्यक मानतो. स्त्रिया शरीरावर अनेक ठिकाणी गोंदवून घेतात. कपाळावर इंग्रजी 'M' सारखी आकृती व त्याच्या खाली एक बिंदू असणे ही कोरकू स्त्रीची ओळख असल्याचे मानले जाते (*फोटो क्र. ६८*). पुरूष सहसा आपले नाव गोंदवून घेतात. पूर्वी ओझा स्त्रिया गोंदवण्याचे काम घरोघर जाऊन करत असत. आता मात्र हाट-बाजारात कारागीर यंत्रांनी गोंदवण्याचे काम करतात.

गोंदताना म्हणायचे गीत पुढे देत आहे-

ङचौफार गोडुवा डि गोडुवा।
चौफार गोडुवा डि गोडुवा।
मोर बको बाई डि चौफार गोडुवा रे
मुं गोडुना डि मू किय पुली।
कपार गोडुना डि बिन्डिवा।
बाँट गोडुना बाऊ टिया।
टी गोडुना डि कंगली।
पात गोडुना डि बिडिया।
लुतुर गोडुना डि सा कोम।
टोपड गोडुना डि झारा।
डिम डोण नाट डि गोडुवा ।ङ

अर्थ

हे सखी मी काय गोंदवून घेऊ।
हे सखी तू नाकावर लवंगेच्या जागी फुली गोंदवून घे ।
कपाळावर बिंदी गोंदवून घे ।
दंडावर बाहुटा गोंदवून घे ।

हातात बांग्ड्या गोंदवून घे ।

पायात पैजण गोंदवून घे ।

कानावर सागाचे पान गोंदवून घे ।

गुडघ्यावर गवत गोंदवून घे ।

छातीवर आपल्या प्रियाचे नाव गोंदवून घे । (चौरे १९८७:११५)

कोरकूंचे खगोल ज्ञान

कोरकूंनी नैसर्गिक घटकांमधल्या शक्तींना आपल्या दैवतमंडळात प्रतिष्ठित केलेले आहे. चंद्र-सूर्य, धरती, डोंगर इत्यादींची आराधना केल्याने मानवी जीवनात सातत्य टिकून राहाते अशा संकल्पना त्यांच्या नृत्य-गीतातून प्रकटतात. तसेच कोरकूंना आकाशातील ताऱ्यांचीही माहिती आहे असे दिसते. 'कोरकूंच्या पूर्वजांनी आकाशातील तारे आणि त्यांचा प्रभाव या विषयावर अभ्यास केला असावा' (*देगावकर १९९०:५२*). वैशाख महिन्यात आकाशात गोल आकाराचे तारामंडळ उगवते ज्याला कोरकू सेमाबावडी म्हणतात व हे मंडळ पाऊस येण्याचे लक्षण मानून नांगरणी सुरू करतात. कोरकू आकाशातील सप्तर्षींना सोने की खटीया म्हणतात. या ताऱ्यांच्या उगवण्याच्या वेळावरून रात्रीच्या वेळेचा ते अंदाज करतात. जेव्हा एखाद्या ताऱ्याभोवती खळे (*तारामंडळ*) तयार होते तेव्हा ते महागाई होण्याचे लक्षण मानून कोरकू शेतकरी आपल्या शेतात नगदी पैसे मिळतील अशा अपेक्षेने कापूस लावतो. शेपटी असलेला तारा धूमकेतू उगवणे हे नैसर्गिक आपत्तीचे लक्षण मानले जाते. सुको (*शुक्रतारा*) दिसला की दिवस संपला असे मानून दिवसाचे काम थांबवतात. आकाशगंगेला 'राघीकोरा' म्हणतात. आकाशगंगेत दोन प्रवाह आहेत असे मानतात. पहिला सासऱ्याचा आणि दुसरा सुनेचा.

कोरकू लोकगीत

कोरकू भाषेला लिपी नसल्यामुळे त्यांच्या संकल्पना, परंपरांची माहिती त्यांच्याशी प्रत्यक्ष भेटून अथवा लोकगीतातून मिळते. सणावारी उत्सवप्रसंगी, सामूहिक प्रसंगानुसार नृत्य आणि लोकगीत गाण्याची त्यांच्यात प्रथा आहे. लोकगीत म्हणजे

समूहव्दारा निर्मित गीत. या गीतांना सिरिंज असे म्हणतात. जी समुदायाची उस्फूर्त अभिव्यक्ती असते. या नृत्य-गीतांमधून मनोरंजन तर होतेच शिवाय एकतेची भावना जागृत होते. आजही बहुसंख्य कोरकू जंगलात भौतिक सुख-सुविधांपासून ढूर कष्टमय जीवन जगत आहेत. जीवन जगण्याची नवीन प्रेरणा त्यांना त्यांच्या नृत्य गीतातून मिळते. त्यांचे सणवार, उत्सव निसर्गाच्या ऋतुचक्राशी जोडलेले आहेत. त्यांच्या परंपरा, श्रद्धा लोकगीतातून उलगडत जातात काही अपवाद वगळले तर कोरकू गीतांना नृत्याची जोड असतेच. म्हणूनच कोरकू या दोन्ही प्रकारांचा उल्लेख 'डंडा सिरिंज' किंवा 'डोलार नाचो' असा जोड शब्दाने करतात. सर्वसाधारणपणे ही नृत्य-गीते समूहाने सादर होतात. या नृत्य-गीतांचे वर्गीकरण खालील प्रमाणे करता येईल.

१) फक्त स्त्रियांनी म्हणायची सिरिंज २) फक्त पुरूषांनी म्हणायची सिरिंज ३) दोघांनी मिळून म्हणायची सिरिंज. कोरकू लोकगीतांचा पसारा विस्तृत आहे म्हणून प्रत्येक प्रकाराचे एक-एक गीत वानगीदाखल देत आहे.

१-: स्त्रियांनी म्हणायच्या सिरिंज- १) ब्याह सिरिंज २) चिरूडी सिरिंज

चिरूडी सिरिंज-भाद्रपद आणि अश्विन महिन्यात संध्याकाळी स्त्रिया एकत्र जमून नाचत-नाचत हे गीत गातात. ही सिरिंज स्त्रीच्या भाव-भावनांची अभिव्यक्ती आहे. या गीतात स्त्रीच्या जीवनातील दैनंदिन अनुभव मुक्तपणे सादर होतात.

रेमाय साडीन डोटका जोकेन डोटका
तोडे रेमाय डोटका तोडे
लवार घर से ढरती मांगो ढरटी
चिरो रेमाय डोटकान चिरो
कुंवर घर से हंडी मांगे हंडी
तेली घर का तेल मांगो
रोने रेमाय डोटकान रोने (पौहार २००६:१४८)

अर्थ

रेमाय तुइच्या घराच्यामागे अंगणात ढूध भोपळा लागला आहे.

तो ढूधभोपळा तोड

लोहाराकडून विळी मागवून

ढूधभोपळा चिर

मातीच्या मडक्यात

तेल टाकून

भोपळ्याची भाजी शिजव.

पुरूषांनी म्हणायच्या सिरिंज -(१) चाचरी-गोगल्लिया सिरिंज (२) डंडा सिरिंज (३) ढांढेल सिरिंज (४) खंबा सिरिंज निमाडी भजन

२-: चाचरी-गोगल्लिया सिरिंज

वैशाख महिन्यात संध्याकाळपासून अंधाऱ्या मध्यरात्रीपर्यंत चाचरी नृत्य-गीत सादर होते. दिवसभर कडक उन्हाने थकलेल्या तापलेल्या शरीराला थंड हवेची झुळूक आनंद देत राहाते. गुडूप अंधारात टिमटिमत्या चांदण्यात हे गीत सादर करतात. अशा उल्हासमय वातावरणात प्रेक्षक आणि नर्तक रात्रभर तल्लीन असतात. 'अंधारात चमकणाऱ्या चांदणीची ओढणी जणू काही चंद्र बाजूला करतो आहे' असा आशय असलेल्या गीतांना चाचरी सिरिंज म्हणतात (*पौहार ००६:४०*). कलाकार दोन रांगात जागच्या जागी नाचत-गात राहातात.

ए बेरूली काये पेरे राणी माडो।

बेरूली टारोबा रेंगो लीडे ।।

बेरूली काये पेरे राणी माडो

बेरूली बिच्छिया पेरे राणी माडो

बेरूली टारोबा रेंगो लीडे।।१ ।।

बेरूली काये पेरे राणी माडो

बेरूली घगरा पेरे राणी माडो

बेरूली टारोबा रेंगो लीडे।।२ ।।

अर्थ

'हे बेरूली राणी।

तू काय घातले आहेस ?

तू सूपात चारोळी निवडताना फार सुंदर दिसते आहेस।

हे बेरूली राणी तू काय घातले आहेस ?

बेरूली तू जोडवी घातली आहेस

तू सूपात चारोळी निवडताना फार सुंदर दिसते आहेस।

हे बेरूली राणी तू काय घातले आहेस?

तू सूपात चारोळी निवडताना फार सुंदर दिसते आहेस। (पौहार, २००६:१४२)

मध्यरात्री चांदणी उगवल्यावर गोग्गलिया सिरिंज गायला सुरूवात होते. चंद्र-सूर्य-पृथ्वी गोलाकार गतिमान आहेत. माणसेही निसर्गाशी समरस, गतिमान होऊन, गोलाकारात उभे राहून गोग्गलिया गीत गायला सुरूवात करतात.

गोग्गलिया रमा नाचा रांगे बाई कानिया।

तोनेमाजा देवता को राजा बाई मानीले।

खेडामाजा देवता को राजा बाई मानीले।।१ ।।

चांदमाजा सुरज को राजा बाई मानीले।।२ ।।

सीवाला देवता को राजा बाई मानीले।।३ ।।

मुथामाजा देवता को राजा बाई मानीले।।४ ।।

अर्थ -

गोग्गलिया गीत गाताना कन्हैया रांगेत नाचतो आहे.

तू कोणत्या देवतेला देव मानले आहेस।

'खेडा' देवतेला तू देव मानले आहेस।

चंद्र- सूर्याला तू देव मानले आहेस।

गाव सीमेवर असलेल्या देवाला (शिव)ला तू देव मानले आहेस

'मुथा' देवाला तू देव मानले आहेस. (पौहार २००६:१४२)

३ –: स्त्री आणि पुरूष दोघांनी मिळून म्हणायची सिरिंज

झामटा सिरिंज –

बल्ला लिया डूडा पीपली रीपी बोलीजा।

भुरू वहा रैयनीजांमूरे रासो बोली ।।

हाजेजा हाजे बाबोन आलोम बारेन माडीजी।।१ ।।

बांगोनजा बंगोन डोके इया आबा डोडोबाला।।२ ।।

आमा आवाज डोके इया कून्कार नुरूबाला।।३ ।।

अर्थ –

डोंगरावरून पिंपळाच्या तुटलेल्या फांदीचा जोराने आवाज येत आहे.

खालून जांभळाच्या पानांचा आवाज मात्र हळूहळू येतो आहे.

ए 'साली' (मेहुणी) तू इकडे गप्पा मारण्यासाठी लवकर ये'.

साली, उत्तर देते, 'ए प्रियकरा मी तिकडे येऊ शकत नाही.

कारण माझ्या वडिलांचे माझ्याकडे लक्ष आहे'.

'त्यांचे लक्ष असले तरीही तू ये, ते माझे सासरे पण आहेत'. (पौहार २००६:१५४)

काही नृत्य–गीतांना ढोल, बासुरी, टिमकी, डमरू, मृदंग, चिटकोरी, इत्यादी वाद्यांची साथ आवश्यक मानली जाते. तर काही नृत्यांना पायाचा ठेका आणि टाळ्यांच्या ताल अथवा मनापासून मारलेली आरोळीही पुरेशी ठरते.

कोरकूंचे नृत्य प्रकार (*चौरे १९८७ : परिशिष्ट ५*)

झूला नृत्य – पावसाळ्यात स्त्रिया झोपाळ्यावर बसून झोके घेता–घेता गाणी म्हणतात.

डंडा नृत्य – पावसाळ्यात गोल करून पुरूष दांड्याच्या तालावर नृत्य करतात.

होरियार नृत्य – होळी पौर्णिमेनिमित्त पुरूष पेटत्या मशाली घेऊन नृत्य करतात.

गोल नृत्य – थंडीत तरूण मुली हातात हात धरून गोल करून नृत्य करतात.

खंब नृत्य – थंडीत मुठवादेवाजवळ खांब रोवून नृत्य करतात.

खडा नृत्य – प्रौढ स्त्रिया नृत्य करतात.

गढली नृत्य – विवाह प्रसंगी विवाहित अथवा अविवाहित स्त्री–पुरूष ढोल व बासरीच्या तालावर नृत्य करतात.

फगनाई नृत्य – होळी पौर्णिमेनिमित्त स्त्री–पुरूष माती, धूळ आणि चिखल एकमेकांवर फेकत फेकत नृत्य करतात.

चाचरी नृत्य – उन्हाळ्यात स्त्री–पुरूष एकत्र नृत्य करतात.

टिमकी नृत्य – किशोर वयातील मुले– एकत्र नृत्य करतात.

कोरकूंचे पशुपालन

सर्वसाधारणपणे प्रत्येक कोरकू घरात कोंबड्या आणि गाई पाळलेल्या दिसतात. इतर आदिवासी समाजात रूढ असलेली बळीप्रथा कोरकूही पाळतात. पाळलेल्या कोंबड्याचा त्यासाठी उपयोग होतो. शिवाय कोंबडीची अंडी आहारात उपयोगी ठरतात. कोरकू पहाडी गायी आणि बैल पाळतात. ही गुरे बुटकी व काटक असतात. डोंगराळ भागातील कामांसाठी ती योग्य असतात. गाईच्या शेणाचा उपयोग खत, इंधन आणि जमीन सारवण्यासाठी होतो. बैलांच्या पैदाशीचे साधन म्हणूनही गाईंना महत्व दिले जाते. कोरकू गाईचे दूध आणि दुधाचे पदार्थ खात नाहीत. शेतातील नांगरणी, विहिरीतील पाणी काढणे इत्यादी कामांसाठी बैलाचा वापर करतात. बैल चार वर्षांचा होईपर्यंत त्याच्याकडून कुठलेच काम करून घेत नाहीत. चार वर्षांचा बैल काम करण्यास सक्षम आहे असे मानून त्याला कामाला जुंपतात. सधन कोरकू म्हैसही पाळतात. रेड्याकडून फारसे काम करवून घेत नाहीत. जमीन ओलसर किंवा दलदलीची असेल तर रेड्याला नांगराला जुंपून नांगरणी करतात. कोरकू म्हशीचे दूध पित नाहीत.

शेळ्या –मेंढ्या

कोरकू शेळ्या पाळतात त्यांचे गोठे भक्कम बांधावे लागतात. कारण वन्यप्राण्यांना बोकडाचे मांस आवडते. ज्यांना हा खर्च परवडत नाही ते रात्री शेळ्या, बोकडांना घरातच बांधतात. कोरकूही बोकडाचे मांस आवडीने खातात. शिवाय देवतेला

बोकडाचा बळी देण्याची प्रथा प्रचारात आहे, शेळीचे दूध सहसा वापरत नाहीत पण बाळंतपणात मृत झालेल्या स्त्रीच्या बाळाला शेळीचे दूध पाजतात. ज्या स्त्रियांना दूध येत नाही त्यांच्या मुलांनाही शेळीचे दूध पाजतात.

डुकरे

कोरकू समाजात डुक्कर पाळण्याची परंपरा आहे. कोरकूंना डुकराचे मांस आवडते. डुकराचे मांस खाल्यास स्त्रियांमध्ये वंध्यत्व येते असा समज असल्यामुळे स्त्रियांना डुकराचे मांस खाण्यास बंदी आहे. घरासाठी जेव्हा डुक्कर कापतात तेव्हा एकदा खाऊन उरलेले मांस वाळवून ठेवतात. भैसासूर देवतेला डुकराचाच बळी देण्याची रूढी आहे.

कोरकूंचे व्यवसाय

कोरकूंचे जीवन कृषी, मासेमारी किंवा मोलमजुरी यावर अवलंबून आहे. जवळ-जवळ ७५% कोरकू कृषी व्यवसाय करतात. उरलेले सरकारी योजनात, वनखात्यात अथवा खाजगी क्षेत्रात मजुरी करतात. शिकार, मासेमारी असे जोडव्यवसायही करतात. कोरकू नांगरणी पासून मळणी पर्यंत प्रत्येक प्रक्रियेचा आरंभ सामुदायिक पूजनाने करतात. पूजा भुमका किंवा परिहार करतो. कोरकूंची कृषी उत्पादने मुख्यत: कुटकी, ज्वारी, मका, शेंगदाणे, इत्यादी आहेत.

कृषी व्यवसायाची सुरूवात हलवाईने (*नांगरणीने*) होते. नवीन वर्षातील नांगरणीला हलवाई म्हणतात. परिहार हलवाईचा दिवस ठरवतो. त्या दिवशी खट्टी गोमाजची पूजा करतात. पूजनाची सामग्री नारळ, कोंबडा, गूळ आणि लिंबू असते. पूजा झाल्या शिवाय हलवाई करणे हा अपराध मानला जातो. पूजेचा प्रसाद फक्त नांगरणी करणारेच खातात. नांगर आरंभी उत्तरेकडून दक्षिणेकडे पाच वेळा चालवतात. नंतर सामान्य पद्धतीने नांगरणी होते. नांगरणी झाल्यावर पेरणी करतात. पेरणी सहसा मंगळवार, शुक्रवार किंवा रविवारी करण्याची रूढी आहे.

पेरणीच्या दिवशी 'तारा उग्या'[१०] या ताऱ्याच्या. उदयानंतर घरातील प्रौढ पुरूष शेतीची अवजारे, बैल व बीज घेवून शेतात जातो. विधिवत खट्टी गोमाजची पूजा करतात. पूजनानंतर खट्टी गोमाजजवळ पांढऱ्या कापडाची पताका लावतात. देवतेला नमस्कार करून पेरणी सुरू करतात. सुरूवातीच्या दहा पावलांचे वृत्त आखून घेऊन [११]त्यात प्रथम बिया पेरतात. पेरणी करताना केलेल्या पूजेतील नैवेद्य घरी नेत नाहीत, तेथेच संपवतात. सुकोतारा (*शुक्रतारा*) उगवल्यावर शेतीची सर्वकामे बंद करतात. हा अलिखीत नियम कोरकू काटेकोरपणे पाळतात (*चौरे १९८७:५८*).

भारतीय शेतकरी वन्य पशू किंवा चोरांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी रात्री शेतात झोपतात. कोरकू शेतकरी सुद्धा सुगीच्या काळात पहाऱ्यासाठी रात्री शेतात झोपतात. परंतु शेतात झोपण्याची सुरूवात करण्यापूर्वी 'होरीयार' नावाचा विधी करतात. हा विधी सामुदायिकरीत्या साजरा करतात. हा विधी करण्याची वेळ रात्रीची आहे. रात्रीचे जेवण झाल्यावर मुले घरातील पेटती लाकडे घेऊन गावाच्या पश्चिमेकडे जमा होतात. तेथे शेकोटी पेटवतात. गावातील प्रौढ पुरूष शेकोटीभोवती बसून गप्पा-गोष्टी करतात तर तरूण मुले-मुली नृत्य-गायनात मग्न असतात. रात्री उशीरा लाकडे विझवतात. तेथील राख, कोळसे घरी घेऊन येतात. शेतात रखवालीसाठी बांधलेल्या झोपडीत ही राख पुरतात. असे केल्याने भूत-प्रेत, आणि विषारी किड्यांपासून पिकांचे आणि झोपणाऱ्या शेतकऱ्याचे रक्षण होते असा कोरकूंना विश्वास वाटतो. दुसऱ्या रात्रीपासून शेतात झोपण्यास सुरूवात करतात.

पिकाची पूर्ण वाढ झाल्यानंतर कापणी होते. कापणी करताना पुन्हा खट्टी गोमाजची पूजा करतात. या पूजेचा दिवस परिहार ठरवतो. तोच पूजा करतो. ज्या शेतकऱ्यांनी पीक चांगले यावे म्हणून नवस कलेला असेल ते यावेळेस कोंबडा बळी देऊन नवसाची पूर्तता करतात. एका ओळीतील धान्य देवाला अर्पण करतात. या पूजनाचा

---

१० आकाशात उत्तर रात्री तारामंडळ तयार होते. कोरकू त्याला सेमाबावडी म्हणतात.(देगावकर, १९९०:५२).

११ या वृतात उगवलेले धान्य शेताचा मालक स्वत:काढत नाही किंवा वापरत नाही. हे धान्य बहुधा भाचा, परिहार, भुमका आणि रजालिया काढून घेऊन जातात, (चौरे, १९८७:५८)

प्रसाद स्त्रियांसाठी वर्ज आहे. सुरूवातीला पेरलेले वृतातील धान्य शेताचा मालक किंवा त्याचे कुटुंबीय कापत नाहीत. खातही नाहीत.

यानंतर खळ्यात कणसे नेऊन त्यांची मळणी (*उडावनी*) करतात. त्यासाठी जमीन समतल करून शेणाने लिंपतात व खलिहान देवाची पूजा करतात. पूजेत हळद, कुंकू, नारळ वाहून आणि कोंबडीच्या पिल्लाचा बळी देतात. बळीचे रक्त खळ्यात शिंपडतात आणि मळणीला सुरूवात करतात. हा विधी केल्याने अवेळी पाऊस येऊन खळ्यातील धान्याचे नुकसान होत नाही असे कोरकू मानतात (*चौरे १९८७:५१*). धान्य घरी नेण्यापूर्वी पुन्हा एकदा खलिहान देवा समोर नारळ फोडतात. कोठीत धान्य भरून ठेवताना कोठादेवी आणि दैयताची पूजा करतात. दैयतासाठी डुक्कर किंवा मेंढा आणि कोठादेवीसाठी कोंबडा बळी देतात.

शिकार

मुघल अंमलापर्यंत जंगलातील वन्यपशूंच्या शिकारीवर बंधन नव्हते. ब्रिटिश अंमलात प्रथमच वन आणि वन्यप्राणी संरक्षण कायदे आले. कोरकूंच्या जीवनप्रणालीत बदल घडत गेले. वनखात्यातील पहारेदारांना चुकवून शिकार करणे अशक्य झाले. मेळघाटातील कोरकू हरीण, सांबर, चारशिंगा या प्राण्यांची शिकार करण्यात तरबेज आहेत. निमाड्मधील कोरकू नीलगाईची शिकार करण्यात पटाईत आहेत. मेळघाटात जंगली डुकरे आहेत. रान डुकराची शिकार करण्याची कोरकूंची एक ठराविक पद्धत आहे. रानडुक्कराचा माग मिळाला की कोरकू त्याचा पाठलाग करतात. रानडुकरे वेलांच्या दाट जाळीत लपतात. कोरकूंची कुत्री अशा जाळ्या शोधून रानडुकरांना बाहेर हुसकतात. मग कोरकू त्यांना कु-हाडीने मारतात. रानडुकराचे मांस घरी आणणे किंवा घरात शिजवण्याला कोरकू समाजात बंदी आहे. म्हणून गावाबाहेर शिजवून खाऊन उरलेले मांस जमिनीत पुरून टाकतात. हरणाचे मांस मात्र घरी आणतात. घरातील स्त्रिया ते शिजवतात, खातात. पाळीव डुक्कर जेव्हा कापतात तेव्हा खाऊन उरलेले मांस वाळवून ठेवतात. उंदरावर उजेड टाकून डोळे दिपवून त्याला दगडाने ठेचून मारतात. कोरकू मुले गुलेलीने पक्षी मारण्यात तरबेज

असतात. सापळे आणि पिंजरे लावूनही कोरकू शिकार करतात.

परंतु आता शिकारीसाठी लागणारी हत्यारे बाळगणे हा देखील कायद्यानुसार गुन्हा ठरतो. कोरकूंना कुऱ्हाडीशिवाय कुठलेही हत्यार वापरता येत नाही. त्यामुळे कोरकूंचा शिकार व्यवसाय जवळ-जवळ बंद होण्याच्या मार्गावर आहे. शासनाची बंदी ज्या पशू-पक्ष्यांच्या शिकारीवर नाही अशांचीच शिकार करतात. त्यासाठी सापळा आणि पिंजरा वापरतात.

मासेमारी

मध्यभारतातील कोरकू निवासक्षेत्रात जून ते सप्टेंबर महिन्यात नदी, तलाव आणि ओढ्यात भरपूर मासे येतात. म्हणूनच या सुमारास कोरकू मासेमारी करतात. सुरूवात जलदेवतेच्या पूजनाने होते. नदीतीरावर जलदेवता स्थित असतात. पूजनात कोंबड्याचा बळी देऊन सामुदायिक भोजन करतात. स्त्रिया आणि पुरूष वेगवेगळे गट करून मासेमारी करतात. पकडलेले मासे टोळीतील सर्वजण एकसारखे वाटून घेतात.

कोरकू वेगवेगळ्या पद्धतीने मासेमारी करतात. नदीला बांध घालून बांधावर शंकूच्या आकाराची ढाट विणलेली बांबूची टोपली बांधतात या टोपलीत मासे जमा होतात. ही पद्धत अधिक वापरात आहे. या पद्धतीत वापरलेल्या टोपलीला कोरकू कुकरी म्हणतात. क्वचितच दोऱ्याची विणलेली जाळी लावूनही मासे पकडतात. मासे हे कोरकूंचे पूरक खाद्यान्न आहे.

उपलब्ध साधनांमध्ये झालेल्या बदलाचा परिणाम कोरकूंच्या बदलत्या जीवनक्रमातून प्रत्ययाला येत आहे. पूर्वी कोरकूंची अर्थव्यवस्था आणि बाजारव्यवस्था कमी गुंतगुंताची आणि नित्य आणि नैमित्तिक गरजा भागवणारी, वस्तूविनिमयाच्या तत्त्वावर आधारित होती. आधुनिक युगात वस्तूविनिमयाची जागा नगद पैशाने घेतल्याचे दिसले. चुर्णी बाजारात हे प्रत्ययाला आले. चुर्णी हे ठिकाण

सेमाडोह ते चिखलदरा मार्गापासून जवळ आहे. होळी पौर्णिमेच्या निमित्त भरलेल्या बाजारात तेलमीठापासून दागिन्यांपर्यंत सर्व वस्तू विकल्या-घेतल्या जात होत्या. बाजार आदिवासी आणि इतर समाजातील स्त्री-पुरूषांनी भरलेला होता. आदिवासी समाजातील लोक ग्रॅम, किलो, लीटर, मीटर या नवीन वजनमापांशी चांगले परिचित झाल्याचे दृश्य दिसत होते.

१९७० मध्ये शासनाच्या मार्गदर्शनासाठी घटना तयार झाली. घटनेमध्ये आदिवासी आणि मागासवर्गीय यांना सवलती आणि आरक्षण जाहीर झाले. आदिवासींना मुख्य प्रवाहात सामील करण्यासाठी अनेक योजना तयार झाल्या. ब्रिटिश शासनाने ज्या आदिवासी गावांच्या जमिनी व्याघ्रप्रकल्पात समाविष्ट केल्या होत्या, त्यांना पर्यायी जमिनी देण्याचा कायदा पास केला आहे. या कायद्यानुसार पायविहीर आणि अशा अनेक गावांना सामूहिक जमीन जंगल लागवडीसाठी मिळाली आहे. जंगलाचे हक्क सामुदायिक आहेत. जंगलातून मिळणाऱ्या वन्योत्पादनाचे मालकी हक्क सामुदायिक आहेत. जंगलात गरजू गावकऱ्यांसाठी रोजगार उपलब्ध झाला आहे.

मध्यप्रदेशातील बैतुल जिल्ह्यात भैसदेई हे तालुक्याचे गाव आहे. भैसदेई गावापासून चाळीस कि. मी. व महाराष्ट्रातील घटांग पासून अंदाजे पंचवीस कि. मी. अंतरावर खामला हे गाव आहे. सोमवारी खामला येथे आठवड्याचा बाजार भरतो. या बाजारात आजूबाजूच्या गावातील लोक भाजी खरेदी-विक्रीसाठी येतात. बाजारात कोरकूंचे प्रमाण अधिक दिसले. ह्या बाजारात प्रामुख्याने धान्य आणि भाजीची खरेदी-विक्री होत होती. बाजारात आलेल्या कोरकूंनी सांगितले, 'आम्ही सर्व प्रकारच्या भाज्या खातो. पूर्वी दही-दुधाचे पदार्थ खात नव्हतो. आता नवीन पिढीचे युवा क्वचित दही-दुधाचे पदार्थ खातात'. या बाजारात काही कोरकू विनिमयाच्या तत्त्वावर आधारित वस्तुंची देवाण-घेवाण करताना दिसले. अर्थातच वस्तुविनिमय पद्धत जवळ- जवळ समाप्त होत आहे'.

भैसदेईपासून अंदाजे आठ ते दहा कि. मी. अंतरावर पूर्णानदी आहे. या नदीच्या

कृपेने संतान प्राप्ती होते. अशी या नदीची ख्याती आहे. या नदीच्या तीरावर पूर्णानदीचे मंदिर आहे. कार्तिकी पौर्णिमेपासून पुढे दहा दिवस येथे मेळा व बाजारही भरतो. कोरकू आणि इतर समाजाचे लोकही या मेळ्यात नवस करण्यासाठी किंवा फेडण्यासाठी येतात. बाजारात कापड, तयार कपडे, तऱ्हेत-हेची खेळणी, मिठाई इत्यादी वस्तूंची दुकाने येतात. कोरकू सुद्धा या बाजारातील आधुनिक वस्तूंची खरेदी करत असल्याचे दृश्य दिसले.

शासकीय गृहउद्योग योजना अचलपूरला लागू झाली आहे. या योजनेचा उद्देश उद्योग सुरू करण्यासाठी लागणारे व्यावसायिक शिक्षण देणे व स्वतःचा उद्योग सुरू करण्यास मदत करणे हा आहे. या शिक्षण केंद्रात मातीची भांडी तयार करणे, चामड्याच्या वस्तू तयार करणे, सूत, रेशीम, लोकर यांचे विणकाम इत्यादी शिकवले जाते. या उद्योगांसाठी शासन आर्थिक मदत देते. शिवाय कमी किमतीत जागा देते. अद्यापि कोरकू किंवा इतर आदिवासी फारसे सहभागी होताना दिसत नसले, तरीही या योजनांकडे आकर्षित झालेले दिसतात.

तरूण पिढीच्या वेषभूषेत बदल झाला असल्याचे दिसते. ते पॅण्ट व शर्ट घालताना दिसतात. मुली सलवार कमीज घालतात. कोरकू स्त्रिया महाराष्ट्रातील स्त्रियांसारखी डाव्या खांद्यावर पदर घेऊन साडी नेसू लागल्या आहेत.

कुटुंबव्यवस्थेत अद्याप स्त्रियांचे स्थान दुय्यम असल्याचे जाणवते. त्यांना जातो पंचायतीत सभासदत्व नाहीच परंतु उपस्थित सुद्धा राहाता येत नाही. फक्त चालू प्रकरणात त्यांचा संबंध असेल तरच साक्षीदार म्हणून साक्ष देण्यापुरताच प्रवेश करता येतो. अनेक धर्मिक विधीत पूजनात सहभागी होता येत नाही किंवा नैवेद्यही ग्रहण करणे वर्ज्य मानले जाते. चैत दसऱ्याला होणारी पूर्वज पूजा करण्याचा अधिकार फक्त पुरूषांनाच आहे. कुटुंबप्रमुख गैरहजर असेल तर पूजेचा दिवस लांबवला जातो.

कोरकूंच्या घर आणि गाव रचनेत बदल होत आहेत. विशेषत: जी गावे

राजमार्गाजवळ आहेत त्या गावात विटा आणि सिमेंटने बांधलेली घरे आहेत (*फोटो क्र. ७३*). आधार खांबाला आधारून भिंत बांधून त्यावर चित्रांकन केलेले बोराटाखेड्यातील एका कोरकू घरात दिसते (*फोटो क्र. ७४*). घरातील आतील सजावट बदलली आहे. आधुनिक वस्तूंचा वापर करू लागले आहेत (*फोटो क्र. ७५, ७६*) हे स्पष्ट आहे. घरातील 'धारणा' खांबाला धरून भिंत बांधतात. या भिंतिंवर चित्रांकन करताना दिसतात.

बिच्चूखेडा गावात गोंड, गवळी आणि कोरकू राहतात. पूर्ण गावाचा एकच भुमका कोरकू गानु सावलकर आहे. सर्व गावकऱ्यांच्या संमतीने दशहरा उत्सव सुरू केला आहे. पूर्वी विवाहासाठी पुरोहित लागत नसे. काळानुसार काहीवेळा विवाहासाठी पुरोहित बोलवला जातो. सूर्यशक्तीवर चालणारे दिवे आहेत. गावाची रचना कोरकू गावासारखी राहिलेली नाही. बिच्चु खेड्याचे पटेल गावातील एकोपा आणि स्वच्छता कमी होत असल्याची तक्रार करीत होते.

कोरकू तरूणांना शिक्षणाचे महत्व पटले आहे. शिक्षण पूर्ण करून घरची आर्थिक अवस्था सुधारता येईल अशी जाणीव त्यांना झाल्याचे त्यांच्या बोलण्यातून अनुभवाला येते. ते तसा प्रयत्न करीत असल्याचे दिसते. पायविहीरमध्ये राहाणाऱ्या रामलालने पदवी घेतली आहे. मिळालेल्या जंगलातील उत्पन्नाचा लाभ पायविहीरमधील लोकांना कसा मिळेल याचे प्रयत्न करताना तो दिसतो. मात्र त्याने कोरकूंच्या चालीरीती आणि आचारधर्म यांचा त्याग केलेला नाही.

रायपूर गावातील बहुतांश लोक स्वत:ला हिंदू मानतात. स्थानिक देवता आणि स्वीकारलेल्या देवतांची सामुदायिक पूजा करतात. दोन्ही देवतांची पूजा पद्धती सारखीच आहे. पण स्थानिक देवतांना बळी देणे अनिवार्य मानले जाते तर स्वीकारलेल्या देवतांना बळी देत नाहीत.

भारतीय घटनेत अदिवासींना मिळालेल्या विशेष सवलतीनुसार जवळ-जवळ

प्रत्येक गावात प्राथमिक आरोग्य सेवाकेंद्र, प्राथमिक शाळा सुरू झालेल्या आहेत. काही मोठ्या गावात माध्यमिक शाळाही आहेत. मुला-मुलींसाठी जागोजागी आश्रम शाळा आहेत. विजेची सोयही बहुतांश गावात झाल्याचे दिसते. रायपूरसारख्या मोठ्या गावात विजेवर चालणारी पिठाची गिरणी सुरू झालेली आहे. जवळ-जवळ प्रत्येक गावात नित्य गरजेच्या वस्तू पुरवणारी दुकानेही आहेत. ज्या गावात वीज पोहोचविण्यात अडचणी आल्या त्या गावात सूर्यशक्तीवर चालणारे दिवे आहेत. कोरकूंच्या अभ्यासासाठी निवडलेल्या गावातून एकच कुकरू गाव असे आढळले की ज्या गावात विज, शाळा किंवा आरोग्य केंद्र नाही.



कोरकूंची ग्राम रचना



कोरकूंची ग्राम रचना



कोरकूंची ग्राम रचना



कोरकूंची ग्राम रचना



कोरकू ढाणा



कोरकूंची ग्राम रचना



मातीच्या कोठ्या



धारणा किंवा उरोगोमाज



कोरकूंचे स्वयंपाकगृह



ढोरीवर टांगलेले कपडे



पुढची पडवी



मातीचे जाते




मागील परसू



दफन



दफन



भुमक्याची स्मृतिशिला



देवराई



दृष्ट काढण्याची पद्धत



भूतबाधेपासून मुक्त होण्याची पद्धत



नथ घातलेली स्त्री



अलंकाराने नटलेली स्त्री



केंडा(गळ्यातील अलंकार)



बांगड्या



पैंजण



नथ



कर्णफूल



बाकरिया १



बाकरिया २



कपाळावर गोंदण असलेली स्त्री



हातावरचे गोंदण



हातावरचे गोंदण




हातावरचे गोंदण



हातावरचे गोंदण



घराच्या रचनेत झालेला बदल



आधारखांबावर केलेले चित्रांकन



घरातील बदललेली सजावट



घरातील बदललेली सजावट

प्रकरण चौथे

कोरकूंचे धार्मिक जीवन

भारतीय विधिपरंपरांची रचना विविध देवता, अनेक उपासनापंथ, त्यांची मिथके, तत्त्वज्ञानाच्या विविध प्रणाली यांच्या संमिश्रतेतून झालेली आहे व या सर्वांचे मूळ लोकधर्मात दडलेले आहे असे बहुतेक विद्धान मानतांना दिसतात. भारतीय संस्कृ-तीतील अनेक परंपरा फक्त ग्रामीण समाजात प्रचारात आहेत असे नाही, तर त्या शहरी समाजातसुद्धा स्पष्टपणे दिसतात. डॉ. ढेरे यांच्या मताप्रमाणे, 'लोक देवतांची प्रकृती बव्हंशी आदिम देवतांच्या प्रकृतीसारखीच असते' (*ढेरे २००२:१७६*). तारा भवाळकरांच्या मते, 'लोकसंस्कृतीची घडण ही प्रामुख्याने स्थिर-संस्कृतीत झालेली असते. तत्पूर्व आदिम संस्कृती आणि कृषी संस्कृतीच्या सीमेवरील अवस्थाही लोकसंस्कृतीच्या घडणीत अंशरूपाने असतेच. म्हणजेच आदिम संस्कृती, आदिम व लोक संस्कृतीचा सांधा, लोकसंस्कृती ते नागरसंस्कृती अशी स्थूलमानाने येथील संस्कृतीच्या प्रवासाची दिशा आहे' (*भवाळकर २००५:प्रास्ताविक*). भारतीय धर्माचारांचा प्रवास 'आदिमधर्म ते लोकधर्म ते आजचा प्रस्थापित धर्म' या क्रमाने झाला असे म्हणता येईल. नागरसंस्कृतीमधील अनेक परंपरांचे मूळ लोकधर्म आणि आदिमधर्म यामध्ये आहे. त्यांचाच शोध घेण्यासाठी महाराष्ट्रातील आणि मध्यप्रदेशातील विविध कोरकू जाणकारांशी प्रत्यक्ष संपर्क साधून प्रचारात असलेले लिखित साहित्य, लोकगीते, मिथके समजून घेण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे.

आदिवासी दैवत परंपरांचा अभ्यास करताना आदिवासी दैवत परंपरांचे भारतातील लोकधर्मात असलेले स्थान आणि या परंपरांच्या देवाणघेवाणीतून त्यांनी आत्मसात केलेल्या काही पद्धती. त्यामधे झालेले आनुषंगिक बदल याचाही विचार करणे महत्वाचे आहे. धर्मजिज्ञासेच्या तौलनिक अभ्यासाची ही मूलभूत गरज आहे. विषयाच्या व्यासीचा विचार लक्षात घेता सर्वच आदिवासी समाजांच्या परंपरांचा अभ्यास प्रस्तावित प्रबंधाच्या चौकटीत करणे कठीण आहे. 'महाराष्ट्र' आणि 'मध्यप्रदेशात' राहाणाऱ्या कोरकूंनी आधुनिक शहरवासियांच्या संपर्कात येऊनही त्यांच्या परंपरांचे मूळ स्वरूप जपलेले आहे. तरूण मुलांमध्ये आधुनिक शिक्षणामुळे

त्यांच्या अस्मितेची जाणीव अधिक प्रखर झालेली आहे. ते त्यांच्या परंपरांचा विचार अधिक सजगपणे करू लागले आहेत. त्यामुळे त्यांच्याशी संवाद साधणे सहज शक्य होते.

या प्रबंधात कोरकू समाजाच्या दैवतपरंपरांशी भारतीय धारेतील इतर दैवत परंपरांशी असलेला संबंध समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. मिळालेल्या पुराव्याची संगतवार रचना करून कोरकूंच्या दैवतपरंपरांचा आणि त्यानुसार असलेल्या त्यांच्या समाजजीवनाचा अभ्यास करणे हे या प्रबंधाचे उद्दिष्ट आहे. हा अभ्यास, क्षेत्रपाहणी आणि उपलब्ध साहित्याच्या आधाराने केला आहे. त्यासाठी प्रत्यक्ष निरीक्षण आणि आणि प्रश्न मंजूषेच्या आधारावर कोरकू समाजातील जाणकारांशी संपर्क साधणे या पद्धतीचा अवलंब केला आहे (परिशिष्ट क्र. चार). समाज आणि तदनुषंगिक ग्रामरचना समजण्यासाठी काही निवडक गावांचे नकाशे तयार केले आहेत.

कोरकू दैवत परंपराचा उगम

निसर्गापेक्षा जास्त सामर्थ्यवान शक्ती कार्यरत आहे आणि ही शक्ती निसर्गाच्या संवर्धक आणि संहारक अशा दोन्ही घटितांवर नियंत्रण ठेवते अशी निसर्गाच्या सतत सान्निध्यात राहाणाऱ्या कोरकूंची नितांत श्रद्धा आहे. यातून त्यांच्या दैवत परंपरांचा उगम झालेला दिसतो. तसेच प्रेतात्म्यांचेही मनुष्याच्या दैनंदिन जीवनातील बऱ्यावाईटावर अधिपत्य असते, या कल्पनेचाही त्यांच्या मनावर पगडा असतो. या भावनेतून दोन्ही शक्तींना दैवत स्वरूपात प्रतिष्ठित केलेले दिसते. ही दैवते प्रसन्न राहावीत म्हणून पूजा पद्धतीची रचना झाली असावी. कोरकूंच्या पूजापद्धतीत पुजारीवर्ग आणि लोकगीतांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसते.

कोरकू दैवते आणि आचारविधींची परंपरा

कोरकूंच्या आचार-विधींचे नियोजन करण्याची आणि ते पार पाडण्याची जबाबदारी भुमका, परिहार व रजालिया या तीन पुजारी वर्गावर आहे. भुमका आणि परिहार यांच्यात देवतांशी संवाद साधण्याची क्षमता आहे याची कोरकूंना खात्री वाटते. संपर्क साधून देवतांच्या अपेक्षांची पूर्तता केल्याने संकट निवारण होईल याबद्दल या पुजाऱ्यांना आणि कोरकूंना खात्री असते.

१) **भुमका**

भुमका हा गावाचा धार्मिक-सामाजिक नेताच मानला जातो. प्रत्येक गावात एक भुमका असतोच. भुमका हे पद वंशपरंपरेतून येते. बऱ्याच गावात पटेलच भुमक्याचे काम करतो. सर्वसाधारणपणे नवीन वसाहत करताना भुमक्याची निवड पुढील पद्धतीने होते. मुठवागोमाजसमोर गावातील सर्व पुरूष ओळीत बसतात. मुठवागोमाजला काळ्या आणि पांढऱ्या रंगाचे कोंबडीचे पिल्लू बळी देतात. परिहार असेल तर तो किंवा गावातील प्रौढ पुरूष, नाणे उभे करून सोडतो. ते नाणे घरंगळत ज्या व्यक्तीसमोर थांबेल ती व्यक्ती देवाने भुमका म्हणून निवडली आहे असे मानतात (*देवगावकर १९९०:४७*). भुमका नैमित्तिक पूजेचे आयोजन-नियोजन करतो. प्रत्येक घरातून त्याला धान्य स्वरूपात वर्षासन मिळते. शिवाय आचारविधी पार पाडण्याच्या प्रसंगी भेट मिळते. भुमका गावातील आणि कुटुंबातील कलह निवारणासाठी मार्गदर्शन करतो. विवाहासाठी वधू-वरांची निवड करतो.

चिचखेडा गावात राहाणारे भिकाजी चव्हाण भेटले. ते भुमका आणि पाटील अशी दोन्ही पदे सांभाळत असत. दसरा आणि चैत्रात बाबांना संचार होत असे. त्याचा अनुभव घेतलेल्या त्यांच्या सुनेने सांगितले, 'संचार झाल्यावर बाबांच्या आवाजात बदल होत असे, हालचालीत फरक पडत असे. त्यांच्या आशिर्वादाने एका भक्ताची मन्नत पूर्ण झाली म्हणून त्याने धारण्यावर तलवार वाहिली आहे'. बाबांनी सांगितले, संचार झाल्यानंतर विशिष्ट पोशाख करावा लागतो ज्यात आसूड गाईच्या शेपटीच्या केसांचा असतो. देव अंगात संचारल्यानंतर सवारी आली असे म्हणतात.

२) परिहार

जो देवतांचे माध्यम म्हणून काम करतो, ज्याच्या अंगात देव येतो, जो धार्मिक विधी पार पाडतो, अशा व्यक्तीलाच परिहार म्हणून मान्यता मिळते. प्रत्येक गावात परिहार असतोच असे नाही. काही वेळा दोन-चार गावांसाठी एकच परिहार धार्मिक विधी पार पाडतो. विशेष प्रसंगी त्याला आमंत्रित करतात. तो घरोघरी जाऊन धान्य गोळा करतो. शारीरिक व्याधी किंवा नैसर्गिक आपत्ती, देवतांच्या किंवा पूर्वजांच्या कोपण्यामुळे ओढवतात अशी कोरकूंची श्रद्धा असते. संकट निवारणाचे उपाय सांगणे

हे परिहाराचे प्रमुख कार्य मानले जाते. काही परिहारांना औषधी वनस्पतींचे ज्ञान असते. ते रोग निवारणासाठी त्याचा उपयोग करताना दिसतात. ते रोगांवर मंत्रतंत्रादी उपचारही करतात. थोडक्यात परिहार देवऋषी किंवा भगताचे काम करतो.

३) रजालिया

भुमका आणि परिहार यांच्यासाठी निरोप्या आणि हरकाम्या म्हणून काम करणाऱ्याला रजालिया म्हणतात. रजालियाची निवड भुमक्याच्या संमतीने करतात. एखादा विधी करण्याचे ठरल्यानंतर तो केव्हा करण्याचे निश्चित केले आहे याची गावातील लोकांना सूचना देणे, सामग्री गोळा करणे, गावात होणाऱ्या धार्मिक, सामाजिक सभांची सूचना गावकऱ्यांना देणे इत्यादी कामे रजालिया करतो. अंगात आले असताना भुमका अथवा परिहार अंगविक्षेपातून आणि हाकाऱ्या-हुकाऱ्यातून जे सुचवत असतो त्याचा अर्थ तो गाऱ्हाणे घेऊन आलेल्या व्यक्तीला समजावून सांगतो. रजालिया सार्वजनिक पूजेची वर्गणीही गोळा करतो. पूजेनंतर घरोघरी प्रसाद पोहोचवतो.

कोरकूंचे आचारविधी भुमका अथवा परिहार पार पाडतात. पूजेस सुरूवात करताना पुजारी देवांना आवाहन करतो. त्याद्वारे त्याच्या अंगात देवाचे वारे येते, असे समजले जाते. 'या गीतांतून कोरकूंच्या ईश्वरासंबधीच्या श्रद्धा स्पष्ट होतात. शिवाय त्यांची पूजा पद्धती आणि भक्तीचे स्वरूप प्रत्ययाला येते' (*पैठाहार २००५:३१*). कोरकूंची पारंपारिक लोकगीते आजही प्रचारात आहेत. त्यात विविधता आहे. प्रसंगाला अनुसरून गीतांचे प्रकार, वादक कोण हे ठरलेले असते. सणवार आणि उत्सवाच्या प्रसंगी पुजाऱ्याच्या अंगात येते आणि त्याच्या माध्यमातून देव प्रकट होतात अशी कोरकूंना खात्री वाटते. दैवतांची स्तुती करणाऱ्या गीतांना 'देवसिरींज' आणि पूर्वज पुजाऱ्याच्या अंगात आले असताना गायल्या जाणाऱ्या गीतांना 'देवकुदना' सिरींज म्हणतात. कोरकूंच्या पारंपारिक लोकगीतातून कोरकू मानसातील श्रद्धांचे स्वरूप उलगडत जाते. नवस करताना, देवपूजा करताना किंवा कुलधर्म (*नोस*) करताना कोरकू आनंदाने देवसिरींज गातांना दिसतात त्याला घुंगरू, म्हशीचे शिंग इत्यादी वाद्यांची साथ असते. या वाद्यांचा गजर टिपेला

पोहोचलेला असताना पुजाऱ्याच्या अंगात येते. त्यांच्या माध्यमातून देवाशी संवाद साधला जातो. काहीवेळा तेथे हजर असणाऱ्यांपैकी काहींच्या अंगात येते. अंगात आलेली व्यक्ती स्पष्ट भाषेत न बोलता हाकारे-हुकारे देत असते. त्याचे हावभावही बदलतात. भुमका किंवा परिहार देवांपर्यंत भक्ताचे गाऱ्हाणे पोहोचवतात. थोडक्यात त्यांची भूमिका देव आणि भक्त यांच्यातील माध्यमाची आहे. म्हणूनच दैवतांच्या यादीत त्या दोघांनाही देवा- इतकेच महत्व दिले जाते. अंगात आले असतांना त्यांच्या हाकाऱ्या-हुकाऱ्यांचा अर्थ फक्त रजालियालाच समजतो. हजर असणाऱ्यांना तो त्या अर्थाचा उलगडा करून पटवून देतो.

भुमक्याला उद्देशून गायल्या जाणाऱ्या एका देवसिरींजमध्ये 'देवपूजेसाठी तयार केलेल्या मांडवाचे वर्णन आहे'. 'बांबूच्या हिरव्या निळ्या फाद्यांनी मांडव तयार केला आहे. त्याला नारळाची आणि लिंबाची जोडी टांगलेली आहे' (*बऱ्हाटे १९०७:२९१*). याच गीतात 'खारीक, लिंबू, शेंदूर, नारळ, काजळ, कुंकू, कोंबडी, बकरा, खिचडी व दारू इत्यादी पूजेच्या सामग्रीची यादीही आहे' (*बऱ्हाटे १९०७:२९१*). ते गीत पुढील प्रमाणे आहे -

'हारो, निलो बास का मांडवा बाबा मारो
हारो, निलो बास का मांडवा रे
मांडवा में जोडा नारियल टांगी रायारे की
बाबा मारो हारो निलो बास का मांडवारे ।।१ ।।
मांडवा में जोडा लिंबूबा टांगी रायारे की
बाबा मारो हारो निलो बास का मांडवारे।।२ ।।

भुमकारी भुमकारी खारीक, लिंबू पूजनवालो भुमकारी
भुमकारी नारीयल, सेंदूर पूजनवालो भुमकारी
भुमकारी काजळ, कुंकू पूजनवालो भुमकारी
भुमकारी मुरगी, बकरा पूजनवालो भुमकारी
भुमकारी दारू खिचडा पूजनवालो भुमकारी''

कोरकू मुळात निसर्ग तत्त्वाचे पूजक आहेत, निसर्गदेवतेला पहिला मान देऊन 'सोने

की दिवाला रूपे की बाती ओ, पहिला आरती धरती आसमान' अशी आरतीची सुरूवात ते करतात (*बऱ्हाटे १९०७:२८८*). नंतर क्रमाने इतर देवांची आरती होते. 'कोरकूंच्या लोकगीतातून त्यांच्या देवदेवतांना आवाहन करण्याचा एक विशिष्ट क्रम पाहायला मिळतो' (*बऱ्हाटे १९०७:२८९*).

सोनेकी दिवाला रूपेकी बाती ओ
सोनेकी दिवाला रूपेकी बाती
पहिला आरती आरती आसमान
सोनेकी दिवाला रूपेकी बाती ओ
पहिला आरती खेडवाला हनुमान
सोनेकी दिवाला रूपेकी बाती
पहिला आरती खेडवाला देवाला
सोनेकी दिवाला रूपेकी बाती

चौरे यांनी विवाहाचे आमंत्रण देणाऱ्या गीतातून हा क्रम, 'मुठवा, खेडा, खट्टी, हरदुला, बिजासरी, हनुमंत असा असल्याचे दाखवून दिले आहे (*चौरे १९८९:३४*).

गाजो रे गाजो बेडा गाव की चिठ्ठी ।
गाजो रे गाजो मुठवा गोमाज की चिठ्ठी।
टुडी व बन्जा सागु टुडी वा दो ।
अल्ल नअ बाजा सागु टुडी बन्डो ।
गाजो रे गाजो बेडा गाव की चिठ्ठी ।
खेडा गोमाज की चिठ्ठी।
गाजो रे गाजा खनेरा गोमाज की चिठ्ठी।
गाजो रे गाजो बेडा गाव की चिठ्ठी ।
गाजो रे गाजो खट्टी गोमाज की चिठ्ठी।
गाजो रे गाजो बेडा गाव की चिठ्ठी ।
गाजो रे गाजो हरदुला गोमाज की चिठ्ठी।
गाजो रे गाजो बेडा गाव की चिठ्ठी ।
मरोड माय बीजासरी माय की चिठ्ठी।
गाजो रे गाजो बेडा गाव की चिठ्ठी ।

देव नवसाला पावतो आणि संकटाचे निवारण होते, यावर कोरकूंची श्रद्धा असल्याचे त्यांच्या गीतातून दिसते. 'एक स्त्री आपल्या सखीला नवस करण्यासाठी ताट घेऊन देवाला चलण्याची विनंती करत आहे. प्रथम मुठवा, नंतर महादेव, हनुमान, जिराडबाबा (*स्थानिक देवता*), खुकलिमाय, सानिमाय यांची पूजा करून नवस करूया असे ती सांगते आहे' (*बऱ्हाटे १९०७:२६५*) –

'म्यानी मुन्डि ताम्बा मुन्डि पेरिलेओ रानीबाई
म्यानी थाळा,पोपा थाळासजिलेओ रानीबाई
भला भला देवता को निवताओ।।
मुठवामा देवता के आरुतओ रानीबाई
भला भला देवता को निवताओ।।
शिव-शंकर देवता के आरतिओ ओ रानीबाई
भला भला देवता को निवताओ।।
हनुमानबाबा देवता के पुजिलेओ रानीबाई
भला भला देवता को निवताओ।।
म्यानी थाळा, पोपा थाळासजिलेओ रानीबाई
भला भला देवता को निवताओ।।
जिटाङ्ग बाबा देवता के पुजिलेओ रानीबाई
भला भला देवता को निवताओ।।
खुकलीमाय देवी के पुजिलेओ रानीबाई
भला भला देवता को निवताओ।।
सानिमाय देवी के पुजिलेओ रानीबाई
भला भला देवता को निवताओ।।'

प्रसंगानुरूप नानाविध गीते कोरकूंमध्ये प्रचलित आहेत. अर्थातच ती लोकगीते परंपरेने चालत आलेली आहेत. यातील काही गीतांच्या आधारे कोरकूंच्या दैवतकल्पनांवर बऱ्यापैकी प्रकाश पडतो. कोरकूंच्या दैवतांचे स्वरूप समजून घेण्यासाठी कोरकू दैवतांचे वर्गीकरण चार विभागात केले आहे –

१) गावठाणे आणि दिशांचे संरक्षक देव

२) रोगराई आणणारे आणि निवारणारे देव-देवता

३) जनन मरण आणि विवाहविधींच्या वेळी पूजण्याचे देव

४) व्यवसायासाठी पूजण्याचे देव

१) गावठाणे आणि दिशांचे संरक्षक देव

मुठवा (*फोटो क्र. ८२*)

गाव वसवताना सहसा एकाच कुळीतील कुटुंबे एकत्र आलेली असतात. गाव वसवण्यापूर्वी मुठवा या ग्रामदेवतेची स्थापना केली जाते. त्याचा विधी पुढील प्रमाणे असतो. गाव वसवण्याची जी जागा निवडतात तेथे आठ-दहा प्रौढ लोक रात्री जाऊन झोपतात. रात्रीचे स्वप्न शुभ असेल तर ती जागा निश्चित केली जाते' (*चौरे १९८७:७५*). 'परिहाराच्या अंगात आले असतांना तो नदीतून दगड आणून चबुतऱ्यावर देवतेची स्थापना करतो. गावासाठी निवडलेल्या जागेच्या चारही कोपऱ्यात दहा ते बारा इंच उंचीचे खिळे ठोकतात. प्रत्येक खिळ्यावर कोंबडा किंवा कोंबड्याचे पिल्लू मान मुरगळून बळी देतात. बळीचे रक्त खिळंयावर शिंपडतात' (*फ्युचेस १९८८:३३०*). मुठवादेवता गावातील मृतात्म्यांचे प्रतीक असून ती गावाचे आणि गावातील लोकांचे रक्षण करणारी देवता मानतात. पुढे गावातील प्रत्येक शुभकार्याला सुरूवात करताना परिहार अथवा भुमका प्रथम मुठव्याची पूजा करतात. मुठवा ही ग्राम देवता आहे. बाहेरून येणाऱ्या दुष्टात्म्यांपासून गावाचे रक्षण करते. म्हणून या देवतेची स्थापना गावाच्या मुख्य चौकात करतात. प्रत्येक विधींच्या सुरूवातीला मुठव्याचे पूजन केले जाते. सणसमारंभाच्या प्रसंगी गावातील लोक मुठव्याभोवती नृत्य करतात. रोगराई पसरू नये म्हणून मुठव्याला डुकराचा बळी देण्याची प्रथा कोरकूंमध्ये आहे (*रसेल १९१६:५५३*). बळी दिलेल्या डुकराचे मांस कोरकू प्रसाद म्हणून खातात. मुठवा देवतेचे पूजन वर्षातून दोनदा, दसरा आणि आखाडीला करतात. पूजनात हळद, शेंदूर, नारळ, गूळ, दारू आणि रंगीत दोरा ठेवतात. या पूजनासाठी गावातील सर्व स्त्रीपुरूष व मुले हजर राहतात.

फ्युचेस लिहितात, [१२]मुठवा, भिऊ (महाभारतातील भीम) आणि [१३]कृत्येचे संतान आहे असे मानले जाते. मेळघाटातील कोरकू मुठव्याच्या जन्माची कथा सांगतात. 'पूर्वी

१२ ज्या घरात स्त्रिया अवमानित केल्या जातात ती घरे कृत्यदत्य (कृत्येची बाधा झालेली होऊन सर्व बाजूंनी नाश पावतात) (मनुस्मृती, ३.५८)

१३ ही एक मारी देवता आहे. हीची बाधा दूर करण्यासाठी शांती करावी लागते. असे कल्पद्रुममध्ये सांगितले आहे. (भारतीय संस्कृती कोश, खंड २:४६८)

दोन बहिणी वेगवेगळ्या गावात राहात होत्या. दोघींनाही चार-चार मुलगे होते. थोरल्या बहिणीच्या मोठ्या मुलांची नावे भिऊ आणि अर्जुन होती. धाकट्या बहिणीच्या मुलांनी मातीचे मोठे घर बांधले. घर बांधून झाल्यावर त्यांनी थोरल्या बहिणीला व तिच्या मुलांना जेवणासाठी आमंत्रित केले. घर पाहून थोरल्या बहिणीच्या मुलांनाही आपण घर बांधावे असे वाटले. त्यांनी झाडाच्या चिका (लाख)पासून घर बांधले. घर बघण्यासाठी व भोजनासाठी धाकटी बहिण व तिची मुले नवीन घरी आली. घर पाहून त्यांच्या मनात ईर्षा जागी झाली. मध्यरात्री घराला आग लावून ते पाचही जण निघून गेले. अचानक भिऊला जाग आली. आग पाहून त्याने आई आणि भावंडांना उठवले. ते सर्वजण सुखरूप घराबाहेर पडले. जंगलात त्यांना कृत्या नावाची राक्षसिण भेटली. ही राक्षसिण झोपाळ्यावर झोपलेली होती. तिने या सर्वांना अडवले. ती म्हणाली मला झोके द्या नाहीतर मी तुम्हाला जाऊ देणार नाही. भिऊने सांगितले मी तुला झोके देतो, माझ्या आईला जाऊ दे. भिऊवर राक्षसिण खूष झाली. तिने भिऊचा पती म्हणून स्वीकार केला. एक दिवस भिऊ आंघोळीला गेला असताना राक्षसिणीला मुलगा झाला. त्याचे नाव तिने मुठवा ठेवले आणि त्याला सांगितले की घरात कोणालाही येऊ देऊ नको. भिऊ आंघोळ करून परतला, मुठवा त्याला घरात येऊ देईना. दोघांच्यात मारामारी सुरू झाली. आवाज ऐकून राक्षसिण बाहेर आली. तिने मुठव्याला संगितले, 'हे तुझे वडील आहेत. भिऊने मुठव्याला आशिर्वाद दिला. तुला ग्रामदेवतेचा मान मिळेल आणि तुझी प्रत्येक कोरकू गावात मध्यवर्ती चौकात स्थापना होईल' (*पद्युचेस १९८८:१२८*).

धारणा (*फोटो क्र. ८३*)

धारणा किंवा उरोगोमाज या नावाने प्रत्येक कुटुंबाची कुटुंबदेवता घरा-घरात बसवली जाते. कोरकूंच्या श्रद्धेनुसार उरोगोमाज ही देवता कुटुंबाच्या पूर्वजांची प्रतिनिधी असते. कोरकू धारण्याला वडीलधाऱ्यांपेक्षा जास्त मान देतात. नवीन घर बांधताना चारही बाजूंना लोखंडी खिळे ठोकतात. भुमक्याकडून मंतरलेली पाच लिंबे घेऊन ती चारही कोपऱ्यातून मध्याकडे एकाच वेळी फेकून मध्य काढतात. मध्यावर खड्डा खणून त्यात सोने, चांदी, पैसे टाकतात. त्यावर धारणा उभा करतात. धारणा उभा केल्यावर घरातील तीन मुली व दोन मुलगे पाच प्रदक्षिणा घालतात. त्यावेळेस मुलांच्या हातात बाभळीच्या दांड्याला कापड्याच्या चिंध्या लावून केलेली पेटती

मशाल धरलेली असते. त्यावेळेस मुले विचारतात 'तुम्ही काय करत आहात? 'घरातील लोक सांगतात, 'आम्ही घराचे उजल-पूजल[१४] करीत आहोत'. हा विधी संपन्न झाल्यावर प्रथम गावातील सर्व मुलांचे भोजन होते. तदनंतर गावजेवण होते. त्या खांबाला चिखलदऱ्यात 'धारणा' तर निमाडमध्ये 'उरोगोमाज' असे म्हणतात. धारण्याची नित्यपूजा कुटुंबप्रमुख करतो. पूजेच्या वेळी घरातील सर्वजण उपस्थित असतात. विवाहप्रसंगी धारण्याची पूजा करतात. धारण्याला बांगड्या, त्रिशूळ, लिंबू, इत्यादी वस्तू अर्पण केलेल्या दिसतात. चिचखेड्यात असलेले 'चव्हाण' गावपटेल आणि भुमका अशा दोन्ही पदांवर काम करीत असत. यांच्या घरातील धारण्यावर तलवार होती. कारण विचारल्यावर, भक्ताची मन्नत पूर्ण केल्यामुळे कृतज्ञता म्हणून भक्ताने ती वाहिली आहे, असे त्यांनी सांगितले. घरातील कुठल्याही शुभकार्याच्या वेळी धारणागोमाजची पूजा करण्याची प्रथा आहे.

खेडागोमाज (*फोटो क्र. ८४*)

खेडादेवतेची शिळा टोकदार, गावाबाहेर पूर्वेला सीमेवर पण झाडांच्या राईत, झाडाखाली प्रस्थापित केलली असते भटक्या भूत-प्रेतांपासून गावकऱ्यांचे रक्षण करणारी खेडा ही ग्रामरक्षक देवता आहे. खेडागोमाजची पूजा वर्षातून दोनदा, दसऱ्याला व पोळ्याला करतात. पूजेत बकऱ्याचा बळी दिला जातो. त्याच्या मांसाचा नैवेद्य दाखवून उपस्थित असलेले पुरूष तेथेच भोजन करतात. दसऱ्याच्या दिवशी खेडा गोमाजपर्यंत रेड्याला पळवत नेतात. परत येतांना कोयत्याने वार करत मुठव्याजवळ आणतात. सरते शेवटी नाकावर कुऱ्हाडीचा वार करून बळी देतात. त्याचे रक्त जमिनीवर सांडल्याने समृद्धी येते व धान्याला कीड लागत नाही असे मानले जाते. फ्युचेस यांच्या मतानुसार, खेडागोमाज अविवाहित आहे. त्याचा स्त्रियांवर राग आहे असा कोरकूंचा समज असल्यामुळे स्त्रियांना त्याच्या पूजनात सहभागी होता येत नाही, पूजेचा प्रसादही स्त्रियांना दिला जात नाही (*फ्युचेस १९८८:३३७*). खेडागोमाजविषयी कोरकूंच्या मनात श्रद्धेपेक्षा भयच अधिक असते (*पाटिल १९९३:१३२*). कोरकू खेडागोमाज आणि मुठवागोमाज भाऊ असल्याचे मानतात.

१४ स्वच्छता व पूजा विधी

हनुमान (*फोटो क्र. ८५, ८६*)

एका देवसिरींज मध्ये हनुमान कुठे आहे या प्रश्नाचे उत्तर देतांना 'हनुमंत पिंपळाच्या झाडाखाली बसला आहे. हे मुठवा, शिवमहादेव, भीम, अर्जुन, चंद्र-सूर्य, राम-लक्ष्मण, खेडादेव आणि भुमकाबाबा या देवतांनाही माहित असल्याचा उल्लेख आहे. 'जसे सर्व हिंदू हनुमानाला रक्षक देवता मानून तिची स्थापना गावसीमेवर करतात तसेच कोरकूही हनुमानाला रक्षक देवता मानून तिची स्थापना गावसीमेवर करतात'. कोरकू हनुमानाजवळ सातमातांचीही स्थापना करतात कोरकू हनुमानाला महावीर असेही म्हणतात'. (*पाटिल १९९३:१३४*). कोरकू गावात हनुमान आणि मातेचे स्थान पश्चिम सीमेवर आढळते. हनुमानाची मूर्ती मोठ्या शिळेवर कोरलेल्या स्वरूपात असते. पाथरवटांकडून ही मूर्ती करवून घेतात. हनुमान मुळातला यक्ष असावा. 'वीर हा शब्द यक्षवाचक आहे. यक्षपूजा ही वेदपूर्व कालापासून चालत आलेली आहे (*ढेरे २००२:१८०*). यक्षासंबंधी कथात्मक स्पष्टीकरण दिले जाते ते असे, 'प्रजापतीने पाणी आणि प्राण्यांच्या संरक्षणासाठी मानवसदृश जीव निर्माण केले. जन्मतःच हे जीव भूक-भूक म्हणून ओरडू लागले. ब्रह्मदेवाला वाटले हे जीव सर्व प्राणी खातील म्हणून ब्रह्मदेव त्यांना म्हणाला, 'रक्षध्वम'. काहीजणांनी त्याचा अर्थ 'बळकावणे' असा घेतला. ते झाले राक्षस. ज्यांनी 'रक्षध्वम' चा अर्थ खाऊन टाका असा घेतला ते झाले यक्ष' (*भारतीय संस्कृती कोश खंड ७:५९१/९२*). यक्षासंबंधी असेही म्हटलेले आहे की, 'लोकमानसात यक्ष पाऊस पाडतात. धन-धान्याला समृद्ध करतात. गावाचे, गुराढोरांचे देवस्थानाचे रक्षण करतात. वांझ स्त्रियांना संतती देतात. ते विघ्नकर्ते आणि विघ्नहर्ते असे दोन्ही असतात. ते बावन्न वीर म्हणून ओळखले जातात. 'वेदपूर्वकाळात' यक्षोपासना सर्व भारतभर पसरलेली होती. या यक्षोपासनेला वैदिक संस्कृतीने स्वतःच्या उदरात समाविष्ट करून घेतले. कालांतराने यक्षपूजा ऱ्हास पावत गेली आणि यक्षाची गणना क्षुद्र देवतांच्या श्रेणीत होऊ लागली' (*ढेरे २००२:१७९*).

हनुमानाचे मूळ स्वरूपही यक्षाचेच आहे. हनुमान सर्व प्रकारच्या अरिष्टांपासून गावाचे रक्षण करतो. अवर्षण आणि दुष्काळातही हनुमानाची आळवणी करण्याची प्रथा कोरकू समाजात प्रचलित आहे व शिशुजन्मानंतरही हनुमानाला नारळ अर्पण करतात. शिशुजन्मानंतर पूजेत स्त्रिया अर्थातच सहभागी होतात. अशा श्रद्धेतून

गावाच्या वेशीवरच हनुमानाची स्थापना होते. कोरकू समाजात भुमक्याने हनुमानाची पूजा करण्याची प्रथा प्रचलित आहे.

पायविहीर गावाला लागून गोंडवाघोली गाव आहे पायविहीर गावातील जीजी छोटेलाल तोटे यांनी सांगितले.'गोंडवाघोली गावातील लोकांनी सीमेवर असलेल्या हनुमानाला आपल्या गावाच्या हद्दीत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी ठरला कारण हनुमान आपल्या जागेवरून हलला नाही. गोंडवाघोली गावात अल्पवयीन मुलांचे मृत्यू होण्यास सुरूवात झाली. गावातील लोकांनी हनुमान घेऊन जाण्याचा प्रयत्न सोडून दिला'.

हरढूला गोमाज

हरढूला सर्व दु:खे हरण करणारी देवता आहे. असे कोरकू मानतात (*चौरे १९८७:७९*). या देवतेची स्थापना गापासून एक कि. मी. दूर मोहाच्या झाडाखाली होते. वार्षिक पूजा मार्गशीर्ष शुद्ध अष्टमी किंवा दशमीला करतात. पूजेसाठी गावातील पुरूष भुमक्याच्या घरी जमा होतात. सर्व मिळून हरढूला गोमाजला जातात. या पूजेत फक्त पुरूषच सहभागी होतात. तेथेच भोजन तयार करतात. त्यानंतर या देवतेजवळ असलेल्या काटेरी झुडूपाची पूजा होते. पूजनात, 'कणकेचा चौक करून त्यावर तेवता दिवा ठेवतात. भुमका उघड्याने मंत्रजप करतो. चौकाला आणि झाडीला धूप दाखवतो, चौकाच्या चारही कोपऱ्यांवर लिंबू कापून ठेवतो, बकऱ्याचा बळी देतो, नारळही फोडतो. भुमका तेथेच तयार केलेल्या भोजनाचा हरढुलाला नैवेद्य दाखवतो. त्याचा प्रसाद कोणीही पाच प्रौढ, भुमका, रजालिया आणि गावपटेल घेतात. या देवतेला नवस करण्याची प्रथा प्रचारात आहे. या पूजेत नवस करणारे किंवा नवस फेडणारे लोकही हजर असतात. भुमक्याच्या पूजेनंतर ज्यांना नवस करायचा आहे ते नवस करतात. ज्यांना नवस फेडायचा असेल ते कोंबड्याचा बळी देतात. तेथेच अन्न शिजवून, शिजवलेले अन्न व बळीच्या मांसाचा नैवेद्य दाखवून प्रसाद ग्रहण करतात.

बंजारनमाय

ही देवी गुराढोरांचे वन्यपशूंपासून संरक्षण करते असे कोरकू मानतात. धारणीजवळ

टिमगड येथे डिसेंबरमध्ये या देवीची वार्षिक जत्रा (*मेळा*) भरते. दूरदूरचे कोरकू जत्रेला येतात. तऱ्हेतऱ्हेच्या दुकानांनी गाव गजबजून जाते. गोंदवणाऱ्या स्त्रियाही या जत्रेत हजर असतात.

२) रोगराई आणणारे आणि निवारणारे देव-देवता

देवीमाता (भुवानी माता)

या देवतेला कोरकू 'बडी माँ' असे संबोधतात. 'गाव स्थापनेबरोबर या देवतेची स्थापना करतात. जागेची निवड परिहार अथवा भुमका करतो. सर्वसाधारणपणे हिचा तांदळा मुठवागोमाजपेक्षा मोठा असतो'. कोरकू म्हणतात 'ये माँ खूष है तो बच्चा होता है, अगर घुरसा हो गयी तो बच्चों को बिमार करती है इसीलिये हम इस देवीमा की पूजा करते है'. मुळात ही देवता सर्जनाची देवता आहे. ती आरोग्य देते. परंतु ती रूष्ट झाल्यास आजार पसरवते असे कोरकू मानताना दिसतात (*फ्युचेस १९८८:३४१*). दरवर्षी श्रावण महिन्यात या देवतेची पूजा गावाबाहेर भुमका किंवा परिहार करतात. पूजनात इतर सामग्रीबरोबर बकराही असतो. बकरा वर्गणीतून आणतात. नैवेद्य मांस आणि मलिदा यांचा असतो. हा प्रसाद घरोघर पोहोचवतात. या पूजेत गावातील सर्व पुरूष सहभागी असतात. चैत्रात आाणि दसऱ्याच्या उत्सवात या देवीला विशेष मान मिळतो. ज्या दिवशी गावाबाहेर मातापूजा करतात त्याच दिवशी गावसीमेवरच्या देवीच्या देवळात नवरा-बायको जोडीने देवीची पूजा करतात. देवीला हळद, कुंकू, खोबऱ्याचे तुकडे, बांगड्या वाहतात. देवीपुढे उदबत्ती आणि तेलाचा दिवा लावतात. शिऱ्याचा नैवेद्य दाखवतात (*पायविहिरमध्ये पूजा प्रत्यक्ष पाहिली आहे*). या देवीला मातामाय असेही म्हणतात.

भैसासूर

भैसासूर आत्मारूपी देवता आहे म्हणूनच त्याला रूप बदलता येते. तो डुकराच्या रूपात दलदलीच्या ठिकाणी उपस्थित असतो असे मानले जाते. तो गुरांच्या कळपांचे व गव्हाच्या उभ्या पिकांचेही रक्षण करतो. दरवर्षी चैत्रात आणि दसऱ्याला त्याची पूजा करतात. पूजेत काळ्या डुकराचा बळी देतात. जमलेले लोक बळीचे मांस प्रसाद म्हणून खातात. गावात गुरांमध्ये तोंडाचे किंवा पायाचे रोग बळावल्यास डुकराचे जिवंत पिल्लू गुरांच्या गोठ्यात दफन करतात. गव्हाच्या पेरणीच्या आणि कापणीच्या

वेळेस या देवतेची पूजा करतात. कापणी करतांना गव्हाच्या लोंब्या अर्पण करतात. हा देव इतका ताकदवान आहे की ज्याच्या अंगात येतो त्याला ताप भरतो व त्याच्या नाक, तोंड व ओठातून रक्त येते असे मानतात. या देवाला यातुविधींमध्येही स्थान आहे (*फ्युचेस १९८८:३३३*).

दैयत (*फोटो क्र. ८७*)

विवाह होण्यापूर्वी एखाद्या तरूणाचा मृत्यू झाला तर त्याच्या आत्म्याचे रूपांतर दैयतात होत. हा आत्मा रूष्ट झाला तर लोकांना त्रास देतो अशी माहिती चांदपूरच्या खानजी तोटे यांनी सांगितली. जरिदा येथे भेटलेल्या संतोष बैठेकर यांनी सांगितले, डवराबाबा, चुमक्याबाबा, दैयत आणि पीरबाबा हे चौघे भाऊ आहेत. हे सर्व राक्षस कुळीतील आहेत. दैयत जंगलात किंवा एकांतात असलेल्या वास्तूत राहातात. एकट्या-दुकट्या स्त्रीला, विशेषत: गर्भवतीला गाठण्याचा प्रयत्न करतात. दैयतामुळे गर्भपात होतो असा कोरकूंचा समज आहे. अशाच प्रकारची मुंजा ही संकल्पना हिंदू समाजात प्रचलित आहे. तरूणाचा मृत्यू झाल्यास त्याचा आत्मा मुंजाच्या रूपात पिंपळाच्या झाडावर राहातो असे मानले जाते.

अस्तरी

अविवाहित तरूणीचा मृत्यू झाल्यास तिच्या आत्म्याचे रूपांतर 'अस्तरीत' होते आणि ती पाण्याच्या स्रोताजवळ राहाते. मासेमारीसाठी किंवा आंघोळीला येणाऱ्या मुला-मुलींना ती त्रास देते असे कोरकू मानतात (*फ्युचेस १९८८:३५०*).

बिजासरी (सातमाता) (*फोटो क्र. ८८*)

मुठवा, खेडागोमाजची पूजा करूनही आजाराला उतार पडत नाही असे लक्षात आल्यावर व्याधींनी त्रस्त झालेल्या कोरकूंनी, व्याधींनाच देवता मानून देवता परिवारात समाविष्ट केले. नंतर प्रत्येक व्याधीसाठी स्वतंत्र देवता ही संकल्पनाही साकार झाली असावी. 'आज कोरकू दैवत परंपरेत बिजासरी, बडी माय (*देवी*), छोटी माय (*कांजिण्या*), जरी माय (*मलेरिया, मोतीझरा*), मरी माय (*प्लेग, महामारी*) शीतलामाय (*इतर अन्य आजारांपासून रक्षण करणारी*) छटी माय (*माता-बालकांचे आरोग्य रक्षण करणारी*). या सर्वांना एकत्रित सात माय असे संबोधन लाभलेले

दिसते' (*पाटिल १९९३:१३३*). बिजासरीजवळ ठेवलेला त्रिशूळ गालात खोचून, शरीराला कष्ट देणारे प्रायश्चित घेतल्याने मनोवांछित फळ मिळते असे कोरकू मानत असल्याचे दिसते. बिजासरीजवळ असलेला त्रिशूळ गालात खोचून देवीची उपासना करण्याची प्रथा प्रचारात आहे. कोरकू बिजासरी मातेची आळवणी करताना पुढील गीत गातात

सातपुड धरती बारा गज धरती।
जिखम फोडी कर, निकलई।
बीजासरी माई, उरका वली माई।
उरका वली माई, पुरखा वली माई।
रूनझुन वालीग अडूलवालीय माई ।
गरूर वाली माई, अन्डनी वाली माई।
घूमडी वालई माई, सपना वाली माई।
माता तूखअ, चांद सूरज।
गौरा पार्वती की ढुवा।

भूमीच्या सात थरांखाली, बारा हात जमीनीमध्ये बिजासरी (रोग नाहीसा करणारी) मातेचा निवास आहे. ती भूमीला फोडून वर आली म्हणूनच तिला उरकावाली किंवा इतरही अनेक नावांनी संबोधले जाते. या गीतात बिजासरी रोग भगानेवाली माता आहे असे स्पष्ट म्हटले आहे' (*चौरे १९८९:१६*).

'कोरकूंना बिजासरी या देवतेची भीती वाटते कारण ही देवता बालकांमध्ये अपस्मार निर्माण करते असे मानले जाते. ही देवता इतर रोग निर्माण करणाऱ्या सात बहिणींच्या समूहात महत्वाची असते. आश्विन आणि चैत्र महिन्यात या देवतेची पूजा करतात. विवाहप्रसंगी या देवतेला कापड अर्पण करण्याची कोरकूंमध्ये प्रथा आहे. आरोग्यरक्षणासाठी शिशुंच्या गळ्यात या देवतेच्या नावाने जिवती सारखा ताईत घालतात' (*फ्युचेस १९८८: ३४८*) शिशूला आरोग्य आणि दीर्घायु लाभावे म्हणून शिशूच्या गळ्यात जिवती घालण्याची व भिंतीवर जिवतीचे चित्र असलेला कागद चिकटवून श्रावणातल्या दर शुक्रवारी तिची पूजा आणि आरती करण्याची प्रथा महाराष्ट्रातील ग्रामीण आणि नागरी समाजातसुद्धा प्रचलित आहे. कोरकू या देवतेजवळ खांबावर लहान लोटीत पाणी टांगून ठेवतात. हे पाणी रोगनाशक आहे

असे मानले जाते. 'जिवती ही मुळात बालभक्षक देवतांच्या समूहात नांदणारी देवी आहे' (*ढेरे २००७:पहिली ओळख*) 'रावणकृत कुमारतंत्रात जन्माच्या पहिल्या दिवसापासून बाराव्या दिवसापर्यंत क्रमाने बालकांना झपाटणाऱ्या बारा स्त्रीरूप बालग्रहांच्या शांतीचे विधी सांगितले आहेत' (*ढेरे २००७:१०५/६*). या बालघातिनी मातांच्या रूपाने मातृत्वाचे भक्षक रूप अनिष्ट निवारणासाठी मानवाने पूजनीय मानले. श्रीकृष्ण राऊत यांनी 'कोरकूंची लोकगीते' या लेखात नमूद केले आहे की, 'कोरकू मध्य भारतातील मूळ रहिवाशांपैकी आहेत'. हे मानले तर त्यांच्याकडून लिंगयोनी पूजा स्वीकारून वैदिक धर्माने-सनातन हिंदू धर्माने तिला मान्यता देऊन उदात्त रूप दिले असावे असे वाटते आणि 'बिजासरी' नावाचे बिजाक्षरी मंत्राशी स्पष्टपणे साम्य जाणवते' (*राउत २००८:११८*). दुर्गा भागवत यांच्या 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथात एक कथा दिलेली आहे. महादेवाने बिजाक्षरी हा मंत्र पार्वतीला विंध्याच्या एका शिखरावर बसून देण्यास सुरूवात केली, परंतु मंत्र चालू असतानाच पार्वतीला झोप लागली. मंत्र अर्धाच ऐकल्यामुळे पार्वती अमर झाली. पण तिला इतर कोणालाही मृत्यू पासून वाचविता आले नाही (*भागवत १९९६:१२९*). याच ग्रंथात सप्तमातृकांची कथा दिली आहे. या कथेत सप्तऋषींच्या भार्या या सात बहिणी आहेत. अग्नि त्यांच्यावर मोहित झाला. त्यांच्यापैकी चंद्राची कन्या 'स्वाहा' हीला अग्निचा मोह आवरता आला नाही. अरूंधती सोडून इतर ऋषीभार्यांचे रूप घेऊन ती अग्नीशी रममाण झाली व अग्नीचे वीर्य जंगलात नेऊन टाकले. त्यापासून स्कंदाचा जन्म झाला. क्रोधित झालेल्या ऋषींनी आपल्या भार्यांचा त्याग केला. या सहा आणि ऋषींच्या क्रोधातून उत्पन्न झालेली धात्री या सातजणींनी बालकाचे पालन-पोषण केले. त्या लोकमाता किंवा सप्तमातृका म्हणून ओळखल्या जातात (*भागवत १९९६:१६३*). या सात आणि आठवी स्वाहा मिळून आठही जणींसाठी वीराष्टक म्हणतात (*भागवत १९९६:१६३*). श्रीकृष्ण राऊत यांच्या मतानुसार बिजासरीचा संबंध शंकराने पार्वतीला दिलेल्या बिजाक्षरी मंत्रातील पार्वतीशी आहे, परंतु प्रत्यक्षात बिजासरी देवतेचे स्थान रोगराई पसरवणाऱ्या बालघातिनी देवतांमध्ये आहे. बिजासरीचा संबंध पार्वतीशी जोडणे सयुक्तिक वाटत नाही. ती सातमातांशी संबंधित असल्याचे स्पष्ट दिसते. प्रत्येक आजाराची स्वतंत्र देवता अशा स्वरूपात या देवतांचे कार्य निश्चित आहे. कोरकू लोकगीतात तसा स्पष्ट उल्लेख आहे.

फ्युचेस यांनी उल्लेख केल्याप्रमाणे मेळघाटातील कोरकू दसरा आणि चैत्र महिन्यात एक पितळी गाडी तयार करतात. या गाडीची चाके लाकडाची असतात. या गाडीवर दोन पताका लावतात. या गाडीत नऊ देवतांची स्थापना करतात. त्यातील एक पुरूष देवता असते. पुरूष देवता गाडीवान आहे असे मानतात. गाडीतील देवतांचे स्थान ठराविक आणि नावे निश्चित केलेली आहेत (*फ्युचेस १९८८:३४४*). गाडीतील देवतांची नावे, कार्य खालील प्रमाणे आहेत.

१) **अगवानी मात्य** ही गाडी चालवणारी पुरूष देवता आहे. त्याची उत्पत्ती वावटळीतून झाली आहे. तो एक दुष्ट आत्मा आहे असे मानले जाते.

२) **देवीमाता** या देवीला मातामाय या नावाने ओळखले जाते. या देवतेच्या अनुमतीने रोगराई पसरते असे कोरकू मानतात. 'सितलामातेशी या मातेचे साम्य असावे असे फ्युचेस यांना वाटते' (*फ्युचेस १९८८:३४४*).

३) **कापसीमाता** ही देवता 'गोवराची' देवता मानली जाते.

४) **बाबरा माता** या देवतेच्या अवकृपेमुळे अंग खाजते. अंगावर लाल चट्टे उमटतात.

५) **जोवारी माता** अंगावर मोठे-मोठे फोड येतात

६) **गोनामाता** या देवतेच्या अवकृपेमुळे जनावरांचे शरीर खाजते. शरीराची आग होते. शरीरावर मोठ-मोठे ज्वारीच्या आकाराचे फोड येतात.

७) **चूर्णीमाता** अंगावर फोड येतात.

८) **अंगलिजा माता** या देवतेच्या अवकृपेमुळे मुलांमध्ये जुलाबाच्या आजाराची लागण होते. या देवतेच्या हातात असलेल्या भांड्यात प्रज्वलित अग्नि असतो.

९) **फागरा माता** शरीरावर फोड येतात.

यातील बहुतेक जणी त्वचारोग निर्माण करणाऱ्या आहेत. सप्तमातृकांशी यांचा काय संबंध आहे हे कोरकूंना माहिती नाही. कोरकू या सात बहिणी आहेत असे मानतात (*फ्युचेस १९८८:३४४*). उत्सवानंतर ही गाडी धुतात. कोरकू हे तीर्थ रोग प्रतिबंधक आहे असे मानतात (*फ्युचेस १९८८:३४४*). मेळघाटातील सध्याचे कोरकू मात्र या

गाडीविषयी माहिती नाही असे सांगतात. कदाचित ही प्रथा बंद झाली असावी आणि त्यानंतर बराच काळ लोटल्यामुळे ती पूर्णत: विस्मरणात गेली असावी.

शितलामाता (*फोटो क्र. ८९*)

या देवतेची शिळा ओबडधोबड छिद्रमय असते. कडुलिंबाच्या झाडाखाली तिची स्थापना करतात. लिंबाच्या झाडावर ती वास करते असे मानले जाते. ती गाढवावर बसून रोगी असलेल्या घरात येऊन राहाते. ती घरात आली असताना घर पवित्र राहावे म्हणून घरातील लोकांना बाहेर जाणे किंवा घराबाहेरील लोकांनी घरात येणे अनुचित मानतात. घरात रोगी आहे अशी सूचना बाहेरच्या लोकांना मिळावी म्हणून दारावर लिंबाची फांदी टांगून ठेवतात. काही वेळा रोग्याचे वडील डोक्यावर पेटता अग्नि ठेवून देवीच्या पूजेला जातात. घरातील कोणीतरी एक व्यक्ती ओलेत्याने देवळात जाऊन देवीच्या स्नानाचे तीर्थ आणून रोग्यास पिण्यास देतात. घरात चुलीतला अग्नी पेटता ठेवतात. रोग्याजवळ रात्रंदिवस दिवा लावून ठेवतात. रोग्याला बरे वाटल्यावर कुटुंबप्रमुख देवळात पूजा करतो. पूजनात खीर, पुरी, दहीभाताचा नैवेद्य दाखवतात. विवाहित स्त्रिया देवीला हळद, कुंकू, पिवळी चोळी वाहतात. ग्रामीण समाजात सुद्धा गोवर, कांजण्या झाल्यास शितलामातेला दहीभाताचा नैवेद्य दाखवतात.

चिखलदऱ्यातील कोरकू शितलामातेची कथा सांगतात–

अचलपूर पासून अंदाजे पंधरा कि. मी. अंतरावर गुहेत वैराटेश्वराचे स्थान आहे. लगतच शितलामातेचा तांदळा प्रस्थापित केलेला आहे. 'प्राचीन काळी या प्रदेशावर वैराट राजा राज्य करीत होता. तो शिवभक्त होता. शितलामातेने त्याला सांगितले, 'तू महादेवाची भक्ती करणे सोडून दे'. राजाने नकार दिला. माता क्रोधित झाली. तिने इतर बहिणींच्या मदतीने लोकांच्यात आजाराची साथ आणली. ही साथ राजाने मातेचे श्रेष्ठत्व मान्य करेपर्यंत चालू राहिली. अखेर राजाने शितलामातेचे श्रेष्ठत्व मान्य केल्यावर आजार थांबले'. आजही कोरकू लाकडी फळीत पाय अथवा हात अडकवून लोटांगण घालत मातेचे दर्शन घेण्याची प्रथा पाळतात.

कपालवाली माता

निमाडमध्ये कालीमातेला कपालवालीमाता म्हणतात. संसर्गजन्य रोगाची साथ पसरल्यास कोरकू आदिवासी व हिंदू शरीराला कष्ट देणारे प्रायश्चित्त घेतात. रोग पसरण्याचे कारण देवी रूष्ट झाली आहे. प्रायश्चित्त घेतल्याने देवी प्रसन्न होईल असे मानून पायात किंवा हातात लाकडी फळ्या घालून लोटांगण घालत देवाचे दर्शन घेतात. चिखलदरामातेला सुद्धा अशा तऱ्हने लोटांगण घालत दर्शन घेण्याची प्रथा अद्याप प्रचारात असल्याचे दिसते. कोरकूंच्या मतानुसार ही देवी गावोगाव फिरते. तिला योग्य वाटेल अशी व्यक्ती निवडते. त्या व्यक्तीला हगवण लागते अथवा ताप भरतो. हे टाळण्यासाठी उपाय म्हणून परिहार मुठव्याला आवाहन करतो. नंतर गावाच्या सीमेवर नारळ आणि लिंबू ठेवतो. तरीही साथ चालूच राहिली तर नदीवर जातो. खाली बसून दिव्याच्या ज्योतीकडे पाहात राहातो. पाहता-पाहता त्याच्या अंगात येते. रोगाची लागण होऊ नये म्हणून काय करावे लागेल हे देवी परिहाराच्या माध्यमातून सांगते. फ्युचेस यांच्या मतानुसार या सातही बहिणी कालीमातेचे किंवा भूमातेचे अवतार असून रोगराई निर्माण करणाऱ्या आहेत. त्यांच्यातील मोठी सितलामाय साथीचे रोग पसरवण्यात जास्त प्रभावी आहे. इतरांमध्ये मरीमाय महामारी, खासीमाय खोकला, जरीमाय म्हणजे ताप आणणारी, या जास्त प्रसिद्ध आहेत. उरलेल्या मायही रोगराई पसरवणाऱ्या म्हणूनच ओळखल्या जातात. या देवतांना प्रसन्न करण्यासाठी खालील उपाय केले जातात. (*फ्युचेस १९८८:३४५*)-

- साथीला आपल्या गावातून बाहेर घालवण्यासाठी कोरकू परिहारासह देवतेला जातात. मातीच्या भांड्यात दारू, बांगड्या, देवतेचे चित्र काढलेले कापड, रूपयाचे नाणे आणि पुऱ्या देवतेला वाहतात. पूजेत वाहिलेल्या वस्तू देवीजवळ न ठेवता परिहार गावाबाहेर तिठ्यावर नेऊन ठेवतात.
- एक छोटी गाडी तयार करतात. बोकड त्या गाडीला गवतानी घट्ट बांधतात. ही गाडी गावसीमेबाहेर हाकलतात. गाडीबरोबर रोग निघून जातो असे मानले जाते.
- रोग्याचे कपडे आणि मेवा-मिठाई गावाबाहेर ठेवल्यास रोग जातो असाही एक समज कोरकूंमध्ये आहे.

मरीआईचा गाडा

भारतीय समाजात मरीआई सातमातांमधील सर्वात मोठी बहिण असल्याचे मानले जाते. काही वर्षांपूर्वी मरीआईचा प्रकोप झाल्यास महामारीची साथ पसरते अशी संकल्पना भारतीय समाजात प्रचलित होती. साथीची लागण पसरू नये म्हणून विधिपूर्वक गाडा तयार करून त्या गाड्याला गावाच्या सीमेबाहेर सोडून येत. या गाडीबरोबर साथ गावातून निघून जाते. ही मूळ संकल्पना एकच असली तरीही तपशिलात थोडाफार फरक असल्याचेही दिसते. मरीआईचा गाडा ऐकिवात नाही असे कोरकू सांगतात, शासकीय आरोग्य योजनांमुळे साथीच्या आजाराची लागण झाली की, ताबडतोब उपचार सुरू होतो. साथ सहसा पसरत नाही म्हणून लोकविश्वास संपला असे नाही, खेडेगावातून गाड्याऐवजी देव्हारे घेऊन पोतराज फिरत असत. 'पुणे जिल्ह्यात पौडपासून पाच कि. मी. अंतरावर गारवली हे गाव आहे, या गावातील पोतराज मरीआईचा गाडा करीत असत. या गावातील पोतराजाला भेटल्यावर तो म्हणाला, 'आम्ही अनेक पिढ्यांपासून मरीआईची सेवा करत आलो आहोत, आजकाल सहसा साथींचे आजार होत नाहीत. लागण झाल्याबरोबर औषधी उपचार करतात. त्यामुळे गाड्याची प्रथा बंद झाली आहे. तरीसुद्धा आम्ही मरीआईचा देव्हारा गावात फिरवत होतो. आईची सेवा करत होतो, परंतु आम्ही बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे आईची सेवा करणे सोडून दिले. मात्र आम्हाला सेवा बंद केल्याचा परिणाम भोगावा लागला. माझा अल्पवयीन मुलगा गेला. गावात त्यामुळे भयाचे वातावरण पसरले. म्हणून अलका गणपत शेलार या न्हावी स्त्रीने ही पूजा स्वीकारली.[१] सेवा स्वीकारतांना निखाऱ्यावर चालण्याचा विधी करावा लागतो, तो तिने केला आहे. कालौघात देव्हाऱ्याची प्रथाही बंद पडली आहे'.

जनन मरण आणि विवाह विधींचे देव

जन्म

आत्मा अमर आहे आणि तो पुन्हा आपल्या कुळीतच जन्म घेतो या संकल्पनेवर कोरकू दृढ विश्वास ठेवतात. जीवन आणि मरण या घटनांवर पूर्वजांचे नियंत्रण असते असेही मानताना दिसतात. गर्भधारणेच्या क्षणी जीवनाचा आरंभ होतो असे कोरकू मानतात. म्हणून गर्भधारणा झाल्याचे निश्चित समजल्यावर गृहदेवतेची (*धारण्याची*) पूजा परिहाराकडून करवतात. परिहाराने मागणी केल्यास पशुबळी

१ शान्ताबाई गायकवाड राहाणार पर्वती वसाहत. या स्त्रीने ही माहीती दिली. प्रत्यक्ष जाऊन अलका आणि पोतराजची भेट घेतली आहे

देतात. कोरकू स्त्रियांचे बाळंतपण घरच्याघरी अनुभवी सुईनीसयानी (*दाई*) करते. बाळंतपणाचा अवधी लांबल्यास परिहाराला बोलावतात. घरात सुईनीसयानी बाळंतपण सुलभ व्हावे असा प्रयत्न करीत असते. तर पूर्वज रूष्ट आहेत असे मानून परिहार त्यांना प्रसन्न करून घेण्याचा प्रयत्न करीत राहातो. 'परिहार गृहदेवतेची (*धारणा*) कोंबडी, लिंबू, तांदूळ, इत्यादी सामग्रीने पूजा करतो. शेवटी कोंबडीचा बळी देऊन प्रसूत होणारीच्या पोटावर कोंबड्याचे रक्त शिंपडतो आणि कानात मंत्र सांगतो. जन्म झाल्यावर बाळाचे डोके दिसले की बाळाने धरतीला नमस्कार केला असे मानले जाते (*चौरे १९८९:४५*). बाळाचा जन्म झाल्यावर पूर्वजांची कृपा प्राप्त झाली असे मानले जाते. पहिला स्पर्श जमिनीचा व्हावा म्हणून बाळाला जमिनीवर ठेवतात. बाळाच्या जन्मानंतर जमलेल्या बायका गीते गातात. या गीतातून वंशवृद्धी झाली म्हणून देवाचे आणि पूर्वजांचे आभार मानले जातात. तसेच सुईनीसयानीला या गीतातून धन्यवाद दिलेले असतात. बाळाला त्याच गीतांमध्ये सुईनीसयानीच्या तोंडून आशीर्वाद दिलेले असतात (*चौरे १९८९:११*). बाळाच्या जन्मानंतर आई आणि बाळ दोघांनाही स्वच्छ करून घरातच पडदा लावून वेगळे झोपवतात. दुसऱ्या दिवशी घरातील प्रौढ स्त्री परिहाराकडे पूजेसाठी लागणारी सामग्री, नारळ, कोंबडा घेऊन जाते. ही पूजा परिहार स्वत:च करतो (*चौरे १९८९;११*). बाहेरची बाधा होऊ नये म्हणून खड्डा खणून वार घरातच पुरतात. पाच दिवस बाळंतीणीला पातळ पेज खायला देतात. या दिवसात बाळंतीण आणि नवजात यांची देखभाल सुईनीसयानी करते. पाचव्या दिवशी 'छटी देवीची' पूजा करतात. आई आणि बाळ, दोघांनाही स्नान घालतात. सुईनीसयानी आणि घरातील एखादी प्रौढ स्त्री देवीमायला छटी पूजनाचे आमंत्रण देण्यासाठी देवळात जातात. छटी देवीची स्थापना गावाच्या पूर्वेला पाण्याच्या स्रोताजवळ होते. 'ही देवी आईचे दूध वाढवणारी आणि बाळाचे रक्षण करणारी देवता आहे असे मानले जाते' (*पाटिल १९९३:३३*). जाताना त्या आपल्याबरोबर थाळीत पूजनाची सामग्री हळकुंडे, नारळ, गहू, डाळ, गूळ, तूप आणि दिवा घेऊन जातात. या दोघी देवीची पूजा करतात. थोडा गूळ देवीजवळ ठेवून बाकीचा प्रसाद म्हणून बाळंतीणीला खायला देतात. छटी देवीच्या पूजनाचा मुहूर्त संध्याकाळी असतो. त्यासाठी गावातील सर्व स्त्रिया हजर असतात. पूजा सुईनीसयानी करते. गावातील इतर स्त्रिया छटीमायची स्तुती करणारे गीत गातात –

'काटो किवडा शलम बिअेन।

घोडकी डो कुहजा बिअेन ।।

हिज्जेन डो ट्राजे लाक्केन।

सानी माय डोअपनी माय।।

आधि रीखे अम लटेन।

डा नि बाही जखत।।

अर्थ

हे आई तू ये.

फार दिवसांनी शिशुचा जन्म झाला आहे.

तू येऊन आशिर्वाद देऊन जा.

दार उघडेच आहे किंवा येण्यास काही अडचण येत असेल तर

कौलातील फटीतून ये आणि

शिशुचे भाग्य लिहून मग जा. (चौरे, १९८९:१३).

ज्या ठिकाणी वार (*नाळ*) पुरली असेल त्या जागी घरातच पूजा करतात. टिमरू किंवा तेंढूच्या फांद्या कापून त्याचे सात तुकडे–सर्वसाधारण मानवी आकाराचे–देवीमायची प्रतिमा म्हणून तयार करतात. त्यातील दोन प्रतिमांना मध्ये लाकूड जोडून प्रवेशदारात ठेवतात (*फोटो क्र. १०*). या प्रतिमा बाहेरील दुष्ट शक्तींपासून बाळ आणि बाळंतीणीचे रक्षण करतात असे मानले जाते. नाळ पुरलेल्या जागेवर उरलेल्या पाचही प्रतिमांची पूजा करतात (*फोटो क्र.* ९१) पूजनात इतर सामग्रीबरोबर कोंबडीचे पिल्लू, तीळ व गूळ असतो. पूजनानंतर जमलेल्या स्त्रियांना तीळगुळाचा प्रसाद वाटतात. पूजनाच्या शेवटी सुईनीसयानी कोंबडीच्या पिल्लाचा मान मुरगळून बळी देते (*फोटो क्र १२*). हे रक्त देवतांवर शिंपडतात. जमलेल्या स्त्रियांना आणि नातेवाईकांना बळीचे मांस व खिचडीचे भोजन देतात. ही पूजा प्रत्यक्ष पाहण्याची संधी पायविहिर या गावात मिळाली. छटीमा या देवतेला मराठीत सटवाई असे संबोधले जाते. 'ही देवी आईचे दूध वाढवणारी आणि बाळाचे रक्षण करणारी देवता आहे असे मानले जाते'. महाराष्ट्रात बाळजन्मानंतर सहाव्या दिवशी या देवतेची पूजा सर्वत्र प्रचलित आहे. पूजेत बाळाचे भविष्य लिहिण्याची प्रार्थना करतात. बाळाच्या कपाळावर सटवाई येऊन भविष्य लिहून जाते असे मानले जाते.

मृत्यू

मृत्यूमुळे शरीराचा अंत होतो. परंतु आत्मा मात्र अमर आहे. तो पुन्हा आपल्याच कुळीत जन्म घेतो. आत्मा पुन्हा जन्म घेईपर्यंत आत्म्याने इतरत्र भटकू नये म्हणून कोरकू मृतात्म्याचे स्मारक करतात. त्याला चिखलदऱ्यात 'मुंडा' तर बैतुलमध्ये 'गाथा' म्हणतात. मृत शरीर जमिनीवर ठेवतात. मृत्यू झाल्यावर मृत शरीर जमिनीवर ठेवण्याची प्रथा हिंदू समाजातही प्रचलित आहे. मृत्यू झाल्यानंतर मृताला स्नान घालून, पुरूष असेल तर पांढऱ्या कपड्यात आणि विवाहित स्त्री असेल तर लाल कपड्यात गुंडाळून स्मशानात नेतात. दक्षिण-उत्तर दोन मीटर लांब खड्डा खणून त्यात दक्षिणेकडे डोके ठेवून मृताचे दफन करतात (*फोटो क्र. ९३*). दफनात मृताचे कपडे, त्याच्या वापरासाठी गरजेच्या वस्तू आणि खिचडी ठेवतात. मृताच्या तोंडात नाणे ठेवतात. दफनावर काटे पसरतात. नंतर दफन मोठ्या-मोठ्या दगडांनी झाकून टाकतात. मृत्यूनंतर येणाऱ्या सोमवारपर्यंत पूजा करणे, मेजवानी देणे, अनुचित मानले जाते. सोमवारी गावातील व परगावातील नातेवाईक मृतात्म्याच्या शांतीसाठी एकत्र जमा होतात. पहाटे घरातील सर्व लोक व इतर नातेवाईक नदी किंवा तलावावर जाऊन स्नान करतात. परतल्यावर परिहार कोंबडा किंवा बकऱ्याचा बळी देऊन मुठव्याची व नारळ अर्पण करून हनुमानाची पूजा करतो. निमाडमधील कोरकूंमध्ये वरील सर्व विधी झाले की आमंत्रित व आप्त सात हळकुंडे घेऊन स्मशानात जातात. चिखलदऱ्यात हळकुंडांच्या ऐवजी बांबूंचे तुकडे नेतात. पशुबळी देऊन त्याचे रक्त दफनावर शिंपडतात. आणलेली हळकुंडे फडक्यात बांधून दफनावर ठेवतात. त्यावर पाणी शिंपडतात. गोत्रगोमाजच्या स्थानाजवळ अथवा नदीवर जाऊन कपड्यात बांधलेली हळकुंडे ठेवतात. तीन प्रदक्षिणा घालून त्यावर पुन्हा पाणी टाकतात. घरी येऊन हळकुंडाचे गाठोडे गृहदेवतेजवळ ठेवतात. हळकुंडे अथवा बांबूच्या तुकड्यांना मृताच्या अवशेषांचे प्रतीक मानले जाते. संध्याकाळी आमंत्रितांना जेवण देतात. या विधीला 'पितर मिलौनी' म्हणतात. हा विधी केल्याने आत्मा तृप्त होतो. त्याचा मृत शरीराशी, व जीवित नातेवाईकांशी संबंध समाप्त होतो असे मानले जाते (*पाटिल १९९३:४२*).

जीवित नातेवाईकांशी मृतात्म्याचा संबंध संपणे ही संकल्पना हिंदू समाजातही प्रचलित आहे. ते पहिल्या दिवशी स्मशानातून मृताचे प्रतीक मानून एक लहान शिळा

आणतात. या शिळेला 'अश्मा' असे संबोधले जाते. दहाव्या दिवशी नदीवर शिळेला मृताचे प्रतीक मानून तिलांजली हा विधी करतात. हा विधी केल्याने मृतात्म्याचा इहलोकाशी संबंध समाप्त होतो व त्याचा आत्मा पूर्वजात विलीन होतो, असे मानतात.

कोरकूसमाजात मृताचे स्मारक स्मृतिशिलेच्या स्वरूपात करण्याची प्रथा अस्तित्वात आहे. त्या स्मारकाला निमाड मध्ये 'गाथा' तर चिखलदऱ्यात 'मुंडा' असे संबोधले जाते आणि या उत्सवाला 'सिडोली' (*फोटो क्र. १४, १५, १६*) अथवा 'गाथा' उत्सव म्हणतात. हा उत्सव चार-पाच दिवस चालतो. या उत्सवासाठी योग्य वेळ कोणती हे परिहार सांगतो. उत्सवासाठी दूरवर गेलेले नातेवाईक जमा होतात. 'पितर मिलौनी' पार पाडल्यानंतर सिडोली उत्सव केव्हा करावा यासाठी काळाचे बंधन नाही. आर्थिक परिस्थितीनुसार सिडोलीचे आयोजन करतात. धारणी तालुक्यात हरितालजवळ रोरा नावाचे कोरकू गाव आहे. या गावात मुंडा करणारे कारागीर राहातात. प्रत्यक्ष गेल्यावर तेथे जे लोक भेटले त्यांची नावे आणि त्यांनी दिलेली माहिती खालील प्रमाणे आहे-

१)	रामकिशोर सोनाजी कासदेकर	वय ३०	शिक्षण एस्. एस्. सी
२)	मौजेलाल धिकार	वय अंदाजे ३५	शिक्षण नाही
३)	मोतीलाल ओंकार बिलावेल	वय ४०	३ री पास
४)	मोतीलाल बाबू जामुनकर	वय३५	शिक्षण नाही

सिडोली करणे अतिशय खर्चिक असते. कारण हा उत्सव ४ ते ५ दिवस चालतो. त्यामुळे पैशाची जमवाजमव झाल्यावरच परिहाराच्या अनुमतीने सिडोलीचा दिवस निश्चित केला जातो. मृत व्यक्तीचे सर्व कुटुंबीय आणि नातेवाईक मृताच्या घरी जमा होतात. काळाचे बंधन नसल्यामुळे प्रत्येक व्यक्तीची स्वतंत्र सिडोली न करता सिडोलीचा उत्सव निश्चित करेपर्यंतच्या अवधीत कुटुंबातील आणखीही कोणाचा मृत्यू झाला असल्यास सर्व मृतांची सिडोली एकत्र करतात. सिडोली लाकडाची किंवा दगडाची करतात. लाकडाची सिडोली करण्यास दोन दिवस लागतात. लाकूड आणण्यासाठी गावातील लोक व नातेवाईक रात्री वाजतगाजत नाचत जंगलात जातात. ज्या घरातील मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ सिडोली करायची त्या घरात सर्व नातेवाईक जमा होतात. घराच्या बाहेर जांभळाच्या फांद्यांचा मांडव घालतात. जमा

झालेले नातेवाईक आणि शेजारी त्या मांडवात जेवतात, झोपतात. पहिल्या दिवशी हजर असलेल्या लोकांमधील काही लोक पूजा करण्यासाठी स्मशानात जातात. जाताना ज्वारी किंवा गव्हाचे पीठ, जांभळाची पाने, हळद, लिंबू, दोरा, दूध, तंबाखू, गृहदेवतेजवळ असलेले हळकुंडाचे किंवा बांबूच्या तुकड्याचे, गाठोडे, आणि दारू घेऊन जातात. स्मशानात पोहोचल्यावर दफनाला नमस्कार करून दफनाभोवती बसतात. जमलेल्या लोकांमधून कुणीतरी परिहाराच्या मार्गदर्शनाने मृताची पिठाची प्रतिमा तयार करतात. दफनावर जांभळाच्या काठ्यांनी मांडव करून त्यात केलेली प्रतिमा ठेवतात आणि तिची पूजा करतात. कोंदो, कुटकी, साळी व दुधाचा नैवेद्य दाखवतात. हजर असलेले सर्वजण नदीवर आंघोळीला जातात. जलदेवता नदीमध्ये वास करते असे कोरकू मानतात, म्हणून हळद वाहून आणि नारळ फोडून नदीची पूजा करतात. नदीच्या तीरावर, बोट जाईल एवढे सात खड्डे करतात. प्रत्येक खड्ड्यावर एक एक अंडे फोडतात. देव अंगात आलेली व्यक्ती मुंडासाठी नदीतील दगड निवडते. दगड घेऊन सर्व लोक मृताच्या घरी परततात. येताना अवशेषांचे गाठोडे आणतात. या सात प्रतिकांची पूजा गृहस्वामी तांदूळ आणि दारू अर्पण करून करतो. बकऱ्याचा बळीही देतो. त्यानंतर जमलेले पाहुणे पाळी-पाळीने पूजा करतात. आलेल्या सर्व पाहुण्यांचे भोजन होते. रात्री उशीरापर्यंत गायन आणि नृत्य चालू राहते. दुसऱ्या दिवशी मुंड्याचे लाकूड आणण्यासाठी नातेवाईक व गावातील लोक वाजत गाजत जंगलात जातात. सिडोलीसाठी सलाईचेच (*साल*) लाकूड वापरतात. झाडाची निवड झाल्यावर झाडाला खूण म्हणून लाल रंगाचा दोरा बांधतात. वृक्ष तोडल्यामुळे वृक्षदेवता नाराज होऊ नये म्हणून नतमस्तक होऊन झाडाची प्रार्थना करतात. कोंबडा अथवा बकऱ्याचा बळी देऊन बळीचे रक्त आणि दारू झाडाच्या मुळ्यांवर शिंपडतात. झाडाला सात प्रदक्षिणा घालतात. मुळांपासून अंदाजे तीस सें. मी. सोडून फांदी कापतात. कापलेली फांदी पांढऱ्या कपड्यात गुंडाळून घरी आणतात. दुसऱ्या दिवशी फांदी सुकल्यावर मुंडा तयार करण्यासाठी कलाकाराकडे सोपवतात. कलाकाराला पाच बाटल्या महुवा आणि कुटुंबप्रमुखाच्या इच्छेनुसार पैसे देतात. मुंडासाठी अंदाजे पाच फूट लाकूड घेतात. लाकूड तासून चपटे किंवा चौकोनी तयार करतात. मुंडा चपट्या आकाराचा किंवा चौकोनी आकाराचा आणि वरच्या बाजूला गोलाकार असतो. वरच्या भागात, चंद्र व सूर्य आणि कोळ्याचे (*जंगली महाराज*) चित्र व मधल्या भागात घोडेस्वार कोरतात. घोडेस्वार शक्यतो

स्पष्ट व रेखीव असतो. स्वर्गात जाण्यास सहाय्यक म्हणून सिडोलीवर कोळ्याचे चित्रण करत असावेत. कोळी (*जंगली महाराज*) स्वर्गात जाण्यास मदत करतो अशी कल्पना सर्व भारतीय समाज मानसात असावी. मराठीत 'सुताने स्वर्ग गाठणे' अशा अर्थाची एक म्हण आहे. कोळी अगदी नाजूक दिसणाऱ्या धाग्यावरून भराभर वर चढताना दिसतो. त्यामुळे तो 'सुतावरून स्वर्गाला जातो' असे वाटले तर नवल नाही. चंद्र-सूर्य हे मृतात्म्यांचे निवासस्थान असल्याचे कोरकू मानतात. दिवसा मृतात्मा सूर्याजवळ तर रात्री चंद्राजवळ राहातो असे कोरकू मानताना दिसतात. खालच्या भागात मधल्या काळात मृत झालेल्या इतर कुटुंबियांचेही प्रतीकात्मक चित्रण करतात. दगडावरही अशाच पद्धतीने चित्रण करतात. लाकडाचा एक तृतीयांश भाग मातीत रोवतात. मुंडा रोवतांना प्रथम पितर मिलौनीच्या दिवशी गृहदेवतेजवळ ठेवलेले हळकुंडाचे गाठोडे पुरतात. निमाडमध्ये मृतस्मारकाची जागा स्मशानात, तर चिखलदऱ्यात गावसीमेवर आणि पाण्याच्या स्रोताजवळ निश्चित केलेली दिसते. मुंडा दक्षिण-उत्तर दिशेलाच उभा असला पाहिजे असा नियम आहे. कारण पूर्वेकडे तोंड करून पूजा केली जाते. मेळघाटात हळकुंडांच्या ऐवजी बांबूचे तुकडे व गवतांच्या पात्याला मृताचे अवशेष मानून मुंड्याच्या पायाशी पुरतात. कोंबडा किंवा बकऱ्याचा बळी देतात. जन्म, विवाह, मृत्यू, इत्यादी प्रसंगी मुंड्याची पूजा करतात. या पूजेत पशुबळी देतात.

पूर्व मेळघाटात, कुकरू मार्गावर बिहाली हे वनराईचे स्थान आहे. या वनराईत अनेक सिडोली आहेत. सिडोलीत असलेल्या विविध प्रकारांवरून अंदाज करता येतो की, या सिडोली भिन्न भिन्न घराण्याशी संबंधित असाव्यात (*फोटो क्र. १५, १६*). या सिडोली कुणाच्या आहेत हे तेथे भेटलेल्या महिलांना सांगता आले नाही. मात्र त्यांनी सांगितले, 'नागपंचमीला यांची पूजा करतात आणि कोंबडा बळी देतात अशी परंपरा आहे' रायपुर गावाच्या सीमेवर अशाच विविध प्रकारच्या (*लाकूड, दगड आणि मूर्ती*) सिडोली आहेत. रायपूरला भेटलेले मांगी विश्राम बैठेकर यांनी सांगितले की, सिडोलीमधली विविधता कुलांमध्ये असलेली भिन्नता दर्शविते. प्रत्येक कुळाचे सिडोलीसाठी वापरायचे माध्यम निश्चित असते.

गावप्रमुख किंवा विशेष दर्जा मिळालेल्या व्यक्तींचे स्मारक गावसीमेवर असते आणि

त्या स्मारकाला मंडो म्हणतात (*फोटो क्र. १७*). मंडोचीही दिशा उत्तर-दक्षिण निश्चित केलेली दिसते. मंडोजवळ सात शंकूच्या आकाराच्या छोट्या शिला ठेवतात. या शिला नदीतून आणतात. त्यावर कुठलेही चित्रण करत नाहीत (*फ्युचेस, १९८८:३००*). त्या सातमाता असतात असे कोरकू सांगतात. मंडो दोन फूट उंच चौथऱ्यावर, छत असलेल्या कमी उंचीच्या झोपडीच्या स्वरूपात, गावसीमेवर असतो (*फोटो क्र. १८*). मंडोला दर मंगळवारी तेलाचा दिवा लावण्याची प्रथा आहे. फ्युचेस यांच्या मताप्रमाणे, मुंडारी भाषेतील 'मुंडुकम' *(Mundukam)* या शब्दावरून 'मुंडा' हा शब्द तयार झाला असावा (*फ्युचेस १९८८:२९१*). फ्युचेस यांच्या मतानुसार, या स्मारकाचे साम्य भारतात इतरत्र आढळणाऱ्या 'वीरगळांशी' आहे. या सर्व स्मृति - चिन्हात चंद्र-सूर्याचे चित्रण आवश्यक असल्याचे दिसते' (*फ्यूचेस १९८८:३१२*).

सिडोली उत्सव कोरकू अतिशय पवित्र मानतात. स्थापन केलेल्या सिडोलीची पूजा पिढ्यानपिढ्या होत राहाते. या प्रसंगी पूर्वज येऊन आशीर्वाद देऊन जातात, असा कोरकूंना विश्वास वाटतो. सिडोली उत्सवाची रात्र गाणी गाऊन साजरी करतात. या गाण्यांना फुलजागणी सिरींज म्हणतात. या गीतांव्दारे पूर्वजांना पुन्हा जन्म घेण्यास प्रोत्साहित करणे असा असावा. डॉ. बऱ्हाटे यांच्या मतानुसार, 'सिडोली उत्सवात प्रौढ स्त्री पुरूष समोरासमोर बसून गाण्यात एकमेकांना लैंगिक हावभाव करून कामोत्तेजित करतात. त्यामागे वंशवृद्धी करणे हा मुख्य उद्देश असतो. मृतात्म्यांना आवडणारा हा प्रकार आहे, असे कोरकूंना वाटते' (*बऱ्हाटे २००७:२९२*). सिडोली उत्सवात गायल्या जाणाऱ्या गीतांतील एक गीत खाली देत आहे.

'टोटी री सारा ढामा जोडा
रजलिया बोल आधी रात।
पांच पितूर नऊ पंच जुडाया
रजलिया बोल आधी रात।
कौन बोको नी गंगा मिलाया
रजलिया बोल आधी रात।
सुरता बेटा जो पुत्रई धरिया
सुरता खाडडाई जो सगुन धरिया
रजलिया बोल आधी रात।

सुरता जेष्टानी नऊ पुत्र उथायो
बेडा डुडमा जो गाथा उथायो
रजलिया बोल आधी रात।
कौन बोको नी गंगा मिलायी
रजलिया बोल आधी रात। (बन्हाटे, २००७:२९२).

अर्थ

मध्यरात्र उलटली आहे. रजलिया सांग,
कोणत्या पुण्यात्म्याने हा उत्सव रचला आहे?
पाच पितरांच्या या उत्सवात
या नऊ पंचांना कुणी बोलावले?
कोण्या भावंडाने या गंगेचे मिलन केले आहे?
सुरता ह्या मृतात्म्याच्या मुलाने हा उत्सव भरवला आहे.
त्याच्या बायकोने दिव्यात तेल घातले
सुरताच्या मोठ्या मुलाने दिव्यात वात घातली.
सुरताच्या पुत्रवधूने दिवा प्रज्वलीत केला.
सुरताचा डुडमा[१६] ह्याने उत्सव भरवला आहे.
गावातल्या पंचांना व लोकांना आमंत्रित केले आहे.
गंगेसारखे पवित्र काम केले आहे
त्यांनी गाथा उत्सव सुरू केला आहे.'

विवाह

कोरकू समाजात बालविवाह प्रथा नाही. वडीलधारी आणि भुमका विवाह ठरवतात. वधूला मागणी घालण्याची व वधुमूल्याची प्रथाही प्रचारात आहे. पूर्वी वीस/पंचवीस रूपये नगद, पंचायतीसाठी पाच रूपये, नातेवाईकांसाठी पाच कपडे असा ढेज वधुपित्याला मिळत असे. आधुनिक काळात हजार रूपयांपर्यंत नगदी रकमेत वाढ झाली आहे. विवाहाचा बहुतांश खर्च वरपक्ष करतो म्हणूनच विवाह प्रसंगात वरपक्षापेक्षा वधुपक्ष वरचढ ठरतो. विवाहाचा प्रस्ताव करताना वंशवृद्धी आणि दोन कुटुंबातील नात्याची गाठ या गोष्टी विचारात घेतल्या जातात. वरपक्षाचा भुमका


१६ मुलगा

वधूची निवड करतो. निवड करताना सामाजिक दर्जा आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेतली जाते. विवाह निश्चित करताना दोन्ही गावातील भुमके व प्रौढ मंडळी किंवा पंच मध्यस्थाची भूमिका करतात. त्यांना 'सिथोरा' म्हणतात. मुलीची निवड झाल्यावर वरपक्षाचा 'सिथोरा' वधूच्या गावात जाऊन त्या गावातील पंचांसमोर वधूला मागणी घालतो. वधुपक्ष वधूच्या भविष्याचा विचार करून होकार देतात. होकारानंतर देज ठरतो. वर पक्षाकडून मिळणाऱ्या इतर वस्तूंना आणि वधुमूल्याला 'देज' म्हणतात. दोन्ही पक्षातर्फे देज मान्य झाल्यावर वरपक्षातर्फे वधूपित्याकडे एक किलो गूळ, एक नारळ आणि एक बाटली दारू देतो. या वस्तू पंचांमध्ये वाटतात. देज म्हणून मान्य झालेल्या इतर वस्तू सगाई किंवा विवाहप्रसंगी देतात. दोन्ही पक्षांच्या संमतीने आणि सोयीने सगाईची तिथी ठरते. वराचे वडील वधूसाठी साडी चोळी आणि सगेसंबंधी घेऊन वधुच्या गावात येतात. वरपक्ष आल्याची सूचना मिळाल्यावर वधूचे वडील व गावातील मंडळी त्यांचे स्वागत करतात. वधूच्या अंगणात सगाई संपन्न होते. वधूसाठी आणलेले कपडे व नऊ रूपये वराचे वडील वधूच्या पित्याकडे देतात. वधू हे कपडे घालून सासऱ्यांच्या व इतर उपस्थित लोकांच्या पाया पडते. त्या नंतर समोरासमोर बसून भोजन होते. विवाहाची तिथी ठरते.

विवाह तिथीच्या आधी दोन ते तीन दिवस वरपक्षाकडून देज, सजवलेल्या गाडीतून वधूच्या गावाला पाठवतात. देज गाडीत ठेवण्यापूर्वी धारणागोमाज जवळ ठेवतात. वराचा मोठा भाऊ तांढूळ, तेवता दिवा, कुंकू, नारळ, पाच लिंबे, गूळ, इत्यादी सामग्रीने धारणा आणि देजची पूजा करतो. बरोबर नेलेलल्या जळत्या गोवरीवर तेल टाकून धूप टाकतो. नारळ फोडतो. नारळ आणि गुळाचा प्रसाद वाटतात. पूजेतील एक लिंबू विवाहासाठी प्रस्थान करताना वराच्या कट्यारीवर खोचतात. पूजा आटोपून वराचा मोठा भाऊ बाहेर येऊन गाववाल्यांना 'रामराम' करतो. नंतर गावातील सर्व सौभाग्यवती स्त्रिया मुठवागोमाजची पूजा करतात. वराची बहिण बैलगाडीची पूजा करते. गावातील स्त्रिया गीत गाऊन देजगाडीची 'विदाई' करतात. देज पोहोचल्यानंतर विवाहाची पूर्व तयारी म्हणून कोरकू खडापाटी लाना, मुठवागोमाजची पूजा आणि पूर्वजांना विवाहात आमंत्रित करणे या प्रथा काटेकोरपणे पाळतात. विधींचा आरंभ 'खडापाटी'ने होतो.

खडापाटी लाना

ही प्रथा 'विवाहासाठी नवीन चूल तयार करावी' यासाठी योजलेली दिसते. वरपक्षाकडील स्त्रिया डोक्यावर पाटी ठेवून वाजत-गाजत गावसीमेवर जातात. तेथे प्रस्थापित असलेल्या खेडागोमाजची यथासांग पूजा करतात. खेडागोमाजजवळची माती चुलीसाठी आणतात. येताना वाटेत मुठवागोमाजची पूजा करून त्याला विवाहाला येण्याचे आमंत्रण देऊन घरी परततात. घरी आल्यावर धारण्याची पूजा करताना 'हे पूर्वजांनो तुमच्या वंशजाचा विवाह आहे आपली उपस्थिती आवश्यक आहे तेव्हा जरूर या'. असे कोरकू भाषेत आमंत्रण करतात. आणलेल्या मातीतून इफ्टीन (मातीची चूल) तयार करून तिची पूजा करतात (*फोटो क्र. ११*). या चुलीवर विवाहानंतरचे भोजन शिजवतात. चिखलदरा येथे विवाहानंतरच्या भोजनाच्या स्वयंपाकासाठी चर खणतात. त्याला अळीगड्डा म्हणतात. स्वयंपाक करण्यापूर्वी अळीगड्ड्याची पूजा करतात. तयार केलेल्या भोजनाचा पहिला घास अळीगड्ड्याला अर्पण करतात. या घासाला 'घासबचोगे' म्हणतात. भारतात सर्वत्र विवाहासाठी नवीन चूल बनवण्याची प्रथा आहे व त्याच नव्याचुलीवर विवाहाच्या मेजवानीचा स्वयंपाक करतात. स्वयंपाक करण्यापूर्वी पेटलेल्या अग्नीत तांढूळ टाकतात. आजही चुलीवर स्वयंपाक करणारी स्त्री पहिल्यांदा अग्नीला घास (न शिजवलेले धान्य) अर्पण करते. विवाहाला निघण्यापूर्वी वराची मित्रमंडळी साल अथवा महुवा लाकडांचा मांडवा (मंडप) घालतात. मांडवाच्या मध्यावर एक खांब रोवतात. चिखलदरा येथील कोरकू खांबावर फिन्नी (शोभेसाठी किनार), तुळशीचे झाड, पक्षी,सकोडी (चौक), स्वस्तिक (सूर्य), चंद्र, जंगली महाराज (कोळी) कटारी इत्यादींचे चित्रण करतात. हा खांब विवाहानंतर इतर ठिकाणी वापरतात. खांबावर कोरलेले स्वस्तिक हे सूर्याचे प्रतीक आणि चौक हे देवतेला आसन असल्याचे जाणकारांनी सांगितले. चौक हे देवतेचे आसन



(बैठक) ही कल्पना हिंदू समाजात प्रचारात आहे. हिंदू प्रत्येक हिंदू समाजात प्रचारात आहे. हिंदू प्रत्येक पूजनात देवतेला आवाहन करताना प्रारंभी चौक बनवतात. कालानुसार चित्रात काही बदलही केलेले दिसतात.

जंगलात लाकडे कापतांना वनदेवतेची पूजा करून मग फांदी कापतात. वधूघरीही मांडवा घालतात. मांडवा घालण्यापूर्वी पाच कुमारिका खांब रोवण्यासाठी केलेल्या खड्ड्यात सुपारी, गूळ, पुरी, पैसा टाकून पूजा करतात. मांडवा करण्यासाठी समोरासमोर सहा-सहा खांब रोवतात. छत इंग्रजी एक्स आकाराचे लाकडाच्या वाशांचे करतात. छपरावर जांभळाच्या फांद्या पसरतात. वर पक्षाच्या घरी लाकडे आणल्यावर कुमारिका त्यांची पूजा करतात. मांडवाच्या मध्यावर एक खांब रोवतात. या लाकडाच्या खांबावर चित्र कोरणे ही परंपरा प्रचलित आहे.

चिखलदरा येथील कोरकूंनी पारंपरिक चित्रणात तुळशीचे झाड, पक्षी, यांची भर घातली आहे. असे दिसते. खामला येथील कोरकू खांबावर नाणी चिकटवतात. माडीया गोंड समाजात विवाहापूर्वी वराला एक खांब तयार करावा लागतो. त्याला मुंडा म्हणतात. प्रत्यक्ष प्रस्थान करण्यापूर्वी कोरकू ग्रामदेवता आणि गृहदेवतेची पूजा करतात. मुठवागोमाजला कोंबडा बळी देऊन त्याच्या रक्ताचे आणि दारूचे तर्पण करतात. धारण्याचीही पूजा करतात. पूजेला जाताना वराच्या हातात लिंबू खोचलेली कट्यार असते. भुमका कुलेदेवतेला कोंबड्याच्या रक्ताचे तर्पण करतो. चंद्र-सूर्याची पूजा करतो. उपस्थित लोक कुलदेवतेला प्रदक्षिणा घालतात. या प्रसंगी जमलेले लोक नृत्य व गायनात रंगून जातात. 'वरपक्षाच्या अंगणात घोंगडीवर वर आणि वराची मोठी वहिनी सातवेळा एकमेकांना अलिंगन देतात. 'ही प्रथा म्हणजे बहुबंधुपतीकत्व'[१७](*लेव्हिरेट*) या प्रथेचा अवशेष असावा' (*पाटिल १९९३:९३*). 'महाभारतात ममता आणि बृहस्पती यांची कथा आहे. ममता ही बृहस्पतीच्या मोठ्या भावाची पत्नी आहे. बृहस्पती ममताकडे शारीरिक सुखाची मागणी करतो. ममता ती मागणी नाकारताना सांगते, 'माझ्या पोटातील बाळाला त्रास होईल. या कथेवरून त्या काळात बहुबंधुपतीकत्व प्रथा होती' (*कर्वे १९९०:६४*). भारतातील खासी, किन्नोर, लाहौल आणि स्पिती इत्यादी समाजात बहुपतीकत्व प्रथा प्रचारात असल्याचे म्हटले जाते (*केजकर २००४:६४*).

१७ स्त्रीला एकापेक्षा अधिक पती असणे आणि ते एकमेकांचे भाऊ असणे.

यानंतर वरपक्ष विवाह संपन्न करण्यासाठी वधूच्या गावाकडे निघतो. वरात सोमवार, बुधवार किंवा शुक्रवारीच पोहोचली पाहिजे असा नियम आहे. वरात वधूच्या गावात पोहोचल्यावर वधूपक्षाचे लोक वरात अडवतात आणि पैशाच्या रूपात भेट वसूल करतात. वधूच्या घरी पोहोचल्याबरोबर वर बांबूच्या पंख्याने मांडवाला स्पर्श करतो. दुसऱ्या दिवशी वधू-वरांना मांडवात बसवतात आणि त्यांच्या अंगावर घोंगडी टाकतात. त्या अवस्थेतच त्यांच्या अंगावर पाणी ओततात. 'या विधीचा सांकेतिक अर्थ, 'जशी पावसात उत्पादन क्षमता आहे तशीच उत्पादन क्षमता वधू-वरांना प्राप्त होवो असा असावा' (*पाटिल १९९३:९३*). यानंतर वर वधूच्या गळ्यात कंठी घालतो. ही कंठी 'बिडाची' असते. वधू-वरांना खांद्यावर घेऊन वधूच्या अंगणात तीन परिक्रमा करतात. परिक्रमा करीत असताना वधू-वर एकमेकांच्या अंगावर हळदीने पिवळे केलेले तांदूळ फेकत राहातात. परिक्रमेनंतर वधू-वरांच्या वस्त्रांची टोके बांधतात. त्यानंतर दोघे मिळून मुठवागोमाजची पूजा करतात. या विधीनंतर विवाह संपन्न झाला असे मानले जाते. वधू-वरांच्या वस्त्रांची गाठ बांधण्याची प्रथा भारतातील बहुतेक समाजांमध्ये विद्यमान आहे.

४) व्यवसायासाठी पूजण्याचे देव

नांगरणीपासून मळणीपर्यंत प्रत्येक प्रक्रियेचा आरंभ कोरकू सामुदायिक पूजनाने करतात. पूजन परिहार किंवा भुमका करतो. कृषीव्यवसायाची सुरूवात हलवाईने (*नांगरणीने*) होते. त्या दिवशी खट्टी गोमाजची पूजा करतात. पूजनाची सामग्री नारळ, कोंबडा, गूळ आणि लिंबू असते. पूजा झाल्याशिवाय नांगरणी करणे अपराध मानला जातो. पूजेचा प्रसाद फक्त हलवाई करणारेच खातात. नांगरणी झाल्यावर पेरणी मंगळवार, शुक्रवार किंवा रविवारी करण्याची रूढी आहे. विधिवत खट्टी गोमाजची पूजा करतात. पूजनानंतर खट्टी गोमाजजवळ पांढऱ्या कापडाची पताका लावतात. देवतेला नमस्कार करून पेरणी सुरू करतात. सुरूवातीच्या दहा पावलांचे वृत्त आखून घेऊन [१८]त्यात प्रथम बिया पेरतात. पेरणी करताना केलेल्या पूजेतील नैवेद्य घरी नेत नाहीत, तेथेच संपवतात सुकोतारा (*शुक्रतारा*) उगवल्यावर शेतीची सर्वकामे बंद करतात. हा अलिखित नियम कोरकू काटेकोरपणे पाळतात (*चौरे*

१८ या वृतात उगवलेले धान्य शेताचा मालक स्वत:काढत नाही किंवा वापरत नाही. हे धान्य बहुधा परिहार, भुमका आणि रजालिया काढून घेऊन जातात (चौरे १९८७:७८).

१९८७:५८).

भारतीय शेतकरी वन्य पशू किंवा चोरांपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी रात्री शेतात झोपतात. कोरकू शेतकरीसुद्धा सुगीच्या काळात पहाऱ्यासाठी रात्री शेतात झोपतात. परंतु शेतात झोपण्याची सुरूवात करण्यापूर्वी 'होरीयार' नावाचा विधी करतात. हा विधी सामुदायिकरीत्या साजरा करतात. हा विधी करण्याची वेळ रात्रीची आहे. रात्रीचे जेवण झाल्यावर मुले घरातील पेटती लाकडे घेऊन गावाच्या पश्चिमेकडे जमा होतात. तेथे शेकोटी पेटवतात. गावातील प्रौढ पुरूष शेकोटीभोवती बसून गप्पा-गोष्टी करतात तर तरूण मुले-मुली नृत्य-गायनात मग्न असतात. रात्री उशीरा लाकडे विझवतात. तेथील राख, कोळसे घरी घेऊन येतात. शेतात रखवालीसाठी बांधलेल्या झोपडीत ही राख पुरतात. असे केल्याने भूत-प्रेत आणि विषारी किड्यांपासून पिकांचे आणि झोपणाऱ्या शेतकऱ्याचे रक्षण होते असा कोरकूंना विश्वास वाटतो. दुसऱ्या रात्रीपासून शेतात झोपण्यास सुरूवात करतात.

पिकाची पूर्ण वाढ झाल्यानंतर कापणी होते. कापणी करताना पुन्हा खट्टी गोमाजची पूजा करतात. या पूजेचा दिवस परिहार ठरवतो. तोच पूजा करतो. ज्या शेतकऱ्यांनी पीक चांगले यावे म्हणून नवस कलेला असेल ते यावेळेस कोंबडा बळी देऊन नवसाची पूर्तता करतात. एका ओळीतील धान्य देवाला अर्पण करतात. या पूजनाचा प्रसाद स्त्रियांसाठी वर्ज्य आहे.

यानंतर खळ्यात कणसे नेऊन त्यांची मळणी (*उडावनी*) करतात. त्यासाठी जमीन समतल करून शेणाने लिंपतात व खलिहान देवाची पूजा करतात. पूजेत हळद, कुंकू, नारळ, कोंबडीच्या पिल्लाचा बळी देतात. बळीचे रक्त खळ्यात शिंपडतात आणि मळणीला सुरूवात करतात. हा विधी केल्याने पाऊस अवेळी येत नाही. आणि खळ्यातील धान्याचे नुकसान टळते. असे कोरकू मानतात (*चौरे १९८७:५१*). धान्य घरी नेण्यापूर्वी पुन्हा एकदा खलिहान देवा समोर नारळ फोडतात. कोठीत धान्य भरून ठेवताना कोठादेवीला कोंबड्याचा बळी देऊन तिची पूजा करतात.

मासेमारी

मध्यभारतातील कोरकू निवासक्षेत्रात जून ते सप्टेंबर महिन्यात नदी, तलाव आणि ओढ्यात भरपूर मासे येतात. म्हणूनच या सुमारास कोरकू मासेमारी करतात. सुरूवात जलदेवतेच्या पूजनाने होते. नदीतीरावर जलदेवता स्थित असतात. पूजनात कोंबड्याचा बळी देऊन. सामुदायिक भोजन करतात. स्त्रिया आणि पुरूष वेगवेगळे गट करून मासेमारी करतात. पकडलेले मासे टोळीतील सर्वांना एकसारखे वाटून घेतात.

धरती

धरतीतूनच मानवी जीवनाचा आरंभ झाला म्हणून कोरकू धरतीला देवता मानतात. मानवी जीवनाची सुरूवात धरतीच्या स्पर्शाने व्हावी या उद्देशाने बाळाचा जन्म झाल्याबरोबर त्याला धरतीवर ठेवतात. नांगरल्यामुळे धरतीला दुखापत होईल म्हणून नांगरणीच्या सुरूवातीला नारळ, खारीक, लिंबू वाहून धरती मातेची पूजा करतात. काही गावात धरतीला कोंबड्याचा बळी देण्याची प्रथा आहे. जमिनीवर काही सांडणे अशुभ आहे असेही कोरकू मानतात. वीज चमकते तेंव्हा धरणीला त्रास होतो म्हणून वीजदेवतेची आळवणी करतात. आखाडीला दारू पिण्याची प्रथा आहे. परंतु दारू पिण्यापूर्वी दारूचे चार थेंब पूर्वजांसाठी जमिनीवर टाकतात. प्रत्येक शुभ प्रसंगी धरतीला दारू अर्पण करतात.

दियागोमाज -(सूर्य)

सूर्य देवतेची पूजा आखाडी आणि भावे या सणाच्या दिवशी किंवा एप्रिल महिन्यात बुधवारी करतात. बाळ जन्माच्या निमित्ताने आणि गर्भधारणेसाठी सुद्धा सूर्यदेवतेची पूजा करण्याची प्रथा आहे. 'चंद्र-सूर्य हे दोघे भाऊ आहेत' असे कोरकू मानतात. 'चंद्र-सूर्यांची उत्पत्ती' कथा कोरकू अशी सांगतात-'एकदा दोन भाऊ जंगलात शिकारीला गेले होते त्यांना एक उंदीर सापडला. त्यांनी त्याला मारून भाजले व दोघांमध्ये त्याची वाटणी केली. एका भावाने आपली वाटणी खाऊन टाकली. दुसऱ्याने आपल्या वाट्याचा उंदीर नीट गुंडाळून फडक्यात बांधून घेतला. घरी गेल्यावर ज्या भावाने वाटणी खाऊन संपवली होती त्याने जवळ-पास आपला भाऊ नाही असे पाहून आई-वडिलांना उंदीर देऊन सांगितले, 'मी तुमच्यासाठी हा उंदीर

आणला आहे'. हे ऐकून आई-वडिलांना खूप आनंद झाला. तेवढ्यात दुसरा भाऊ आला. त्याने आई-वडिलांना सत्य सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना त्याचे म्हणणे पटले नाही. त्यांनी त्याला सांगितले 'तू असाच पृथ्वी आणि माणसांना आपल्या प्रखरपणाने तापवशील. आणि तुझे नाव सूर्य होईल' आणि दुसऱ्याला सांगितले 'तुझा शीतलपणा प्राणिमात्रांना सुखवेल. तू चंद्र या नावाने ओळखला जाशील'.

सूर्य ही देवता विश्वातील सर्वश्रेष्ठ सामर्थ्यवान देवता आहे असे कोरकू मानतात. जमीन शेणाने सारवून त्यावर रांगोळीने चंद्र-सूर्याची आकृती काढतात. रांगोळीवर गारेचा दगड ठेवतात. या दगडाची पूजा चंद्र-सूर्याचे प्रतीक मानून करतात. (*देगावकर १९९०:४२*). कोरकू दर तीन वर्षांनी सूर्य देवतेची पूजा करतात. पूर्वेकडे तोंड करून लावणी किवा कापणी करतात. सूर्यगोमाजला पांढरा कोंबडा किंवा पांढरी शेळी कुटुंबप्रमुखाकडून बळी देण्याची प्रथा अद्यापही प्रचलित आहे (*रसेल १९१६:५५९*). फ्युचेसनी ही पूजा प्रत्यक्ष पाहिली असल्याचे नमूद केले आहे. त्याचे वर्णन त्यांनी, 'कोरकू दर तीन वर्षांनी काराखुंड येथील सूर्यदेवतेची पूजा करतात'. पूर्वीच्या मकराई संस्थानात एका टेकडीवरील एका खडकावर मानवीरूपात घोड्यावर बसलेली सूर्यदेवता प्रतीकरूपात आहे. जखमेत पू झाल्यास या देवतेला एक काळा व एक पांढरा मेंढा बळी देण्याची प्रथा आहे. ही देवता नवसाला पावते अशीही मान्यता आहे. एका कोरकू व्यक्तीने बैलगाडी आणि मोठेघर मिळावे असा नवस केला होता. या देवतेच्या दर्शनाला गोंड आणि हिंदू समाजातील लोकही येतात (*फ्युचेस १९८८:१३१*). ब्रिटिशांनी बरखास्त केलेल्या माखला संस्थानातील अवशेषात दगडावर कोरलेली सूर्यदेवता आहे (*फोटो क्र. १००*). परंतु आता ती <u>खंडित स्वरूपात आहे.</u>

ब्रिटिशपूर्व काळात नर्मदेच्या दक्षिण तीरावर सूर्य पूजेचे माहात्म्य होते. त्याचे वर्णन डग्लस् यांनी लिहून ठेवले आहे. ते असे आहे-

'नर्मदेच्या दक्षिण तीरावर असलेला डोंगराळ प्रदेश ओंकार-मांधाता म्हणून ओळखला जातो. या प्रदेशात एका गुहेत ओंकारेश्वराचे स्थान आहे. लगतच कालभैरव नावाचा डोंगरकडा आहे. या कड्याच्या खाली जवळ-जवळ नव्वद फूट

खोल दरीत कालभैरवाचे स्थान आहे. या कड्यावरून खाली कालभैरवावर स्वत:ला झोकून आत्मदान करण्याची प्रथा प्रचलित होती, असा उल्लेख शासकीय नोंदीत फोरसिथ यांना आढळला. ही नोंद शासकीय अधिकारी डग्लस यांनी केलेली होती. या प्रथेचा उल्लेख स्कंद पुराणांतर्गत रेवाखंडात आहे' (*फोरसिथ २००७:१७३*). डग्लस यांनी, 'नव्वद फूट उंच कड्यावरून स्वत:ला कालभैरवावर झोकून देणारा भक्त प्रत्यक्ष पाहिला आहे. त्यांच्या मतानुसार, 'हे बलिदान करणारा पापमुक्त तर होतोच शिवाय स्वर्गात गंधर्व कन्येशी त्याचा विवाह होतो अशी श्रद्धा भक्तांच्या आणि तेथे हजर असणाऱ्या लोकांच्या मनात दृढ असल्याचे दिसत होते. बलिदान करणारी व्यक्ती हातात सूर्याचे चित्र रेखाटलेला झेंडा आणि याकच्या शेपटीचा चाबूक घेऊन डोंगरकड्यावर चढली आणि त्या व्यक्तीने स्वत:ला कड्यावरून झोकून दिले. मी स्वत: त्या व्यक्तीला वाचवण्याचा प्रयत्न केला. खाली एक नाव तयार ठेवली होती. पण त्याने मानले नाही' (*फोरसिथ २००७:१७३*). डग्लस यांच्या मतानुसार, या मंदिराचे संरक्षण आणि पूजन करण्याची जबाबदारी एका भिल्ल कुटुंबाकडे वंशपरंपरेतून आलेली आहे. वरील प्रसंगी त्यांच्यापैकी एक स्त्रीपुरोहित या विधीचे संचालन करीत होती. तिच्या व्यवहारातून आणि तिच्या परिवेषातून असा अंदाज करता येईल, की ही प्रथा प्राचीन कालापासून प्रचलित असावी'. 'या प्रथेचा उल्लेख स्कंद पुराणांतर्गत रेवाखंडात आहे' (*फोरसिथ २००७:१७३*).

चंद्र-सूर्याला ग्रहण का लागते याचे स्पष्टीकरण कोरकू पुढीलप्रमाणे देतात चंद्र-सूर्यांनी एकदा एका मांग व्यक्तीकडून उसने पैसे घेतले होते. ठरलेल्या मुदतीत चंद्र-सूर्यांनी त्याचे पैसे परत केले नाहीत. त्यामुळे त्या मांग व्यक्तीला राग आला. त्याने राक्षसाचे रूप धारण केले आणि दोघांना गिळून टाकले. ते दिसेनासे होताच त्यांना राक्षसाने सोडून द्यावे. म्हणून प्रयत्न सुरू झाले. दान दिल्याने ते खूष होऊन चंद्र-सूर्यांना सोडतील म्हणून चंद्र-सूर्य दिसेनासे झाले की मांग जातीतील लोकांना कपडे दान करण्याची प्रथा होती. ही प्रथा इतर भारतीयांमध्येही प्रचलित आहे ग्रहणकाळात 'दे दान सुटे गिराण' असे म्हणत मांगजमातीचे लोक गावा-गावातून फिरत असत. कोरकू मानतात की मांग व्यक्तीने धारण केलेले रूप अक्राळ-विक्राळ आहे, त्याचे दात सुसरी सारखे तीक्ष्ण, अणकुचीदार आहेत.

कोरकू चंद्र-सूर्यांना भाऊ-भाऊ मानतात म्हणून त्यांची पूजा एकत्र एकाच वेळी करतात. एक पृथ्वीला प्रकाश देऊन उत्साहित करतो तर दुसरा थकलेल्या शरीराला आनंद देतो. म्हणूनच दोघांचाही कोरकू दैवतमंडळात समावेश झाला असावा.

कोरकू चंद्रावर असलेल्या डागाची कथा अशी सांगतात, 'चंद्र आणि इंद्र यांना स्वत:चे रूप बदलता येते. ते कधी मांजर तर कधी ऋषींचा वेष धारण करू शकतात. एकदा चंद्र आणि इंद्र मध्यरात्री ऋषींच्या वेषात एका ऋषींच्या घरी गेले. ऋषी नदीवर स्नानाला गेले होते. ऋषीपत्नी एकटीच घरी होती. त्यांनी ऋषीपत्नीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट गंगेने नदीवर स्नान करत असलेल्या ऋषींना सांगितली. त्या बरोबर ऋषी घरी परतले. त्यांना पाहून चंद्र आणि इंद्र पळू लागले. ऋषींनी त्यांना लंगोट फेकून मारला. तो चंद्राला लागला. तोच डाग चंद्रावर आजही आहे.

डोंगर गोमाज

चंद्र-सूर्याचे निवासक्षेत्र डोंगराच्या मागे आहे आहे असे, 'पूर्व-निमाड मध्ये राहणारे कोरकू मानतात. कारण चंद्र-सूर्याचा उदय-अस्त डोंगराच्या मागून होतो. हे लोक मृतात्म्यांचे निवासक्षेत्रही तेच असल्याचे समजतात. जन्म आणि मृत्यू या घटनांचे कर्ते करवितेही आत्मेच आहेत असे मानून बाळजन्मानंतर डोंगरदेवाला पशूबळी देतात. आत्मे रूष्ट होऊ नयेत म्हणूनही दरवर्षी दसऱ्याला खारीक, खोबरे, कुंकू आणि मेंढ्याचा बळी देऊन डोंगरदेवतेची पूजा करतात. परिहार पूजा आणि पशूबळी देऊन आत्म्यांना संतुष्ट करतो अशी कोरकूंना खात्री वाटते (*पाटिल १९९३ :१३१*).

एका गोगलिया गीतात –

गोग्गलिया रे रमा नाचे बाई कानिया
तोने माजा देवता राजा बाई मानीले
मुठवा देवताके राजा बाई मानीले
खेडा माजा देवताके राजा बाई मानीले
चांद माजा सुरज को राजा बाई मानीले
भीमाजा अर्जुन को राजा बाई मानीले
महादेव माजा देवता को राजा बाई मानीले

आगासा पाताल को राजा बाई मानीले

वरील गीतात 'कन्हैया नाचत असून कोणत्या देवाला तू देव मानले आहेस असा प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाचे उत्तर, 'मी मुठवा, खेडादेव, चंद्र-सूर्य, भीम-अर्जुन, महादेव, हनुमान, आकाश पाताळ, यांना देव मानले आहे असे दिले आहे' (*बऱ्हाटे १९०७:२६६*).

'दुसऱ्या एका गीतात रावण, चंद्र-सूर्य, भीम-अर्जुन शुक्रताऱ्याबरोबर होळी खेळत आहे असा उल्लेख आहे-

'रावना रावना कोन रे, राजा रे खना रे
टोनेम देवता एलिचाटो खेलिजो, राजा रे खना रे
चदमा-सुरजो एलिचाटो खेलिजो, राजा रे खना रे
भिवज-अर्जुन एलिचाटो खेलिजो, राजा रे खना रे
सुको तराजा एलिचाटो खेलिजो, राजा रे खना रे

या गीतातून कोरकू तारकांना देवता मानत असल्याचेही स्पष्ट होते' (*बऱ्हाटे १९०७:२६७*).

एका होरयार (*होळीत गायले जाणारे गीत*) गीतात 'आकाशमार्गे पृथ्वीतलावर उतरणाऱ्या देवदेवतांचे वर्णन केलेले आहे. त्यात रावणही आहे (*बऱ्हाटे १९०७:२७७*). 'आत्मा हा परमात्मा स्वरूप झाला की मानवी आत्म्यापासूनचे भय संपुष्टात येते. लंकेचा राजा रावण हाच आत्मा-परमात्मा यांचे मीलन घडवून आणू शकतो असा विश्वास रावणाला उद्देशून गायलेल्या खालील गीतात आहे (*बऱ्हाटे १९०७: २७७*).

रव्ना पव्ना चारिमाकु राजा रे रावना
होळिमा देवता चारिमाकु राजा रे रावना
रव्ना पव्ना चारिमाकु राजा रे रावना
खेडा मुठवा चारिमाकु राजा रे रावना
रव्ना पव्ना चारिमाकु राजा रे रावना

विसनु भगेवान चारिमाकु राजा रे रावना
रव्ना पव्ना चारिमाकु राजा रे रावना
शंकर भागोवान चारिमाकु राजा रे रावना
हनुमान देवता चारिमाकु राजा रे रावना
रव्ना पव्ना चारिमाकु राजा रे रावना

कोरकू लोकगीतात रावणाचा उल्लेख देवता म्हणून येत नसला तरीही कोरकू रावणाला देवतास्वरूप पूर्वजाचे स्थान देतात. वरील गीतातून लंकेचा राजा रावण हाच आत्मा परमात्मा यांचे मीलन घडवून आणू शकतो असा आत्मविश्वास व्यक्त झाला आहे. म्हणूनच कोरकू होळीनंतर मेघनाद आणि रावणाची पूजा करतात. मेघनादाला साकडे घातले तर तो संकट निवारण करतो अशा श्रद्धेने बगाडासारखी कष्टमय उपासना भक्तिभावाने करतात.

कोरकूंच्या उत्पत्ती –कथेत मातीतून महादेवाने मानवी आकृती तयार केल्या. त्यात जीव निर्माण केला अशी कथा आहे. याच कथेत दिमकदेवी, बुडू (*डुक्कर*), सीटा (*कुत्रा*), काग (*कावळा*) या प्राण्यांनीही मानवाच्या उत्पत्तीत मदत केली म्हणूनच कोरकू धरती, बुडू (*डुक्कर*), सीटा (*कुत्रा*) आणि कावळ्याला देवता मानतात. या कथेत बुडूने घातलेल्या अटीनुसार कोरकू बुडूची दर तीन वर्षांनी महाभूषम म्हणून पूजा करतात (*रसेल १९१६:५५३*). या पशुदेवतांशिवाय जीवन रक्षणाच्या हेतूने कोरकूंनी वन्य पशुंनाही दैवत स्वरूपात सामावून घेतले आहे. सापाला भिलटदेव, वाघाला कुलामामा आणि जंगली रेड्याला भैसासूर मानून दैवत मंडळात प्रवेश मिळाला आहे.(*चौरे १९८९१:१३४*).

कोरकूंच्या लोकगीतात पृथ्वीची उत्पत्ती वर्णन करणारे आणखी एक लोकगीत आहे. पृथ्वीची उत्पत्ती उदिया मातेने (वाळवी) केली म्हणून सर्वात आधी उदियामातेची पूजा करावी, नंतर मनुष्य निर्मितीला कावळ्याने मदत केल्याने त्याचीही पूजा करावी असे सांगणारे गीत पुढे देत आहे –

'भई जब लाखोउदला वायरो
वन जारण वाई लाखो, उदल वाई

भाई जबकौन हला देवान सेवान
वायलारो उढल वायरो
रोज भी कागलिया रो मांस
न सेवा रो उबले रा रे' (बन्हाटे १९०७: २६३)

कोरकू साजरे करीत असलेले सण समारंभ

चैती दसरा

हा सण पितरपूजा आणि भुमक्याकडून मिळणारी मेजवानी अशा दोन प्रकारात साजरा करतात. कोरकू चैत्री पोर्णिमेला मुठवागोमाजची सामूहिक आणि धारण्याची प्रत्येक घरात पूजा करतात. दोन्ही पूजेत बळी देणे आवश्यक असल्याचे मानले जाते. बळी बोकडाचा अथवा कोंबड्याचा देतात. मुठवागोमाजची पूजा भुमका कों-बडीचे पिल्लू बळी देऊन करतो. नारळही फोडतो. धारण्याची पूजा कुटुंबप्रमुख करतो. बोकडाचा बळी देतो. नैवेद्य बोकडाचे मांस आणि पुरीचा दाखवतात. कुटुंबप्रमुख गावात नसेल तर तो आल्यावरच पूजा करतो. ही पूजा करण्याचा स्त्रियांना अधिकार नाही असे कोरकू मानतात. म्हणूनच पितरांची पूजा करण्यासाठी प्रत्येक कोरकू मुलगा व्हावा अशी अपेक्षा बाळगतो. भोजनाचा कार्यक्रम स्वतंत्रपणे घराघरातून उशिरापर्यंत चालू राहातो. त्यानंतर पूर्ण रात्र नाच-गाण्यात आणि दारू पिण्यात कोरकू बायकामुलांसह रमून जातात.

मेळघाटात हा सण थोडा भिन्न पद्धतीने साजरा होतो. तो तीन दिवस चालतो. पहिल्या दिवशी भुमका पूर्ण गावाला मेजवानी देतो. दुसऱ्या दिवशी सकाळी भुमक्याबरोबर नदीवर जाऊन आंघोळ करतात. जाताना आपल्याबरोबर बकरा आणि इतर पूजनाच्या सामग्रीत बांगड्या, लाल कापडाचा तुकडा, तांदूळ, नारळ, लाल आाणि हिरव्या रंगाचे धागे घेऊन जातात. नेहमीप्रमाणे पूजन आणि बळी देण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर अन्न शिजवतात. त्याच सुमाराला भुमक्याच्या अंगात देव संचारतो. त्याचे शरीर डोलू लागते. तिसऱ्या दिवशी गावातील रोगी उपचारासाठी परिहाराकडे जातात. उपचार करण्याच्या उद्देशाने जाणाऱ्यांमध्ये बन्हया (*वंध्या*) स्त्रियाही असतात. परिहार मंत्र म्हणून आजार बरा करतो असे कोरकू मानतात. परिहाराने बगाडा सारखे शरीराला कष्टविणारे प्रायश्चित्त घेतल्यामुळे त्याला रोग घालविण्याची

शक्ती प्राप्त झाली आहे, प्रायश्चित घेतल्याने सामर्थ्य वाढते असा विश्वास कोरकूंना वाटतो. लोक जाताना जंगली आंबे आणि लाल व पांढऱ्या रंगाची तुतीची फळे घेऊन जातात. परिहार ती फळे गावपटेलाकडे गावात वाटण्यासाठी देतो. भैसासुरला काळामेंढा बळी देऊन परिहार त्याची पूजा करतो. भैसासुरचा निवास ढलढलीत असल्याचे मानले जाते म्हणून ही पूजा ढलढल असलेल्या ठिकाणी होते.

रांडभावे आणि चिखलभावे–

हे दोन्ही सण पावसाशी संबंधित आहेत, ज्येष्ठ महिन्यात धान्य काढल्यावर जमीन विधवेसारखी शुष्क होते. तिची अवस्था जणू एखाद्या विधवेसारखी होते. भूमीवर पावसाचा वर्षाव झाल्यावर कृषी उत्पादन वाढेल. या भावनेतून ज्येष्ठ महिन्याच्या अमावस्येला रांडभावे हा सण साजरा करतात. कोरकू भाषेत रांड या शब्दाचा अर्थ 'विधवा' आणि भावे म्हणजे मेजवानी. पावसाने कृपा करावी म्हणून पावसालाच देवता मानून ज्येष्ठ अमावस्येला रांडभावे हा सण साजरा होतो. गावाचा पटेल दिवस निश्चित करून उत्सवाचे आयोजन करतो. गावातील सर्व लोक पूजेत सहभागी होतात. मुला–मुलींनी जंगलातून तोडून आणलेल्या बांबूच्या काठ्यांची पूजा होते. गावाचे तसेच उभ्या पिकांचेही संरक्षण व्हावे या हेतूने खेडा देवतेची पूजा करतात. प्रत्येक घरातून शेतात पेरायच्या बिया एकत्र करतात. त्यातील काही भाग खेडागोमाजला अर्पण करतात. पूजा झाल्यावर सर्व लोक आपापल्या घरी परततात. दुपारी गावातील मुले–मुली नदीवर जाऊन बेडूक पकडतात. मातीचे गोळे तयार करतात. त्यापैकी एका मातीच्या गोळ्यात बेडकाला लपवतात. एका टोपलीत तयार केलेले मातीचे गोळे ठेऊन ते जांभळाच्या लहान–लहान फाद्यांनी झाकतात. एका मुलाच्या डोक्यावर टोपले ठेऊन मुले–मुली गावात परततात. परत आल्यावर मुठवागोमाजची व 'डेडर' (*बेडूक*) ची पूजा पाऊस पडावा म्हणून करतात. कोरकू डेडरलाच पावसाची देवता मानतात. पूजा करताना–

'डेडरा डेडरा पानी दे'
गाडा टालन पानी सुखी गयो पानी दे
पानी कायोम सेरोम सेरोम डेडरा डेडरा पानी दे'
हे गीत गातात (बऱ्हाटे १९०७:२८४).

अर्थ

'डेडरा (बेडूक) ही पावसाची देवता असल्याने सर्व मुले मुली डेडरास विनवणी करतात की डेडरा डेडरा पाऊस येऊ दे, नदीचे पाणी आटले आहे. खूप जोरात पाऊस येऊ दे' (*बऱ्हाटे १९०७:२८४*).

या गीतांना डेडरा सिरिंज म्हणतात. 'बेडकाचा संबंध जलवितरणाशी आणि जलसंचयाशी जोडलेला वेदात आणि वेदोत्तर लोकविश्वासात सापडतो. त्याचा संबंध गर्भधारणा आणि सुपिकता यांच्याशी जोडलेला दिसतो. काही ठिकाणी आकाशाचे प्रतीक म्हणून तर कुठे सुपिकता धारण करणाऱ्या पृथ्वीचे प्रतीक म्हणून येतो. ही प्रतीके पूर्वी पासूनच प्रचलित असलेल्या परंपरागत प्रतीकांमधून वैदिक ऋषींनी घेतली असावीत' (*इंगोले २००५:९४*).

मुले डेडर गीत गात, नाचत गावात फिरून धान्य गोळा करतात. गावातील लोक ज्याच्या डोक्यावर बेडूक असेल त्याच्या डोक्यावर पाणी टाकतात. मुलाच्या डोक्यावर पाणी टाकणे म्हणजे पर्जन्य देवतेला प्रसन्न करणे असे कोरकू मानतात. गोळा केलेल्या धान्यातून मुलेच स्वयंपाक करतात. त्याच अन्नाचा नैवेद्य डेडरला दाखवून तिथेच भोजन करतात. संध्याकाळी प्रत्येक घरात नांगराची पूजा करतात. रात्री स्त्री-पुरूष हातातील काठयांच्या तालावर ढांडेलगीत गात नृत्य करतात. हे नृत्य रात्रभर चालते. या नृत्याचे आयोजन वर्षातून फक्त एकदाच या सणाच्या दिवशी करण्याची रूढी आहे. बऱ्हाटे यांच्या मतानुसार, 'हे नृत्य आणि गीत म्हणजे परमेश्वराची रासलीला आहे, असे कोरकू मानतात' (*बराटे १९०७:२३३*). कर्नाटक राज्यात सौंदत्ती हे यल्लमादेवीचे स्थान आहे. येथे मातंगी (*यलम्माच्या उपासिका*) माघी पौर्णिमेला 'रांडव पुनव' या नावाचा विधी करतात. या विधीत हातातील चुडा फोडतात. या पौर्णिमेला रांडव पुनव म्हणतात आणि ज्येष्ठी पौर्णिमेला पुन्हा चुडा भरतात. या पुनवेला 'अहेव पुनव' असे संबोधले जाते. या चार महिन्यांसाठी देवीला वैधव्य प्राप्त झाले आहे असे मानतात. 'पिकांच्या कापणीनंतर भूमीला जी कळा प्राप्त होते ती वैधव्यसूचक होय आणि पुन: नवीन वर्षाच्या प्रारंभी नव्या पिकांचा गर्भ वाहण्याची तिला प्राप्त होणारी क्षमता ही सौभाग्य लाभाची द्योतक आहे' (*ढेरे १९८८:१७६*). या दोन्ही संकल्पना भूमीच्या सर्जनशीलतेशी निगडित आहेत. आचारधर्मात भिन्नता दिसत असली तरी मूळची संकल्पना भूमीच्या सुफलीकरणाशी

जोडलेली एकच आहे. चिखलभावे हा सण पहिला पाऊस पडल्यावर आषाढ महिन्यात साजरा होतो. कोरकू या सणात पावसाबद्दल वाटणारी कृतज्ञता व्यक्त करतात. कोरकू या दिवशी दोन्ही सणात सामील व्हा असे सांगत गीत गातात.

चिखला भावे ये जेबा, लमम्बे को ।।धृ।।
कोडकी केले, लमम्बे को ।
चिखला भावे ये जेबा, लमम्बे को ।

अर्थ
'या रे या आपण कुटकी, कोदो खाऊन रांडभावे व चिखलभावे सण साजरा करू या'.

चांदपूर गावातील कोरकूंनी सांगितले, 'शारीरिक व्यंग येऊ नये म्हणून आम्ही भावेपूजा करतो. ही पूजा फक्त विवाहित पुरूषांनीच करावी अशी प्रथा आहे. या पूजेनंतर मेंढा बळी द्यावा आणि त्याचा प्रसाद ही फक्त पुरूषांनीच ग्रहण करावा अशी रीत आहे'.

आखाडी

सुख आणि आरोग्य मिळावे म्हणून आखाडी सण साजरा करतात. या सणाचा आरंभ मुठवा या ग्रामरक्षक देवतेच्या पूजनाने होतो. नंतर बंजारनमाय व वाघदेवाची पूजा करतात कारण हे देव गुरांचे व गावकऱ्यांचे जंगलात संरक्षण करतात. खेडागोमाज गावाला दुष्टात्म्यांपासून वाचवतो. म्हणून त्याचीही पूजा केली जाते. या पूजनात बकराबळी देणे आवश्यक मानतात. बळीचे मांस फक्त पुरूषच खातात. त्या वेळी गावातील गुरे-ढोरे व गावकऱ्यांचे संरक्षण व्हावे या हेतुने मन्नत (नवस) मागण्याची प्रथा आहे. कसईखेडा गावातील जाणकारांच्या मतानुसार- भिमबाबा, पिसा, झीटांगा या देवतांना वीज, वादळ, पावसाच्या देवता असल्याचे मानतात. आखाजीला या देवतांची पूजा करतात. दुष्काळ पडल्यास अथवा पाऊस कमी झाल्यास हनुमानाच्या देवळात भजन करतात. भिमबाबा, पिसा, झीटांगा यांची पूजा करतात. विहीर खोदताना तिकास, फावडा, घमेले यांची पूजा करतात. विहिरीचे खोदकाम पूर्ण झाल्यावर विहिरीची पूजा होईपर्यंत घरातील कोणीही सदस्य पाणी पीत नाही. हा सण दोन-तीन पाऊस येऊन गेल्यावर शेतात पालेभाजी आलेली

असते अशा वेळेस घरा-घरातून साजरा होतो. प्रथम धारणागोमाजची पूजा करतात. पूजनाच्या सामग्रीत इतर सामग्रीबरोबर कोंबडाही असतो. सागाच्या पानावर शिजवलेला भात आणि नवीन आलेल्या पालेभाजीचा नैवेद्य दाखवतात. हा प्रसाद फक्त पुरूषच खातात. यानंतर पालेभाज्या खाण्यास सुरूवात होते. यावेळी दारू पिण्याची प्रथा आहे. परंतु दारू पिण्यापूर्वी दारूचे चार थेंब पूर्वजांसाठी जमिनीवर टाकतात. देवाला पालेभाजी अर्पण केल्यानंतरच कुटुंबीय पालेभाजी खातात.

नागपंचमी-बमबोटा

श्रावण महिन्यातल्या शुक्ल पंचमीला नाग-सापांची पूजा करतात. कुटुंबप्रमुख प्रथम स्वत:च्या शेतात वारूळाचा शोध घेतो. न मिळाल्यास जिथे वारूळ असेल तिथे जाऊन फुटाणे, लाह्या, कुंकू, दूध वाहून येतो. त्याला माहित असणाऱ्या सर्व सापांची नावे घेऊन माझे व माझ्या कुटुंबाचे रक्षण कर असे आवाहन करतो.

पंचमढी जवळ नागदरी नावाची टेकडी आहे. तिथे नागपंचमीला नागदेवतेची जत्रा भरते. या जत्रेला नियमित जाणारी काही कोरकू कुटुंबे आहेत (*फ्युचेस १९८८:४*). भारतीय संस्कृती कोशात 'कर्कोटक' ही एक जमात होती. महाभारतामध्ये कर्कोटक जमातीचा उल्लेख आहे (*संस्कृतीकोश खंड २:११३*). कर्कोटक या जमातीला कार्तवीर्य अर्जुनाने जिंकले होते असे वायु पुराणात म्हटले आहे (*संस्कृतीकोश खंड २:११३*).

पूर्व मेळघाटात घटांग ते कूकरू मार्गावर बिहाली हे वनराईचे स्थान आहे. या वनराईत अनेक सिडोली आहेत या ठिकाणी गुरांची राखण करणाऱ्या भागिरथी सीताराम बेलसरे व शशिकला शालिकराम मावस्कर या दोन महिला भेटल्या. त्यांना या सिडोली कुणाच्या आहेत हे सांगता आले नाही. मात्र त्यांनी सांगितले, 'नागपंचमीला यांची पूजा करतात आणि कोंबडा बळी देतात अशी परंपरा आहे'.

जिरोती

'हा सण सर्जनाची देवता जेरीमातेचा आहे' (*फ्युचेस १९८८:३७५*). तो श्रावणी अमावस्येपासून सुरू होतो आणि भाद्रपद अमावस्येला संपतो. या सणाला बहिणी

आपल्या भावाकडे येतात. श्रावणी अमावस्येला स्त्रिया आरंभी 'धारणागोमाजची' पूजा करतात. नंतर आपल्या लहान मुलांना निरोगी आयुष्य लाभावे म्हणून गावात असलेल्या सातमातांची पूजा करतात. नैवेद्यासाठी शेतात उगवलेली नववर्षाची भाजी, भात, मांस आणि खोबऱ्याचे तुकडे ठेवतात. या दिवसापासून नववर्षाची भाजी खाण्यास सुरूवात होते. पावसामुळे प्रसन्न झालेल्या वातावरणात झाडाला झोके बांधून बायका झोके घेता घेता गाणी म्हणतात. या गीतांना डोलारसिरिंज म्हणतात. 'पोळा होईपर्यंत झोक्यावर बसून स्त्रिया झोके घेतात. मुले काठीवर चढून पकडा-पकडीचा खेळ खेळत असतात (*फोटो क्र. १०१*). झुल्यावर बसलेल्या मुलींच्या भोवती फिरत असतात. या दोघांमध्ये चेष्टा मस्करी चालू असते. हे वातावरण सर्जनाला उपयुक्त ठरते असे कोरकू मानत असल्याचे मत फ्युचेस यांनी व्यक्त केले आहे' (*फ्युचेस १९८८:१७६*). डोलारसिरिंज मधे विरहगीतांना प्राधान्य आहे. ही गीते बरेच दिवस माहेरी आलेली तरूणी आपल्या पतीच्या विरहाने व्याकुळ होऊन गाते. जिरोतीसाठी आले आणि आणि पोळ्याला घरी जात आहे. हे प्रियतम तुझ्यासाठी मन व्याकुळ झाले आहे. हे प्रिय राजा, आई वडिलांच्या राज्यात आपण झोपू, हे प्रियतम तुझ्यासाठी मन व्याकूळ झाले आहे (*बऱ्हाटे १९०७:२८८*).

नमुन्यादाखल एका गीत खाली देत आहे.

*'जिरोती मे आऐ**SS** पिऊ*

*पोला मे**SS** चले*

*हेरे पिऊ **SS** झुरे **SS***

*मन **SS** झुरे **SS** ॥१॥*

*आयो बा राजा **SS***

*पिऊ **S** पलंगो मे **SS** सोये ।*

*हेरे पिऊ **SS** रणसाठी **S***

*मन **SS** झुरे **SS** ॥२॥'*

कोरकूंचे स्त्री-पुरूष संबंध काहीसे मोकळे असले तरीही गावप्रमुखाचे वयात आलेल्या मुला-मुलींवर बारीक लक्ष असते. अनुचित कृती घडल्यास पंचायत दंड

आकारते.

पोळा

भारतातील प्रत्येक जण पोळा सण साजरा करून त्याच्या मनात बैलाबद्दल वाटणारी कृतज्ञतेची भावना प्रकट करीत असतो. कोरकू सुद्धा याच भावनेतून मनापासून पोळा सण साजरा करतात. विधीत काहीसा बदल असला तरीही मूळ भावना तीच असल्याचे दिसते. कोरकू यादिवशी बैलाकडून काम करून घेत नाहीत. सकाळी बैलाला नदीवर नेऊन पाण्याने धुतात. कपाळावर कुंकवाचा टिळा लावतात. बैलासह जाऊन मुठवा आणि हनुमानाची पूजा करतात, नारळ फोडतात. बांधलेल्या दोरांनी बैलाच्या गळ्याला जखम होऊ नये म्हणून गळ्याला शर्यत सुरू होण्यापूर्वी तूप आणि हळद लावतात.

दुपारी बैलांची पळण्याची शर्यत होते. गावाच्या पूर्व दिशेला समोरासमोर असणाऱ्या दोन घरांना आंब्याच्या पानाचे तोरण बांधतात. पानात पान अडकवून तोरण तयार करतात. गावात जितके बैल असतील तितकी पाने तोरणात गुंफतात. तोरणाखाली बैलांना एका रांगेत उभे करतात. त्यांच्या मागे शेतकरी उभा राहातो. चौधरी बैलांची पूजा करतो. नारळ फोडतो. बैलाला मीठ खायला देतो. गावाचा पाटील बैलांना कुंकू लावून नमस्कार करतो. दिवा ओवाळून शर्यत जिंकण्यासाठी शुभेच्छा देतो. शर्यत मुठव्यापासून सुरू होते. खेडालागोमाजपाशी संपते. जिंकलेल्या बैलाचा मालक खेडागोमाजची पूजा करतो. घरी येऊन बैलांना कुटुंबियांसाठी शिजवलेल्या अन्नातून पोटभर खाऊ घालतात.

दसरा

कोरकू दसऱ्याला दसरा देवतेची पूजा करतात. देवतेला वर्गणी करून आणलेल्या हेल्याचा (रेड्याचा) बळी देतात. हेल्याची शिंगे मोराच्या पिसाने किंवा झाडाच्या फ ाद्दीने सजवतात. दहा मीटर पांढऱ्या कापडात हेल्याचे अंग गुंडाळतात. हेल्याच्या नाकात वेसण घालून त्याला गावातील तरूण मुले आणि पुरूष गावातून पळवतात. पळवतांना त्याच्या अंगावर शस्त्राने वार करत राहातात. शेवटी पाटलाच्या परवानगीने गावाच्या मुख्य चौकात आल्यावर कु-हाडीने हेल्याचे नाक छाटतात.

गाववाले धावत येऊन वाहणाऱ्या रक्तात हाताचे पंजे बुडवतात. त्याचे ठसे घराच्या चौकटीवर छापतात. प्रत्यक्ष बळी देण्यापूर्वी हेल्याला नमस्कार करतात व नंतर त्याची मान कापतात आणि रक्त वाहू देतात. असे केल्याने पिकांना कीड लागत नाही असे कोरकू समजतात (*फ्युचेस १९८८:३८०*). हेल्याचे तुकडे करून गावात वाटतात. घरात असणाऱ्या सदस्यांच्या संख्येनुसार हेल्याचे तुकडे करतात. बऱ्हाटे यांच्यामतानुसार, 'या सर्व विधींमुळे कुंभकर्णाला जाग येते व तो संतुष्ट होतो'. असे कोरकू मानतात. हेल्याचे कातडे विकत नाहीत. त्या कातड्याचा उपयोग फक्त वाद्य करण्यासाठी करतात. बैतुल जिल्ह्यातून इंदापुरला शेतात मजुरी करण्यासाठी बेमाटगडहून आलेल्या हरेलाल पढोरकर यांनी सांगितले, 'आमच्या गावात सर्व संमतीने या रूढीत बदल केला आहे. दसरा देवाला बोरकुंड नावाच्या फळाचा बळी देतो', बैतुलमधील इतर कोरकूंनी सांगितले ही प्रथा अद्याप जात पंचायतीने मान्य केलेली नाही.

डोलारमाय

श्रावण आणि भाद्रपद महिन्यात स्त्रीया झाडाला झोका बांधून झोके घेतात. झोका तुटून कोणाला दुखापत होऊ नये म्हणून कोरकू दसऱ्याला डोलारमायची पूजा करतात. पूजनाचा कार्यक्रम झाल्यावर बकऱ्याचा बळी देतात. या पूजनाला स्त्रिया आणि मुली हजर राहातात.

दिवाळी

दिवाळीचा सण हा भारतातल्या अनेक ठिकाणी गाईगुरांची पूजा करण्याचा सण आहे. या पूजेला गोवर्धन पूजा म्हणतात. अश्विन अमावस्या आणि कार्तिक प्रतिपदा असा दोन दिवस चालणारा हा सण आहे. चिखलदऱ्यातील कोरकू शेणाचे पाच गोळे पांडवांचे प्रतीक मानून त्यांची पूजा करतात (*फोटो क्र. १०२*). या विधीला पांडव बसवणे अशी संज्ञा आहे. अशा प्रकारे पांडव बसवण्याची प्रथा उत्तर कर्नाटकात अजून प्रचारात आहे. महाराष्ट्रातील गुराखी, दिन दिन दिवाळी। गाईम्हशी ओवाळी।। गाई म्हशी कुणाच्या लक्ष्मणाच्या।। असे गीत गातात. बैलांना सजवून त्यांची मिरवणूक काढतात. घरा-घरातून मातीचे बैल करून त्यांची पूजा करतात. बैलांना मिष्टान्न खाऊ घालतात. निमाडमधल्या कोरकूंच्या गोवर्धन पूजेचे वर्णन डॉ. पाटिल यांनी

पुढील प्रमाणे केले आहे – 'हा सण कार्तिक शुक्ल प्रतिपदेला साजरा केला जातो. या सणाला घरातील गुराढोरांची पूजा करतात. घरातील सर्व गाईगुरांना पाण्याने धुतात. गळ्यात माळा घालतात. त्यांची शिंगे रंगवतात. शेणाचा गोवर्धन करून त्याची व गाईगुरांची पूजा करतात' (*पाटिल १९९३:५३*). या सणात गुरांबद्दल वाटणारी आदराची भावना प्रकट होते. विश्वनाथ शिंदे यांच्या मताप्रमाणे, ही आदराची भावना नागरसंस्कृतीनेही जपलेली दिसते. शेणाचा गोवर्धन म्हणजे बलरामाच्या गढीचे प्रतीक आहे. नागरसंस्कृतीमध्ये दारात केलेल्या किल्यांच्या रूपात हे प्रतीक साकार होते. दिवाळी हा जसा गुरांचा सण आहे तसाच तो दीपोत्सवही आहे (*शिंदे २००५:१७*).

कुकरू गावात पशूंचे संरक्षण करणाऱ्या बंजारन माय, गोपालबाबा आणि सांजेशिवारी यांना दिवाळी नंतर गोठ्याजवळ बोकड किंवा डुकराचा बळी देतात. भंगीबाबा, दैयत यांची पूजा भुमका करतो. ही पूजा फक्त रविवारी करतात. चुनखडी गावातील कोरकू दिवाळीत लक्ष्मीपूजा व गाईची पूजा करतात. घरात व अंगणात दिवे लावतात.फटाके उडवतात.

होळी

बहुतांश भारतीय होळी हा उत्सव उत्साहाने साजरा करतात. कोरकू सुद्धा होळी तितक्याच उत्साहाने परंतु त्यांच्या पद्धतीने साजरी करतात. कोरकूगावात दोनदा होळी होते. सर्व गावकऱ्यांची सामुदायिक होळी, ज्या होळीला कोरकू छोटी होळी म्हणतात. दुसऱ्या होळीला बडी होळी म्हणतात. ही होळी कोरकू त्यांच्या पद्धतीने साजरी करतात. मध्ये अंतर ठेवून दोन होळ्या पेटवतात (*फोटो क्र. १०३, १०४*). एक नर व दुसरी मादी घरा–घरातून होळीसाठी लाकडे गोळा करतात. स्त्रिया नारळ, लिंबू वाहून बाजूला बसतात. गावाचा पटेल होळी प्रज्वलित करतो. नंतर स्त्रिया घरी निघून जातात. कोरकूंची होळी पाच ते सहा दिवस चालते. होळीत गायल्या जाणाऱ्या गीतांना होरयार गीत म्हणतात. फ्युचेस यांच्या मतानुसार या गीतातून मनोरंजन होते. शिवाय निसर्गात असणारी प्रजनन शक्ती ही देवाची देणगी आहे आणि म्हणून देवाबद्दल वाटणारी कृतज्ञताही व्यक्त होते (*फ्युचेस १९८८: ३५६*). फाल्गुन महिन्यातील एकादशीपासून होळी सणाच्या तयारीची सुरूवात होते. गावातील मुले

गट करून लाकडे गोळा करण्यासाठी निघतात. प्रत्येक गटाचा नायक ठरवतात. गटप्रमुखाजवळ घुंगरू लावलेली काठी असते. विशिष्ट तालात तो ती काठी आपटत राहातो. त्याच्या तालावर काही मुले नाचत गात राहातात तर काही लाकडे गोळा करतात. कोरकू होळीचे दहन पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी करतात. संध्याकाळी काही लोक होळी रचण्यासाठी गावाबाहेर जातात. होळीच्या जागेवर एक खड्डा खणून त्यात लिंबू, नाणी व टेमरूचे फळ टाकतात. नंतर खड्ड्यात एक बांबू रोवतात. बांबू विविध रंगांच्या कागदाच्या पट्ट्यांनी सजवतात. फ्युचेस यांच्या मतानुसार, बहुतांश विद्धान हे योनी आणि लिंग यांचे प्रतीक आहे असे मानतात (*फ्युचेस १९८८:३५७*). गावातील उरलेले सर्व लोक गात नाचत पाटलाकडे जातात. पाटील पूजेचे साहित्य, नारळ आणि जेवण घेऊन निघतो. वाटेत स्वत: गात गटाचे नेतृत्व करत होळीच्या स्थानावर येतो. प्रथम लिंबू वाहून पाटील होळीच्या पूजेला आरंभ करतो. पूजनानंतर रावणाची आरती म्हणतात–

आरती मा आरती बाई चोजमा आरती डो
चोजमा आरती डो राजा रावना के आरती ले
सोने की आरती बाई रूपे की बारी आई
रूपे की बारी बाई राजा रावना के आरती ले
ये साली को साडी दे बाई हीरा मोती पेरिले
सोने की आरती बाई रूपे की बारी आई
रूपे की बारी बाई राजा रावना के आरती ले
ये साली को साडी दे बाई हीरा मोती पेरिले
आरती मा आरती बाई चोजमा आरती डो
चोजमा आरती जे राजा के आरती ले
सोने की आरती बाई रूपे की बारी आई
रूपे की आरती राजा रावना के आरती ले'

पटेल बरोबर आणलेले जेवणही होळीत अर्पण करतो व होळी पेटवतो. होळी प्रज्वलित झाल्यानंतर काही क्षण नि:शब्द शांतता पसरते. बोराटाखेड्यात रामकिशन दारशिंगे म्हणाले, 'होळी हे रावणाच्या बहिणीचे प्रतीक आहे. तिला शांतीबाई म्हणतात तिच्या स्मृती.– प्रीत्यर्थ शांतता पसरते व स्त्रिया होळीजवळ न थांबता घरी परततात'. काही वेळाने हे शोकमय वातावरण बदलते. तरूण जळत्या होळीवरून उड्या मारतात.

स्त्री-पुरूष वेगवेगळे गट करून नाचू गाऊ लागतात. मध्यरात्रीपर्यंत हे नृत्य-गायन चालूच राहाते. दुसऱ्या दिवशी होळीची राख कपाळाला लावतात. मुठवागोमाजला वंदन करून पटेलाकडे जातात. पाटील त्यांना पैसे व धान्य देतो. पटेलाची स्तुती करतात. या गीताला झामटा म्हणतात. यानंतर फगवा[१९] मागण्यास सुरूवात करतात. गावातील प्रत्येक घरात आणि इतर गावातूनही फगवा गोळा करतात. येणाऱ्या-जाणाऱ्या वाटसरूंकडेही फगवा मागण्याची प्रथा प्रचारात आहे. पाच दिवस फगवा मागतात (*फोटो क्र. १०५*). आलेल्या फगव्याच्या पैशातून एक बकरा विकत घेतात. गावातील सर्व लोक मेजवानीत सहभागी होतात. हे पाच-सहा दिवस संपूर्ण गाव नाच गाण्यात आणि मद्यपानात धुंद असते. चुनखडी गावातील कोरकू दिवाळीत लक्ष्मीपूजा व गाईची पूजा करतात. घरात व अंगणात दिवे लावतात. फटाके उडवतात.

मेघनाद

होळी नंतरच्या मंगळवारी कोरकू मेघनादाचा उत्सव करतात. गाव सोडून बाहेरगावी स्थायिक झालेले लोक मेघनादाच्या उत्सवात सहभागी होण्यासाठी गावी येतात.

गोंड, निहाल इत्यादी आदिवासी आणि मैदानी भागात राहाणारे लोकही या उत्सवात हजर असतात. मेघनाद नवसाला पावतो असे मानले जाते. या उत्सवाचा प्रमुख विधी शरीरात 'आकडा' खोचून मेघनादाच्या खांबावर गोल गोल फिरणे[२०] हा आहे. मेघनादाचा 'खांब' (*फोटो क्र. १०६, १०७*) म्हणजे २५ ते ३० फूट उंच तीन पायांची शिडी. ही शिडी मेघनादाचे प्रतीक मानतात. खांबाच्या पायथ्याला रावणाचे प्रतीक म्हणून एका टोकाला निमुळता दगड प्रस्थापित करतात. मेघनाद, रावण, महादेव-पार्वती यांची पूजा करतात. कोरकू रावणाला प्रजेचे रक्षण करणारा राजा मानत असल्याचे त्यांच्या लोक गीतांवरून दिसते. 'एकदा एका राजाने कोरकूंच्या प्रदेशावर आक्रमण केले. मेघनादाने या राजापासून कोरकूंची सुटका केली. त्याची स्मृती म्हणून मेघनादाची पूजा करतात' (*बऱ्हाटे १९०७: २७१*). संकटांपासून मुक्तता मिळावी अथवा संकटे येऊ नयेत या उद्देशाने खांबावर लटकून गोल गोल फिरणे हा या उत्सवाचा मुख्य विधी आहे. प्रायश्चित्त घेणाऱ्याने खांबाला बकरा अथवा कोंब-ड्याचा बळी देण्याची प्रथा प्रचारात आहे. पूजनानंतर कोरकू 'खंब' नावाचे नृत्य

१९ होळी निमित्त पैसे मागण्याची प्रथा

२० शरीरात आकडा खोचून घेण्याची कठोर उपासना पद्धती आजही भिल्ल, मुंडा, संथाल समाजात प्रचलित आहे. प्राचीन युरोपात सुद्धा अशा तऱ्हेची उपासना प्रचलित होती.

करतात. मेघनादाला खंडेरोदेव असे ही संबोधले जाते. फ्युचेस यांनी निमाड जिल्ह्यातील देवली गावात असलेल्या खंडेरोदेवाचे वर्णन केले आहे. तेथील खांबावर एकाखाली एक आकृत्या क्रमाने कोरल्या आहेत स्त्री, धनुष्य घेतलेला पुरूष, सर्प, एका ओळीत चार पुरूष, सूर्य आणि शेवटी घोड्यावर बसलेले दोन पुरूष आहेत. या चित्रांचा अर्थ तेथे हजर असणाऱ्या कोणालाही सांगता आला नाही. प्रत्यक्ष भेटीत चिखलदरा तालुक्यातील जरिदा या गावात मेघनादाचा खंब पाहिला. त्यावर तो १९८५ साली दुरूस्त केल्याची नोंद आहे. येथे हा उत्सव ३५० वर्षांपासून सुरू आहे. अकबर बादशहाचा सेनापती मानसिंग उत्सवाला हजर होता असे गावकऱ्यांनी सांगितले. जरिदा गावाच्या पटेलाचा दरवर्षी खंबावर चढण्याचा पहिला मान असल्याचे सांगितले. खंबवरून खाली उतरल्यावर आणलेला पशू बळी देतात. मांसखंड हजर असणाऱ्यांमध्ये वाटतात. रायपूर गावातही मेघनादाचा उत्सव करतात. गावाच्या पटेलांनी सांगितले–'मेघनादाचा मृत्यू झाल्यावर त्याला घेऊन जाताना जेथे–जेथे मेघनादाचे अवशेष पडले तेथे–तेथे मेघनादाचा उत्सव करतात'.

जेरी (झेंडा)

वरवर पाहता उंच खांबावर चढून काठ्यांचा मार सहन करत टोकावर बांधलेले गाठोडे काबीज करणे असे मनोरंजक किंवा साहसी खेळ असे याचे स्वरूप वाटत असले तरीही फ्युचेस यांच्या मतानुसार, 'हा सण होळीचाच एक भाग असून हे राम–सीता किंवा शंकर–पार्वती, कृष्ण–गोपी यांच्यातील प्रेमाचे प्रतीक आहे (*फोटो क्र. १०८*). उंच खांब रोवून त्याच्या टोकावर गाठोड्यात गूळ, खोबरे, काही रूपये बांधून ठेवतात. हे गाठोडे कलाल ठेवतो त्याच्या मोबदल्यात त्याला फक्त त्यादिवसापुरतीच गावात दारू विकायची परवानगी मिळते. खांबाच्या एका बाजूला स्त्रियांचा गट उभा राहून गाठोड्यापर्यंत कोणी पोचू नये असा प्रयत्न करीत राहातो. तर खांबाच्या दुसऱ्या बाजूला पुरूषांचा गट खांबावर वर जाणे सोपे जावे असा प्रयत्न करतो. वर चढणाऱ्याचे पाय घसरावेत म्हणून हा खांब तेल लावून गुळगुळीत करतात. खांबावर फक्त तरूण मुले चढतात. दरवेळी एखादा धाडसी तरूण वर चढण्यात यशस्वी होतो. त्याला गाठोडे बक्षिस मिळते. मेघनाद हा नर आणि जेरी मादी आहे असे कोरकू मानतात.

कोरकू लोकगीतातून उलगडत गेलेल्या कोरकू दैवत परंपरा प्रत्यक्ष भेटीत जास्त स्पष्ट झाल्या. जाणकारांच्या तोंडून त्यांची परंपरांवर असलेली श्रद्धा अनुभवता आली. कठीण जीवन संघर्षातही त्यांनी परंपरांचे मूळ स्वरूप जपले असल्याचे प्रत्ययाला आले. इतकेच नाहीतर कोरकूंनी दैवतपरंपरेत वैदिक, पौराणिक आणि आधुनिक देवतांचा स्वीकार करून समन्वय साधल्याचे जाणवते.



चादर



चादर



चोळणा



चोळणा



आसूड



मुठवा गोमाज



धारणा



खेडा



हनुमानाचे देऊळ




हनुमान



दैयत



सातमाता



शितलामाता



बाळ आणि बाळंतीणीचे रक्षण करणाऱ्या देवता



छटीमायची पूजा



छटीमायची पूजा



दफन



सिढुली ((स्मृतीशिला)



सिढुली ((स्मृतीशिला)




सिढुली ((स्मृतीशिला)



मंडो(गावप्रमुख किंवा विशेष दर्जा मिळालेल्याव्यक्तींचे स्मारक



मंडोचे स्थान



विवाहानंतरच्या भोजनाच्या स्वयंपाकासाठी इफ्टीन (मातीची चूल)



खंडीत सूर्यदेवता



जिरोती सणामध्ये काठीवर चढून खेळणारा मुलगा

दिवाळी



सणामध्ये पूजले जाणारे पांडवांचे प्रतीक



होळी




होळी



वाटसरूंकडे फगवा मागणाऱ्या स्त्रिया



मेघनाद



मेघनाद



रावण



जेरी

प्रकरण पाचवे

उपसंहार

कोरकूंचा परिसर व त्यातील साधनसंपत्ती

या प्रबंधाचा विषय आदिवासी दैवत परंपरांचा अभ्यास हा आहे. विषयाच्या व्याप्तीचा विचार लक्षात घेता सर्वच आदिवासी समाजांच्या दैवतपरंपरांचा अभ्यास प्रस्तावित प्रबंधाच्या चौकटीत करणे कठीण आहे. उदाहरण म्हणून कोरकू समाजाच्या दैवतपरंपरांशी भारतीय धारेतील इतर दैवतपरंपरांशी असलेला संबंध समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे समजून घेताना धर्माचे समाजशास्त्र *(Sociology of Religion)* या विषयाचा आधार घेतला आहे. धर्माचे समाजशास्त्र हा विषय समाज, धार्मिक श्रद्धा आणि आचार यांचा अभ्यास करते.

कोरकू महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशचे निवासी आहेत. हा प्रदेश पूर्व-पश्चिम पसरलेल्या विंध्य आणि सातपुडा पर्वतांच्या रांगांनी वेढलेला आहे. बहुसंख्य कोरकूंचे वास्तव्य सातपुड्याच्या उत्तर आणि दक्षिण रांगांमध्ये आहे. महाराष्ट्रातील अमरावती जिल्हा आणि आजच्या मध्यप्रदेशातील बैतूल, छिंदवाडा, होशंगाबाद, निमाड, इत्यादी जिल्हे, नर्मदा परिसर हे कोरकूंचे निवासक्षेत्र आहे. कोरकूंच्या एकूण लोकसंख्येतील जवळजवळ ३०% हून अधिक कोरकू मेळघाटात राहातात. दाट जंगले हे या भागाचे वैशिष्ट्य आहे. या जंगलात रानडुकरे व अस्वले भटकताना आढळतात.

पूर्वेला बंगाल आणि बिहार, पश्चिमेला गुजरात, दक्षिणेला महाराष्ट्रातील अकोला, यवतमाळ आणि बुलढाणा हे जिल्हे, उत्तरेला मध्यप्रदेशातील भोपाळ, जबलपूर, आणि छत्तीसगड राज्य अशा या प्रदेशाच्या सीमा आहेत. तापी नर्मदा पूर्णा, सिपना, टिगनी, गडगा, सुखी या नद्या व त्यांच्या उपनद्या या प्रदेशातून वाहतात. येथील हवामान विषम कोरडे आहे. हा प्रदेश अधिक पर्जन्यमानाचा आहे. सरासरी पाउस १९०५ मि. मी. इतका पडतो. ज्वारी, कोदो, कुटकी, का-हळे, राळा, धान, भुईमुग ही

येथील प्रमुख पिके आणि वनौषधी, डिंक, मध, हरडा, गवत, मोहाच्या बीया, मोहाची फुले, चारोळी, तेंदुपाने ही येथील प्रमुख वन्योत्पादने आहेत. येथील रहिवाशांचा निर्वाह प्रामुख्याने शेती, वन्योत्पादने गोळा करून विकणे, शासकीय योजनांमध्ये मजुरी आणि लाकूडतोडी यावर अवलंबून आहे. या प्रदेशात कोरकूंखेरीज आंध, परधान, बैगा, माडिया, गोंड, कोलाम राजगोंड, निहाल या आदिवासी जमाती आणि गवळी, बलिया या मागासवर्गीय जमातींची वस्ती आहे.

मेळघाट आणि कालीभीत जंगल या परिसरात विखुरलेल्या लहान-लहान वस्त्यांमध्ये कोरकू स्थायिक झाले आहेत. जंगलातील वन्य उत्पादने, कंदमुळे, फळे, भाजीपाला, मासे, पशू-पक्षी या गरजेच्या वस्तू त्यांना या क्षेत्रात सहजपणे उपलब्ध होत होत्या. शिवाय कोरकूंना स्थलांतरित शेतीच्या पद्धतीने कोदो, कुटकीसारखी धान्ये पिकवणे शक्य होत होते. त्यांच्या परंपरा पर्यावरणाला अनुकूल अशाच होत्या. त्यांची जीवनप्रणाली जंगलातील वन्य उत्पादन आणि त्याचा विनिमय यावर अधिष्ठित होती.

प्राचीन कालापासून मध्ययुगापर्यंतच्या प्रदीर्घ कालावधीत मौर्य, शुंग, सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, यादव इत्यादी अनेक राजवंशानी या प्रांतावर अधिपत्य गाजवले. पण गोंडांखेरीज इतर स्थानिक लोकांची सत्ता स्थापन झाल्याचे उदाहरण मात्र आढळत नाही.

१५९८ मधे अकबर बादशहाने मेळघाटात शांतता आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याच्या अटींवर सहा परगण्यांवर राजपूत सुभेदार नेमले. त्यांना राजा ही पदवीही दिली होती. कालौघात राजपूत सुभेदारांचे विवाह कोरकू स्त्रियांशी झाल्याचे मानले जाते. त्यांची संतत्ती कोरकू म्हणूनच ओळखली जाते. ब्रिटिश शासनाने वरील कोरकू राजांवर तंट्या भिल्लाला मदत केली असा आरोप ठेवून अनेक राजांना निलंबित केले. त्यात खटकली संस्थानाचा समावेश नव्हता. अजूनही त्यांच्या वंशजांना कोरकू आपला राजा मानतात.

मराठ्यांनी विदर्भावर अंदाजे दीडशे वर्षे राज्य केले. १७२४ मध्ये पेशवे आणि निजामामध्ये करार होऊन अमरावती विभाग निजामाच्या अधिकारात आला. १८६० मधे निजाम आणि ब्रिटिशांमध्ये करार झाला. करारानुसार हा सर्व प्रदेश (*म्हणजेच बरार*) ब्रिटिशांच्या ताब्यात आला. ब्रिटिशांनी १८६१ मध्ये हा सर्व प्रदेश आणि निजामाच्या हद्दीतील मराठी भाषिक प्रांत जोडून सेंट्रल प्रॉव्हिन्स निर्माण केला. आजही **कोरकूंचे हेच निवास क्षेत्र आहे**.

कोरकूंचे वास्तव्य मध्यभारतात केव्हापासून आहे हे निश्चित सांगता येत नाही. तरीसुद्धा अभ्यासकांच्या विवेचनातून असा अंदाज करता येतो, की आर्य आणि द्रविडांचे आगमन मध्यभारतात होण्यापूर्वी या प्रदेशात काही आदिम समाजांचे अस्तित्व होते. हे आदिम समाज दक्षिण आशिया, ऑस्ट्रेलियापर्यंत पसरलेले होते असे मानले जाते[२१]. आता मात्र हा समाज छोट्या छोट्या समूहात विभागलेला दिसतो. (*कर्वे १९९०:३१६*) विभागलेल्या समूहातील सर्वात पश्चिमेकडचा ऑस्ट्रो-एशियाटिक भाषा समूहातील मुंडारी भाषा बोलणारा एक समूह कोरकू म्हणून ओळखला जातो.

आज ज्या समाजांना आदिवासी या नावाने संबोधले जाते. त्या समाजांचा उल्लेख प्राचीन साहित्यात 'जन' म्हणून केला असल्याचे दिसते. आर्य आणि द्रविड समाजांचे आगमन मैदानी प्रदेशात होण्यापूर्वी हे समाज मैदानी प्रदेशात स्थिरावले होते. बहुतांश जन हे प्रोटो-आस्ट्रोलॉइड वंशाचे होते. कृषिप्रधान संस्कृती विस्तारत गेल्या तसेतसे ते डोंगराळ प्रदेशात सरकले. हे जन निषाद, कोल आणि शबर असल्याचे दाखले इतिहासात आहेत (*रे १९७२:१६*).

निमाडचे कोरकू स्वत:ला कर्कोटक नागवंशी असल्याचे मानतात. ते नागपूजा ही करतात. ते एक कथा सांगतात, त्यानुसार एक नाग जोडपे एका मुलाला मोहाच्या झाडाखाली टाकून निघून गेले. कनोजच्या राजाने बालकाचे पालन- पोषण केले.

२१ त्यातील एक ऑस्ट्रो- एशियाटिक बोलणारा, जंगलात राहून भात शेती करणारा व शिकारी समाज असावा.(कर्वे, १९९०:३१६)

त्याचे नाव 'महावासी' ठेवले. मोठा झाल्यावर त्याचे लग्न लावून दिले. व त्याला गांजार प्रदेशाची जहागिर दिली. आजही मेळघाटात गांगडा नावाचा प्रांत आहे. आणि मोवासी कोरकू गांगडा प्रदेशात रहातात (*सानप २००८:१२१*). कर्कोटक या जमातीला कार्तवीर्य अर्जुनाने जिंकले होते, असे वायुपुराणात म्हटले आहे (*संस्कृतीकोश खंड २:११३*).

कोरकूंची जीवनप्रणाली पर्यावरणाला अनुकूल आणि सामुदायिकतेला प्राधान्य देणारी असल्याचे दिसते. धार्मिक विधी सामुदायिक पद्धतीने साजरे करण्याची रूढी त्यांच्यात प्रचलित आहे. बहुतांश पूजाविधी पार पाडण्याची जबाबदारी भुमका किंवा परिहारावर आहे. सुफलन आणि समृद्धीसाठी देवतांना आवाहन करणे आणि संकटाचे मंत्रतंत्र करून निवारण करणे, अशीच सर्वसाधारण पठडी कोरकू समाजातही दिसते.

कोरकूंच्या प्रत्येक गावात पारंपरिक पंचायत असतेच. पारंपरिक पंचायतीकडे कुटुंब, भूमी, संपत्ति, स्त्री-पुरूष संबंधातील गुन्हा, जवळच्या नात्यातील निषिद्ध मानलेल्या संबंधांमुळे होत असलेल्या संघर्षांचे निवारण करण्याची जबाबदारी आहे. या संबंधात वाद निर्माण झाल्यास पंचायतीमध्ये तक्रार करता येते. पंचायतीचा कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी सहा व्यक्तींवर असते. १ प्रधान, २ भुमका, ३ परिहार, ४ पटेल, ५ दोन अन्य पंच, ६ रजालिया किंवा चौधरी. कुटुंब प्रमुखाला पंचायतीचा सभासद होता येते. स्त्रियांना मात्र सभासद होता येत नाही. कार्यवाही चालू असताना पंचायतीमध्ये प्रवेशावरही बंदी आहे.

कोरकूंनी समाजजीवन सुरळीत असावे, त्याचे सातत्य टिकून राहावे म्हणून वर्तणुकीचे नियम निश्चित केलेले आहेत. कोरकू त्यांचे काटेकोर पालन करतात. नियमांचे नियोजन कुटुंब आणि जातपंचायत या संस्था करतात. नियमाविरूद्ध वर्तन करणारा शिक्षेस पात्र ठरतो. ग्रामरचनेचे नियम ठरलेले आहेत. सर्व कोरकू गावे एकसारख्या रचनेची असल्याचे दिसते.

कोरकूंच्या समाजरचनेत भुमका महत्वाचा घटक आहे. हे पद वंशपरंपरेतून येते. तो सामाजिक, धार्मिक संस्थांचे आयोजन, नियोजन करतो. विवाहासाठी वर-वधुंची निवड करणे, सामायिक संपत्तीची वाटणी करणे, इत्यादींमध्ये त्याचा सल्ला किंवा अनुमती महत्वाची मानली जाते. एकंदरीत पाहाता तो समाजाचा नेताच असतो. त्याला देवतांशी संवाद साधता येतो. याची कोरकूंना आणि भुमक्याला सुद्धा खात्री असते. प्रत्येक कोरकू गावात पारंपरिक पंचायत आहे. या पंचायतीचा भुमका कायमस्वरूपी सभासद असतो. वृद्धत्वामुळे पदाचा त्याग करता येतो. पद मुलाकडे जाते. मुलगा नसल्यास कुटुंबातील इतर सदस्याची नियुक्ती होते.

समाजाचे सातत्य जन्म आणि मृत्यूच्या चक्रातून चालू राहाते. मृतात्मे पुन्हा आपल्या कुळीत जन्म घेतात ही संकल्पना सर्व भारतीय समाजात प्रचलित आहे. कोरकू गर्भधारणा झाली ही पूर्वजांनी कृपा केली असे मानून गृहदेवतेची पूजा करतात. ही पूजा परिहार अथवा भुमका करतो. पुजाऱ्याने मागणी केल्यास पशुबळी दिला जातो. बाळंतपणाला विलंब लागल्यास पूर्वज क्रोधीत झाले आहेत असे मानले जाते. पुजारी त्यांना प्रसन्न करण्याचे प्रयत्न करू लागतो. धारण्याची पूजा करतो. पूजनानंतर कोंबडीचा बळी देतो. बळीचे रक्त बाळंतिणीच्या पोटावर शिंपडून कानात मंत्र सांगतो. बाळाचा जन्म झाला ही पूर्वजांची कृपा झाली असे मानून जमलेल्या स्त्रिया पूर्वजांचे आभार मानणारे गीत गातात. बाळाच्या पाचव्या दिवशी छटी देवीची पूजा करतात. पूजेच्या वेळी छटीमॉ उपस्थितीत राहून बाळाचे भाग्य लिहून जाते असा कोरकूंना विश्वास वाटतो.

कोरकूंच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे गर्भवतीची फारशी काळजी घेतली जात नाही. बाळजन्मानंतर केवळ एक महिना स्त्री घरात राहाते. त्यानंतर ती बाळाला घरातील प्रौढांजवळ ठेवून बाहेर कामाला जाते. त्यामुळे कोरकू शिशुंमध्ये कुपोषणाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. मुले सात-आठ वर्षांची होईपर्यंत कोरकू मुलगा-मुलगी असा भेद करीत नाहीत. मुलगा आठ वर्षांचा झाल्यावर गाई-गुरांना चरायला जंगलात घेउन जातो. मुली घरकामात आईला मदत करतात.

कोरकू आपल्या मुलांना जीवनाला आवश्यक असलेले कुठल्याही प्रकारचे औपचारिक शिक्षण देत नाहीत. गुलेलीने पक्षी मारणे, तलावातील मासे पकडणे या गोष्टींचे ज्ञान मुले जंगलातील सोबत्यांकडून मिळवतात. त्यांना घरात आवश्यक असलेले जंगली खाद्य पदार्थ, जळणासाठी सुकलेल्या झाडाच्या फांद्या गोळा करून घरी आणण्याची सवय होते. यातून लहानपणीच मुलांना सामुदायिकता आणि नीतिमूल्ये समजतात. इतर मुलांबरोर लहान मुलेही दारू गाळणे व पिणे सुरू करतात. पुढे त्याचे परिवर्तन व्यसनात होते. व्यसनाधीनता हे कोरकूंच्या निर्धनतेचे एक कारण आहे असे मानले जाते. पारंपरिक समाजात विवाह संस्था ही कुटुंबसंस्थेला आधारभूत मानली जाते. अनेक कुटुंब मिळून समाज होतो. म्हणजेच विवाह हा समाजाचाही आधार आहे. कोरकू समाजाच्या विवाह संस्थेचे नियम आहेत व कोरकू त्याचे काटेकोर पालन करतात.

मुलाच्या आवाजात झालेला बदल आणि मुलीचे रजोदर्शन तारूण्य आल्याचे सूचक मानले जाते. हे विवाहासाठी योग्य वय आहे असेही कोरकू मानताना दिसतात. विवाहाचे वय झाल्यावर जोडीदार शोधण्यास सुरूवात होते. गावातील प्रौढ पुरूष आणि गावाचा भुमका विवाहासाठी वर-वधुंची आर्थिक, सामाजिक स्थिती समान असावी असा हेतू लक्षात घेऊन मुलांसाठी जोडीदाराचे संशोधन करतात.

कोरकू समाजात वधुमूल्य घेण्याची प्रथा प्रचलित आहे. वरपक्षाचा एक नातेवाईक (*सिथोरा*) वधुची माहिती जमवतो. वधुपक्षाचा प्रतिनिधी सिथो-च्यापुढे आपली बाजू मांडतो. वधुपिता मागेल ते देज (*गोनम*) मान्य झाल्यावर विवाह निश्चित होतो. वधुमूल्य नगदी पैशांमधध्ये अथवा पशुंच्या रूपात देतात. साहजिकच विवाह प्रसंगात वधुपक्षाची बाजू वरचढ ठरते. या विवाह पद्धतीला गोनम विवाह असे संबोधले जाते. या शिवाय लमझाना आणि घरघुशी विवाहप्रथा प्रचारात आहेत.

विवाहतिथीच्या आधी दोन ते तीन दिवस वरपक्षाकडून देज गाडीतून वधुघरी पोचविले जाते. गाडी वधुच्या गावात पोहोचल्यावर गावातील स्त्रिया नवी चूल घालून

विवाहविधींची सुरूवात करतात. वर-वधू दोघांच्याही अंगणात मांडव घालतात. मांडवाच्या मध्यावर खांब रोवतात. यावर चित्रे कोरण्याची प्रथा आहे. कालानुसार चित्रांमध्ये बदल होत असल्याचे दिसते.

वरपक्ष विवाहासाठी निघताना भुमका गृहदेवता आणि मुठव्याची पूजा करतो. कोंबड्याचा बळी देऊन त्याच्या रक्ताचे व दारूचे शिंपण मुठव्यावर करतो. मांडवात वर आणि वराची मोठी वहिनी एकमेकांना सात वेळा आलिंगन देतात. हा बहुबंधु पतिकत्व प्रथेचा अवशेष असावा (*पाटिल १९९३:९३*). प्रत्यक्ष प्रस्थान करताना वराच्या कट्यारीवर लिंबू खोचलेले असते.

विवाहाच्या दिवशी वधुवरांना मांडवात बसवतात. दोघांचे अंग घोंगडीने झाकतात. वरून त्यांच्या अंगावर पाणी टाकतात. या विधीचा सांकेतिक अर्थ पावसासारखी प्रजननक्षमता वधुवरांना लाभो असा असल्याचे दिसते (*पाटिल १९९३:९३*). वर वधुच्या गळ्यात बिडाची माळ घालतो. यानंतर वधुवरांना खांद्यावर घेऊन अंगणाला तीन प्रदक्षिणा घालतात. प्रदक्षिणा घालताना ते दोघे एकमेकांच्या अंगावर हळदीने पिवळ्या केलेल्या अक्षदा टाकत राहातात. नंतर दोघांच्या वस्त्राची टोके बांधतात. दोघे मिळून मुठवागोमाजची पूजा करतात. या विधीनंतर विवाह संपन्न झाला असे मानले जाते.

कोरकू समाजात विधवा आणि विधुराच्या विवाहाला मान्यता आहे. एखादी मुलगी विवाहापूर्वी गर्भवती झाल्यास त्या मुलीचे वडील पंचायत बोलावतात. पंच तिला ज्याच्यापासून गर्भ राहिला त्याचे नाव विचारतात. जर त्या व्यक्तीने गर्भाचे पितृत्व मान्य केले तर वरपक्ष वधूपक्षाला देज देतो आणि गोनम विवाह होतो. कोरकू समाजात घटस्फोटासाठी दोन कारणे महत्वाची मानली जातात. स्त्री वंध्या (*बन्हया*) किंवा चारित्र्यहीन असेल तर पंचायत घटस्फोटाला मान्यता देते. घेतलेले वधुमूल्य परत करावे लागते म्हणून बरेचदा कोरकू पुरूष मूल न झालेल्या पत्नीचा त्याग न करता दुसरा विवाह करतो. दोन्ही स्त्रिया नवऱ्याच्या घरात राहतात. परित्यक्ता

स्त्रीशी विवाह केल्यास देजची अर्धी रक्कम तिच्या पहिल्या नवऱ्याला परत करावी लागते (*पाटिल १९९३:१०३*).

कोरकू समाजात पैतृक परंपरा आणि एकत्र कुटुंब पद्धती प्रचलित आहे. एकत्र कुटुंबात माता-पिता तसेच इतर नातेवाईकही राहतात. कोरकू कुटुंबपद्धतीत मुलीचा विवाह लमझाना पध्दतीचा असेल तर तिचा पती मुदत संपेपर्यंत बायकोकडे एकत्र कुटुंबात राहातो. विवाहित मुलगा, विवाहानंतर धाकट्या भावाच्या विवाहापर्यंतच एकत्र राहातो आणि नंतर तो स्वतंत्र बिऱ्हाड करतो. स्वतंत्र बिऱ्हाड झाले तरीही चल-अचल संपत्तीची वाटणी होत नाही. सामाईक कृषी उत्पादनाची वाटणी कुटुंबातील सदस्य संख्येनुसार होते. कर्ज-फेडीत मात्र स्वतंत्र बिऱ्हाड करून राहणाऱ्या कुटुंबियालासुद्धा बरोबरीने सहभागी व्हावे लागते. वडिलांच्या मृत्यूनंतरच संपत्तीची वाटणी होते. सावत्र मातेला मूलबाळ नसल्यास वडिलांच्या मृत्यूनंतर घरात राहाणारा लहान मुलगा तिचा सांभाळ करतो. आकाराच्या अनुषंगाने विचार केल्यास कोरकू कुटुंबाला सीमित संयुक्त परिवार अशी संज्ञा देणे उचित ठरेल. वडिलांच्या मृत्यूनंतर प्रत्येक मुलाचे कुटुंब स्वतंत्र कुटुंब म्हणून ओळखले जाते. पिता पंचायतीचा सदस्य असल्यास त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा त्याची जागा स्वीकारतो.

कोरकूंचे वारस आपल्या घरातील प्रत्येक मृत व्यक्तीने पुन्हा आपल्याच कुळीत जन्म घ्यावा अशी अपेक्षा करताना दिसतात. सिडोली उत्सव केल्याने आपली अपेक्षा पूर्ण होईल याची खात्रीही त्याला वाटत असते. म्हणून ते ढफन, पितरमिलोनी आणि सिडोली उत्सव मनापासून करतात.

दैनंदिन जीवनातील अडचणी

स्वातंत्र्य प्राप्तीपर्यत आदिवासी समाजाला, गरीबी, ढळणवळणाच्या सोयींचा अभाव, अपुऱ्या वैद्यकीय सेवा, अस्वच्छ पाणी, बेरोजगार इत्यादी अडचणींनी ग्रासले होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनाने अनेक योजना आखल्या व लागू केल्या आहेत. योजनांचा लाभ आदिवासींना मिळत असल्याचे त्यांच्यात होत असलेल्या

बदलांवरून म्हणता येईल.

गेली अनेक शतके कोरकूंची वस्ती डोंगराळ प्रदेशात आहे. त्याचे दैनंदिन जीवन शेती आणि शिकारीवर अवलंबून होते. ब्रिटिशांनी 'वनसंरक्षण' योजना आखल्या. संरक्षित क्षेत्रात स्थानांतरित शेतीवर आणि पशूंच्या शिकारीवर बंदी आली. संरक्षित क्षेत्रात स्थायिक असलेल्या आदिवासींच्या जमिनी गेल्या. पर्यायी जमिनी देण्याचा विचारही शासनाने केला नाही. वनसंरक्षण कायद्यामुळे शिकार आणि स्थलांतरीत शेती बंद झाली. शिकार हा कोरकूंचा जोडव्यवसाय होता. पोटाला पुरेसे अन्न मिळत होते ते मिळेनासे झाले. अन्न सामग्रीच्या कमतरतेमुळे स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत या प्रदेशातील आदिवासी हलाखीचे जीवन जगत राहिले. ज्या आदिवासींच्या जमिनी संरक्षित क्षेत्राबाहेर होत्या त्या जमिनी सावकार आणि जमीनदारांनी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन ताब्यात घेतल्या होत्या, असे मानले जाते. शासनाने या परिस्थितीतून आदिवासींची सुटका करण्यासाठी अनेक योजना चालू केल्या आहेत. त्याचा लाभ आदिवासींना मिळत असल्याचे दृश्य हळूहळू दिसू लागले आहे.
मध्यवर्ती शासनाने आदिवासींची आर्थिक सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन 'आदिवासी उपाययोजना' तयार करण्याची शिफारस केली होती. या योजनेची उद्दीष्टे पुढील प्रमाणे आहेत–

१– आदिवासींना मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी दळणवळणाची साधने वाढवणे, शैक्षणिक विकास घडविणे, शास्त्रीय उत्पादन पद्धतीची माहिती देणे.

२– आदिवासींना आर्थिक शोषणातून मुक्त करणे.

3– आदिवासी क्षेत्रात शेतीला पूरक धंदा सुरू करणे.

४– आदिवासींना खावटी कर्जाद्वारे कर्जपुरवठा सहकारी पद्धतीने करणे.

५– आदिवासी मुलांसाठी आश्रम शाळा स्थापन करणे.

प्रादेशिक शासनाने मध्यवर्ती शासनानाच्या शिफारशींनुसार विजेच्या पंपासाठी अर्थसहाय्य, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, वाहातुकीसाठी साधने, पाणीपुरवठा इत्यादी कल्याणकारी योजना आदिवासी समाजासाठी लागू झाल्या आहेत.

आदिवासी संशोधन व प्राशिक्षण संस्था, आश्रमशाळा इत्यादींवर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. शासनांनी अमलात आणलेल्या सर्व योजनांमध्ये आदिवासींकडून प्रतिसाद मिळत आहे (*जाधव १९८९:४८*).

इतरांच्या संपर्कातून झालेली देवाण घेवाण

गेली अनेक शतके कोरकूंचे वास्तव्य मध्य भारतात असले तरी ते छोटा नागपूर भागातून स्थलांतर करून आले आहेत, असे बहुतांश विद्धान मानतात. स्थलांतराला अनेक वर्षे लागली असावीत, हे स्पष्ट आहे. त्या काळात त्यांचा संपर्क वेदपूर्व, वैदिक परंपरेतील कथा, श्रद्धांशी झाला असावा असे अनुमान त्यांचा लोककथा, लोकगीतांवरून करता येईल. म्हणूनच आजच्या कोरकू दैवतपरंपरांना मिश्रस्वरूप प्राप्त झाले आहे.

कोरकू चंद्रावर डाग असण्याचे कारण सांगतात, इंद्र आणि चंद्र एकदा एका ऋषींच्या घरी ऋषीं नसताना गेले होते. घरात ऋषींपत्नी एकटीच होती या दोघांनी ऋषींपत्नीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. गंगेने स्नान करीत असलेल्या ऋर्षीना ही गोष्ट सांगितली. ऋषीं ताबडतोब घरी आले. त्यांना पाहून इंद्र व चंद्र घाबरून पळू लागले ऋर्षीनी त्यांच्या अंगावर लंगोट फेकला. तोच लंगोटाचा डाग आजही चंद्रावर दिसतो.

कोरकू रावणाला आदर्श राजा मानतात. काही कोरकू आम्ही रावणाचे वंशज आहोत असेही म्हणतात. होळी नंतरच्या मंगळवारी कोरकू मेघनादचा उत्सव करतात. या उत्सवात मेघनाद आणि रावणाची पूजा करतात. तरीही इतरांच्या संपर्कामुळे त्यांनी रामाला आपल्या दैवतमंडळात प्रतिष्ठित केले आहे. अशा अर्थाचे एक देवगीत कोरकू गातात. त्या गीतात हनुमान कुठे आहे असा प्रश्न विचारला आहे. त्याचे उत्तर हनुमंत पिंपळाच्या झाडाखाली बसला आहे. हे मुठवा, शिवमहादेव, भीम, अर्जुन, चंद्र-सूर्य, राम-लक्ष्मण खेडादेव आणि भुमक्याला माहित आहे, असे दिले आहे (*बऱ्हाटे १९० ७:२७६*).

दुसऱ्या एका गीतात कन्हैया नाचत असून तू कोणाला देव मानले आहेस असा प्रश्न विचारला आहे. त्याचे उत्तर मी मुठवा, खेडा, चंद्र-सूर्य, भीम-अर्जुन, महादेव, आकाश-पाताळ यांना देव मानले आहे असे दिले आहे. या गीताच्या आधारे राम, श्रीकृष्ण, शिवमहादेव, भीम-अर्जुन, यांचा कोरकू दैवतमंडळात समावेश झाला आहे असे म्हणता येईल (*पौहार २००६:१४२*).

मुठवागोमाजच्या जन्मकथेत मुठवा भीम आणि कृत्येचा पुत्र असल्याचे सांगितले जाते. वरील कथांमधून कोरकूंचा वैदिक पौराणिक कथा, श्रद्धांशी परिचय असावा असे दिसते.

बहुतांश कोरकू गावात गणपती बसवतात. वर्गणी जमवून गणपतीची सामुदायिक पूजा करतात. रायपुर गावातील माजी बैठेकर सांगत होते, 'एका उन्हळ्यात गावात पाण्याची कमतरता झाली होती. शासनाने विंधण विहीर खोदली पण तिला पाणी लागले नाही. शाळेतील शिक्षकाने सांगितले गणपती बसवला तर विहीरीला पाणी लागेल पुढच्या वर्षी गणपती बसवला विहीरीला पाणी आले. तेंव्हापासून पाण्याची कमतरता होत नाही. आम्ही दरवर्षी गणपती बसवतो. मूर्ती पथरोटला मिळतात. अकराव्या दिवशी विसर्जन करतो. आम्ही नवरात्रात दुर्गामाचा दहा दिवस उत्सव करतो, दसऱ्याच्या आधल्या दिवशी दुर्गेचे विसर्जन करतो.

पायविहीर गावातील जीजी तोटे यांनी पुढील माहिती दिली. ती त्यांच्याच शब्दात देत आहे. पायविहीर गावाला लागून गोंडवाघोली गाव आहे. दोन्ही गावांच्या सीमेवर हनुमानाचे मंदीर आहे. गोंडवाघोली गावातील लोकांनी हनुमानाला आपल्या गावात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. परंतु हनुमान हलला नाही. गों डवाघोली गावात अल्पवयिन मुलांचे मृत्यू होण्यास सुरूवात झाली. गोंडवाघोली गावातील लोकांनी हनुमानाला घेऊन जाण्याचे प्रयत्न सोडून दिला.

चाळीस वर्षांपूर्वी पायविहीर गावातील आजारांचे वाढते प्रमाण पाहून गावातील

लोकांनी भुमक्याच्या सल्ल्याने गणपती उत्सव सुरू केला आहे. गावातील लोकांचा गणपती देवावर विश्वास आहे. गणपतीचे विसर्जन बारा दिवसांनी करतो. गावातील आजारांचे आणि अल्पवयिन मुलांच्या मृत्यूचे प्रमाण कमी झाले आहे. हा अनुभव आल्याने दुर्गापूजाही सुरू केली आहे. दुर्गेला नऊ दिवस फुलांची माळ घालतो. गव्हाची रोटी, रोटीवर गूळ, डाळभाताचा नेवैद्य दाखवतो. काही लोक दुर्गेची ओटी भरतात. या साडया विकण्याचा प्रयत्न झाला. ज्याने साड्या विकल्या तो स्वत: आजारी पडला. सुरूवातीला माझासुद्धा दुर्गामावर विश्वास नव्हता. पण मग मी सतत आजारी पडू लागले. देवाची प्रार्थना केल्याने माझी प्रकृती सुधारली. तेव्हापासून पितळेची दुर्गेची मूर्ती मी घरात ठेवली आहे, मी तिची रोज पूजा करते.

कोरकू दैवतपरंपांमध्ये केवळ आदिवासी आणि इतर जातीजमातींच्या देवतांचा समावेश झाला आहे, असे नाही तर इतर धर्मीयांच्या देवतांचाही कोरकू दैवतमंडळात प्रवेश झाल्याचे फोटोतून स्पष्ट दिसते. डवराबाबा, चुमक्याबाबा आणि पीरबाबांना कुलदेवतेचे स्थान प्राप्त झाले आहे. आधुनिक काळामधील संत सैलानीबाबा, गुणवंतबाबा हे कोरकू दैवतमंडळात प्रतिष्ठित आहेत. वरील दोन्ही बाबांचे भक्त ग्रामीण समाजात आहेत. औरंगाबादमधील काही भक्त नियमितपणे सैलानीबाबांच्या जत्रेला दरवर्षी येत असल्याचे अकोल्या मधील भक्त सांगतात.

सैलानीबाबा

काही वर्षांपूर्वी बोराटाखेड्यात एक फकीर राहात होता. त्याचे घर आणि स्मारक गावात सुरक्षित ठेवलेले आहे. हे स्मारक सैलानीबाबांचे आहे असे गावातील लोक सांगतात. याची पूजा चादर घालून आणि उदबत्ती लावून केल्याने वेड जाते असे कोरकू मानतात (*फोटो क्र. १०९*).

सैलानी बाबांच्या कृपेमुळे मानसिक रोगी आणि भूत-प्रेतांची बाधा झालेले रोगी बरे होतात अशी श्रद्धा महाराष्ट्रातील समाजात असल्याचे दिसते. आजही असे काही रोगी बाबांच्या दरबारात हजेरी लावतात. त्यांची कृपा असावी म्हणून बाबांच्या

दर्ग्याजवळ काही काळ वास्तव्य करण्याची प्रथा प्रचारात आहे. भक्तांसाठी दर्ग्याजवळ खोल्या बांधलेल्या आहेत.

सैलानी बाबांचा मृत्यू १९०७ साली महाराष्ट्रात बुलढाणा जिल्ह्यात पिंपळगाव पासून दोन कि. मी. अंतरावर झाला. हा प्रदेश लहान-लहान टेकड्यांनी व्यापलेला आहे. आजू-बाजूला थोडीफार शेती होते. अशा उंच-सखल प्रदेशात, मोठ्या आवारात बाबांचे दफन जिथे झाले त्याच जागी दर्गा आहे. छत घुमटाकार असून त्याच्याखाली मध्यभागी बाबांची शिला *(Turbat)* प्रस्थापित केलेली आहे. बाबांच्या कृपेने मानसिक रोगी बरे हातात. तसेच भूत-प्रेत बाधितांची बाधेतून सुटका होते अशी लोकांची श्रद्धा आहे. दररोजच येथे भक्तांची गर्दी असते. गुरूवार-शुक्रवार ती जास्तच वाढते. शिरनी, पेढा, मलिदा, नारळ आणि अगरबत्ती दर्ग्याला वाहण्याची प्रथा प्रचारात आहे. काही भक्त चिकन, मटणही वाहतात. गोमांस मात्र चालत नाही. दर्ग्याची व्यवस्था परंपरेतून आलेला खानदानी मुजावर पाहातो. तो सैलानी बाबांचा प्रमुख शिष्य शेख हुसेन मुजावरचा वंशज आहे. बाबांचा दर्गा असलेल्या विस्तीर्ण प्रांगणात रामजानीबाबा आणि वाघजली बाबांचे दर्गे आहेत. तसेच हिंदू देवता द्रुपदामाचा तांदळा, शंकर आणि मारूती, गुजराथी मा करवंदाच्या जाळीखाली स्थापित केलेल्या आहेत. येणारे भाविक दोन्ही ठिकाणी दर्शन घेतात. जवळच टेकडीवर गवळीबाबांचा दर्गा आहे. गवळीबाबा सैलानीबाबांसाठी रोज दूध घेऊन येत असत. वाटेत जंगल आहे. या जंगलात वाघांची वस्ती होती. बाबा वाघांपासून गवळीबाबांचे संरक्षण करीत असत असे मानले जाते. गवळीबाबांचा दर्गा लहानशा जागेत आहे. मध्यभागी गवळीबाबांची शिला प्रस्थापित केलेली आहे. येथे नियमित पूजा होत नाही. कारण नेमलेला पुजारी नाही. भक्त येऊन उदबत्ती लावतात आणि लिंबू वाहतात. गवळीबाबांच्या दर्ग्याजवळ द्रुपदामाचा तांदळा आहे. तांदळा गोल आकाराचा शेंदूराने रंगवलेला आहे. ही देवता येथील मूळ निवासी गवळी लोकांची असल्याचे लोक सांगतात. गवळीबाबा आणि द्रुपदामा या दोघांची जत्रा किंवा उरूस एकाच वेळी भरतो.

रामजानीबाबांचा दर्गा हे कानिफनाथांचे देऊळ असल्याचे स्थानिक हिंदू मानतात. रामजानीबाबा नाथपंथी होते असेही सांगतात. हे देऊळ किंवा दर्गा पांढऱ्या रंगाने रंगवलेला आहे. रामजानीबाबांच्या दर्ग्याजवळ शंकर आणि मारूती स्थापित केलेले आहेत. या देवतांच्या मूर्ती लहान आहेत. या देवतांच्या दर्शनाला लोकांची कायम गर्दी असते. जवळच एक विहीर आहे. या विहिरीच्या पाण्याने स्नान केल्याने त्वचा रोग जातात आणि पाणी सेवन केल्यास पोटाचे आजार बरे होतात असे मानले जाते.

सैलानीबाबा वाघजली दर्ग्याच्या जागी विश्रांती घेत असत. वाघ त्यांचा भक्त होता व तो दररोज येउन आपल्या शेपटीने ही पवित्र जागा स्वच्छ करायचा असे स्थानिक लोक सांगतात. या ठिकाणी मन्नत मागण्याची प्रथा आहे. बाजूच्या भिंतीवर आणि जवळच्या झाडावर रंगीत दोरे, कापडाच्या पट्ट्या बांधलेल्या दिसतात. प्रवेश दाराजवळ दोन्ही बाजूला वाघाचे दोन पुतळे मांडलेले आहेत. जवळच करवंदाच्या जाळीखाली गुजराथी माची मूर्ती स्थापित केली आहे. मुले व्हावी म्हणून वंध्या स्त्रिया या देवतेला मन्नत मागतात. मन्नत पूर्ण झाली तर हिरव्या बांगड्या वाहण्याची प्रथा प्रचलित आहे. येथे देवाचा संचार झालेली तरूण मुले आणि बायका शरीराला झटके देत घुमत असतात (*रॉय बर्मन २००१:१०७–१०८*).

गुणवंत बाबा, नागबाबा (शेष अवतार)

अकोटहून अचलपूर जाताना ३० ते ४० कि. मी. अंतरावर कारला गावात गुणवंत बाबांचे स्थान आहे. त्या जागी उषाताई कात्रे भेटल्या. त्या गुणवंतबाबांच्या भक्त आहेत. त्यांच्या अंगणात गुणवंत बाबांचा फोटो आणि सात आसरा मांडलेले होते. त्या रोज बाबांची पूजा करतात. पूजेत हळद, कुंकू, फुले, बाबांना आवडतात म्हणून भजी ठेवतात. बाबांना चपलाही वाहण्याची प्रथा आहे. बाबा २५ वर्षे पाताळात राहिले. त्यांना पाताळात चपला मिळाल्या नाहीत म्हणून चपला वाहतो असे उषाताईंनी सांगितले. त्या सांगत होत्या, 'सर्व आदिवासी विशेषत: कोरकूंची बाबांवर श्रद्धा आहे' सेमाडोहला भेटलेल्या राजपुतांचीसुद्धा बाबांवर श्रद्धा आहे. त्यांच्या खानावळीत बाबांचा फोटो लावलेला आहे.

बाबांचे मूळ गाव परतवाड्याजवळ लाखनवाडी हे आहे. ते जातीने धनगर होते. त्यांनी रामासारखा वनवास भोगला. नंतर ते पाताळात २५ वर्षे राहिले. यापेक्षा अधिक माहिती मिळाली नाही. बाबांचा फोटो आणि मूर्ती पूर्व मेळघाटात बिहाली जवळ स्थापित केलेली आहे. चुमक्याबाबाच्या पायाशी नागबाबांचा फोटो वाहिलेला होता. नागबाबांची मूर्ती पूर्व मेळघाटात बिहाली जवळ आहे (*फोटो क्र. ११०, १११*).

श्रद्धा पद्धती, दैवते आणि आचारविधी

कोरकूंचे धार्मिक जीवन

कोरकू मुळात निसर्गतत्त्वाचे पूजक आहेत, निसर्गाच्या सौम्य व उग्र रूपाच्या आलेल्या प्रत्ययातून कोरकूंनी निसर्गातील शक्तींना दैवत स्वरूपात प्रतिष्ठित केलेले दिसते. कोरकू देवांची दोन कुळे असलल्याचे मानताना दिसतात. (१)देवकुळ आणि (२)राक्षसकुळ.

धार्मिक विधी सामुदायिक पद्धतीने साजरे करण्याची रूढी त्यांच्यात प्रचलित आहे. बहुतांश पूजाविधी पार पाडण्याची जबाबदारी भुमका किवा परिहारावर आहे. सुफलन आणि समृद्धीसाठी देवतांना आवाहन करणे आणि संकटाचे मंत्रतंत्र करून निवारण करणे, अशीच सर्वसाधारण रूढी कोरकू समाजातही दिसते.

प्रत्येक सजीव अथवा निर्जिव वसतूंमध्ये आत्मा वास करतो. आत्म्याच्या प्रेरणेमुळे माणूस जगतो अथवा मरतो. नैसर्गिक घटकांमध्येही आत्मा असतो. चंद्र-सूर्यांनाही आत्म्यांकडूनच काम करण्याची प्रेरणा मिळते. अशा श्रद्धेतून निसर्ग घटकही कोरकू दैवत मंडळात प्रतिष्ठित आहेत म्हणूनच ते आरतीची सुरूवात धरती-आसमानाच्या आरतीने करतात.

कोरकू देवतांचे क्रम ठरलेले आहेत. पहिला मान धरती आसमानाचा आहे नंतर क्रमाने इतर देवता येतात. हा क्रम,मुठवा, खेडा, खट्टी, हरढुला, बिजासरी, हनुमान असा असल्याचे एका विवाहाचे आमंत्रण देणाऱ्या लोकगीतात म्हटले आहे

धारणागोमाज

कोरकू घर चौकोनी आकाराचे बांधतात. बांधकामाच्या. आरंभाला घराचा मध्यबिंदू काढतात मध्यबिंदूवर खूण करतात. खुणेच्या जागी. खड्डा खणतात. त्या खड्यात सोने. चांदी पैसे टाकून त्याची पूजा करतात खड्यावर खांब उभा करतात. या खांबाला धारणा किंवा उरोगोमाज म्हणतात.कुटुंबाच्या प्रत्येक कार्यारंभी याची पूजा करतात.

हनुमान

कोरकू गावात पश्चिम सीमेवर हनुमान आणि सातमातां प्रतिष्टित केलेल्या असतात. या सीमेवरच्या देवतांची पूजा भुमका किंवा परिहार करतो. शिशूजन्मानंतरच्या पूजेत मात्र स्त्रिया सहभागी होतात.

दैवत मंडळात पाऊस, वादळ, पिकांची वाढ इत्यादींसाठी स्वतंत्र देवता असल्याचे दिसते. शेतातील पिकांची संरक्षक देवता खट्टीगोमाज आहे. नांगरणी पासून मळणी पर्यंत प्रत्येक प्रसंगी त्याचे सामुदायिक पूजन करतात.

पावसासाठी कोरकू गंगा, दैयत. भीम. शंकर इत्यादी देवतांची पूजा करतात. रांडभावे सणात पाऊस यावा .म्हणून बेडकाला टोपलीत ठेऊन त्यावर पाणी टाकतात. अशा साधर्म्यदर्शक घटना घडवून सृष्टितील घटनाचक्रावर ताबा मिळवता येईल असे कोरकू मानताना दिसतात.

जंगलातील निवासामुळे हिवताप,दुषित पाण्यामुळे पोटांचे विकार, अपुरा आहार यामुळे लहानापासून प्रौढ व्यक्तींपर्यंत आजारांनी त्रस्त झालेल्या कोरकूंनी प्रत्येक आजाराची स्वतंत्र देवता मानलेली दिसते

कोरकू दुष्ट व्यक्तीची नजर माणसांना विशेषत: शिशुंना व गुरांनाही लागते.असे मानताना दिसतात. त्यासाठी तोडगे करतात. कोरकू शारीरिक व्याधींवर

वन्योषधींचे उपचारही करतात. परिहार वन्योषधींचा जाणकार असतो.

आत्मा अमर आहे आणि तो आपल्याच कुळीत पुन्ह जन्म घेतो.या संकल्पनेवर कोरकूंचा दृढ विश्वास आहे.गर्भधारणा होणे ही पूर्वजांची कृपा आहे असे कोरकू मानतात. म्हणून पूर्वजांचा कोरकू दैवत मंडळात समावेश झाला असावा.

कोरकू रावणाला देवतेचा मान देत नसले तरीही ते रावणाला देवतास्वरूप पूर्वजांचे स्थान देतात. तोच आत्मा आणि परात्मा यांचे मीलन घडवू सकतो असा आत्मविश्वास त्यांच्या लोकगीतातून व्यक्त होतो.(बन्हाटे१९० ७:२७८). म्हणूनच कोरकू मेघनाद आणि रावणाची पूजा करतात. मेघनादाला साकडे घातले तर तो संकट निवारण करतो अशा दृढ श्रद्धेने मनोभावे बगाडा सारखी कष्टमय उपासना करतात.

कोरकूंच्या विधी-आचारांचे संयोजन नियोजन भुमका अथवा परिहार करतो. त्याच्या जवळ जास्त सामर्थ्य आहे, तो देवतांशी आणि पूर्वजांशी संवाद साधू शकतो.अशी कोरकूंना खात्री वाटते. त्याच्या शरिरात देवता प्रवेश करतात.संचार झाला असताना आवाज बदलतो. क्वचित त्याची भाषाही बदलते.

कोरकूंच्या उत्पत्तीकथेनुसार रावणाने बुडू (डुक्कर), सीटा (कुत्रा), काग (कावळा), यांच्या मदतीने मानवी आकृती तयार केल्या. म्हणून प्राण्यांना कोरकूंनी दैवतमंडलात सामील केले आहे,. बुडूने घातलेल्या अटींनुसार कोरकू त्याची ढर तीन वर्षांनी महाभूषम म्हणून पूजा करतात. या शिवाय वाळवीने पृथ्वीची उत्पत्ती केली आहे म्हणून सर्वात प्रथम वाळवीची पूजा करावी असे एक लोकगीतही आहे.

जंगलात राहाणाऱ्या कोरकूंनी जंगलात मानवाचे आणि जनावरांचे रक्षण व्हावे या हेतूने सापाला भिलटदेव, वाघाला कुलामामा, जंगली रेड्याला भैसासूर मानून त्यांचा दैवतमंडळात प्रवेश दिला आहे.

गोठोबा ही देवता स्थापित केलेली आहे..(फोटो क्र ११४) ही देवता जंगलातील श्वापदांपासून पशूंचे संरक्षण करते अशी मान्यता आहे. या देवाची पूजा करताना देवासमोर मीठ ठेवतात. पूजेनंतर यातील थोडेसे मीठ ठेऊन बाकीचे मीठ गुरांच्या चाऱ्यात मिसळतात.स्थानिकतेनुसार या देवतेला भिन्न नावाने संबोधले जाते.

कोरकूंच्या दैवत मंडळात वैदिक पौराणिक आणि लोकदेवतांचा समन्वय साधला आहेच त्याच बरोबर पीर, चुमक्याबाबा,डवराबाबा यांना कुलदेवतेचे स्थान प्राप्त झाले आहे

कोरकू आदिवासींच्या प्रत्यक्ष भेटीच्या वेळी प्रश्नावलीच्या आधारे त्यांच्या परंपरांसंबंधीचे काही पैलू समजून घेण्याचा प्रयत्न केला (परीशिष्ट क्र. ४). त्या प्रश्नावलीला मिळालेल्या उत्तरांच्या आधारे काही निष्कर्ष काढता आले. ते पुढीलप्रमाणे:-

१/२ - ८६%कोरकू आदिवासी चंद्र-सूर्य भाऊ-भाऊ आहेत असे मानतात. म्हणून त्यांची पूजा एकाच वेळी करणण्याची प्रथा त्यांच्यात प्रचलित आहे. त्यासाठी असलेले पूजेचे विधी आणि पूजासामग्री ही हिंदू संप्रदायाप्रमाणे प्रचलित असलेले घरगुती पूजाविधी आणि सामग्री यांच्याप्रमाणेच आहे. शिशू जन्माकाळी किंवा गर्भधारणेसाठी सूर्यदेवतेची उपासना करतात.जेवणावळींची प्रथा आहे.देवतेशी संबंधीत आख्यायिका व आरत्याही आहेत (प्रकरण चार पहा). आकाशगंगेला 'राघीकोरा' म्हणतात. आकाशगंगेत दोन प्रवाह आहेत असे मानतात - पहिला सासऱ्याचा आणि दुसरा सुनेचा.

३- ७५% कोरकू जमिनीला देवता मानतात नांगरल्यामुळे जमिनीला दुखापत होऊ नये म्हणून नांगरणीपूर्वी नारळ,खारीक,लिंबू वाहून तिची पूजा करतात. काही ठिकाणी पूजेनंतर कोंबड्याचा बळीदेण्याची प्रथा आहे. जमिनीवर काही सांडू नये असे मानतात.

४ – ८०% कोरकू पाऊस पडावा म्हणून गंगा,भीम आणि शंकराची पूजा करतात. (सुखा) दुष्काळ पडल्यास हनुमानाच्या देवळात भजन म्हणतात. वीज पडू नये म्हणून पिसा आणि झिंगाबाबा या देवतांची पूजा करतात. आकाशातून पडलेल्या ढगडाला देवता मानलेले माहीत नाही.असे सांगतात.

५ – ८०% कोरकू पाण्यात रोग बरे करणारी शक्ती असते म्हणून पाण्याला पवित्र मानतात. भैसदेईपासून अंदाजे आठ ते दहा कि.मी. अंतरावर पूर्णानदी आहे. या दीच्या कृपेने संतान प्राप्ती होते. अशी या नदीची ख्याती आहे. कोरकू आणि इतर समाजाचे लोकही या नदीला नवस करणण्यासाठी किंवा फेडण्यासाठी नदीवर येतात. विहीर खणताना बली प्रथा नाही.विहीर खणण्यापूर्वी जमिनीची आणि कुदळ,फावडे घमेल्याची पूजा करतात. पाणि लागल्यावर पुन्हा पूजा केल्यावरच पाणी वापरतात.

६ – कोरकू समाजात स्त्रियांचा दर्जा दुय्यम मानला जातो. बहुतांश धार्मिक विधी भुमका अथवा परिहार करतात. काही विधी करण्याचा अधिकार फक्त कुटुंब प्रमुखाचा आहे स्त्रियांना पूजेचेवेळी हजर रहाणे कींवा प्रसाद ग्रहण करण्यावर बंदी आहे. स्त्रियांना फक्त शिशूजन्मानंतर हनुमानाची आणि देवीमॉची पूजा करण्याची मान्यता आहे. स्त्रियांना पंचायतीचे सदस्यत्व नाहीच पण पंचायत चालू असताना हजरसुद्धा रहाता येत नाही.

७ – ८०% कोरकू रावणाला देवतास्वरूप पूर्वजाचे स्थान देतात.एका लोकगीतीतून लंकेचा राजा रावण हाच आत्मा परमात्मा यांचे मीलन घडवून आणू शकतो असा आत्मविश्वास व्यक्त झाला आहे. या भावनेतून कोरकू होळीनंतर मेघनाद,कुंभकर्ण आणि रावणाची पूजा करतात.

८ – ७६% कोरकू जाळा, जोधा, पिसा, झिंगाबाबा यांना स्थानिक देवता मानतात.काही वेळा स्थानिकतेनुसार त्यांच्या नावात बदल झाला असल्याचे

दिसते. कोरकू सांगतात वाड-वडील यांची पूजा करत होते म्हणून आम्ही ही त्यांना देवता मानतो. मुठवा,खेडा या ग्राम देवतांना बळी देण्याची प्रथा कोरकू पाळतात. मुठवा आणि खेडा भाऊ-भाऊ आहेत. नवीन गावाच्या स्थापने आरंभी मुठवा,खेडा आणि दैयत या देवतांची पूजा करतात. या देवतांच्या जागा निश्चित केलेल्या असल्याचे कोरकू सांगतात. हा नियम कोरकू पाळतातही पण त्याचे कारण माहीत नाही असे सांगतात

९- ७०% कोरकू बंजारनमाय आणि गोफाळबाबा हे पशूंचे देव आहेत असे मानतात. गाई-गुरांची व शेळ्या, मेंढ्यांची काळजी घेणाऱ्या देवता त्याचआहेत. भुमका यांची पूजा करतो. पूजा पद्धती स्थानिक देवतांसारखीच आहे.

१० - ६०% कोरकू शिवारीसांजे,खट्टी या देवता पिकांचे संरक्षण करणाऱ्या देवता आहेत असे मानतात. पेरणी आणि कापणीच्या वेळेस शिवारीसांजे,खट्टी या देवतांची पूजा करतात.

११ - ७०% कोरकू स्थानिक देवता आणि स्वीकारलेल्या देवतांच्या पूजेत फरक नाही असे मानतात. फक्त स्थानिक देवतांना बळी देण्याची प्रथा वेगळी आहे.

१२ - ७१% कोरकू बंजारनमॉयला वनदेवता मानतात. हिची पूजा भुमका करतो.

१३ - ९०% कोरकू हनुमान,सातमाता खेडा यांना गावसीमेवरील देवता मानतात. यांची पूजा भुमका कींवा चोधरी करतो.

१४ - ६५% कोरकू प्रत्येक आजाराची स्वतंत्र देवता मानतात. उदाहरणार्थ.जरीमाय,खासीमाय

१५ - ८०% कोरकू नजर लागते असे मानतात. त्यासाठी दोरा बांधणे,ताईत

घालणे,मीठ- मिरची ओवाळणे इत्यादी उपचार करतात.

१६ - कोरकू दारा समोर रांगोळ्या कींवा आकृत्या काढत नाहीत.

१७ - ९५% कोरकू आत्मा पुन्हा आपल्याच कुळीत जन्म घेतो.असे मानतात. मृतस्मारकांत शक्ती असते. भुमका कींवा विशेष मान्यता पात्र व्यक्तीच्या स्मारकाला (सिढुलीला) मंडो म्हणतात (अधिक माहीती प्रकरण चार पहा). सैलानीबाबाच्या थडग्यात शक्ती आहे. त्यांच्या उपासनेमुळे वेड जाते.

१८ - ३०% कोरकू काळजी मुळे वेड लागते असे मानतात. पिराला चादर पांघरून आणि उदबत्ती लावल्याने वेड जाते असेही मानतात.

१९ - ८५% कोरकू देवता अथवा पूर्वज रूष्ट झाल्यामुळे मुले होत नाहित असे मानतात. त्यासाठी संचार झाल्यावर भुमका जे सांगेल ते उपाय करतात. पुर्णा नदीला नवस केल्याने संतान प्राप्ती होते, असेही मानतात.

२० - ९०% कोरकू देवतांजवळ दोन्ही शक्ती आहेत असे मानतात. अनुभवांची कुणीही नोंद केलेली नाही.

२१ - ७८ % कोरकू मृत्यूनंतर आत्मा ग्रामदेवतेजवळ जाताअसे मानतात. कोरकू परलोक मानतात. आत्महत्या केलेल्या व्यक्तीला गती मिळावी म्हणून तेरावा करतात.

२२ - ८९% कोरकू भूत असते असे मानतात. एक कथा जामम्बुखेडा गावात घडली असल्याचे गावकऱ्यांनी भुताला उंची वाढवता येत असेही मानत असल्याचे दिसते. भुतांना सैतान चुडेल अशी नावे आहेत. भुतांच्या राहण्याच्या किंवा वावरण्याच्या जागा दफनभूमी, पाण्याच्या जागी जंगलात, गावात किंवा एखाद्या झाडावर असतात. मुंजा कुणाला म्हणतात हे माहित नाही. वयात आलेल्या मुलीने

विषेशत;पाळी चालू असतांन किंवा बाळंतीणीने, नवजात शिशुनेही जाऊ नये अशी ठिखाणे नाहीत. जांभई देणे मोठ्याने आवाज करणे शीळ घालणे ही झाड सोडल्याची लक्षणे आहेत

२३ – वाघाने अथवा इतर जंगली जनावराने मारलेल्या(खाल्लेल्या)व्यक्तीच्या आत्म्याशी संबंधीत काही माहिती नाही. असे सांगतात

२४ – ओसाडजागी, खाणीत, गुहेत शक्ती असते असा समज नाही. गावात संध्याकाळी न जाण्याची काही ठिकाणे नाहीत.

२५ – ६५ % कोरकू तृतीयपंथी लोकांना सामान्य पद्धतीने वागवतात. जन्मवेळी बालकाला व्यंग असल्यास त्याला बाराबीटी म्हणतात.उदाहरणार्थ नवजाताला सहा बोटे असल्यास गावातील लोक जवळ घेऊन पैसे देतात. खुजेपणाकडे कमीपणाच्या भावनेतून पाहिले जात नाही.

२६ – ६७% कोरकू शुभ अशुभ दिवस किंवा शकुन पाळत नाहीत. देवाला कौल लावत नाही.

२७ –७०% कोरकू मृतात्म्याला सद्गती मिळावी म्हणून तेरावा करतात. मृताचे नित्य वापरायच्या वस्तू मृता बरोबर दफन करतात. दहन केल्या नंतर दिवा लावतात. सूतक किंवा सोयर पाळले जात नाही. मुलांना मुंडन करावे लागते. मृताच्या घरातील बायका कुंकू लावत नाहीत.

२८– कोरकू भांड्यांना मंगल किंवा अमंगल मानत नाही.

२९ – ६०% कोरकू झाडे, दगड, डोंगर, नदी, वृक्ष यांच्यामध्ये आत्मा असतो असे मानतात. गावतील गावतील कोणी व्यक्तीने दगडाची पूजा सुरू कोली तर तर

गावातील इतर लोकही त्याला देव मानतात. महुवा आणि साल वृक्षाची पूजा करतात. होळी साठी सुकलेल्या फांद्या वापरतात.सिदुलीसाठी सालाचे लाकूड वापरतात. नाग सोडून सर्व साप मारतात.

३० – कोरकू गुप्त धन(जमिनीत गाडलेली संपत्ती) या संबंधी काही कल्पना–कथा माहित नाहीत असे सांगतात.

३१ – सुफलनाचे विधी माहित नाहीत असे सांगतात.

३२ – कोरकूंच्या कुळींची यादी प्रकरण तीनमध्ये आहे. भुमक्याला संचार झाला असताना तो देवतेसाठी दगड निवडतो.त्या दगडाला विशिष्ट आकार देऊन देवतेच्या रूपात स्थापित केले जाते. दगडाची पूजा एका कुटुंबाने सुरू केल्या नंतर गावातील लोकही त्या देवतेचा स्वीकार करतात

३३ – ७०% कोरकू नित्य वापरातील सूप,टोपल्या,केरसुणी,नांगर यांना देवता मानून पूजा करतात.

३४ – अग्निपूजेच्या कींवा वेदीच्या खूणा आढळल्या नाहीत परंतु विवाहविधींच्या आरंभाला नवी चूल घालण्याची प्रथा आहे. जाम्बुखेडा गावातील भुमका गणाजी तांडेल बिडी पेटवण्यासाठी गारगोटी वापरतात.

३५ – ८२% कोरकू पशू, पक्षी, किटक, वृक्ष मंगल किवा अमंगल असल्याचे मानतात.

पशू : ६०% कोरकू शेळी, ६८% – कुत्रा, ६८% – म्हैस, ४४ % – डुक्कर, ५६% – घोडा, ५२%हत्ती यांना मंगल मानतात.

पक्षी : ४२% कोरकू कावळा, ५६% – कबुतर, ६३% – मोर, ६४% – कों

बडी यांना मंगल मानतात. घुबड आणि वटवाघूळ यांना फक्त अमंगल मानतात.

किटक : ढेकूणआणि डास फक्त अमंगल असून इतर सर्व किटकांना मंगल मानतात.

वृक्ष : सर्व वृक्ष मंगल असून त्यांना इजा करणे पाप मानतात.

मांस : स्त्रियांनी रानडुकराचे मांस खाल्यास त्यांना वंध्यत्व येते असा समज असल्यामुळे रानडुकराचे मांस घरी आणणे किंवा घरात शिजवण्यास कोरकू समाजात बंदी आहे.

३६ – ७७% कोरकू चेटूक करणाऱ्या जवळ शक्ती असते असे मानतात. चेटकिणीकडे हिन दृष्टीने पाहिले जाते(सविस्तर प्रकरण तीन पहा).

३७ – आरंभी कृषीची प्रत्येक प्रक्रिया आरंभी पूजाविधी करून होते (सविस्तर प्रकरण तीन पहा).

३८ – ४० % कोरकू पाऊस वेळेवर पडावा म्हणून हनुमानावर पाणी टाकत राहतात.

३९ – गुरांच्या संरक्षणासाठी विधी नाहीत.

४० – पिकांच्या संरक्षणासाठी 'होरीयार' विधी करतात(सविस्तर माहिती प्रकरण तीन पहा).

४१ – गूढ अथवा गुप्त विधी नाहीत

४२ – स्थानिक वैशिष्ट्ये असणाऱ्या कथा आहेत. कुलदेवतांविषयीच्या कथा (प्रकरण दोन पहा) कींवा (चंद्र–सूर्य (प्रकरण चार पहा)).

४३ – ९२% कोरकू गावातील पुजाऱ्याला भुमका म्हणतात. भुमक्याच्या राहाण्याची जागा मुठवा गोमाज जवळ निश्चित केलेली आहे. भुमक्याला त्याच्या घरी जाऊन आमंत्रण द्यावे लागते. सुगी नंतर भुमक्याला धान्य देण्याची प्रथा आहे. शिवाय शिवारातील निश्चित असलेल्या जागेवरचे धान्य भुमका स्वत: तोडून घेऊन जातो.तशी पूर्वापार चालत आलेली रूढी आहे.प्रत्येक कोरकू गावात भुमका असतोच. तो धार्मिक, सामाजिक संस्थांवर नियत्रण ठेवतो. कौटुंबिक संपत्तीची वाटणी नियमानुसार होते आहे का? यावर लक्ष ठेवतो. विवाहासाठी योग्य निवड करण्यास मदत करतो.

४४ – साधारणपणे तीन ते चार गावात एकच परिहार असतो. तो वनौषधींचा जाणकार असतो व तो वनौषधींनें उपचार करतो.

कोरकू दैवतपरंपरांचा यथातथ्य आढावा घेण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे. या माहितीचा आजच्या समाजास काय उपयोग आहे, असा प्रश्न कोणी उपस्थित करू शकेल. आदिवासी समाजांच्या रीतीरिवाजांचे जीवनसरणीचे आकलन कशासाठी करून घ्यायचे, या मूलभूत प्रश्नाशी निगडीत असा हा प्रश्न आहे. आजच्या समाजमनाच्या विस्मरणात गेलेल्या अनेक गोष्टींचे मूळ आदिवासी समाजाच्या वर्षानुवर्षे जपल्या गेलेल्या परंपरांमध्ये पहायला मिळते कारण त्या परंपरांमध्ये होत जाणारा बदल हा अत्यंत धीम्या गतीने होत आला आहे. आधुनिक जगाच्या वेगवान जीवनसरणीत यापुढेही आदिवासी परंपरा आहे तशाच जपल्या जाण्याची शक्यता कमी होत आहे. आदिवासीही शिक्षणाच्या आणि आधुनिक जीरनसरणीच्या मुख्य प्रवाहात सामील होत आहेत. ही एक अत्यंत स्वागतार्ह गोष्ट असली, तरी त्याची दुसरी बाजू ही आहे, की आदिवासींच्या जीवनसरणीतही बदल होत जातील, त्यांच्या वर्षानुवर्षे जपलेल्या परंपरा कदाचित लोप पावतील.त्या परंपरा हे मानवी संस्कृतीच्या वाटचालीतील एक महत्वाचा टप्पा दर्शवितात त्यांचे यथातथ्य वर्णन करणारा दस्तावेज तयार करणे हे पुढील पिढ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

त्याची काही प्रमाणात पूर्ती करण्याचे काम या प्रबंधात केले आहे.

आदिवासींच्या दैवतपरंपरा, त्या भोवती गुंफले गेलेले आदिवासींचे समाजजीवन, अर्थकारण याचा वेधही घेण्याचा प्रयत्नही या प्रबंधात केलेला आहे.भारतीय समाजजीवनातील एक महत्वाचा हिस्सा आदिवासींच्या समाज जीवनाशी, अर्थकारणासी अनिवार्यपणे जोडलेला आहे. भारतीय समाजजीवन आणि त्याचा इतिहास यथार्थपणे समजून घ्यायचा असेल तर आदिवासींचे त्यांच्या दैवतपरंपरांच्या भोवती गुंफले गेलेले समाजजीवन आणि अर्थकारण समजून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. त्या दृष्टिने हा प्रबंध उपयोगी ठरेल.


प्राचीन काळापासून अशा वैविध्यपूर्ण परंपरा असलेले समाज भारतात येत राहिले. कालंतराने ते भारतातच स्थाईक झाले. भारतीय समाजाने त्यांना त्यांच्या आचारा-विचारांसह स्वीकारले आणि म्हणून भारतीय समाजाच्या धार्मिक आचारा विचारांमध्ये औपचारिक धर्मविधी आणि लोकधार्मिक आचार यांची सरमिसळ झालेली दिसते.आज जो हिंदुधर्म म्हणून ओळखतो त्याला जसा वेदांचा आधार आहे तसाच पुराणग्रंथ, महाकाव्य, धर्मशास्त्र तसेच लोकपरंपरा याचा आधार आहे. ज्याप्रमाणे आदिवासी समाजाच्या दैवत परंपरांचे लोकधर्माशी असलेले नाते आणि त्यातूनच हिंदुधर्मामध्ये त्याचा झालेला समावेश, त्यामध्ये झालेले आनुषंगिक बदल याचा अभ्यास या दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न केला आहे.

काही अभ्यासकांनी त्याचे महत्व विशद केलेले असले तरीसुद्धा त्याचा अधिक अभ्यास करणे जरूरीचे होते. विशेषत: आदिवासी समाजाच्या दैवत परंपरांचे लोकधर्माशी असलेले नाते आणि त्यातूनच हिंदू धर्मामध्ये त्याचा झालेला समावेश, त्यामध्ये झालेले अनुषंगिक बदल याचा सखोल अभ्यास झालेला नाही. सर्वच आदिवासी दैवत परंपरांचा अभ्यास या दृष्टिकोनातून व्हावा ही तौलनिक धर्मजिज्ञासेची, तौलनिक अभ्यासाच्या क्षेत्रातील निकडीची गरज आहे. हे लक्षात आले. परंतु विषयाची व्यापकता लक्षात घेता धर्मजिज्ञासेचा तौलनिक अभ्यास


पद्धतीचा उपयोग करून कोरकू आदिवासी जमातीच्या दैवत परंपरांचे अध्ययन करण्यातून या गरजेची अंशत: पूर्तता करणे शक्य झाले.



नाग बाबा (गुणवंत बाबा)



गुणवंत बाबा





बिहाली वनराई स्थित असलेल्या सिद्धुली



गोठोबा



टेकडीवर आमराईत राजवाड्याचे भग्न अवशेष

परिशिष्ट क्रमांक १

कौटिलीय अर्थशास्त्रात वन्योत्पादनांची यादी आहे. द्रव्यांचे इतरत्र मिळणारे संदर्भ आहेत.

त्यामध्ये वनसंरक्षक शासकीय अधिकाऱ्याला 'कुप्याध्यक्ष' आणि वन्योत्पादनांना 'द्रव्य' असे संबोधन आहे. अर्थशास्त्रात वनसंरक्षण आणि गरजेच्या वस्तू तयार करण्यासाठी केलेल्या सूचना खालील प्रमाणे आहेत: कुप्याध्यक्षाने द्रव्यवनातील रक्षक अधिकाऱ्यांकडून तेथील माल आणण्याची व्यवस्था करावी. द्रव्यवनातील मालासाठी कारखाने उभारावेत. द्रव्यवनातील झाडे तोडणाऱ्यांनी त्याबद्दल किती रक्कम द्यावी व परवानगी शिवाय तोडल्यास आपत्तीचा अपवाद वगळता किती दंड घ्यावा ते निश्चित करावे (*कंगले १९८५:१४२*). लागवडीस योग्य नसलेल्या जमिनीवर जंगलात उत्पन्न होणाऱ्या व उपयोगी पडणाऱ्या म्हणून सांगितलेल्या पदार्थांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे द्रव्यवने लावावीत. द्रव्यवनांच्या आश्रयाने जंगली लोकांना तेथे वसवावे (*कंगले १९८२:६१, ८२*).

मौर्य कालात वन्योत्पादनांचे उत्पादक वनवासी (*आदिवासी*) होते हे स्पष्ट आहे. प्रदीर्घ कालावधीचा विचार करता वनस्पती व वृक्षांच्या नावात फारसा बदल झालेला दिसत नाही. त्याचप्रमाणे द्रव्याचे उत्पादक वनवासी (*आदिवासी*) ही पद्धती साहित्याव्दारे आणि आयुर्वेदीय ग्रंथाव्दारे सातत्याने टिकून असल्याचे दिसते. *(It is interesting to note that the rural communities are still dependent on herbal medicines and take herbal medicine from herbal healers of their area - Vijendra-Khati, 2010: 666)* अशी नोंद केली आहे.

जैविक विविधता असणाऱ्या जगातील बारा देशांपैकी भारत हा एक देश आहे. वनस्पती जगतात फुले धरणाऱ्या एकूण ४२५ प्रजाती आहेत. त्यापैकी भारतात ३२८ प्रजाती असल्याची नोंद आहे. भारतीय शासनाने त्यातील ३,००० वनस्पतींचे संरक्षण आणि संवर्धन करणारी N. W. F. P. S ही योजना १९८८ पासून लागू केली आहे. *(Produced by Forestry department)* या योजनेअंतर्गत *Institute of Deciduous Forests (I. C. F. R. E) Jabalpur* ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेच्या अहवालातून निवडलेली

वन्य उत्पादने कौटिलीय अर्थशास्त्रातील द्रव्यांच्या वर्गातील आहेत. औषधी द्रव्ये *(National Medicinal Plant Board)* यांच्या यादीतील आहेत.

१) कौटिलीय अर्थशास्त्रातील द्रव्ये

२) वनस्पतींची लॅटीन नावे

३) बॅनर्जींच्या शोध निबंधातील वनस्पतींची नावे *(Kautily Arthasastra on forestry by Manubendu Banerjee, 2010)*

४) भावप्रकाश या आयुर्वेदीय ग्रंथातील वनस्पती (*निघंटू व्याख्याकार, ब्रम्हशंकरशास्त्री नवम संस्करण १९९९*)

५) महाभारतातील वनस्पती (*नागर १९५६*)

६) वराह पुराणातील वनस्पती (*नागर १९५६*)

७) वामन पुराणातील वनस्पती (*नागर, १९५६*)

८) द्रव्यांची मराठी नावे (*संज्ञा*)

९) कौटिलीय द्रव्यांच्या वर्गातील *N. W. E. P. S* च्या अहवालातील आणि *(National Medicinal Plant Board)* यादीतील आहेत.

कौटिलीय अर्थशास्त्रातील दोर करण्याच्या कामी उपयोगी गवत १४३आणि त्याचे इतरत्र असणारे संदर्भ								
कौटिलीय अर्थशास्त्रातील द्रव्ये (कंगले १९८२:१४२)	वनस्पतींची लॅटिन नावे	बॅनर्जींच्या शोध निबंधातील वनस्पतींचे संदर्भ	भावप्रकाश या आयुर्वेदीय ग्रंथातील वनस्पतींचे संदर्भ	महाभारतातील वनस्पतींचे संदर्भ	वराह पुराणातील वनस्पतींचे संदर्भ	वामन पुराणातील वनस्पतींचे संदर्भ	वनस्पतींची मराठी नावे	कौटिलीय द्रव्यांच्या वर्गातील वनविभागात असणाऱ्या वनस्पती
मुंज	*Saccharum Munja RoXb*	*Sacchar um munja मुंज*	*मुंज ३८०*	मुंज (महाभारत) ३८			शेर	*Saccharum Munja*
बल्वज		*Eleusine Indica*						

कौटिलीय अर्थशास्त्रात उल्लेख केलेली लेखनासाठी उपयोगी पाने (१४३)	
ताली	ताली, ताड , भूर्ज इत्यादी पानांचा वापर आता लिहिण्यासाठी होत नाही.
ताड	
भूर्ज	

वेळूंचा (बांबूंचा) वर्ग (१४२) आणि त्याचे इतरत्र असणारे संदर्भ

उटज (मोठी भोके, नाजूक काटे असलेला व खडबडीत)	बांबूंच्या एकूण १०० प्रजाती भारतात आहेत. बहुतेक प्रजाती वन्य आहेत. कौटिल्याने ज्या पद्धतीने त्यांचे तपशीलवार वर्गीकरण केले आहे ती वर्गीकरणाची पद्धत आज आढळत नाही.
चिमिग (भोके नसलेला व वरून गुळगुळीत)	
चाप (लहान भोके व फार खडबडीत)	
वेळू (काटे नसलेला, धनुष्य करण्यास उपयोगी)	
वंश (भोके आणि लांब पेरे असलेलात, बासरी करण्यास उपयोगी)	
सातिन (पुष्कळ काटे असलेला)	
कंटक(गव्हासारख्या लोंब्या असलेला)	
भाल्लूक(लांब पेरे असलेला)	

कौटिलीय अर्थशास्त्रातील धातू वर्ग (१४३)आणि त्याचे इतरत्र असणारे संदर्भ	
लोखंड	हे सर्व धातू भारतात सर्वत्र प्रचारात आहेत.
तांबे	
पोलाद	
कासे	
शिसे	
कथिल	
वैकुंतक (पारा, पारद)	
पितळ	

वल्कांचा वर्ग								
कौटिलीय अर्थशास्त्रातील 'द्रव्ये'	वनस्पतींची लॅटीन नावे	बॅनर्जींच्या शोध निबंधातील वनस्पतींचे संदर्भ *१२५)*	भावप्रकाश या आयुर्वेदीय ग्रंथातील वनस्पतींचे संदर्भ	महाभारतातील वनस्पतींचे संदर्भ	वराह पुराणातील वनस्पतींचे संदर्भ	वामन पुराणातील वनस्पतींचे संदर्भ	वनस्पतींची मराठी नावे	कौटिलीय द्रव्यांच्या वर्गातील वनविभागात असणाऱ्या वनस्पती
मालती	*Jasminum Grandiflorum*	*Jasminum Grandiflorum*	चमेली ४९१				चमेली	
मूर्वा	*इरींहळपळर रिहश्रळश्र*	*रिपेळल सींरी*	मूर्वा ४३६					
अर्क	*उरश्रीीळी ऋळसरपींशर*	*उरश्रीीळी ऋळसरपींशर*	श्वेतार्क		अर्क	अर्क	रूई	
बिब्ब्याच्या झाडाच्या [२२]फांद्या (१४१)	*ङ्शाशलरीीिी रपरलरीवळी*		भल्लातक (१४१)		बिब्बा			
गवेधुका (गरदेहुआ)	*उेळु श्रलहीरषेलळ डळपप*	*उेळु इरीलरींर*	गरदेहुआ ६६०				कसई	
अतसी		*डळपीं णीळींरींळी डळीं*						
भल्लातक (७०)	*ङ्शाशलरीीिी रपरलरीवीं*							

२२ १६व्या शतकात *Garcia daOrta* यांच्या *The drug and samples of India* या ग्रंथात बिब्ब्याचा उल्लेख आहे. (वैद्य-राउत, १९१२:३). तसेच रसेल ह्यांनी मध्य भारतातल्या महादेव कोळींच्या एका पोटजातीचा उल्लेख कोला आहे. भिलावफोडया नावाने ओळखल्या जाणाऱ्या या पोटजातीचे सदस्य बिब्ब्याचे तेल काढण्याचा व्यवसाय करत असत. बिब्ब्याचे तेल वन्योत्पादन म्हणूनच त्यावेळेस बाजारात येत होते आणि तो उद्योग आदिवासी वंशपरंपरेने करत होते. हे या वरून स्पष्ट दिसते. (रसेल, २००७ (इ बुक) :७३४)आजही खानदेशातील निहाल बिब्ब्याचे तेल काढून त्याची पावडर करून विकतात (सिंग, भानू, १९७५:२६१)

कंद, मुळे, फळे	कौटिलीय अर्थशास्त्रातील औषधी वर्ग *ज्या वनस्पतींच्या कंद, मुळे, फळांमधून औषधी द्रव्ये मिळतात अशा ६०० वनस्फतींची नोंद आहे.* *(Encyclopedia of Ayurvedic Medicine)*

कौटिलीय अर्थशास्त्रातील रंगनिर्मितीसाठी उपयोगी फुले (१४३) आणि त्याचे इतरत्र असणारे संदर्भ

कौटिलीय अर्थशास्त्रातील द्रव्ये	वनस्पतींची लॅटिन नावे	बॅनर्जीच्या शोध निबंधातील वनस्पतींचे संदर्भ	भावप्रकाश या आयुर्वेदीय ग्रंथातील वनस्पतींचे संदर्भ	महाभारतातील वनस्पतींचे संदर्भ	वनस्पतींची मराठी नावे	कौटिलीय द्रव्यांच्या वर्गातील वनविभागात असणाऱ्या वनस्पती
किंशुक		*Butea Frondosa*		*Kimsuka (Butea Manosperma)*		*Butea monosperma*
कुसुम्भ	*Carthamus Tinctorius*	*Carthamus Tinctorius*	कुसुम्भ ११२	*Kesara*	करडई	
कुंकुम	*Crocus Sativus*	*Crocus Sativus*	केशर २३३		केशर	*Kesar (N.m.p.B)*

वन्योत्पादनातील समाविष्ट पशू आणि त्यांच्या अवयवांचा वर्ग (१४३)

घोरपड सेरक अस्वल शिशुमार सिंह वाघ हत्ती चमरू सुमर गाय मृग गवा हरिण	कौटिल्याने शेजारील रकान्यातील पशूंसाठी अरण्य, मृगारण्य, हस्तिवन, अशा पद्धतीची वने निर्माण करावीत. ही वने कुठे असावीत त्यासाठी किती क्षेत्र आवश्यक आहे, तटबंदी कशी असावी किती रक्षकगण नेमावेत इत्यादींचे तपशीवार विवेचन केले आहे.	भारतीय शासनाने ठिकठिकाणी वनस्पतीसृष्टी आणि प्राणीजात यांचे संरक्षण आणि संवर्धन करणाऱ्या योजना लागू केल्या आहेत.

कौटिलीय अर्थशास्त्रातील वेत आणि माती यापासून बनवलेली भांडी (१४३)

वेताच्या टोपल्या आणि मातीची भांडी भारतात सर्वत्र प्रचारात आहेत. त्याचा उल्लेख कौटिल्यानेही केलेला आहे. मातीची भांडी वनवासी (आदिवासी) स्वत: तयार करत नाहीत. परंतु वेताच्या टोपल्या आणि निरनिराळी फळे वाळवून त्याचा उपयोग वाद्ये व भांड्यासारखा करण्याची परंपरा त्यांच्यात अजूनही दिसते. त्यामुळे ही परंपरा नागरी समाजातील लोकांनी त्यांच्यापासून घेऊन त्यावर पुढे संस्करण केले हे सिध्द आहे.

कौटिलीय अर्थशास्त्रातील (१४२) लाकडांचा वर्ग आणि त्याचे इतरत्र असणारे संदर्भ								
कौटिलीय अर्थशास्त्रातील द्रव्ये १४२	वनस्पतींची लॅटिन नावे	बॅनर्जीच्या शोध निबंधातील वनस्पतींचे संदर्भ (१२४)	भावप्रकाश आयुर्वेदीय ग्रंथातील वनस्पतींचे संदर्भ	महाभारतातील वनस्पतींचे संदर्भ	वराह पुराणातील वनस्पतींचे संदर्भ	वामन पुराणातील वनस्पतींचे संदर्भ	वनस्पतींची मराठी नावे	कौटिलीय द्रव्यांच्या वर्गातील वनविभागात असणाऱ्या वनस्पती
साग	*Tectona grandis linn*	*Delbergia*	सागोन ७४९				सागवान	Sal, 9
तिनिश	*Ougeinia dalbergloides Benth*	*Ougegeinensis*	तिनिश पानन ७४८				तिमस	
अर्जुन	*Terminalia Arjuna w*	*Terminalia Arjunavy*						*Terminalia chebula 16*
मधुक =मोह	*(Bassia Latifolia)*	*Bassia Latifolia*	महुआ ७७९		*Madhuka 143*	*Madhuka 143*	मोहड	*Madhuca Indica 8*
तिलक	*W endlandia*	*Berleria Cristata*	तिलक ७०७					
साल	*Shorea Robuasta*	*(Berleria Cristata)*	शाल ७२०	*Sala 140*			रालचावृक्ष	*Shorea Robuasta*
शिशपा	*Dalbergla sissoo Roxb*	*Dalbergia Sissu*	शीसपा ७२२	*Dalbergla sissod 140*			शिसव	
अरिमेद		*Fetid Mimosa Mimosops Kauki*						
राजादन		*Mimosops Kauki*						
शिरीश		*Sirisha (Mimosa*		*Sirish*				
खैर	*Acacia catchu Wild*	*Mimosa*	खैर ७२७				खैर=काथ	*Acacia catchu Wild*
सरल	*(Pinus Longifolia)*	*Pinus Longifolia*	देवदारू १२६		*Devadaru 142*	*Devadaru 142*	देवदार	*Deodar oil*
ताड	*Borasssus Flabell ifer*		ताड ७६४				ताड	
अश्वकर्ण		*Vatica Robesta*						
सोमवल्क		*A kind of white Khadira*						
कुश	*Eragrostis cynosuroides*		कुशदर्भ २८२	*Kusa139*	*Kusa142*	*Kusa142*	दर्भ	
आम्र	*Manglfera Indica*		आम ७७२	*Amra 139*	*Amra 141*	*Amra 141*	आंबा	*Mango 9*
धव	*Anogeissus Latifolia*	*Mimosa Hexandra*	धौरा ७४०				धावडा	

विषवर्ग						
कौटिलीय अर्थशास्त्रातील द्रव्ये १४२	वनस्पतींची लॅटीन नावे	बॅनर्जीच्या शोध निबंधातील वनस्पतींचे संदर्भ (१२६)	भावप्रकाश आयुर्वेदीय ग्रंथातील वनस्पतींचे संदर्भ	महाभारतातील वनस्पतींचे संदर्भ	वनस्पतींची मराठी नावे	कौटिलीय द्रव्यांच्या वर्गातील वनविभागात असणाऱ्या वनस्पती
कालकूट		*It is the secretion from leaves of fig-like tree*	कालकूट ६३२			
वस्तनभा		*Having blue & elongated leaves*	वत्सनाभ=बच नाग ६२६		बचनाग	*Vastanabha (N.m.p.B)*
हालाहल		*Having blue & elongated leaves*	हलाहल ६३३		कलाहल	
मेषशृंग		*mesa-srnga looking like the bud of a blue lotus*				
मुस्ता		*a variety of plant which is white as conchshe*				
कुष्ट	*Saussureo lappa*		कुष्ट (कूट)९१	कुष्ट	कोष्ठ= उपलेट	*Kuth (N.m.p.B)*
महाविष		*bearing flesh colored fruitofformof breast nipple*				
वेल्लितक		*having the root like a monkey's testicles*				
गौरार्द्र		*a bulbous root of black colour*				
बालक		*also called palaga or palang in the commentaries*				
हैमवत		*being the product of the Himalayas and having long leaves*				
कालिंगक		*a product of the Kalinga country and is like the yava (barley*				
दादरक						
अंकोलसारक						
साप व कीडे-तेच घड्यात घालून ठेवलेले						

संदर्भसूची

१. कौटिलीय अर्थशास्त्र, प्रा. र. पं. कंगले पृष्ट १४२ ते १४४

२. *(Kautily's Arthasastra on Forestry, Manubendu Banerjee, 2000*

३. *(Nagar S. I. Protection, Conservation, Preservation of India Monuments)*

४. भावप्रकाश, व्याख्याकार भिषक्-रत्न श्री ब्रम्हशंकरशास्त्रीी विवरणकार रूपलालजी वैश्यन, नवम संस्करण १९९९, वाराणसी

५. *Traditional knowledge on ethno-medicine uses prevailing tribal pockets of Chhindwara and Betul Dist. M. P.* या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल

परिशिष्ट क्रमांक २

माखला

निजामशाही जिंकल्यावर मोगलांनी त्यांच्या अधिकारात समावेश झालेल्या नवीन प्रदेशांवर लक्ष केंद्रित केले. त्यातील मेळघाट हा एक प्रदेश होता. मेळघाट सातपुडा पर्वताच्या उंच सखल रांगांनी वेढलेला आहे. दाट जंगले हे या प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. येथील जंगलात अस्वल, वाघ, वनगाई यासारखे वन्यपशू आढळतात. सखल भागातील जमीन सुपीक व शेतीसाठी योग्य आहे. परंतु येथील हवामानामुळे मलेरिया आणि पोटांच्या विकारांचा प्रादुर्भाव आहे (*फ्युचेस १९८८:४३२*).

आजच्या मेळघाट तालुक्याच्या पश्चिम-दक्षिण प्रदेशालाच मध्ययुगात गांग्रा *(Gangra)* असे संबोधले जात असे *(देवगावकर, १९९०:१५)*. याच प्रदेशात १) माखला २) धूलघाट ३) जामघर ४) मोखोट ५) खटकली ६) रूपगड या सहा परगण्यांचा समावेश होता (*फ्युचेस १९८८: ४३१*).

येथे शासन करणाऱ्या राजांच्या मतानुसार अकबर बादशहाने या प्रदेशात स्थायिक होण्यासाठी दिलेल्या आमंत्रणाचा स्वीकार करून आम्ही येथे स्थायिक झालो आहोत. स्थायिक होताना बादशहाने आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था टिकवण्याची अट घातली होती. तिचे पालन केले म्हणून आम्हाला राजा ही पदवी आणि सनद दिली आहे (*फ्युचेस १९८८:४३१*).

बादशहाचे हे आमंत्रण विजयराव, गंभीरराव व गरूडराव या तीन राजपूतांनी स्वीकारले. विजयराव माखला, गंभीरराव माखोट, गरूडराव धुलघाटचे राजे झाले. इतरांची माहिती उपलब्ध झाली नाही. या राजांची शासन व्यवस्था प्राथमिक स्वरूपाची होती. या राजांनी जवळ-जवळ तीनशे वर्षे आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था टिकवली. त्यांना आपले राज्य वैभवसंपन्न किंवा सामर्थ्यवान करता आले नाही. पण राज्याला त्यांनी स्थिरता दिली. १८६८ साली ब्रिटिश शासनाने चिखलदरा तालुक्यातील काही भाग व आजच्या मध्यप्रदेशाचा काही भाग एकत्र

करून या भागाला 'वाघ संरक्षण क्षेत्र' म्हणून घोषित केले. वाघ संरक्षण क्षेत्रापासून अंदाजे १० कि. मी. अंतरावर माखला नावाचे गाव आहे. याच गावाचे राज्यपद विजयरावाने स्वीकारले. या भागात स्थायिक झाल्यानंतर या राजांनी येथल्या कोरकू स्त्रियांशी विवाह केले. झालेली संतती स्वत:ला कोरकूंपेक्षा वरच्या दर्जाचे मानत असल्याचे दिसते. स्थायिक असलेले कोरकू मेखलाहून स्थलांतरित झालेले असावेत. १९७४ साली भट्टाचार्य यांनी पुराणांवर आधारित सादर केलेल्या,'सेंट्रल इँडियन ट्राइब्स ए हिस्टॉरिकल डायमेंशन' या शोध निबंधात, 'अमरकंटकला राहाणाऱ्या समाजाला मेखला *(Mekala)* असे संबोधन होते हे दाखवून दिले आहे (*भट्टाचार्य १९७४:१९५*). प्रदीर्घ कालावधीत अमरकंटकला राहाणारा हा समाज माखलाला स्थलांतरित झाला असावा. अमरकंटक ते माखला हे अंतर अंदाजे ३५० कि. मी. आहे. मोगल आणि ब्रिटिश अमलात १)माखला २)धूलघाट ३)जामघर ४)मोखोट ५)खटकली ६)रूपगड ही सहा संस्थाने होती.

पंधराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंतची या सहा राज्यांच्या इतिहासाची फारशी माहिती मिळत नाही. १८१२ मध्ये माखोटच्या राजाने शेखदुल्ला नावाचा मदतनीस नेमला. त्याला पेंढाऱ्यांबरोबर लुटीत सहभागी होऊन लुटालूट करणे आवडत होते. कामगिरी फत्ते करून तो या सहा पैकी एका राजांकडे येऊन लपत असे. हे राजे लुटीतील काही भाग वसूल करीत असे मानले जाते. त्याच्या सहवासाने प्रेरित होऊन माखोटचा राजाही पेंढारींच्या अराजक हालचालीत सामील झाला. या दोघांच्या दंडेलशाहीत अराजकता वाढत आहे व मेळघाटातील इतर राजेही लुटीतला काही भाग वसूल करत आहेत. हे लक्षात आल्यामुळे पेशव्यांनी शेखदुल्लाला पकडण्यासाठी मेळघाटात सेना पाठवली. शेखदुल्ला पळाला. खुशालसिंग आणि त्याच्या भावावर आरोप सिद्ध झाले. पेशव्यांनी त्याचे राज्य खालसा केले. १८१६ मध्ये पेशव्यांची सेना पुण्याला परत गेली. १८१७ मधे एलिजपुरच्या नबाबाने खुशालसिंगला कैद केले आणि संपूर्ण बरारप्रांत निजामशाहीत समाविष्ट केला. याच सुमारास शेखदुल्लाचा मृत्यू झाला तरीसुद्धा त्याचा सहकारी जंगुसिंग बरारमधे लुटालूट करीत राहिला. ब्रिटिशांनी जंगुसिंगला पकडण्यासाठी त्यांच्याच टोळीतील एका वृद्धाला नेमले त्याने जंगुसिंगला भोसकून ठार केले.

१८१८ पर्यंत हे राजे पेंढारींच्या समवेत लुटीत सहभागी होऊन बेकायदेशीर कृत्ये करीत असावेत असे मानले जाते. १८४० नंतर त्यांना आपल्या गैरवर्तनामुळे आपण गमावलेल्या हक्कांची जाणीव झाली. त्यांनी केलेल्या मागणीचा विचार करण्यासाठी प्रथम कॅप्टन जॉन्सन आणि नबाबजानी यांची नेमणूक झाली, त्या नंतर रिचर्ड टेंपल यांच्या अधिकारात जंगलाची हद्द ठरवणे आणि या सहा राजांच्या मागण्यांची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली. समितीने या राजांना पुन्हा पहिले अधिकार दिले. हे अधिकार देताना त्यांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन दरवर्षी नुकसान भरपाई देण्याचा ठराव पास झाला. वन्योत्पादनांच्या अंदाजी लाभाच्या एक तृतीयांश भागाचे दोन भाग करून एक भाग माखलाच्या राजाला द्यावा. उरलेल्या भागाचे समभाग करून इतर राजांना द्यावे. कारण माखलाच्या राजाने शांतता व सुव्यवस्था जास्त चांगल्या पद्धतीने सांभाळली आहे. शिवाय जंगलाची सीमा वाढवल्यामुळे त्याचे जास्त नुकसान झाले आहे, असा निर्णय दिला. राजांना या समितीने दिलेला प्रदेश आणि पैशांच्या रूपात मिळणारी नुकसान भरपाई याची नियमानुसार नोंदणी केलेली आहे (*प्युचेस १९८८:४३४*).

१८७० साली माखलाच्या राजाची तीन गावे माखला, पुंजारा आणि सुमेत वनखात्याच्या अधिकारात समाविष्ट झाल्यामुळे माखलाचा राजा अचलपूरला राहू लागला. त्याच्या तक्रारीनंतर भारतीय शासनाने कोटचिकजी, नांढुरा आणि जाम्बुतोटा या गावांची जहागीर माखलाच्या राजाला दिली आणि माखलाच्या पठारावरचा अधिकार मान्य केला. त्याच्या पूर्वजांचा वाडा आंब्याच्या राईत अवशेषरूपात विखुरलेला आजही दृष्टीस पडतो (*फोटो क्र. ११५*).

माखला राजाचा अधिकार आणि त्याची शासनव्यवस्था १८८४ पर्यंत चालू होती. १८८४ नंतर या भागात प्रवासीमार्ग निर्माण झाले. झालेल्या सोईंचा लाभ व्यापारी आणि सावकारांनी उचलला. ते या भागात ये-जा करू लागले. मेळघाटातील राजांची शासकीय व्यवस्था अपुरी ठरली. कारण या व्यवस्थेत गुन्ह्यांची नोंदणी किंवा नागरीसुरक्षा या व्यवस्था नव्हत्या. त्याच सुमारास मेळघाटात तंट्या भिल्लाच्या बंडाळीचा प्रभाव वाढत होता. तंट्याभिल्ल हा स्वातंत्र्यसैनिक निमाडचा

रहिवासी होता. तंट्या इंग्रजांचा आणि होळकरांचा खजिना लुटून गरजू गरिबांमध्ये वाटत असे. त्याच्या उदारपणामुळे प्रभावित झालेली जनता 'मामा' या आपुलकीच्या नात्याने त्याला संबोधत असे. त्याने इंग्रजांविरूध्द बारा वर्षे संघर्ष केला. तुरूंग फोडून पसार होण्यात तो तरबेज झाला होता. अखेर १८८९ मध्ये इंग्रजांनी त्याला पकडले. जबलपूर कोर्टात त्याला फाशीची शिक्षा झाली. शिक्षेची अंमलबजावणी केव्हा झाली हे गूढ अजूनही कायम आहे.त्याचे पार्थिव कालापानी जवळ रेल्वेरूळावर सापडले. त्याची स्मृती म्हणून जाणाऱ्या-येणाऱ्या आगगाड्या त्या ठिकाणी आजही दोन क्षण थांबतात. मध्य प्रदेश शासन तंट्याभिल्लाच्या स्मरणार्थ दरवर्षी एका हुशार विद्यार्थ्याला एक लाख रूपये शिष्यवृत्ती देते.


वरील कोरकूराजांनी तंट्याला मदत केली अशा संशयाने ब्रिटिश शासनाने खटकली सोडून इतर तीनही राजांना निलंबित केले. स्थानिक कोरकूंचा छळ केला. पोलिस व्यवस्था ताब्यात घेतली. ठराविक रक्कम जीवननिर्वाहासाठी मंजूर केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या राजांचे तनखे व भत्ते बंद झाले. माखलाच्या निलंबित राजाचे वंशज कुमानसिंग आणि राजपरिवार धारणीजवळ जांम्बुतोटा या गावात राहात आहेत. या राजघराण्याच्या वंशजांना कोरकू लोक अजूनही आपला राजा मानतात.

सेमाडोहपासून अंदाजे आठ कि. मी. अंतरावर माखला नावाचे गाव आहे. माखलाढाणा (*कोरकू भाषेत गावाला ढाणा म्हणतात*) पासून अंदाजे दीड कि. मी. अंतरावर एक टेकडी आहे. टेकडीवर आमराईत राजवाड्याचे भग्न अवशेष विखुरलेले दिसतात. अवशेषांवरून येथे भिंती असाव्यात असा अंदाज करता येतो. फ्यूचेस यांच्या मते याच जागी राजवाडा होता (*फ्युचेस १९८८:४३४*). थोडे पुढे गेल्यावर रूंद खोड असलेल्या झाडामध्ये भिंत दिसली (*फोटो क्र. ११६*). भिंती जवळ मातीचा दिवा होता. येथेच सोमा बैठेकर भेटला. सोमाने संगितले, ही पूजा झाडाची नाही. आम्ही कोरकू झाडाची स्वतंत्र पूजा करत नाही. देव झाडाखाली असतात म्हणून झाडाची पूजा होते. या ठिकाणी पूर्वजांची पूजा केलेली आहे. जुलै महिन्यात येथे दिवा लावण्यासाठी राजाचे वंशज येतात. भिंतीजवळ ठेवलेल्या दिव्याचा फोटो आहे (*फोटो क्र. ११७*). या ठिकाणी स्मृतिशिला, मूर्ती किंवा तांदळा सापडला नाही परंतु कथित राजवाड्याच्या स्थानापासून थोडे दूर एका झाडाखाली,

सूर्याची अस्पष्ट आकृती असलेली शिळा सापडली(*फोटो क्र ११८*). अंदाजे दहा फुटांवर स्मृतिशिला सापडली(*फोटो क्र. ११९*). तिथे भेटलेल्या लोकांकडे चौकशी करूनही ही शिळा कोणाची आहे हे समजले नाही. जवळच बांधून तयार केलेले तळघर असावे अशी एक जागा इधरलाल याने दाखवली (*फोटो क्र. १२०*). परततांना वाटेत 'शक्तीबीचा बुरू' हे बाजाराचे स्थान लागले. त्या ठिकाणी राजाची बसण्याची जागा उंच ओट्यावर आहे (*फोटो क्र. १२१*). या क्षेत्राचा शेतीसाठी वापर होत असल्याचे दिसते. लाकडाच्या नांगराने नांगरणी करतात, अशी माहिती मिळाली (*फोटो क्र. १२२*).



आमराई



टेकडीवर आमराईत राजवाड्याचे भग्न अवशेष




भिंती जवळ मातीचा दिवा



सूर्याची अस्पष्ट आकृती असलेली शिळा



स्मृतिशिला



बांधलेले तळघर



शक्तीबीचा बुरू, बाजाराचे स्थान



लाकडी नांगर

परिशिष्ट क्रमांक ३

अठराव्या शतकात औरंगजेबच्या मृत्यूनंतर मोगलांच्या सत्तेचा ऱ्हास सुरू झाला. शाहूराजांची मोगलांच्या कैदेतून सुटका झाली. साताऱ्याला येऊन त्यांनी नवीन मंत्रिमंडळाची रचना केली. नवीन मंत्रिमंडळात बाळाजी विश्वनाथ भटांची पेशवेपदावर नियुक्ती झाली. त्यांनी थेट दिल्लीपर्यंत मजल मारून चौथाई, सरदेशमुखीचे हक्क मिळवले. उत्तरेकडे टिकून राहाण्यासाठी त्यांनी, ग्वाल्हेरला शिंदे, इंदूरला होळकर, बडोद्याला गायकवाड तर नागपूरला भोसले यांना जहागिरी दिल्या. हे जहागिरदार आपल्या पदरी पेंढारी बाळगत असत. 'पेंढारींच्या हालचाली बेभरवशाच्या आणि त्यांचा आपसातही एकमेळ नसायचा.कुठून केव्हा किती लुटारू जमतील याचाही अंदाज नसायचा. रातोरात पाचसहा हजारांची छावणी उभी राहायची' (*नेमाडे २०१०:१२६*).

पेंढारी लूटमार, पुंडावा, जाळपोळ, अत्याचार, दंगे, आपसात लढाया यात तरबेज असल्याचे दिसते. गावात घुसून लूटमार करून स्त्री, मुलांना पकडून नेऊन बाजारात गुलाम म्हणून विकत असत. पळून जाण्यासाठी पेंढाऱ्यांनी उत्तरेच्या सातपुडा रांगांतून कायम स्वरूपी रस्ते तयार केले होते (*नेमाडे २०१०:९९*). पेंढारी लुटीचा काही हिस्सा सरदारांना देत असल्याचे मानले जाते. होळकरांच्या पदरी असलेले पेंढारी सातपुड्यातील घळीतून खानदेश, माळवा आणि निमाड मध्ये धुमाकूळ घालून रातोरात गुजरातमध्ये पळून जात. आजही त्यांच्या अत्याचाराच्या अनेक कथा या भागात सांगतात. विखुरलेले अवशेष, उजाड घरे आजही दृष्टीस पडतात. त्यापैकी एका उजाड गावाची कथा नेमाड्यांनी 'हिंदू' या ग्रंथात दिली आहे, नेमाड्यांचे सातवे पूर्वज, नागोरावांनी या घटना प्रत्यक्ष अनुभवल्या होत्या. हरिपुऱ्यावर पेंढाऱ्यांनी केलेल्या हल्ल्याची हकिगत नेमाड्यांनी आपल्या वडीलधाऱ्यांच्या तोंडून ऐकून हिंदू या ग्रंथात नमूद केली आहे.

उत्तरेला सातपुडा, पश्चिमेला इंजाळ आणि पूर्वेला मोर नदी. दक्षिणेला या दोन्ही नद्यांचा संगम. अशा पठारावर मोरगाव हे नेमाड्यांचे मूळ गाव आहे. या गावाशेजारी एकेकाळी हरिपुर हे गावही होते. हे गाव लभान्यांचे होते.'देशांची सीमा न मानणारे हे

लोक. खरे हिंदुस्थानी आर्य लोक. धनगरांच्या वह्यांमधे यांचे उल्लेख येतात (*नेमाडे २०१०:११२*). हरिपुर येथील लभाने खानदेशातील स्वस्त धान्य घेऊन उत्तरेकडील छावण्यांना विकणारे व्यापारी म्हणून प्रसिध्द होते. कामगिरी संपवून परतल्यावर, मोर किंवा हरणाच्या मांसाचे जेवण जेऊन दारू, नाच, गाणे यात मग्न होत.

एका वैशाखी पोर्णिमेच्या उत्तररात्री कामगिरी संपवून आलेले लभाने दारू पिऊन झिंगलेल्या अवस्थेत असतानांच अचानक पेंढाऱ्यांची हरिपुरावर धाड पडली. होळकरांशी इमान राखून असलेले लभाने गाफील होते. अशा वेळेस सातपुड्यावरून ३०/४० घोडेस्वार उतरले. त्यांनी हरिपुऱ्याच्याभोवती वेढा घातला. वेढा धातल्यावर शिंग फुंकून पेंढारी गावात घुसले. शिंगाचा आवाज एकून जाणकारांनी पेंढारी आल्याचे ओळखले. 'वरच्या पठारावरून **कोरकू** हे सर्व पाहात होते. पण खाली उतरण्याची त्यांची हिंमत झाली नाही. ते सांगत होते की, पेंढाऱ्यांनी आधी कळपा-कळपांनी मेंढ्या बाहेर काढल्या. ढीडेक हजार गायी बैल दावणीला बांधून उभे केले. घराघराला आगी लावत दिसेल त्याला ते भोसकत गेले. आठदहा शुध्दीवर असलेल्या लभ्यान्यांच्या माना पेंढारी पद्धतीने हाताने पिरगळून त्यांना मारून टाकले. तटाजवळ राहाणारे काही लोक भीतीने मोरगावाकडे पळत होते त्यांना बाहेर उभ्या असलेल्या घोडेस्वारांनी पायाखाली तुडवले. या वेळेस लभान्यांनी काही पेंढारी मारले तर काहींना जखमी केले. जे मारले गेले त्यांना मूठमाती देण्यात आली. जखमींना घोड्यावर घालून तळावरच्या हकिमांकडे नेण्यात आले, दुसऱ्या दिवशी मोरगावच्या वाटेवर कैक प्रेते पसरलेली दिसत होती. आकाश गिधाडांनी झाकून गेले होते (*नेमाडे २०१०:११३*).

दसऱ्याच्या सुमारास अचानक मीरखान, जो होळकरांच्या पेंढारींचा प्रमुख होता, त्याचा निरोप आला, 'टोपीवाले फिरंगी चालून येत आहेत. आठ दिवसाच्या आत आपल्या शिबंदीसह नसिराबाद येथे हजर व्हावे'. पंचायतीत चर्चा झाली. मीरखानाचा हुकूम पाळू नये असा काका देशमुखांनी निर्णय दिला कारण 'मीरखानाचे दोन नाईक या भागात लुटालूट करत होते, आमचे इमान मल्हारराव होळकरच्या गादीला आहे, उपटसुंभांसाठी नाही' असे मीरखानाला कळवण्यात आले. या सुमारास इंग्रज होळकरांच्या मागे हात धुऊन लागले होते. त्याचा फायदा

पेंढारी उचलत होते. आठ दिवस वाट पाहून पेंढारी खवळले होते. त्यांच्या संशयास्पद हालचाली सुरू होत्या. या बातम्या **भिल्ल कोरकू** यांच्याकडून पाटलाला समजल्या होत्या. बातमी देऊन डोंगरी लोक नाहीसे झाले. पेंढाऱ्यांची ही धाड साधी नाही हे मोरगावकर जाणत होते. त्यांनीही मुकाबला करायची तयारी सुरू केली. पाटलांनी गावोगाव निरोप धाडले पण कुठूनही सकारात्मक उत्तर आले नाही. अशा वेळेस 'नागोरावांनी केलेला मुकाबल्याचा मनसुबा मोरगावचा आणि मराठेशाहीचा इतिहास बदलण्याइतका युगप्रवर्तक होता' (*नेमाडे २०१०:१२२*).

परिशिष्ट क्रमांक ४

आदिवासी जीवनप्रणालींना मानवी समाजव्यवस्थेची प्राथमिक अवस्था मानून मानवशास्त्रज्ञांनी आदिवासी समाजाचा अभ्यास केला आहे. आता मात्र समाजशास्त्रज्ञ या विषयाकडे फक्त उत्क्रांतिवादाच्या दृष्टिकोनातून न पाहता आदिवासी संस्कृती-परंपरांचे स्वतंत्र स्थान मान्य करतात. या प्रबंधात, अभ्यास करण्याच्या हेतूने मानवशास्त्र आणि समाजशास्त्र या दोहोंच्या अभ्यासपद्धतीचा आधार घेतला आहे. कोरकू समाजरचना, जीवनपद्धती आणि तदनुषंगिक ग्रामरचना समजण्यासाठी क्षेत्र-कार्य पद्धती आणि उपलब्ध साहित्याचा आधार घेतला आहे. क्षेत्र-कार्य पद्धतीमध्ये प्रत्यक्ष निरीक्षण आणि प्रश्नमंजूषेच्या आधारावर प्रत्यक्ष संपर्क याचा समावेश केला आहे. गावाची रचना समजण्यासाठी काही नमुना-गावांचे नकाशे तयार केले आहेत. क्षेत्रीय अवलोकन करून महाराष्ट्रातील चिखलदरा आणि मध्यप्रदेशातील भैसदेही तालुक्यातील कोरकू गावांची निवड केली. निवड करतांना पुढील निकष लावले आहेत.

१) ९५ % अधिक कोरकू असलेली गावे

२) ९० % हून अधिक कोरकू असलेली गावे

३) ५०% हून अधिक कोरकू असलेली गावे

४) ५०%हून कमी कोरकू असलेली गाव

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील निवडलेली गावे

प्रदेश	गावाचे नाव	लोक संख्या	कोरकू	कोरकूंची टक्केवारी
महाराष्ट्र	बोराटाखेडा	४६०	४५९	९९.७८%
महाराष्ट्र	चांदपूर	७६१	७४२	
महाराष्ट्र	चुनखडी	६५३	६५३	१००%
महाराष्ट्र	वाटापाटी	२४३	२४३	१००%
मध्यप्रदेश	जाम्बुखेडा	३२१	३१९	९९.३७%
मध्यप्रदेश	कसई	४३०	४१५	९६.५१%
महाराष्ट्र	माखला	८८४	८२६	९३.४३%
महाराष्ट्र	गाडसिंबा	३८५	३५७	९२.७२%
महाराष्ट्र	रायपूर	११३१	१०३७	९१%
महाराष्ट्र	खडीमल	७९१	६८०	८५.९६%
महाराष्ट्र	अंबापाटी	९३६	६३६	६७.९८%
	कुकरू	५०५	३७०	७३%
	जरिढा	७६८	५२८	६८.७५%
महाराष्ट्र	बिच्चूखेडा	२५७	७०	२७.२३%
महाराष्ट्र	चिचखेडा	४४३	८९	२०.०९%
महाराष्ट्र	पायवीर	५१७		
महाराष्ट्र	घटांग	१९१	३२	१६.७५%
मध्यप्रदेश	खामला	१५२९	१३४	८.७६%

१) ९५ % अधिक कोरकू असलेली गावे

गावाचे नात्त	गावाचे क्षेत्रफळ (हेक्टर्स)	एकूण लोक संख्या	एकूण घरे	जंगल क्षेत्र	जवळचे गाव	स्त्री	पुरूष
बोराटा खे डा	२७८.६६	४६०	१२५	११२.३२	रायपूर	२२४	२३६
चांढपूर	४९०	११६२	१७१		टेंभुर सोडा	४०२	३७९
चुनखडी	३९४.०९	६२४	११५	७५.१०	नवलगाव	२३७	४४०
जाम्बुखेड	३२१	३१९			मेघनाद ढाणा	१६१	१५८
मेघनाद ढाणा		१०१३	२७९		जाम्बुखेडा	४९३	५२०
कसई		४३०	११२	२१९	कुकरू	२१४	२३९

<u>बोराटाखेडा</u> [२३]

जिल्हा अमरावती

तालुका चिखलदरा

जवळचे गाव रायपूर.

या गावातील प्रमुख पिके-तूर, तांदूळ, सोयाबीन, ज्वारी, उडिद, मूग आहेत. भाज्या- राजगीरा (रायगुरा), मिरची, भेंडी, काकडी आहेत.

गावात भेटलेले लोक

१) काळू रज्जी कासदेकर वय ५८ भुमका

२) रज्जी रावजी कासदेकर वय ४० शिक्षण १० वी

३) सुरेश सुखदेव तळोलकर वय २५ शिक्षण १२ वी

४) शामलाल म्हसकर वय ३२ शिक्षण ८ वी

५) धाजू रजाई कासदेकर वय ३८

६) अशोक वय २५ शिक्षण पदवीधर

७) रजनी रावजी कासदेकर वय ३५ शिक्षण नाही.

सेमाडोह पासून इतर जिल्हामार्गाने रायपूरपर्यंत जाता येते. रायपूरपासून अंदाजे ५ ते ६ कि. मी. अंतरावर सातपुडा पर्वताच्या एका पठारावर बोराटाखेडा गाव वसलेले आहे. गावात प्रवेश करतानाच गावाची विशिष्ट रचना लक्ष वेधून घेते. कोरकू जात्याच स्वच्छ असून ते घर व गावाचा परिसर स्वच्छ ठेवतात. उत्तर-पूर्वेकडून

२३ पुनरूक्ती टाळण्यासाठी बोराटाखेडा गावाचे तपशील हा मूळ नमुना मानून इतर गावांचे वर्णन करताना जी वेगळी वैशिष्ट्ये आढळली त्याचा गावाच्या वर्णनात समावेश केला आहे.

गावात प्रवेश केल्यास वाटेत उजव्या बाजूला स्मशान आहे. स्मशानाच्या उत्तरेला खेडा गोमाज, हरढुलीमाता आणि [२४]मंडो आहे. थोडे पुढे गेल्यावर गावाच्या आरंभी पश्चिमेला एका टेकडीवर बजरंगबलीचे बांधलेले देऊळ आहे. देवळात बजरंगबलीची ढगडावर कोरलेली मूर्ती आहे. मूर्तीचे तोंड स्मशानाकडे आहे. देवळाच्या पलीकडे बिजासरी व सातमाता आणि सिढुली आहे. सातमाता लहान-लहान पाषाण स्वरूपात आहेत. त्याच्यावर छप्पर आहे. जवळच एका खांबावर मातीच्या भांड्यात पाणी टांगून ठेवलेले आहे. या पाण्यात रोग निवारण करणारी शक्ती असल्याचे मानले जाते.

पुढे गेल्यावर चौकात मुठवागोमाज लिंबाच्या झाडाखाली आहे.

घर बांधतांना आधार म्हणून एक खांब रोवतात. या खांबाला 'धारणा' किंवा 'उरा गोमाज' म्हणतात. कोरकूंच्या प्रत्येक घरात धारणा असतोच. धारणाखाली मातीचा छोटा चौथरा शेणामातीने सारवलेला असतो. धारणावर बांगड्या, लिंबू आणि त्रिशूळ वाहतात.

या गावात जेरीचा उत्सव धूमधडाक्यात साजरा करतात. जेरी माढी आणि मेघनाढ नर आहे. ज्या गावात मेघनाढ होत नसेल त्याच गावात जेरीचा उत्सव करतात. गावाच्या उत्तर-पश्चिम दिशेला जेरीचा खांब कायम स्वरूपी पुरलेला आहे.

काही वर्षांपूर्वी या गावात सैलानीबाबा राहात होते. त्यांचे घर आणि त्यांचे स्मारक गावात सुरक्षित ठेवलेले आहे. वेड लागले तर ढग्र्याला चादर चढवतात. उदबत्ती लावून पीराचे आवाहन करतात. असे केल्याने वेडा बरा होतो असा कोरकूंना विश्वास वाटतो.

भुमका नुसत्या स्पर्शाने भूतबाधा झाल्याचे ओळखतो. लिंबू, फुटाणे, दूध, पाणी, चिवडा, किंवा भूत मागेल ते गावाचच्या सीमेबाहेर पुरतात.

थोडेसे पुढे गेल्यावर भुमका 'काळू कासदेकर' यांच्या वडिलांची सिडोली आहे.

२४ मंडो भुमक्याची सिढुली. दर मंगळवारी येथे दिवा लावतात.

सिडोलीवर चंद्र, सूर्य आणि कोळी यांचे चित्रण आवश्यक आहे. कारण मृतात्मे दिवसा सूर्याजवळ राहातात तर रात्री चंद्रा जवळ असतात. कोळी स्वर्गात जाण्यास मदत करतो. भुमक्याच्या सिडोलीला 'मंडो' म्हणतात. सहसा भुमक्याची सिडोली मूळ गावात करतात क्वचितच सध्या रहात असलेल्या गावात होते. तिन ते चार फूट उंच, छप्पर असलेल्या चौथऱ्यावर भुमक्याची स्मृतिशिला स्थापित करतात. दर मंगळवारी तिथे दिवा लावतात. कासदेकरांची सिढुली सात मातांजवळ आहे. सिडोलीला नारळ आणि मलिदा यांचा नैवेद्य दाखवतात.

होलीबाई जिला शांतीबाई असे म्हणतात. ही रावणाची बहिण आहे. 'होळी पेटवणे म्हणजे रावणाला आदर दाखवणे, म्हणूनच होळी पेटवल्यावर काही क्षण स्मशान शांतता पसरते' असे मत 'नारायण खरे' (प्रोफेसर, परतवाडा) यांनी दिले.

नोस –कुलदेवतेची वार्षिक पूजा. पूर्वी दरवर्षी होत असे. आता तीन वर्षांनी करण्याची नवी प्रथा सुरू केली आहे. खांबे म्हणजे गणपती. आला पटेल म्हणजे वंशपरंपरेतून आलेली पाटीलकी (रामलाल).
बोराटाखेड्यातील काही आडनावे.
१ बिल्वा–बैठेकर
२ माती कासदेकर
३ पाणी मासदेकर
अविवाहित मुलगा मृत झाल्यास त्याला दैयतबाबाचे स्वरूप प्राप्त होते. ज्या गावात त्याचा मृत्यू होतो त्याच गावात त्याचे दफन होते. दैयताची बाधा झाल्यास, भुमका त्याच्याशी संवाद साधतो. दैयताचे नाव घेऊन विचारतो. तो मागेल त्या वस्तू स्मशानाजवळ पुरतात. दैयत निघून जातो. दैयत, पीरबाबा, चुमक्याबाबा आणि डवराबाबा चौघे भाऊ आहेत.

विवाहानंतर गदोली नृत्य करतात. हे नृत्य विवाहित अथवा अविवाहित स्त्री–पुरूष वेग–वेगळ्या रांगा करून नृत्य करतात.

वाघ (कुलामामा) या गावातील कुलदेवता आहे.

धारण्याच्या शेजारील भिंतीवर रांगोळ्या काढल्या आहेत. ढफन करतात. ढफन ढगडांनी पूर्णपणे झाकतात. हनुमानाचे देऊळ नवीन पद्धतीने बांधलेले आहे. हनुमानाची दृष्टी स्मशानाकडे आहे. स्मशान गावाच्या ढक्षिण-पश्चिमेला आहे.

गावात अंगणवाडी शाळा आहे. प्राथमिक आरोग्यकेंद्र आहे. या गावाला पाणी पुरवठा हातपंप, पाझर तलाव आणि कठडे असलेल्या विहिरीतून होतो.

चांदपूर

जिल्हा अमरावती

जवळचे गाव मखोले

प्रमुख उत्पादने - सोयाबीन, भुईमूग, कापूस, ज्वारी

भाजी - भेंडी, टोमॅटो, काकडी, मिरची

गावात भेटलेले लोक

रामजी उमाकर	वय ७५
देमाय काकी	५०
बुद्धी जामुनकर	२६ ढहावी पास
राम बेलसरे	३२ आठवी पास
शिवराम	
रामजी सावलकर	४०(सावरकर लावतात)
बलाई	७०
संगिता	
बुला	
पार्वती	
श्रीराम चतुरकर	अंदाजे ३८ (भुमका)

चिखलढऱ्यापासून अंदाजे २५ ते ३० कि. मी. अंतरावर **चांदपूर** गाव आहे. गावाजवळून जिल्हामार्ग जातो. हे गाव कोरकूंनी वसवलेले आहे. या गावात

मेघनादाची पूजा करतात. बाहेरगावी स्थायिक झालेले लोकही त्यासाठी येतात. या गावातील काही लोकांची कुलदेवता कालाबाबा (*महादेव*), गुपितवाडा भजदईजवळ (*बैतुल जिल्हा*)आणि डबरा बाबा आहे. डबराबाबाला नांगर वाहतात. या गावाचे पोलिसपाटील 'खानजी तोटे' चौथी पास आहेत. ते जातो पंचायत आणि औपचारिक पंचायत अशा दोन्ही पंचायतींचे काम पाहातात.

त्यांनी जातो पंचायती विषयी बोलताना सांगितले, 'पंचायतीने केलेला निवाडा मान्य करून त्याचे काटेकोर पालन करावे लागते. नियमांचे उल्लंघन केलेल्या व्यक्तीस अपराधानुसार दंड आकारला जातो. गरज भासली तर बहिष्कारही घालता येतो'. विवाहप्रथेची चर्चा करताना त्यांनी स्वत:चा विवाह लमझाना विवाह असल्याचे सांगितले. 'मुदती नंतर मला पटेल पद मिळाले. घरात आणि गावात माझ्याकडे आदराने पाहिले जाते. विवाह आणि सिडोलीच्या वेळी मी मूळगावी जातो'. घरघुशी प्रथा प्रचारात आहे. नुकताच या गावात अशा पद्धतीचा विवाह झाला आहे. परंतु विवाहित शेतात गेले असल्यामुळे त्यांची भेट होऊ शकली नाही. वैवाहिक समस्या निर्माण झाली तर जातो पंचायत पुढीलप्रमाणे कारवाई करते. दोघांचेही म्हणणे ऐकून पंच दोघांनाही समजावण्याचा प्रयत्न करतात. एकत्र राहाणे मान्य झाले नाही तर काडीमोड होतो. स्त्री नवीन विवाह करीत असेल तर पहिल्या नवऱ्याने नव्या वराला अर्धे वधूमूल्य परत करावे लागते. विवाहानंतर पाच ते सहा वर्षात मूल न झाल्यास पहिल्या पत्नीच्या सहमतीने दुसरे लग्न करता येते दोघीही एकाच घरात राहातात. तिलाही मूल न झाल्यास दोघींनाही दुसरा विवाह करता येतो असे सांगितले'.

आचारधर्माचे संचालन नियोजन करणारा 'श्रीराम चतुरकर' भेटला. तो चांदपूर चा भुमका आहे. त्याने सांगितले, नुसत्या स्पर्शाने झोडपा *(भूतबाधा)* झाल्याचे ओळखतो. फुटाणे, दूध, पाणी, चिवडा, लिंबू आणि भूत मागेल ते गावसीमेबाहेर पुरतो. बाधा उतरवण्यासाठी लोटीत पाणी घेऊन सात वेळा बाधितावरून ओवाळतो, ओवाळताना खालील मंत्र म्हणतो.

भाले खोले को पकडना।

मही मशान को पकडना।

चलते फिरते माता को देख बराबर।
सातमाता तुम्हारे नाम से पानी देता''.

या उपायांनी भूतबाधेपासून मुक्तता मिळते अशी कोरकूंची श्रद्धा असल्याचे दिसते. गावात दैयतबाबा [२५] आहे. तरूणाचा मृत्यू झाल्यास त्याच्या आत्म्याचे रूपांतर दैयतात होते. त्याची शारीरिक वासना अतृप्त असते. तो गायला-नाचायला लागतो. स्त्रियांना त्रास देतो. तो रूष्ट झाल्यास गर्भपात होतो. दैयताचा संचार झाल्यास जात्याची पाळी उभी करून ठेवतात आणि नाव घेऊन काय हवे आहे असे विचारतात. तो जे मागेल ते गावसीमेवर पुरतात. मृताचे दफन करताना उदबत्ती लावतात. गर्भार स्त्री मृत झाल्यास वस्तीजवळच पुरतात. नोसचा महिना चैत्र ठरलेला आहे. रामजी सावरकर भेटले त्यांनी सांगितले, 'माझे मूळ आडनाव सावलकर आहे, परंतु मला सावरकर आडनाव आवडले म्हणून मी सावरकर लावतो. श्रावण महिन्यात गावाबाहेर मातापूजा करतात. वर्गणी करून पूजेचा खर्च करतात. बकरा बळी देतात. प्रत्येक घरी पोळी, चिकन, मलिदा असा प्रसाद पोहोचवतात.

शारीरिक व्यंग येऊ नये म्हणून भावेपूजा फक्त विवाहित पुरूषच करतात. मेंढा बळी देतात. प्रसादही फक्त पुरूषच ग्रहण करतात.

होळीचा उत्सव होतो. बाहेरगावी स्थायिक झालेले लोकही होळीसाठी गावाला येतात. या गावात कोरकूंच्या देवता आणि चकाजी ही स्थानिक देवता मानतात. वाडवडिलही चकाजीला मानत होते. आम्ही ही मानतो. इतकीच माहिती मिळाली. या गावात प्रत्येक आजाराची स्वतंत्र देवता मानतात. उदाहरणार्थ खोकलीमाय, अग्निमाय, अपनमाय, तपनमाय, बंजारनमाय, सापडमाय, जरीमाय, इत्यादी. या गावात आधुनिक पद्धतीने बांधलेले हनुमानाचे मंदिर आहे. हनुमानाचे तोंड दक्षिणेकडे आहे. स्मशानभूमीही दक्षिणेकडेच आहे.

चुनखडी

सेमाडोह ते जरिदा या मार्गावर अंदाजे पंचवीस कि. मी.अंतरावर चुनखडी गाव आहे. जिल्हा अमरावती

२५ अविवाहित मुलाचा मृत्यू झाल्यास त्याच्या आत्म्याचे रूपांतर दैयतात होते.

जवळचे गाव बिच्चु खेडा

या गावातील प्रमुख कृषी उत्पादने–ज्वारी, सोयाबिन, तांढूळ, कुटकी, तूर, उडीद, मका

गावात भेटलेले लोक

१) शालीग्राम कालु कासदेकर	२३ ८वी
२) राजू कालु बेठेकर	३० ४थी
३) इन्दु रमाजी बेठेकर	२७
४) अर्जुन काळु दहीकार	३० ४थी
५) सुरेश बाबू धिकार	३०
६) अबू भैया तोटे	६०
७) सज्जू साढुलाल जामुनकर	५०

तोटे = मक्याचे कणिस

जामुनकर = जांभुळ

चुनखडी गावातील सर्व लोक सुखी आणि निरोगी राहावेत म्हणून आखाडी सण साजरा करतात. बंजारीनमाता गाई–गुरांचे संरक्षण करते अशी मान्यता आहे. आखाडीची पूजा केल्याने गावात रोगराई पसरत नाही. म्हणून आखाडीचा सण साजरा करतात. त्या दिवशी पूजनाचा आरंभ मुठव्याची पूजा करून करण्याची परंपरा आहे. मुठवा ही ग्रामरक्षक देवता आहे. गावकऱ्यांच्या मतानुसार, कुठल्याही पूजेचा आरंभ मुठव्याची पूजा करून करण्याची परंपरा पूर्वजांपासून चालत आलेली आहे. ही प्रथा आम्ही काटेकोरपणे पाळतो. नंतर क्रमाने बंजारनमाय व वाघदेवाची पूजा करतो कारण हे देव गुरांचे व गावकऱ्यांचे जंगलात संरक्षण करतात. खेडागोमाज गावाला दुष्टात्म्यांपासून वाचवतो. म्हणून त्याचीही पूजा केली जाते. पूजेत इतर पूजासामग्री बरोबर बकराबळी देणे आवश्यक मानतात. बळीचे मांस फक्त पुरूषच खातात. त्या वेळी गावातील गुरे–ढोरे व गावकऱ्यांचे संरक्षण व्हावे या हेतुने मन्नत (नवस) मागण्याची प्रथा आहे.

नागपंचमी

कुटुंबप्रमुख जंगलात किंवा डोंगरावर साप-नाग दिसू नये, त्याने कुणालाही चावू नये म्हणून त्याला माहित असलेल्या नाग-सापांची नावे घेऊन सापाच्या वारूळात(*बंबोटा*) दूध घालतात व पुरीचा (*स्वाहली*) नैवेद्य दाखवतात.

पोळा

पोळा हा सण बैलांचा आहे. त्या दिवशी गावातील बैलांची शर्यत ठेवतात. बैलाला सकाळीच स्वच्छ अंघोळ घालतात. त्याच्या अंगाला व शिंगांना रंग व रंगीत कागद लावतात. कपाळावर कुंकवाचा टिळा लावतात. बैलासह जाऊन मुठवा आणि हनुमानाची पूजा करतात, नारळ फोडतात. दुपारी बैलांची शर्यत मुठवा देवापासून आरंभ करून खेडा देवतेपाशी संपते. त्यासाठी गावाच्या पूर्व दिशेला समोरासमोर असणाऱ्या दोन घरांना आंब्याच्या पानाचे तोरण बांधतात. पानात पान अडकवून तोरण तयार करतात. गावात जितके बैल असतील तितकी पाने तोरणात गुंफतात. तोरणाखाली बैलांना एका रांगेत उभे करतात. चौधरी बैलांची पूजा करतो, नारळ फोडतो, बैलाला मीठ खायला देतो. नंतर शर्यत सुरू होते. ही शर्यत खेडा देवतेपाशी संपते. जिंकलेल्या बैलाचा मालक खेडा देवतेची पूजा करतो, नारळ पोडतो. हा दिवस बैलांच्या विश्रांतीचा मानला जातो. त्यांच्याकडून कुठलेही काम करून घेतले जात नाही, ही परंपरा पूर्वजांपासून चालू आहे, असे जाणकारांनी सांगितले.

गणेश पूजा

वर्गणी जमवून दहा दिवस गणपती बसवतात. गावातील सर्व स्त्री-पुरूष, मुले पूजेला हजर राहातात. दहा दिवसानंतर गणपतीचे विसर्जन करतात.

मेघनाद

होळी नंतर या गावात मेघनादचा उत्सव करतात. गाव सोडून गेलेले लोकही या पूजेला येतात. आजूबाजूच्या गावातील लोकही नवस करण्यासाठी किंवा नवस फेडण्यासाठी गावात येतात.

दसरा

या सणाला दशहरा या देवतेची पूजा खेडा देवतेजवळ करतात. त्या दिवशी रेड्याचा बळी देण्याची प्रथा आहे. त्याचे मांस गावातील सर्व लोकांना प्रसाद म्हणून वाटतात. बळी दिलेल्या प्राण्याचे कातडे विकत नाही. वाद्यासाठी वापरतात.

दिवाळी

दिवाळीत लक्ष्मीपूजा व गाईची पूजा करतात. घरात व अंगणात दिवे लावतात. फटाके उडवतात. या गावात मुलाचे जावळ करण्याची प्रथा आहे. जावळ मामा करतो. दफन प्रथा आहे. पण विष पिऊन आत्महत्या केली असेल तर दहन करतात. कारण पोलिस येऊन दफन उकरतात. गावात वन व आरोग्य खात्यांची कार्यालये आहेत. पाण्याचा पुरवठा कठड्याच्या विहिरीतून होतो

या गावातल्या जाणकारांनी देवतांच्या दिशा सांगितल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

मुठवा	कडुलिंबाच्या झाडाखाली	चौथऱ्यावर चौकात	वरचा भाग गोलाकार
खेडा	गावाजवळच्या जंगलात	पूर्वे सीमेवर	वरचा भाग टोकदार
भुवानी माता		स्थान भुमका अथवा परिहार निवडतात.	गोलाकार, मुठव्या पेक्षा मोठी
हनुमान	पिंपळाच्या झाडाखाली	पश्चिम सीमेवर	शिलेवर कोरलेली मूर्ती
हरढुला	मोहाच्या झाडाखाली	गावापासून एक कि. मी. दूर	
शितलामाता		गावापासून दूर	ओबडधोबड छिद्रमय
छटीमाय	पाण्याच्या स्रोता जवळ	पूर्वेला	
खट्टीगोमाज	शेताच्या बांधावर		
भैसासूर	ढलढलीच्या ठिकाणी		
दैयत	उत्तर पश्चिम		

मेघनादढाणा

या गावात मेघनादाचा उत्सव होतो. गावाला पाणी पुरवठा हातपंप आणि विहिरीतून होतो. गावात वनखात्याचे कार्यालय आहे. अंगणवाडी, माध्यमिक शाळा आहे. आरोग उपकेंद्र आहे.

कोरकू भाषेत ढाणा याचा अर्थ फक्त कोरकूंची वस्ती असलेले गाव. मेघनाद ढाणा हे गाव बैतुल जिल्ह्यात, भैसदेई तालुक्यात आहे. घटांग पासून अंदाजे २५ कि. मी. अंतरावर हे गाव वसलेले आहे. मेघनाद हा रावणाचा पुत्र आहे. होळीनंतरच्या मंगळवारी मेघनादाचे 'खंब' (*२५ ते ३० फूट उंच खांब*) हे प्रतीक मानून मेघनाद रावण, महादेव-पार्वती यांची पूजा करतात. त्या दिवशी कोरकू 'खंब' नावाचे नृत्य करतात. मेघनादाला नवस करण्याची रूढी आहे. इतर समाजही या उत्सवात सहभागी होतात. 'एकदा एका दुष्ट राजाने कोरकूंच्या प्रदेशावर आक्रमण केले. मेघनादाने या दुष्ट राजापासून कोरकूंची सुटका केली. त्याची स्मृती म्हणून हा उत्सव करतात. हे गाव बलाईंचे असून येथे मेघनादचा उत्सव होतो.

जाम्बुखेडा

जिल्हा-बैतुल

तालुका-भैसदेई

जवळचे गाव-खामला

मेळघाटातील घटांग गावापासून अंदाजे पंधरा कि. मी. अंतरावर मध्यप्रदेशातील बैतुल जिल्हा आहे. या जिल्ह्यात भैसदेई तालुक्यात जाम्बुखेडा हे कोरकूंचे गाव आहे. मुठवागोमाज चौकात छप्पर असलेल्या ओट्यावर आहे. खेडागोमाज पूर्वेला आहे. बजरंगबलीचे देऊळ आहे. त्याचे तोंड दक्षिणेकडे आहे. स्मशानही दक्षिणेकडे आहे गावाच्या सीमेवर असणाऱ्या हनुमान, मासायनी देवतांमधे शिवारीसांजे आणि कुलागोमाजचा (*वाघदेवता*) समावेश आहे. शिवारीसांजे ही देवता पिकांचे संरक्षण करणारी देवता असल्याचे गणाजी तांडेल यांनी सांगितले. सीमेवरच्या देवतांची पूजा चूढरी करतो. गाईंचे संरक्षण बंजारीमाय आणि गोपालबाबा करतात. वनदेवता भंगीबाबा असून त्याची पूजा रविवारी किंवा सोमवारी करतात, एप्रिलमध्ये आखाजीला चंद्राची पूजा करतात. गावातील भ्रुमका गणाजी तांडेल भेटले. ते बिडी पेटवण्यासाठी गारगोटी वापरतात. जुकला जांबु भेटल्या त्या गळ्यात मंगळसूत्र घालतात. त्यांचे कुलदैवत पीरबाबा आहे. आखाडीला पीरबाबांना पांढरा बकरा बळी देतात. जुकलांच्या घरातील कोठीवर शंकर भगवानाचे चित्र रंगवलेले होते, त्यांनी देवाचे चित्र काढण्याचे कारण देवाला हे समजले पाहिजे की त्याला या घरात स्थान

आहे असे सांगितले. मातीत गवत मिसळून केलेले जाते (*रूचा*) पाहिले. या जात्याने धान्य भरडले जाते.

भूत बंगला

गावाजवळ अंदाजे चार कि. मी. अंतरावर 'एका घरात भूत आहे, अंधारात एकट्याने या बंगल्यात गेल्यास कुणीतरी येऊन गळा दाबतो आणि ती व्यक्ती मृत्यू पावते. गेल्या काही वर्षात तेथे पुढील व्यक्तींचे मृत्यू झाल्याचा अनुभव आहे.

१) चोवीस वर्षांचा शाळेचा शिपाई माधू

२) चार वर्षांचा लहान मुलगा नाव आठवत नाही

३) घोगरे शिक्षक खामला

४) पांडे आडनावाची स्त्री

वरील माहिती देणारे–

आठवडे बी. एल.	शिक्षक	जाम्बुखेडा
आठवडे आर. बी	शिक्षक	लोकलधारी
आठवडे पाना	ग्रामसेवक	जाम्बुखेडा

या तिघांनी पुढील माहिती दिली–

प्रत्यक्षात त्या घरात चंद्र शेखर बेले यांनी मुलांचे वसतीगृह चालू केलेले आहे. त्यात जाम्बुखेडा सोडून इतर गावातील मुले राहातात. चंद्रशेखर बेले यांच्या मतानुसार, मुलांनी आजवर त्यांच्याकडे अशा तऱ्हेची तक्रार केलेली नाही. परंतु त्यांनी फोटो काढण्यास मात्र नकार दिला.

कसई खेडा

जिल्हा–बैतुल

तालुका–भैसदेई

जवळचे गाव खामला

गावात भेटलेले लोक

जग्गु ढहिकर
मुनसा सुझी जामूनकर
बाकलु धुनू धिकर
रामा परसे

घटांग पासून २२कि. मी. अंतरावर भैसदेई तालुक्यात कसईखेडा आहे. या गावात चंद्र-सूर्य भाऊ-भाऊ आहेत, असे मानत असल्याचे सांगितले. सूर्याची पूजा आखाजी आणि भावे या उत्सवात एप्रिल-मे महिन्यात करतात. तर चंद्राची पूजा जानेवारीत करतात. बाळजन्माच्या वेळी आणि गर्भधारणेसाठी भगताच्या घरी सूर्याची पूजा करण्याची प्रथा आहे. या गावातील लोक भिमबाबा, पिसा, झीटांगा या ढेवतांना वीज , वादळ, पावसाच्या देवता असल्याचे मानतात. आखा आखाजीला या ढेवतांची पूजा करतात. ढुष्काळ पडल्यास अथवा पाऊस कमी झाल्यास हनुमानाच्या ढेवळात भजन करतात. भिमबाबा, पिसा, झीटांगा यांची पूजा करतात. विहीर खोदताना तिकास, फावडा, घमेले यांची पूजा करतात. विहिरीचे खोदकाम पूर्ण झाल्यावर विहिरीची पूजा होईपर्यंत घरातील कोणीही सदस्य पाणी पीत नाही. मुठवा आणि खेडा ढोघे भाऊ आहेत अशी माहिती या गावात मिळाली. गावाच्या सीमेवर असणाऱ्या हनुमान, खेडा, कुला, सांजेशिवारी, मायसानी यांची पूजा भुमका करतो. उताऱ्यासाठी अथवा पूजेसाठी भुमक्याला आमंत्रण द्यावे लागते. त्याला देवतांच्या नंतर मान मिळतो. या गावात वीज आलेली नाही. शिक्षणाच्या किंवा आरोग्याच्या कुठल्याही शासकीय योजना नाहीत. मुंडा देवस्थानाजवळ किंवा कुलदेवतेजवळ उभा करतो.

९० % पेक्षा अधिक कोरकू वस्तीची गावे

गावाचे नाव	गावाचे क्षेत्रफळ (हेक्टर्स)	लोक संख्या	एकूण घरे	वन क्षेत्र (हेक्टर्स)	कृषी क्षेत्र (हेक्टर्स)	स्त्री	पुरूष
माखला	२३३.२६	८८४	१७१	४६७.०९		४४२	४४२
गाडसिंबा		३८७	७८				
रायपूर		११३१	१७२			७३२	७९९

माखला

जिल्हा अमरावती

तालुका चिखलदरा

सेमाडोहपासून अंदाजे आठ कि. मी. अंतरावर माखला आहे.

या गावातील प्रमुख कृषी उत्पादने–ज्वारी, सोयाबिन, तांदूळ, कुटकी, तूर, उडीद, मका.

गावात भेटलेले लोक

बुडी जानोरकर

समोती जानोरकर

इधरलाल सोमा बैठेकर

सेमाडोहपासून अंदाजे आठ कि. मी. अंतरावर माखला आहे. माखला गावापासून दीड ते दोन किलो मी. अंतरावर आमराईत एका टेकडीवर राजवाड्याचे विखुरलेले अवशेष दिसतात. मोगल अमलात माखला हे संस्थान होते (*पूर्ण कथा पहा परिशिष्ट क्रमांक २*). झाडाच्या रूंद खोडात पडकी भिंत दिसली. भिंतीजवळ मातीचा दिवा होता. येथे इधरलाल सोमा बैठेकर भेटले, त्यांनी सांगितले, 'ही पूर्वजांची पूजा आहे. कोरकू वृक्षाची स्वतंत्र पूजा करत नाहीत'. दिवा लावण्यासाठी राजाचे वंशज जुलै महिन्यात येथे येतात. जवळपास कसलेही स्मृतिचिन्ह आढळले नाही. थोडे दूर काही अंतरावर सूर्याची अस्पष्ट आकृती असलेली शिळा सापडली. जवळच एक स्मृ तिशिला सापडली. चौकशी करूनही ही कुणाची स्मृतिशिला आहे हे जमलेल्या कुणालाही सांगता आले नाही. राजवाड्याजवळ एक दगडांनी बांधलेल्या भुयाराचे अवशेष आढळले. दगडाचे बांधकाम केलेला हौदही आहे. भेटलेल्या लोकांनी सांगितले, राजवाड्याचे दगड चूर्णी येथील देवळाच्या बांधकामात वापरले आहेत. माखला गावातील इतर दैवते आणि त्यांची स्थाने इतर कोरकू गावांसारखीच आहेत. माखला गावातील दोन स्त्रिया, बुडी जानोरकर आणि समोती जानोरकर भेटल्या त्यांच्या हातावर गोंदण होते. त्यांनी गळ्यात हासळी आणि सरी घातली होती.त्यांच्या हातात वाक्या व बकऱ्या घातल्या होत्या.

रायपूर

जिल्हा अमरावती

तालुका चिखलदरा

जवळचे गाव मखोले

पिके–तूर, तांदूळ, सोयाबीन, ज्वारी

भाजी–भेंडी, टोमॅटो, काकडी, मिरची

गावात भेटलेले लोक

जाजु भायल पटेल	वय ३६
झामके वोईके	वय ३०
सुनीत आठवले	वय २०
रतन सवालकर	वय २५
मुन्ना बैठेकर	
माजी विश्राम बैठेकर	वय ६०

हे गाव कोरकूंनी वसवलेले आहे. या गावात मेघनादाची पूजा करतात. बाहेरगावी स्थायिक झालेले लोकही त्यासाठी येतात. या गावातील काही लोकांची कुलदेवता कालाबाबा (*महादेव*) गुपितवाडा भजदईजवळ (*बैतुल जिल्हा*) आहे. या गावाच्या सीमेवर विविध प्रकारच्या (*लाकूड, दगड आणि मूर्ती*) सिडोली आहेत. सिडोली मधले प्रकार कुळांची विविधता दर्शवतात असे येथील जाणकारांनी सांगितले. या गावातील बहुतांश लोक स्वत:ला हिंदू मानतात. स्थानिक देवता आणि स्वीकारलेल्या देवतांची सामुदायिक पूजा करतात. दोन्ही देवतांची पूजा पद्धती सारखीच आहे. पण स्थानिक देवतांना बळी देणे अनिवार्य मानले जाते. तर स्वीकारलेल्या देवतांना बळी देत नाहीत. अंदाजे ३० वर्षांपूर्वी गावात पाण्याची टंचाई निर्माण झाली होती त्यावळेस शाळेतील शिक्षकाने गणपती आणि दुर्गा पूजा करण्याचा सल्ला दिला. पूजा केल्याने हातपंपाला पाणी लागले आणि तेव्हापासून गणपती आणि दुर्गेची सार्वजनिक पूजा केली जाते असे गावकऱ्यांनी सांगितले. गावकऱ्यांच्या मतानुसार मेघनादाच्या मृत्यूनंतर शव घेऊन जात असताना जेथे–

जेथे मांसखंड पडले तेथे-तेथे मेघनादाचा उत्सव होतो. कडुलिंबाचे झाड सुकल्यामुळे मुठवागोमाजजवळ झाड नाही. कडुनिंबाचे झाड सुकल्यास पुन्हा लावत नाहीत असे गावकऱ्यांनी सांगितले. गावात दोनदा होळी होते. सर्व गावकऱ्यांची सामुदायिक होळी, ज्या होळीला कोरकू छोटी होळी म्हणतात. दुसरी होळी फक्त कोरकू करतात. तिला बडी होळी म्हणतात. गावात दुकान, पिठाची गिरणी, माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. वन खात्याचे लहानसे विश्रामगृह आहे. वनखात्यात सेवा करणाऱ्यांसाठी पक्की घरे बांधलेली आहेत.

५०% हून अधिक कोरकू असलेली गावे

गावाचे नाव	गावाचे क्षेत्रफळ	लोकसंख्या	कृषी क्षेत्र, वन क्षेत्र	एकूण घरे	स्त्री	पुरूष
खडीमल	४२७.४०	७९१	३९.९४	१३७	३८९	४०२
अंबापाटी		९३६		१५२		
जरिदा		७६८		१०६	२७७	४९१
कुकरू		५०५		१३०	२५८	२४७

खडीमल

जिल्हा अमरावती

तालुका चिखलदरा

जवळचे गाव

गावात भेटलेले लोक

बब्बु साकतकर	३५	शिक्षण चौथी
रिच बुरा धिकार	५०	शिक्षण नाही
मिराट संतोष कासदेकर	४०	तिसरी पास
धिकला सुधाकर साकलकर		सातवी पास

या गावात भेटलेल्या लोकांनी देवता आणि त्यांच्या मान्यतेविषयी माहिती दिली.

दैयत

तरूण विवाहपूर्व मृत झाल्यास त्याच्या आत्म्याचे दैयतात परिवर्तन होते. त्याने इतरांना त्रास देऊ नये म्हणून त्याची पूजा करतो.

बीजासरीमाता

ही देवीमाय सातमाय मधील एक आहे. गावात कांजण्या आल्यावर सायनीमातेची [२६] सिंदूर आणि फुले वाहून पूजा करतात (सविस्तर माहिती प्रकरण चारमध्ये आहे).

डोलारमाता

दसऱ्याला डोलारमायची पूजा केली जाते. झाडाला झोका बांधून मुली झोके घेतात. झोका तुटून कोणालाही दुखापत होऊ नये म्हणून दसऱ्याला डोलारमायची पूजा करतात. पूजनात बकरा बळी दिला जातो. परंतु हे मांस फक्त पुरूषांनीच खाण्याची प्रथा आहे.

डाकीणमाय

भूत अंगात आल्यासच या देवतेला पूजले जाते. भुमका झोडपा (*भूतबाधा*) झाल्याचे हात लावून ओळखतो. भुमक्याला भूताला काय हवे आहे हे नेमके समजते. 'डाकीणमाय ज्या वस्तूंची मागणी करेल त्या वस्तू स्मशानजवळ खड्डा खणून त्यात पूरतात. त्यानंतर झोडपा लागलेल्या व्यक्तीची सुटका होते.

खडक्या

ही देवता गुरांचे संरक्षण करते म्हणून आखाडीला या देवतेची पूजा करतो.

हरदुलीमाता

ही कष्ट दूर करणारी देवता आहे. सर्व साधारणपणे गावापासून एक कि. मी. दूर आंब्याच्या झाडाखाली या देवतेची स्थापना करतात. मार्गशीर्ष महिन्यात या देवतेची पूजा केली जाते.

दिवाळी

दिवाळीत गाई व म्हशींना सजवतात. गोडपदार्थ खाण्यास देतात. त्यादिवशी गावातील गोंड ढोल वाजवत नाचतात. गोंडांना बासुरी, पैसे, ज्वारी, गहू, खाण्यासाठी गोड पदार्थ देण्याची प्रथा आहे.

---

२६ बिजासरी मातेलाच काही गावात सायनी माय म्हणतात.

गणपती व दुर्गा

या दोन्ही देवतांचा उत्सव दहा दिवस करतो . वर्गणी गोळा करून सार्वजनिक उत्सव करतात.

अंबापाटी

जिल्हा अमरावती

जवळचे गाव

पिके –तांदूळ, सोयाबीन, उडीद, मूग, ज्वारी, मका

गावात भेटलेले लोक

पिलकाय लोटे	४०	शिक्षण ४थी पास
रामचंद्र विश्राम पटेल	४८	शिक्षण नाही
शशी बाबुलाल बेलसरे	२५	बारावी शासकीय आशा योजनेत शिकलेली
मार्तींग तुबल बैठेकर	**भुमका**	

या गावातील लोक रक्षाबंधन सण साजरा करतात. या दिवशी बहीण भावाला राखी बांधते. दिवाळीला लक्ष्मीपूजा करतात. शेणाचा ढीग गोवर्धन पर्वताचे प्रतीक आणि शेणाचे पाच गोळ पांडवांचे प्रतीक मानून त्यांची पूजा करतात. नंतर गाई गुरांचीही पूजा करतात. संक्रांतीला तिळगूळ एक–दुसऱ्याला देतात. शंकर भगवानाची पूजा करतात. गावात तुळशी वृंदावन आहे. त्याची नित्य पूजा करतात. मुठवा पिंपळाच्या झाडाखाली आहे. कारण पहिले लिंबाचे झाड करपले त्या जागी नवीन पिंपळ उगवला. गाईच्या दूधाचा उपयोग करतात. शिरा, लाडू करतात. कानवले, कुरडया, चिवडा करतात. दसऱ्याला देवीला व परस्परात आपट्याची पाने भेट देतात. रोगराई पसरल्यास गावातील सर्व लोक एकत्र जमून बिजासरी मातेची पूजा करतात आणि काळ्या रंगाचे कोंबडीचे जीवंत पिल्लू मातीत गाडतात. जात्यावर दळताना ओव्या म्हणतात. त्या उस्फूर्त असतात.

जरिदा

जिल्हा–अमरावती

तालुका– चिखलदरा

जरिदा हे गाव राजमार्गावर आहे. गावात कोरकूंची लोकसंख्या अधिक आहे. कोरकूंच्या शिवाय गोंड आणि बलाई समाज स्थायिक आहेत. गेली साडेतीनशे वर्षे एकच 'चतुरकर' घराणे मेघनादाची पूजा करतात.'अकबरचा सेनापती मानसिंग मेघनादाचे दर्शन घेऊन गेला' असे सायबू भैया चतुरकरांनी सांगितले. चतुरकरांना मेघनादाच्या खांबवर चढण्याचा पहिला मान मिळतो. १६ मार्च १९८४ ला मेघनादाचे नूतनीकरण झाले आहे. बलाई स्त्रीने सांगितले मेघनादाच्या उत्सवात कोरकूंबरोबर गोंड आणि बलाई सुद्धा सहभागी होतात. नवसही करतात. या गावात मातेचे देउळ बांधलेले आहे. देवळावर छप्पर आहे. जरिदा येथे भेटलेल्या संतोष बैठेकर यांनी सांगितले की, चुमक्याबाबा, डवराबाबा, दैयतबाबा आणि पीरबाबा चौघे भाऊ–भाऊ आहेत. त्यांनी सांगितलेली गोष्ट (*प्रकरण दोन पहा*).

कुकरू

जिल्हा–बैतुल

तालुका–भैसदेई

जवळचे गाव– जाम्बुखेडा

गावात भेटलेले लोक

जगदिस कोगे	सचिव
सोमे चन्नु भारशकर	
किशोरी जामुनकर	रोजगार सेवक
हिरामन मंगल भुसुम	
चंदुलाल चांदुरकर	
नामदेव जाजू चिमोटे	

पशूंचे संरक्षण करणाऱ्या बंजारन माय, गोपालबाबा आणि सांजेशिवारी यांना दिवाळी

नंतर गोठ्याजवळ बोकड किंवा डुकराचा बळी देतात. भंगीबाबा, दैयत यांची पूजा भुमका करतो. ही पूजा फक्त रविवारी करतात. मासयानीची (*सातमाता*) पूजा श्रावण महिन्यात करतो. नजर लागू नये म्हणून मासयानी व कुलागोमाज यांच्या नावाने भुमका ढोरा बांधतो. नजर लागू नये म्हणून लिंबू, आंब्याची पाने, मिरची ढारावर बांधून ठेवतात. गावातील लोकांना आमंत्रण देण्याचे कामही भुमकाच करतो. मूल होत नसल्यास पूर्णा नदीची पूजा करतात. पूर्णा नदी भैसदेई पासून अंदाजे चार ते पाच कि. मी. अंतरावर आहे. कार्तिकी पौर्णिमेपासून पुढे ढहा दिवस या नदीची पूजा करतात. मुलासाठी मन्नत मागतात. नवसाची पूर्तता करण्यासाठी किंवा मन्नत करण्यासाठी येथे मेळा भरतो. तांदळ्याच्या रूपात पूर्णा नदीची स्थापना केलेली आहे, पूजा केल्याने मुल होते असा आम्हाला विश्वास वाटतो, असे या गावातील लोक म्हणतात. या मेळयात आदिवासी समाजाबरोबर आजूबाजूचा ग्रामीण समाजही उत्साहाने हजर असतो. होळीसाठी टेंबरू, सागवान, यांची लाकडे जाळतात. कोरकूं एकाच दिवशी ढोन होळी करतात. मोहनी, बांबू, जामुन या वृक्षांना देवता मानतो. वडाचे झाड अमंगल मानतो कारण त्यावर भुतांचा निवास असतो.

७०% हून कमी कोरकू वस्तीची गावे

गावाचे नाव	गावाचे क्षेत्रफळ	लोकसंख्या	कृषी क्षेत्र	वनक्षेत्र	स्त्री	पुरूष
बिच्चुखेडा		२७७	८७.०९	४४	१३२	१२७
पायविहीर	२१.६०	७१७	१९३.६७	१०१		
घटांग		१९१			९२	९९
खामला		१७२९			७४९	७८०

बिच्चूखेडा

जिल्हा–अमरावती

पिके–तांढूळ, ज्वारी, तूर, हरभरा, सोयाबीन

गावात भेटलेले लोक

गानु सावलकर ७५ भुमका

रविसंकर भुसुम ७०

५० वर्षांपूर्वी खडीमलमध्ये पाण्याची कमतरता झाल्यामुळे या ठिकाणी नवी वसाहत झाली. पूर्वी हा भाग 'माखला' या राज्यात होता. हे गाव 'बिच्चूखेडा' या नावाने ओळखले जाते. या गावात गोंड, गवळी आणि कोरकू राहतात. पूर्ण गावाचा एकच भुमका कोरकू गानु सावलकर आहे. सर्व गावकऱ्यांच्या संमतीने दशहरा उत्सव सुरू केला आहे. देवीमातेला छप्पर आहे. सावलकरांनी सांगितले, 'इतर समाज मनमानी करतात. गावातील एकोपा कमी होऊ लागला आहे'. बिच्चुखेडा गावात राहाणाऱ्या राजगोंडांच्या घरात धारणा आहे, कोनाड्यात छोट्या-छोट्या दगडांच्या स्मृतिशिला ठेवल्या आहेत. पूर्वी विवाहासाठी पुरोहित लागत नसे. काळानुसार काहीवेळा विवाहासाठी पुरोहित बोलवला जातो. सूर्यशक्तीवर चालणारे दिवे आहेत. गावाची रचना कोरकू गावासारखी राहिलेली नाही. गावप्रमुख नाना सावदेकर म्हणाले, 'गवळी ऐकत नाहीत. गावातील एकोपा कमी-कमी होतो आहे'.

चिचखेडा

जिल्हा-अमरावती

जवळचे गाव- टेंभुरसोडा

पिके-तांढूळ, तूर, तीळ, भुईमुग, सूर्यफूल, ज्वारी, तूर, हरभरा, सोयाबीन

गावात भेटलेले लोक

किशन भिकाजी चव्हाण	६५	वीस वर्ष सरपंच होते.
लक्ष्मण किसनराव चव्हाण	४०	आला पटेल
म्हातिंग तुबल बैठेकर		
उषा चव्हाण	२५	दहावी पास

या गावाच्या लोकसंख्येत बलाई बहुसंख्य आणि कोरकू अल्पसंख्य आहेत. किशन भिकाजी चव्हाण या रजपूताचा विवाह कोरकू स्त्रीशी झाला होता. कोरकू कुटुंबाकडे असलेले 'आला पाटील' हे पद त्यांना मिळाले. इतर कोरकू गावासारखीच कोरकूंची घरे मूळ वस्तीपासून वेगळी पण इतर कोरकू गावासारखी एका ओळीत एकाच उंचीची आहेत. चव्हाणांच्या शरीरात देव संचारत असे. ते भुमका आणि पाटील अशी दोन्ही पदे सांभाळत असत. वृद्धत्वामुळे ही कामे त्यांना बंद करावी लागली. त्यांच्या घरात

धारणा आहे. त्याची नित्य पूजा होते. धारणाला लिंबू, बांगड्या, त्रिशूळ आणि एक तलवार वाहिलेली दिसते. तलवार नवसाची पूर्तता म्हणून एका भक्ताने अर्पण केली असे सांगितले. दसरा आणि चैत्रात बाबांना संचार होत असे. संचार झाल्यानंतर विशिष्ट पोशाख करावा लागतो. ज्यात चादर, चोळणा आणि आसूड आवश्यक ठरतात. आसूड गाईच्या शेपटीच्या केसांचा असतो. देव अंगात संचारल्यानंतर सवारी आली असे म्हणतात. त्या वेळी संचार झालेल्या व्यक्तीचा आवाज बदलतो. हालचालीत फरक होतो. क्वचित भाषाही बदलते. धारणाजवळ देवासाठी स्वतंत्र खोली आहे. ज्यात देव्हाऱ्यात अनेक देव आहेत. तसेच देवतांचे आणि संतांचे फोटो आहेत. देव्हाऱ्यात गंगा भरलेली लोटी आहे. घरातील सर्व लोक हिंदू असल्याचे मानतात. कुटुंबप्रमुख दरवर्षी तीर्थयात्रेला जातो. परत येताना तेथील देवतेचा फोटो आणतो. असे अनेक फोटो देव्हाऱ्यात ठेवलेले आहेत. त्यांची नित्य पूजा करतात. देव्हाऱ्यात असलेल्या योगीमहाराजांची तीस वर्षांपासून पूजा करतात. परंतु त्यांचे नाव सांगता आले नाही. चव्हाणांची कुलदेवता आशादेवी आहे. तिचे स्थान अंदाजाने आशिरगड असावे अशी माहिती दिली. स्थान माहित नसले तरीही चैत्र महिन्यात आणि दसऱ्याला कणकेची देवी करून आरती करतात. चैती दसऱ्याला माची उपासना निखाऱ्यावर चालून करण्याची प्रथा आहे. गणपती बसवतात. नैवेद्य मोदकाचा करतात. पूजेत अक्षता, फुले, दूध आणि साखर वापरतात.

दफनाची प्रथा आहे. दफन करताना लोटा, थाळी, अंथरूण, पांघरूण, कपडे दफनात ठेवतात. दफनावर मोठा दगड ठेवून झाकतात. दफनाच्या ठिकाणी दहा दिवस शिजवलेले अन्न ठेवतात. क्वचित दहनही करतात. दहनातील राख नदीत टाकतात. दहनाच्या जागी सिदुली करतात. सिदुलीवर मूर्ती कोरतात. शनिवार, मंगळवार, गुरूवार, एकादशीला उपवास करतात. इतर कोरकूंची घरे एका ओळीत एकमेकांना लागून आहेत. त्यांची कुलदेवता बैराटमाय आहे. चिचखेडा आणि टेंभुरसोडा या दोन्ही गावांच्या सीमेवर राधास्वामी सत्संगआश्रमाची पाटी आहे. कोरकूंना तुम्ही सत्संगाला जाता का? असे विचारल्यावर ते म्हणतात, 'सत्संगात शाकाहारी व्हा असे सांगतील, हे आमच्या परंपरेच्या विरूद्ध असल्यामुळे जात नाही'.

पायविहीर

जिल्हा–अमरावती

जवळचे गाव– टेंभुरसोडा

पिके–तांदूळ, तूर, तीळ, भुईमुग, सूर्यफूल, ज्वारी, हरभरा, सोयाबीन

गावात भेटलेले लोक

रूक्मा जयराम बेलसरे

मुन्नी आशा मावस्कर

दयाराम जयराम बेलसरे

तारा दयाराम बेलसरे

रोहिणी दयाराम बेलसरे

दुर्गेश दयाराम बेलसरे

बाबनू दैकर भेटले. त्यांच्या घरात महादेव आणि पीरबाबाचा फोटो आहे. ती दोन्ही त्यांची कुलदैवते असल्याचे मानतात. दरवर्षी बुलढाण्याच्या दर्ग्याला दर्शनाला जातात. दिवाळीत लक्ष्मीपूजेनंतर गुरांची पूजा शेणाचे पाच गोळे करून करतात. गोळे पांडवांचे प्रतीक असल्याचे मानले जाते. दृष्ट काढण्याची पद्धत खालील प्रमाणे दाखवली. 'मीठ, मिरची आणि बिब्बा मुठीत ठेऊन सात वेळा ओवाळतात. ओवाळताना, 'जीवो गोरू वासरू, शेळी मिरचा बोलूमाग डिट पासरण डिटू सिन्या चाकना (*जीवो गोरू वासरू, शेळी या सर्वांची लागलेली द्रिष्ट मिरची तू घेउन जा*)' असा मंत्र म्हणून चुलीत टाकल्याने द्रिष्ट मिरची बरोबर जळून जाते', असे मानतात. पायविहीरला सुमोती काळे भेटल्या. गावाची वसाहत करताना आरंभी बसापती पूजा होते. बसापतीपूजा म्हणजे मुठवा, दैत्य, गावठाणी देवी यांची पूजा करणे असे सांगितले. धान्य कापल्यावर खल्लापूजा करतात. चपाती, गूळ, तेल यांचा नैवेद्य दाखवतात. काही वेळा कोंबडाही कापतात. अंत्यविधी करताना मृताला उदबत्तीने ओवाळतात. वृद्ध, तरूण किंवा अपघाताने मृत्यू झाल्यास अंत्यविधीमध्ये काही फ रक नाही. काळ्या पोतीला मुछकू म्हणतात. ती घातल्याने लग्न झाले हे समजते. लग्नात वर वधूला ही पोत घालतो. नदीतील देवाला पानघट म्हणतात. लग्नाचे

वऱ्हाड नदीवरून जात असेल तर नदीला गूळ वाहून पानघटदेवाची पूजा करतात. पावसासाठी भीम, अर्जुन, जोधा जाळा यांची मुठव्या जवळ रात्री पूजा करतात. जाळा व जोधा या स्थानिक देवता आहेत. यापेक्षा अधिक माहिती मिळाली नाही. धान्य भरून ठेवतांना कोठादेवीची आणि दैत्याची पूजा करतात. कोठादेवीसाठी कोंबडा आणि दैत्यासाठी डुक्कर किंवा मेंढा बळी देतात. नवीन घर बांधताना चारही बाजूंना लोखंडी खिळे ठोकतात. भुमक्याकडून मंतरलेली पाच लिंबे घेऊन ती चारही कोपऱ्यातून मध्याकडे एकाच वेळी फेकून मध्य काढतात. मध्यावर खड्डा खणून त्यात सोने, चांदी, पैसे आणि लिंबू टाकतात. त्यावर धारणा उभा करतात. धारणा उभा केल्यावर घरातील तीन मुली व दोन मुलगे पाच प्रदक्षिणा घालतात. त्यावेळेस मुलांच्या हातात बाभळीच्या दांड्याला कापड्याच्या चिंध्या लावून केलेली पेटती मशाल धरलेली असते. त्यावेळेस मुले विचारतात 'तुम्ही काय करत आहात?' घरातील लोक सांगतात, 'आम्ही घराचे उजल करीत आहेत'[२७]. हा विधी संपन्न झाल्यावर प्रथम गावातील सर्व मुलांचे भोजन होते. तदनंतर गावजेवण होते.

पायविहीर गावाला लागून गोंडवाघोली गाव आहे पायविहीर गावातील जीजी छोटेलाल तोटे यांनी सांगितले. 'गोंडवाघोली गावातील लोकांनी सीमेवर असलेल्या हनुमानाला आपल्या गावाच्या हद्दीत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी ठरला कारण हनुमान आपल्या जागेवरून हलला नाही. गोंडवाघोली गावात अल्पवयीन मुलांचे मृत्यू होण्यास सुरूवात झाली. गावातील लोकांनी हनुमान घेऊन जाण्याचा प्रयत्न सोडून दिला. चाळीस वर्षांपूर्वी त्यांना आलेला दुसरा अनुभव त्यांनी सांगितला 'पायविहीर गावात आजारांचे वाढते प्रमाण अनुभवून गावातील लोकांनी गणपती उत्सव सुरू केला. पायविहीरला गणपतीचे विसर्जन बारा दिवसांनी करतात. गावातील आजारांचे आणि मृत्यूचे प्रमाण कमी झाल्याचा अनुभव आल्यामुळे दुर्गापूजाही सुरू झाली. आजही पायविहीरमध्ये श्रद्धापूर्ण उत्साहात गणपती आणि दुर्गापूजा करतात'. दुर्गेला नऊ दिवस फुलांची आणि लिंबाची माळ घालतो. गव्हाची रोटी (सोकाडा), रोटीवर गूळ, डाळ-भात यांचा नैवेद्य दाखवतो. काही लोक दुर्गेची साडीने ओटी भरतात या साड्या बाजारात विकण्याचा प्रयत्न झाला. ज्याने साड्या विकल्या तो स्वत:आजारी पडला. सुरूवातीला मी सुद्धा दुर्गामावर अविश्वास दाखवला. पण मी सतत आजारी पडू

२७ उजल-पूजल म्हणजे जागेची स्वच्छता करून पूजा करणे

लागले. देवीची प्रार्थना केल्यानंतर माझी प्रकृती ठीक राहू लागली. आता माझ्या घरात मी दुर्गामाची पितळी मूर्ती ठेवली आहे. मी तिची रोज पूजा करते'.

घटांग

घटांग या गावाजवळून 'परतवाडा ते सेमाडोह' हा राजमार्ग जातो. घटांग पासून अंदाजे वीस ते पंचवीस कि. मी. अंतरावर सेमाडोह आहे. घटांगची होळी पाहिली. तेथे मुंबईला जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये शिकत असलेला 'महेंद्र' नावाचा गोंड मुलगा भेटला. त्याने त्याला त्याच्या आजोबांनी सांगितलेली होळी विषयीची माहिती सांगितली. ती पुढे देत आहे–

'कोरकू दोन होळ्या पेटवतात. एक नर व दुसरी मादी. घरा–घरातून होळीसाठी लाकडे गोळा करतात. स्त्रिया नारळ, लिंबू वाहून बाजूला बसतात. गावाचा पटेल होळी प्रज्वलित करतो. नंतर स्त्रिया घरी निघून जातात'.

त्या वेळेस 'नारायण खरे' नावाचे शिक्षक भेटले. त्यांनी सांगितले, 'होळी पेटल्यानंतर पाच मिनिटे सर्व स्तब्ध उभे राहातात. कोरकू होलिका ही शांताबाई आहे व ती रावणाची बहीण आहे असे मानतात. होळी हा सण शांताबाईचा स्मृतीदिन आहे असे मानताना दिसतात.

खामला

जिल्हा–बैतुल

तालुका–भैसदेई

जवळचे गाव– जाम्बुखेडा

या गावाची एकूण लोकसंख्या ६५०० आहे, त्यात कोरकू फक्त ७५ आहेत.

गावात भेयलेले लोक

१ – तुकाराम जावरकर.

२ –काळीराम भारषकर

३ – हिरालाल रामलाल कासदेकर

या गावातील जाणकारांनी सांगितले की, बहिराम आणि पीरबाबा या रक्षक देवता

आहेत. बहिरामबाबांचा तांदळा फक्त अंगठ्या येवढाच आहे. घटांग ते खामला या घाटात प्रस्थापित केलेला आहे. अतिशय लहान असल्यामुळे त्याचा फोटो आला नाही. सर्व देवतांची पूजा बारा महिन्यात कुठल्याही वारी करता येते. गाव सीमेवर हनुमान, मासायनी, कालीमाता, शंकरभगवान या देवतांची पूजा स्वत:च करावी लागते. भूतबाधा होऊ नये किंवा नजर लागू नये म्हणून नवस करतो. भूतबाधा झाल्यास भुमका इतर उपायही करतो आणि पिंपळाच्या झाडाला खिळे ठोकतो. व्यंग असलेल्या मुलाला बाराबीटी म्हणतात. त्या मुलाला इतर मुलांसारखेच वागवतो.

मृत्यूनंतर आत्मा जो पर्यंत त्याला त्याच्याच घरात जागा मिळत नाही तोपर्यंत भटकत राहातो. नजर लागू नये म्हणून घराच्या दारावर आंब्याची पाने मिरची बांधून ठेवतो. मृताची पत्नी दहा दिवस कूंकू लावत नाही. मुलाला मुंडन करावे लागते. मृताचे कपडे वापरत नाहीत. दोन तोंड असलेल्या सापाला मारत नाही बाकी सर्व सापांना मारतो. सोमवारी आठवडा बाजार भरतो. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील लोक या दिवशी बाजारासाठी येतात. या बाजारात काही कोरकू वस्तू विनिमय करतात, असे गावकरी सांगत होते. येथील आजारी लोकांना औषधांसाठी महाराष्ट्रातील घटांग पर्यंत जावे लागते.

पशू		**पक्षी**		**किटक**		**वृक्ष**	
शेळी	मंगल	कावळा	अमंगल	वाळवी	मंगल	महुआ	मंगल
म्हैस	मंगल	कबुतर	मंगल	मुंग्या	मंगल	साल	मंगल
कुत्रा	मंगल	कोंबडी	मंगल	शेणकिडे	मंगल	टिक	मंगल
हत्ती	मंगल	मोर	मंगल	गांडूळ	मंगल	तुळस	मंगल
घोडा	मंगल	घुबड	मंगल	रातकिडा	मंगल	पिंपळ	मंगल
डुक्कर	मंगल	वटवाघुळ	अमंगल	काजवे	मंगल	वड	अमंगल
				डास (मच्छर) ढेकूण (खटमल)	अमंगल		
				ढेकूण (खटमल)	अमंगल		

चिखलदरा मातेच्या देवळात देणगी देणाऱ्या लोकांची यादी लावलेली आहे.त्यात आडनावे बदललेली दिसतात.त्यापैकी काहींचे मूळ आडनाव आणि बदललेले आडनाव अशी नावे देत आहे.

मुळ आडनाव बदललेले आडनाव

कासदे /कारन्दे काळे

बैठे	बेलसरे
जांबु	जांबुकर
दिकार	दहिकर
भूसूम	भास्करे

परिशिष्ट क्रमांक ५

निवडलेल्या गावातील लोकांकडून माहिती घेण्यासाठी चव्वेचाळीस. प्रश्न असलेली प्रश्नावली तयार केली आहे. प्रश्नावलीतील प्रश्नांची उत्तरे पंचवीस लोकांनी लिहिली आहेत. काही प्रश्नांची उत्तरे माहित नाही किंवा उत्तर दिलेले नाही तरीसुद्धा मिळालेल्या उत्तरांच्या आधारावर कोरकूंच्या दैवत परंपरांचे स्वरूप समजून घेता येईल.

(प्रथा, रूढी, उपासना पद्धती पूर्वापार आहे तशाच पाळता की नवीन स्वीकारल्या आहेत, बदल केला असल्यास केंव्हा पासून झाला? पालन केल्याने सुख किंवा स्वास्थ्य मिळते का? या मागचा हेतू काय असावा? मंगल, अमंगल किंवा शुभाशुभ या समजुती समाजमान्य आहेत का? अशुभ घडू नये म्हणून उपाय करता येतो का? करता का?)

१) सूर्य (दियो गोमाज)

- या देवतेची पूजा करता का?
- कोणत्या महिन्यात, कोणत्या वारी पूजा करण्याची प्रथा आहे?
- पूजेमध्ये कोणती सामग्री वापरता?
- सूर्यासंबंधी काही विधी करता का?
- पूजेनंतर सामुदायिक जेवण असते का?
- सूर्यदेवता संरक्षक देवता आहे का?
- शिशू जन्माकाळी किंवा गर्भधारणेसाठी सूर्यदेवतेची उपासना करता का?
- सूर्यासंबंधी आख्यायिका आहेत का ?

२) चंद्र

- चंद्राशी संबंधित कथा आहेत का?
- चंद्रावर असलेल्या डागासंबंधी काय समजूत आहे?
- चंद्राची पूजा करता का? करीत असल्यास कोणत्या महिन्यात? कोणत्या वारी करता?
- अमावस्या पौर्णिमेला पूजा किंवा विधी आहेत का? त्याला काही अर्थ आहे का?
- चंद्र, सूर्य ग्रहणांमध्ये काही उपचार किंवा विधी आहेत का? त्या वेळी कोणता आचार धर्म पाळता?
- एखादा पहाटेचा तारा (शुक्र) किंवा इतर ताऱ्यासंबंधी विशेष समजुती आहेत का? इंद्रधनुष्य आणि आकाशगंगा याच्यसंबंधी काही समजुती आहेत का?

३) धरती

- जमिनीला माता मानता का?
- जमीन नांगरल्याने दुखावेल अशा भावना आहेत का? झाल्यास, पाप लागू नये म्हणून काही विधी करता का? कसे करता?
- जमिनीवर काही सांडू नये, ठेवू नये असे काही संकेत आहेत का?

४) वीज, वादळ, पाऊस, भूकंप

- वीज, वादळ, पाऊस, भूकंप यांच्या देवता आहेत का?
- या संबंधी काही कथा, आख्यायिका आहेत का?
- या देवतांची पूजा करता का? कशी करता?
- दुष्काळ (सुका) आल्यास कोणत्या देवतेला आळवता?
- कोणत्या देवतेच्या कृपेमुळे ही संकटे टाळता येतात?
- पावसासाठी म्हणून कोणत्या देवतेची पूजा करता?

- आकाशातून पडलेल्या ढगडाला देवता मानलेले माहीत आहे का?

५) विहीर

- विहीर खणतांना बली प्रथा आहे का?
- एखाद्या (नदी, विहीर, किंवा तलावाच्या) पाण्यात रोग बरे करणारी शक्ती आहे का? हे पाणी पवित्र मानता का?
- या पाण्याला का पवित्र मानता?

६) स्त्री आणि पुरूष, या दोघांनी करण्याचे विधी

- स्त्री आणि पुरूष, या दोघांनी करण्याचे विधी वेगवेगळे आहेत का?
- विधी वेगळे असण्याचे कारण काय असावे?
- लिंब नेसणे किंवा त्या सारखे काही आचारधर्म पाळता का?

७) अश्वत्थामा, हनुमान, रावण, मेघनाद, कुंभकर्ण, भीमसेन

- या संबंधात काही कल्पना, संकेत आहेत का?

८) स्थानिक देवता

- स्थानिक देवता आहेत का?
- त्यांची नावे, त्यांचे वर्णन, त्याच्या कथा, त्यांचे पुजारी, नैवेद्य, पूजेची निश्चित वेळ किंवा महिना ठरलेला आहे का?
- गावातील कोणत्या देवतेसाठी बळी देतात?
- स्थानिक देवतांचे एक दुसऱ्याशी नाते आहे का? असल्यास काय आहे?
- नवीन गावाच्या स्थापनेच्या आरंभी कोणत्या देवतेची पूजा करता?

त्याची जागा ठरलेली आहे का?

- देवतांच्या जागा निश्चितीचे काही कारण आहे का?

(*स्थानिक देवता–जटांगबाबा, भुमकाबाबा, सैलानी बाबा, केडदा माता, जनीमाय, बैराट माता, सिरतो माय*)

९) पशूंचे संरक्षण करणारी देवता

पशूंचे संरक्षण करणारी देवता आहे का?

गाई–गुरांची व शेळ्या, मेंढ्यांची काळजी घेणारी देवता एकच आहे की प्रत्येकाची स्वतंत्र देवता आहे?

या देवतेची पूजा करण्याची पद्धत कशी आहे?

पिकांचे संरक्षण करणाऱ्या देवतेचे नाव काय आहे?

या देवतेची पूजा कोणत्या महिन्यात व कोणत्या वारी करता? कुठे करता?

लिंब नेसणे किंवा त्या सारखे काही आचारधर्म पाळता का?

१०) पिकांचे संरक्षण करणारी देवता

- पिकांचे संरक्षण करणाऱ्या देवता आहेत का?
- देवतेचे नाव काय आहे?

देवतेची पूजा कोणत्या महिन्यात व कोणत्या वारी करता?

११) स्थानिक देवता

- स्थानिक देवता आणि स्वीकारलेल्या देवतांची पूजा एकाच पद्धतीने होते का?
- स्थानिक देवतांची व स्वीकारलेल्या देवतांची नावे काय आहेत?

१२) वनदेवता

- वनदेवतेची पूजा करता का? करीत असल्यास ही पूजा कोण करतो?

- वनदेवतांची नावे काय आहेत?
- जंगलातली देवता आहे का?

१३) गावसीमे वरील देवता

- गावसीमेवर कोणकोणत्या देवता आहेत आणि त्यांची नावे काय आहेत?
- गावाच्या सीमेवर असलेल्या देवतेच्या पूजेसाठी पुजारी आहेत का?

१४) पटकी , देवी, ताप, खोकला इत्यादी आजार बरे करणाऱ्या देवता

- पटकी, देवी, ताप, खोकला, इत्यादी आजार बरे करणाऱ्या देवता कोणत्या?
- त्यांच्या उपासना पद्धती काय आहेत?

१५) नजर

- नजर लागू नये, काळी जादू होऊ नये म्हणून काय उपाय करता? (दोरा बांधणे, तोरण बांधणे, गळ्यात ताईत, इत्यादी)
- गुराढोरांवर जादू झाल्यास काय तोडगा आहे?
- याविषयी असलेले संकेत, प्रथा, उपासना काय आहेत?

१६)

- दारावर किंवा दारासमोर रांगोळ्या विशिष्ट प्रकारच्या आकृत्या काढता का? या सर्वांचा देवांशी संबंध आहे का?
- तोडग्यामधे विशिष्ट प्रकारच्या हालचाली (नृत्य किंवा हाताने खुणा करणे, तोंडाने विशेष आवाज काढणे, इत्यादी) करता का?
- त्यांना विशेष अर्थ आहे का? अशा तऱ्हेचे इतरही काही उपाय आहेत

का?

१७ - पुनर्जन्मासंबंधी कल्पना किंवा त्या संबंधीच्या श्रद्धा आहेत का?

- मृतव्यक्तीच्या स्मारकामध्ये विशेष शक्ती आहे असे मानता का?
- संतांची सिद्धुली वेगळी असते का?
- सैलानीबाबाच्या थडग्यात शक्ती आहे का? त्यांच्या उपासनेमुळे संकटाचे निरसन होते अशी कथा माहित आहे का?

१८) - वेड का लागते? या संबंधी काय कल्पना किंवा समजूती आहेत? त्यावर कशा पद्धतीने उपाय केले जातात?

१९) - मुले का होत नाहीत?

- मुले होण्यासाठी काही उपाय करता का?
- कोणत्या देवतेची आळवणी केल्याने संतान प्राप्ती होते?

२०) - देवतांच्याजवळ चांगली आणि वाईट अशा दोन्ही शक्ती आहेत असे मानता का?

- दुष्ट शक्तींचे दैवतीकरण करतांना त्या देवतांचे स्वप्नात येणे, अपशकुन होणे इत्यादी घटनांचा अनुभव आला आहे का?
- दुर्घटना दुष्ट शक्तींमुळेच घडतात असे वाटते का?

२१) - सामाजिक गुन्हा केलेल्या व्यक्तीचा आत्मा मृत्यूनंतर परत येतो अशी कल्पना आहे का?

- अशा तऱ्हेची कथा माहित आहे का? आत्मा परत आल्याचा अनुभव कुणाला आला आहे का?
- आपले शरीर सोडून आत्मा दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करतो असे

मानता का?

- मृत्यूनंतर आत्मा कुठे जातो? परलोक मानता का? मृत्यूनंतर आत्मा परत येतो का?
- इहलोक, परलोक या दोन्ही मधली अवस्था किंवा मृत्यूनंरतची गती आहे असे मानले जाते का?
- आत्महत्या केलेल्या, अपघाती मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या आत्म्यासंबंधीच्या कल्पना काय आहेत आणि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असतो? या आत्म्यांना गती मिळावी म्हणून काही विधी आहेत का?

२२)

- भुता खेतांचे वागणे, दिसणे, त्यांनी केलेली मदत, या संबंधीच्या कथा आहेत का?
- भुताने पछाडलेली घटना माहित आहे का? भुताने पछाडले हे कसे ओळखता येते? किंवा सोडले हे कसे समजते?
- खोकला, शिंक येणे, जांभई देणे, मोठ्याने आवाज करणे, शीळ घालणे ही झाड सोडल्याची लक्षणे आहेत का?
- भुते कशी दिसतात?
- भुतांच्या लक्षणांसंबंघी आख्यायिका, लोककथा, समजूती आहेत का? भुतांना वेगवेगळी नावे आहेत का?
- भुतांच्या राहण्याच्या किंवा वावरण्याच्या जागा आहेत का? (स्मशान, दफनभूमी, पाण्याच्या जागी, जंगलात, गावात किंवा एखाद्या झाडावर)
- नैसर्गिक मृत्यु झालेल्या व्यक्तीच्या आत्म्याला मुंजा म्हणतात की बळी गेलेल्या व्यक्तीच्या आत्म्याला मुंजा म्हणतात?
- वयात आलेल्या मुलीने विषेशत: पाळी चालू असताना किंवा बाळंतीणीने, नवजात शिशुनेही जाऊ नये अशी काही ठिकाणे आहेत का?

२३) - वाघाने अथवा इतर जंगली जनावराने मारलेल्या (खाल्लेल्या)व्यक्तीच्या आत्म्याशी संबंधित काय माहिती आहे?
- मांजर, वटवाघूळ, घुबड याच्या संबंधात काही समजुती आहेत का?

२४) - ओसाड जागी, खाणीत, गुहेत शक्ती असते असा समज आहे का?
- गावात संध्याकाळी न जाण्याची काही ठिकाणे आहेत का?

२५) - तृतीयपंथी लोकांसंबंधी काय समज आहेत?
- जन्मवेळी बालकाला अतिरिक्त अवयव असल्यास, उदाहरणार्थ नवजाताला सहा बोटे असल्यास आईवडील व इतर संबंधीत किंवा गावकरी त्याला कशा प्रकारची वागणूक देतात? त्याचा स्वीकार करतात की त्याला टाकून दिले जाते?
- खुजेपणाकडे कमीपणाच्या भावनेतून पाहिले जाते का ?

२६) - शुभ अशुभ दिवस किंवा शकुन पाळले जातात का?
- देवाला कौल लावता का?

२७) - सद्गती मिळावी म्हणून अंतीम क्रियेत काही विधी आहेत का?
- मृताबरोबर काही वस्तू दफन केल्या जातात का?
- दहन केल्यानंतर दिवा लावला जातो का?
- सुतक किंवा सोयर पाळले जाते का?
- मुलांना मुंडन करावे लागते का?
- मृताच्या घरातील बायका कुंकू लावतात का?

- मृताचे कपडे घरातील लोक वापरतात, की ते कपडे बाहेर फेकले जातात? सुतकानंतर शुद्धीकरण कसे होते? किंवा शकून पाळले जातात का?
- देवाला कौल लावता का?

२८) - भांडी मंगल किंवा अमंगल असतात का?

२९) - झाडे, दगड, डोंगर, नदी, वृक्ष यांच्या मध्ये आत्मा असतो का? दगडात राहणारे आत्मे आकार बदलतात का?
- वृक्ष, सर्प या देवतांची पूजा करता का? देवराईला काय म्हणतात?
- देवतांशी संबंधीत लाकडे होळीसाठी वापरतात का?
- सिद्धुलीसाठी असे (देवता असलेले) लाकूड वापरता का ?
- वृक्षच देवता आहे असे मानता का? वृक्षाशी लग्न करण्याची प्रथा आहे का?
- कोणत्या जातीच्या सर्पाची पूजा करता? कोणते साप मारता ? कोणते साप सोडून देता?
- सर्पदंशाने मेलेल्या व्यक्तीचा अंत्यविधी कसा करतात? त्या मागे काय धारणा आहे?
- साप कसा पकडता? का पकडता?

३०) - गुप्त धन (जमिनीत गाडलेली संपत्ती) या संबंधी काही कल्पना कथा आहेत का?
- ते मिळवण्यासाठी पूजा, विधी आहेत का ?

३१) - सुफलनासाठी पूजा, विधी आहे का? काही विशेष पूजा आहे का?

३२) - या गावात किती कुळे आहेत, त्यांची नावे काय आहेत?

- पशूंचे नाव असलेली कुळे आहेत का?
- त्या दैवतांचे दैवतीकरण (मूर्ती) झाले आहे का?
- देवता म्हणून स्वीकार करतांना दगडाचा विशिष्ट प्रकार असतो का? त्याला काही आकार दिला जातो का? दगडाला छिद्र पाडतात का?
- दगडाचे कडे तयार केले जाते का? त्याचे स्पष्टीकरण देता येईल का? विशिष्ट शिळेत आत्मा रहातो का?
- एखाद्या दगडाची पूजा एका कुटुंबाने सुरू केल्या नंतर गावातील लोकही त्या देवतेचा स्वीकार करतात का? अशी देवता गावात आहे का?

३३) - नित्य वापरातील वस्तू सूप, केरसुणी, मुसळ, नांगर यांना विशेष अर्थ आहे असे मानले जाते का?

३४) - अग्निपूजेच्या काही खुणा मिळतात का? वेदी किंवा चूल यांचे काही संदर्भ मिळतात का?

- गारगोटीचा दगड वापरून अग्नी तयार केला जातो का?

३५) - प्राणी मंगल किंवा अमंगल असतात का? काही प्राणी दुष्ट असतात असे मानता का? पुढे दिलेल्या प्राणी आणि पक्ष्यांपैकी कोणते प्राणी अथवा पक्षी मंगल किवा अमंगल मानले जातात?

- विशिष्ट मांस यांच्या संबंधात काही कथा आहेत का?

पशू	**पक्षी**	**किटक**	**वृक्ष**
शेळी	कावळा	वाळवी	महुआ
म्हैस		मुंग्या	साल
कुत्रा	कबुतर	शेणकिडे	टिक
हत्ती	कोंबडी	गांडूळ	तुळस

घोडा	मोर	रातकिडा	पिंपळ
डुक्कर	घुबड	काजवे	
	वटवाघुळ	डास (मच्छर)	
		ढेकूण (खटमल	

३६) - चेटूक करणाऱ्याजवळ विशेष शक्ती असते का?

- शक्ती मिळवण्यासाठी विशिष्ट वेळ, स्थळ असावे लागते का?
- विशिष्ट आवाज करण्याची गरज भासते का?
- एखादी व्यक्ती चेटकीण आहे हे कसे समजते?
- समाज त्या व्यक्तीकडे कोणत्या दृष्टिकोणातून पाहातो?

३७) - पेरणी, नांगरणी, कापणी, झोडपणी, मळणी ही सर्व कामे सुरू करण्याआधी काही विधी करण्याची प्रथा आहे का?

- प्रत्येकासाठी स्वतंत्र देवता आहेत का?
- हे विधी करण्याचा उद्देश काय आहे?

३८) - पाऊस वेळेवर पडावा म्हणून काही विधी करता का?

३९) - गुरांच्या संरक्षणासाठी विधी आहे का?

४०) - पिकांच्या संरक्षणासाठी विधी आहे का?

४१) - गूढ अथवा गुप्त विधी आहेत का? विधी केल्याने काय परिणाम होतो?

४२) - स्थानिक वैशिष्ट्ये असणाऱ्या कथा सांगता येतील का?

४७) - होळीच्या उत्सवाच्या वेळी खास त्याच गावातील काही वेगळ्या प्रथा आहेत का?

४८) - या गावात भुमका आहे का? तो काय काम करतो?

- गावातील पुजाऱ्याला काय म्हणतात? त्याची राहाण्याची जागा निश्चित केलेली आहे का?
- भुमक्याचा काय मान असतो? उताऱ्यासाठी किंवा पूजेसाठी त्याला आमंत्रण द्यावे लागते का? भुमक्याला आमंत्रण देण्यासाठी काही विशेष संकेत आहेत का?
- दक्षिणा म्हणून त्याला काय दिले जाते?

४९) - या गावात परिहार आहे का? तो काय काम करतो? अधिक माहिती असल्यास खाली द्यावी?

पशू	**पक्षी**	**किटक**	**वृक्ष**
शेळी	कावळा	वाळवी	महुआ
म्हैस		मुंग्या	साल
कुत्रा	कबुतर	शेणकिडे	टिक
हत्ती	कोंबडी	गांडूळ	तुळस
घोडा	मोर	रातकिडा	पिंपळ
डुक्कर	घुबड	काजवे	
	वटवाघुळ	डास (मच्छर)	
		ढेकूण (खटमल)	

ग्रंथसूची

आत्रे त्रिंबक नारायण (मूळ लेखक केनडी एम्)

१९९०(दुसरी आवृत्ती) गुन्हेगार जाती, पुणे : वरदा.

इंगोले प्रतिमा

२००७ लोकजीवनातील सफलीकरणाचे विधी स्वरूप आणि वैशिष्ट्ये (लोकजीवन आणि लोकसंस्कृती), मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृ ती मंडळ.

उप्रेती हरिचंद्र

२००२ (द्वितीय संस्करण) भारतीय जनजातियाँ संरचना एवं विकास, जयपुर, राजस्थान. हिन्दी ग्रंथ अकादमी:जयपुर.

कर्वे इरावती

२००६ (दुसरी आवृत्ती) संस्कृती पुणे: देशमुख आणि कंपनी

कंगले. र. पं

१९९७ (पुनर्मुद्रण) कौटिलीय अर्थशास्त्र मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

केला भगवानदास

१८७० हमारी आदिम जातिया इलाहाबाद : भारतीय ग्रंथमाला

काळे यादव माधव

१९२४ वऱ्हाडचा इतिहास बुलढाणा : प्रकाशक यादव माधव काळे

कुलकर्णी शैानक

२००७ संस्कृती निसर्गआणि जीवन शैली पुणे : डायमंड पब्लिकेशन्स

कुलकर्णी पी. के. / खैरनार दिलीप

२०१३ समाजशास्त्र परिचय पुणे : डायमंड पब्लिकेशन्स्

खडसे भा. कि.

१९९९ सामाजिक मानवशास्त्र नागपूर : मंगेश प्रकाशन.

गरूड पुराण

प्रेतखंड दिल्ली : मोतीलाल बनारसीदास.

गाडगीळ. स. रा.

१९७४ लोकायत नांदेड : लोकवाङ्मयगृह

गुप्ते रमेश शंकर / कुलकर्णी शे. रा.

१९७५ आग्नेय आशियाचा इतिहास नांदेड : परिमल प्रकाशन.

गारे गोविंद

२००२ महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित (आदिवासी) जमाती पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

गोखले शोभना लक्ष्मण

१९७५ पुराभिलेख विद्या पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

गौतम सुशील

२००४ आदिवासी गढ छत्तीसगढ नई दिल्ली : प्रकाशन विभाग

महाराष्ट्र स्टेट. गॅझेटियर

१९६८ गॅझेटियर मुंबई : महाराष्ट्र स्टेट पब्लिकेशन

चौरे नारायण

१९८७ कोरकू जनजाति का सांस्कृतिक इतिहास नागपुर : विश्वभारती प्रकाशन

१९८९ भारतीय जनजाति कोरकूओं के लोकगीत नागपुर : विश्वभारती प्रकाशन.

डांगे. स. अं.

१९७३ हिंदू धर्म आणि तत्वज्ञान पुणे : श्री लेखन वाचन भांडार.

ढेर. रा. चिं.

२००५ (द्वितीयावृत्ती) श्री विठ्ठल एक महासमन्वय पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

२००२ लोकसंस्कृतीचे उपासक पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

२००७ (तृतीयावृत्ती) लोकदैवतांचे विश्व पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

२००२ दक्षिणेचा लोकदेव श्री खंडोबा पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

१९८८ लज्जा गौरी पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

देशपांडे श्याम

२००९ मेळघाटी सातपुडा पुणे : प्रतीक प्रकाशन

देव शांताराम भालचंद्र

१९७६ पुरातत्त्वविद्या पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन

दुबे शयामचरण अनुवाद प्रकाश देशपांडे / केजकर

२००४ भारतीय समाज नवी दिल्ली : नॅशनल बुक ट्रस्ट

नाडगोंडे गुरूनाथ

२००३ भारतीय आदिवासी पुणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन

नेमाडे भालचंद्र

२०१० हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ मुंबई : पाप्युलर प्रकाशन

पाटिल, अशोक

१९९३ कोरकू जनजीवन (संदर्भ ग्रंथ) नागपुर : विश्वभारती प्रकाशन

पौहार

२००५ कोरकू लोकगीतों का साहित्यिक अध्ययन नागपुर : विश्वभारती प्रकाशन

बऱ्हाटे काशीनाथ

२००७ कोरकू बोली वर्णनात्मक समाजभाषा वैज्ञानिक अभ्यास अमरावती : वाधाबाई सारडा महाविद्यालय

बाबर सरोजिनी

१९८३ आदिवासींचे सण उत्सव पुणे : महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला

भवाळकर तारा

२००५ संस्कृतीची शोधयात्रा पुणे : पद्मगंधा प्रकाशन

भागवत दुर्गा

१९५६ लोकसाहित्याची रूपरेखा मुंबई : मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय

भारतीय संस्कृतीकोश

भोसले द. ता.

२००४ लोकसंस्कृती स्वरूप आणि विशेष पुणे :पद्मगंधा प्रकाशन.

वाडेकर देविदास दत्तात्रय

१९७४ मराठी तत्त्वज्ञानकोश–महाकोश खंड ३ पुणे : मराठी तत्त्वज्ञान–महाकोश मंडळ

मुंडले आशा

१९९५ निहाली माणसं पुणे : समाज शिक्षण माला

मिराशी

१९५७ वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ नागपूर :नागपूर विश्वविद्यालय

मोतीचंद्र, अनुवाद पारधी, एम .के.

२०१० सार्थवाह न्यु दिल्ली: साहित्य ॲक्याडमी.

राऊत श्रीकृष्ण

२००८ मौखिकता आणि लोक साहित्य न्यु दिल्ली : साहित्य अकादमी

शिंदे

२००५ लोकसंस्कृती व नागरसंस्कृती परस्पर अनुबंध (लोकजीवन आणि लोकसंस्कृती) मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

स्वामी, प्रभुपाद

१९८२ श्रीमद्भगवत गीता मुंबई : भक्ति वेदांत बुक ट्रस्ट

वरियर. एल. विन. भाषांतर प्रकाश परिहार

२००७ अक्षारिया नई दिल्ली : राजकमल प्रकाशन.

सानप

२००८ मौखिकता आणि लोकसाहित्य न्यु दिल्ली : साहित्य अकादेमी.

References / Bibliography

Ansari, Dhavalikar M. K.

1979 Essay in Indian Protohistory Delhi: B.R.Publishing Corporation.

Atre Shubhangana

1987 Archetypal Mother Pune: Ravish publishers.

Bhattacharya Sudhibhushan

1972 The Tribal situation In India Delhi: Motilal Banarsidas

Deogaonkar, S. G and S.S Deogaonkar

1942 The Korku Tribles New Delhi: Concept Publishing Company.

Deogaonkar Shashishekhar Gopal, Deogaonkar Leena

2003 Kolam Tribes in Maharashtra Delhi: Concept Publishing Company

Dhavalikar, M. K

1979 Essay in Indian Protohistory Delhi: B.R.Publishing Corporation

1988 The first farmers of the Deccan Pune: Ravish Publishers.

Frazer, James

2000 The Golden Bough London: Octopus Publishing Group.

Fuches, Stephen

1988 The Korkus of the Vindhya Hills New Delhi: Inter India Publcation

Forsyth, J.

1872 Highlands of Central India London: Digitalized by Internet Archive

Ghurey, G. S.

1963 The Scheduled Tribes of India London: Transaction Books

Habib, Irfan

2001 Prehistory Delhi: Tulika Publications

Harrison

1927 Themis Oxford University Press

1990 Third Edition Kinship Organization New Delhi: Munshiram Manoharlal Publishers.

1991 Hindu Society a Interpretation Poona: Deccan College

Khanna, Amarnath

1992 Archaeology of India New Delhi: Clarion Books

Kosambi, Damodar Dharmanand

1962 Myth and Reality Bombay: Popular PrakashaN

2004 An Introduction to the study of Indian History Bombay: Popular Prakashan

Maharashtra State Gazzete

1968 Maharashtra State Gazzete Bombay: Maharashtra State Publication

Nath, Vijendra And Khatri Pavan Kumar

2010 Traditional knowledge of ethno medicinal uses in tribal pockets of Chhindwara African Journal of Pharmacy volume (9).

Ratnagar, Shereen

2006 Second edition Understanding Harappa New Delhi: Tulika Books.

1997 Hunter gatherer and Early Agriculturist (From Tribe to Caste) Delhi: Replika Press

Roy, Burman

2001 Hindu Muslim Syncretic Shines and Communities Delhi: Mittal Publishing

Roy, Sharat Chandra

1911 The Mundas and their Country Calcutta: Asia Publishing House.

Sankalia, H. D

1974 The prehistory and protohistory of India and Pakistan Poona: Deccan College

Sontheimer, Gunther Dietz

1993 Pastoral Deities in Western India Delhi: Oxford University Press.

Shrimali, Krishna Mohan

2007 The age of Iron and Religious Revolution New Delhi: Tulika Books.

Thapar, B. K

1985 Recent Archeological Discoveries in India UNESCO

Thapar, Romila

2002 Early India Noida: Penguin Books

Tokarey, Sergei

1989 History of Religion **Moscow: Progress Publishers**

Tribhuvan, R. D

1999 Tribal Dances of India Delhi: Discovery Publishing House

Troisi, J

Tribal Religion New Delhi: Dhawan Printing Press.